

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशीम येथे मागील १४ वर्षांपासून लोकप्रशासन विभागाचे विभाग प्रमुख म्हणून सेवेत कार्यरत आहेत.ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे लोकप्रशासन विषयाचे एकमेव मान्यता प्राप्त संशोधन मार्गदर्शक आहेत.तसेच ते संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या लोकप्रशासन विषयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून देखील सेवारत आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र लोकप्रशासन परिषदेचे ते कार्यकारी सदस्य म्हणूनही कार्य करत आहेत.

त्यांनी मानवी हक्क व सामाजिक न्याय या संशोधकीय शोध निबंधाच्या ग्रंथाचे संपादन देखील केलेले आहे. त्यांचे १.महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन ,

२.महाराष्ट्र प्रशासनाची रूपरेषा हे दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रकाशित असून ते विद्यापीठीय अभ्यासक्रमास तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांच्या अभ्यासक्रमास उपयुक्त आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या मानव्यविद्या शाखा अंतर्गत लोकप्रशासन विषयातून त्यांना 'महाराष्ट्रातील समाज कल्याण प्रशासन आणि स्वयंसेवी संघटना विशेष संदर्भ पश्चिम विदर्भ ' या संशोधन कार्यासाठी उच्च शिक्षणातील विद्यावाचस्पती ( पीएच.डी.) ही पदवी देखील प्राप्त झालेली आहे.

त्यांनी आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरीय २५ चर्चासत्र आणि परिषदांमध्ये पेपर वाचन केलेले आहे. त्यांचे आत्तापर्यंत विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमधून (जर्नल्समध्ये) विविध विषयांवर १५ शोधनिबंधाचे प्रकाशन झाले असून ते लोकाभिमुख समस्यांचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध आहेत.

डॉ. विलास गायकवाड यांनी संपादित केलेल्या या प्रस्तुत ग्रंथास संशोधक, वाचक व अभ्यासक स्वीकारतीलच, त्याचे स्वागत करतील.

Dayadhan Publishers Group
263, Anudaya, Akola Road, Near Gram Panchayat Office,
Balsond, Hingoli Maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

ISBN :978-93-91097-09-7

आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान | डॉ. विलास आबा गायकवाड (संपादक)

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत
# समाज सुधारकांचे योगदान



डॉ. विलास आबा गायकवाड
(संपादक)

E-book

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान


संपादक

प्रा. डॉ. विलास आबा गायकवाड

लोकप्रशासन विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
वाशिम जिल्हा वाशिम.

**दयाधन पब्लिशर्स ग्रुप,**
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान

© डॉ. विलास आबा गायकवाड

आवृत्ती :- पहिली
प्रकाशक
सौ. मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.
**Mob. No.** 7276193979 / 9604872233
Email Id: - dayadhanpublishersgroup@gmail.com
Website: - http://www.dayadhanpublication.com
मुद्रक
श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.
प्रकाशन दिनांक 17 /09 /2021
**ISBN 978-93-91097-09-7**

किंमत 340/-

टीप:-
प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क **सौ. आनिता दयाराम मस्के** यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.
न्यायाधिकरण:-
जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

# प्रकाशकीय

आज आवश्यकता आहे ती सामाजिक समतेची कारण त्यातूनच सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल. समाजाला ही दिशा समाज सुधारकांनी मिळवून दिलेली आहे. आज भारताबाहेर किती व कसे बदललेले जग आहे. ते जग व ती परिस्थिती सुधारकांना व बुद्धिवाद्यांना मात्र दिसलेली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतभर ब्रिटिशांचे राज्य स्थिरस्थावर होऊ लागले. इंग्रजांनी इंग्रजी भाषा व वेगळी शिक्षणपद्धती आणली आणि सर्व शिक्षण सर्व जातिवर्णांना खुले ठेवले. काही थोडे भारतीय समुद्र पर्यटनाची बंदी (धर्माने घातलेली) झुगारून समुद्रापलीकडे जाऊ लागले. त्यामुळे भारताबाहेरही काही जग आहे अशी जाणीव भारतीयांना नव्याने प्रथमच होऊ लागली. फ्रेंच राज्यक्रांतीने निर्मिलेल्या व नंतर जगभर पसरलेल्या 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' या मूल्यांचे महत्त्व भारतीय सुशिक्षितांना (नवशिक्षितांना) पटू लागले. इकडे भारत देशभर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी, हिंदू धर्मातिक अंधश्रद्धा, अस्पृश्यता व जन्मजात उच्च-नीचता वगैरे अनेक दोषांवर बोट ठेवून जोरदार प्रचार केला. अशा अनेक कारणांनी भारतातील बुद्धिमंत 'आत्मपरीक्षण' करू लागले. त्यामुळे 'देवभक्तीभोवती फिरणाऱ्या संतांच्या स्थितिप्रिय शिकवणुकीचा प्रभाव' कमी होऊ लागून एकोणिसाव्या शतकाने भारताला विशेषत: महाराष्ट्राला मोठे मोठे 'समाजसुधारक' दिले. त्यात राजा राममोहन रॉय (बंगाल), महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, न्यायमूर्ती रानडे अशी किती तरी नावे आहेत, की ज्यांनी भारतीयांच्या आचारविचारांना योग्य पुरोगामी दिशा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले.

स्त्रियांबाबत विधवा विवाह विरोध, जरठ-बालविवाह, स्त्रियांचे अज्ञान, परावलंबित्व, कुचंबणा वगैरे दु:खांची मुख्य कारणे 'स्त्री-शिक्षणाचा अभाव' आणि त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला होणारा अडथळा हीच आहेत हे ओळखून महात्मा फुले, महर्षी कर्वे वगैरे थोर समाजसुधारक स्त्री-शिक्षणासाठी जन्मभर झिजले. सनातन्यांचा विरोध आणि जननिंदा सोसूनही त्यांनी महाकठीण कर्म केले. आज भारतात जवळजवळ सर्वच क्षेत्रांत सुशिक्षित स्त्रिया कार्यरत आहेत ते या सुधारकांच्यामुळेच होत. स्त्री - शिक्षण संकल्पनेत स्त्री - पुरुषांतील समानता ही कटाक्षाने अभिप्रेत होती. 'चूल आणि मूल' यात स्त्रीचे आयुष्य बंदिस्त करून ठेवणे हा सनातनी अन्याय सुधारकांना मान्य नव्हता.

लोकांना 'स्वधर्मपालनाच्या नावाखाली' आपापल्या जाती-वर्णाची कर्तव्ये करीत आयुष्य व्यतीत करा, असे सांगितले होते. स्वधर्म शब्दाचा त्यांचा अर्थ वर्णधर्म किंवा जातीधर्म हाच होता. वर्णयोग्य धर्मपालन हे त्या काळी परमार्थाचे साधन मानले जात होते. संतांनी परमार्थाचा अधिकार सर्व जाती-वर्णांना व स्त्री-पुरुषांना बहाल केला खरा; परंतु 'वर्णजातिव्यवस्था व स्पृश्यास्पृश्यता या ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत व त्या अन्यायकारक आहेत म्हणून त्या झिडकारल्या पाहिजेत'

हे सत्य जे संत कधीच सांगू शकले नाहीत ते अखेरीस एकोणिसाव्या शतकातील सुधारकांनी ठणकावून सांगितले. शेकडो वर्षे हिंदू धर्मात प्रस्थापित झालेल्या या व्यवस्था हे हिंदू धर्माचे गुण नसून ते त्यातील दोष आहेत, असे प्रथम सांगितले ते सुधारकांनीच होय.

ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज वगैरे नवविचारांवर आधारलेल्या सामाजिक चळवळींनी एकोणिसाव्या शतकात जातिसंस्थेवर आणि स्पृश्यास्पृश्यतेवर प्रखर हल्ले केले. अशा नवसमाजांचे काम विसाव्या शतकात बुद्धिवाद्यांनी चालू ठेवले. संतांनी आध्यात्मिक समतेचे पहिले पाऊल तरी टाकले असे जरी म्हणता येईल, तरी त्यामुळे ना जातिभेद शिथिल झाले, ना अस्पृश्यता कमी झाली, ना वंचितांचे दु:खनिरसन झाले, ना समाजजीवनाला मानवतावादी वळण लागले. हे सर्व करून दाखविले, ते सुधारकांनीच होय.

प्रामाणिक विचार करणाऱ्या सर्वांना आता ही गोष्ट पटलेली आहे की, आजच्या काळाला आध्यात्मिक समता उपयोगाची नाही. कारण ती केवळ कल्पित परमार्थासाठीची समता आहे. त्यात इहलोकी लागणारी ‘रोटी, कपडा और मकान’ येत नाहीत. त्यामुळे आज आवश्यकता आहे ती सामाजिक समतेची. कारण त्यातूनच सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल. समाजाला ही दिशा सुधारकांनी मिळवून दिलेली आहे, संतांनी नव्हे. आज स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेप्रमाणे कुठल्याही जाती-पंथाच्या व्यक्तीला हवे ते शिक्षण मिळू शकते. कुठल्या जाती-वर्णाच्या माणसाने कुठला व्यवसाय करावा यावर काहीही बंधने नाहीत. प्रत्येक व्यक्तीला आपापले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. स्त्रीला व्यवहारात बरोबरीचा दर्जा, व्यवसायाची समान संधी व समाजात स्वतंत्र स्थान मिळत आहे. परंपरेने तिच्या पायात अडकवलेल्या बेडय़ा तुटल्या आहेत. जातींच्या संस्था व त्यांचे काही उपद्रव (उदाहरणार्थ बहिष्कार) अजूनही टिकून आहेत; पण शहरी, निमशहरी वातावरणात तरी आंतरजातीय विवाह होत आहेत. जातिसंस्था किंवा कोणीही त्यांना रोखू शकत नाहीत. सामाजिक व्यवहारात कुणी कुणाला जात विचारीत नाही. कुणी कुणाचा अपमान करू धजत नाही. आपली योग्य दिशेने एवढी वाटचाल संतांमुळे नव्हे, तर सुधारकांमुळे झालेली आहे; फुले, आगरकर, सावरकर व आंबेडकर यांच्यामुळे झालेली आहे.

आज आपल्या देशापुढे किती तरी कठीण प्रश्न उभे आहेत. लोकसंख्येची बेसुमार वाढ होत आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार फोफावत आहे व त्यावर काही उपाय सापडत नाही. बहुतांश जनतेत शिक्षणाचा व विज्ञानाचा प्रसार होत असूनही, जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा मात्र अंगीकार होत नाही. अतिदूरच्या ग्रामीण भागात आणि तळागाळातील लोकांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा व प्राथमिक सोयीसुविधांचासुद्धा अभाव आहे. अशा निरक्षरतेचे व अशा विषमतेचे, दारिद्र्याचे निर्मूलन होणे आवश्यक आहे.

विचार केला तर असे दिसून येते की, आपल्या अनेक कठीण समस्यांची मूळ कारणे आपल्या वृत्तीत दडलेली आहेत. आपली प्रचंड लोकसंख्यावाढ, आपले अज्ञान व दारिद्र्य यामुळे होत आहे. मुले ही देवाची देणगी मानल्यामुळे आम्ही कुटुंबनियोजनाच्या विरोधात आहोत. या प्रचंड लोकसंख्येच्या हवा, अन्न, पाण्याची काळजी ईश्वर घेईल, असे आपल्याला वाटते. आपण भ्रष्टाचार

करण्याच्या मोहाला स्वत:च बळी पडतो आणि मग अमुकतमुक देवाच्या दर्शनाने व काही दान करून प्रायश्चित्त घेतो, आपण यातून पापमुक्त झालो असे मानतो व पुढचा आणखी एक भ्रष्टाचार करायला मोकळे होतो. तळागाळातील लोकांचे दारिद्र्य व निरक्षरता ही त्यांच्या पूर्वजन्मींच्या कर्मामुळे आहेत असे आपण मानतो. देवच प्रत्येकाचे सुख-दु:ख व भाग्य ठरवीत असल्यामुळे जे जे घडेल ते आपण फक्त पाहत राहावे, असे आपण मानतो. गुरू, बुवा, बाबा अशांच्या चमत्कारांवर आपण विश्वास ठेवतो. काळ व परिस्थितीप्रमाणे बदलण्यास आपण तयार नसतो. आपले आजचे बहुतेक राजकीय नेते स्वत: 'अंधश्रद्ध' आणि 'प्रतिगामी' विचारांचे असतात. त्यांना शाळा, शिक्षण, समाजसेवा, हॉस्पिटल यांपेक्षा प्रचंड देऊळ बांधणे, त्यावर सोन्याचा कळस चढविणे आणि/किंवा धार्मिक कार्यक्रमांमध्ये मिरविणे हे महत्त्वाचे वाटते. आपण वृत्तीने अजूनही अंधश्रद्ध, दैववादी आणि परंपराप्रिय आहोत. इंग्रजांच्या दास्याच्या शृंखला तोडून आपणाला आज ७४ वर्षे झाली खरी; परंतु आपल्याच विकृत सनातनी वृत्तींच्या शृंखला तोडण्यात आपण यशस्वी होऊ तेव्हाच आपण खरे स्वतंत्र होऊ, मुक्त होऊ.

सुधारकांचा व बुद्धिवाद्यांचा काळ एकोणीस व विसावे शतक असा आहे. आज भारताबाहेर किती व कसे बदललेले जग आहे ते जग व ती परिस्थिती सुधारकांना व बुद्धिवाद्यांना दिसलेली आहे व त्यांनी ती लक्षात घेतलेली आहे. आधुनिक विज्ञानाच्या अनेक शाखांतील आश्चर्यकारक शोध आणि जगाची औद्योगिक आणि तंत्रज्ञानविषयक प्रगती या गोष्टी सुधारकांच्या आणि बुद्धिवाद्यांच्या काळात घडलेल्या आहेत. अशा अनेक कारणांमुळे आपले आजच्या जीवनातले प्रश्न सुधारकांना चांगले कळलेले आहेत. त्यामुळे आता सुरू असलेल्या एकविसाव्या शतकात आपल्या देशाच्या सव्वा अब्ज जनतेच्या सुखासाठी व प्रगतीसाठी आपण सुधारकांच्या व बुद्धिवाद्यांच्या 'मानवतावादी आणि चैतन्यमय' मार्गाने पुढील वाटचाल केली पाहिजे.

प्रस्तुत संपादित ग्रंथासाठी महाराष्ट्रभरातील विविध विषयाच्या, विद्याशाखांच्या संशोधक, सहाय्यक, सहयोगी आणि प्राध्यापक मार्गदर्शकांनी अतिशय कमी वेळात आपले लेखन प्रकाशनासाठी उपलब्ध करून दिले त्याबद्दलही मी सर्व सन्माननीय लेखक मान्यवरांचे आणि संपादक महोदयांचे मनःपूर्वक ऋण व्यक्त करते. आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान या संपादित ग्रंथाचे संपादन करण्याचे मत कठीण कार्य मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशीम येथील लोक प्रशासन विभागाचे विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक डॉक्टर विलास आबा गायकवाड सर यांनी स्वीकारले आणि यशस्वीपणे पूर्ण केले हे नमूद करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

या संपादित ग्रंथाचे आपण सर्व वाचक, संशोधक, प्राध्यापक आणि मित्रवर्य याचे स्वागत करालच या अपेक्षेसह याठिकाणी थांबते.

**सौ. आनिता दयाराम मस्के**

# संपादकीय

'आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारकांचे योगदान' हा संपादित ग्रंथ विद्यार्थी व वाचकांच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.भारताला स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुरोगामी आणि सुधारणावादी चळवळीचा इतिहास आहे. या चळवळीमध्ये अनेक विद्वान , महापुरुष व समाजसुधारक यांचे योगदान लाभले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे भारताच्या जडणघडणीचा पाया मजबूत झालेला आहे.या सर्वांच्या कामाचा लेखाजोखा विस्तृतपणे मांडता यावा यासाठी या संपादीत ग्रंथाचे प्रयोजन करण्यात आले होते.

प्रस्तुत संपादित ग्रंथामध्ये अनेक संशोधक, प्राध्यापक ,विद्यार्थी यांनी आपले विविध समाजसुधारक यांच्या कार्यावरील विचार प्रकरणाच्या माध्यमातून दिलेले आहेत.भारतीय शिक्षणाचा व आरक्षणाचा पाया रचणारे राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले ,सावित्रीबाई फुले ,भारतीय रुढी परंपरा यातून भारतीय समाजाला पुढे घेऊन जाणारे व शिक्षणाचे महत्त्व सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सद्गुरू संत सेवालाल महाराज, आधुनिक मुंबईचे शिल्पकार नाना उर्फ जगन्नाथ शंकर शेठ, मध्ययुगीन भारतातील समाज सुधारक महात्मा बसवेश्वर, आधुनिक महाराष्ट्रात सामाजिक जनजागृती करणारे गोपाळ गणेश आगरकर, साहित्याच्या माध्यमातून समाज जागृती करणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे ,राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल,सत्य व अहिंसेच्या मार्गाने भारतीय स्वातंत्र्य लढा देणारे महात्मा गांधी, कुशल राजनीतिज्ञ, महान योद्धा आणि प्रभावशाली शासक महाराणी अहिल्याबाई होळकर, उत्कृष्ट राष्ट्रनिर्माण चे विचार देणारे मदन मोहन मालवीय, 'एक गाव एक पाणवठा' चे प्रणेते बाबा आढाव, भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ.गोविंद सदाशिव धुर्ये,पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार लोकहितवादी, राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतर देशोन्नती साठी स्वतःला आजन्म वाहून घेणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, समाज सुधारणेचा वसा घेणारे ईश्वरचंद्र विद्यासागर,महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण ,बहुआयामी व्यक्तिमत्त्व डॉ.पंजाबराव देशमुख, शासकाने राज्य कसे करावे हे सांगणारे कौटिल्य, रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज घडविणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ ,आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती ,पहिले भारतीय समाज सुधारक राजाराम मोहन राय , इंडो अंगलिकन चे चित्रण करणारे मनोहर माळगावकर व इतर समाज सुधारक यांचे सामाजिक ,आर्थिक ,शैक्षणिक ,राजकीय व राष्ट्र निर्माणाचे कार्य या ग्रंथात एकत्रित बांधण्याचे काम या ग्रंथाच्या माध्यमातून करणे अधिक सोपे झाले आहे.भारतीय समाजसुधारकांचा अभ्यास करताना प्रस्तुत संपादित ग्रंथ निश्चितच उपयोगी येईल याची खात्री व विश्वास आहे.

प्रस्तुत संपादित ग्रंथासाठी लेखन करणारे माझे सर्व तमाम महाराष्ट्रातील वरिष्ठ प्राध्यापक मित्र ,प्राध्यापक भगिनी ,सहकारी ,संशोधक विद्यार्थी यांनी लिखाण केले त्याबद्दल त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. त्यांच्याशिवाय हा ग्रंथ पूर्ण होऊच शकला नसता. मला सदरील संपादित ग्रंथ निर्माण

करण्यास प्रेरणा देणारे माझ्या मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे सर संस्थेचे सन्माननीय सचिव व इतर सदस्य ,माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि माझे प्राध्यापक मित्र यांच्या प्रेरणेमुळे व आशीर्वादामुळे हा संपादित ग्रंथ निर्माण करता आला.

सर्वात महत्वाचे म्हणजे या संपादित ग्रंथाच्या प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी घेणारे माझे स्नेही ,मित्र ,विषयबंधू दयाधन पब्लिकेशन, हिंगोलीचे प्रकाशक, उत्कृष्ट वक्ते, मार्गदर्शक,आदर्श महाविद्यालय हिंगोली येथील लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ. दयाराम मस्के यांनी प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी घेतली व वेळेत पार पाडली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.प्रस्तुत संपादित ग्रंथास संशोधक ,वाचक स्वीकारतील व त्याचे स्वागत करतील अशी आशा व्यक्त करतो . धन्यवाद…!

आपलाच,

प्रा. डॉ. विलास आबा गायकवाड,

दिनांक १७/०९/२०२१

# अनुक्रमणिका


| अ. क्रं. | शीर्षक | लेखक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | समाज परिवर्तनात सावित्रीबाई चे योगदान व साहित्य | प्रा. डॉ. मीना भगवानराव बोर्डे | १-५ |
| २ | गोर बंजारा समाज: विशेष संदर्भ श्री सद्गुरु संत सेवालाल महाराज | डॉ. बंजारा दिलीप लालू | ६-९ |
| ३ | आधुनिक मुंबईचे शिल्पकार नाना उर्फ जगन्नाथ शंकर शेठ | प्रा. डॉ. सुनील दत्त एस गवरे | १०-१५ |
| ४ | मध्ययुगीन भारतातील समाजसुधारक "श्री महात्मा बसवेश्वर महाराज " | प्रा.डॉ.सिध्देश्वर शेटकर | १६-२२ |
| ५ | गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक विचार | प्रा.डॉ. विकास बी. चांदजकर | २३-२७ |
| ६ | महिला विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान | प्रा. डॉ. मीना भगवानराव बोर्डे | २८-३२ |
| ७ | राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य व बहुजनांसाठीचे शैक्षणिक कार्य | सहा. प्रा. ज्ञानेश्वर सुभाष कव्हर | ३३-३६ |
| ८ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे दलित साहित्य आणि कार्य | सहा. प्रा. सचिन रवींद्र इंगोले | ३७-४० |
| ९ | राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार - सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. डॉ. गौरव गोविंदराव जेवळीकर | ४१-४५ |
| १० | महात्मा गांधीचे सत्य व अहिंसा संबंधीचे विचार | डॉ. आर. जी. बोंडे | ४७-५० |
| ११ | एक महान योद्धा...कुशल राजनीतिज्ञ...आणि प्रभावशाली शासक महाराणी अहिल्याबाई | प्रा. कु. पल्लवी र. देशमुख | ५१-५३ |
| १२ | महामना पंडित मदन मोहन मालवीय यांचे समाज कार्यातील योगदान. | प्रा. पूजा हिरामण गांगोडे | ५४-५७ |
| १३ | आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारक डॉ बाबा आढाव यांचे योगदान | डॉ प्रविण मानसिंग कांबळे | ५८-६२ |
| १४ | राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार आणि आजची परिस्थिती | प्रा. डॉ. बन वशिष्ठ गणपतराव | ६३-७१ |
| १५ | भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. गोविंद सदाशिव धुर्ये यांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार | प्रा. राजेश नारायण इंगोले | ७२-७९ |
| १६ | पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार - लोकहितवादी | डॉ. नवनाथ रासकर | ८०-८३ |
| १७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज: एक समाजसुधारक | प्रा. रजनी आनंदराव काळे | ८४-८९ |
| १८ | ईश्वरचंद्र विद्यासागर : समाजसुधारणेचा महामेरु | डॉ. आश्लेषा मुंगी | ९०-९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सशक्तिकरण | डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव | ९४-९९ |
| २० | यशवंतराव चव्हाण यांचे कृषिक्षेत्रातील योगदान | डॉ प्रवीण भास्करराव हाडे | १००-१०६ |
| २१ | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | प्रा. सुधीर ना. देशमुख | १०७-११० |
| २२ | कौटिल्याचे अर्थशास्त्र | डॉ. जयश्री दिघे | १११-११४ |
| २३ | गांधीजींचे विचार आणि भारतीय संविधान | डॉ. अतुल पूंजाजी राऊत | ११५-११९ |
| २४ | कौटिल्याच्या भ्रष्टाचारासंबंधी विचारांची प्रासंगिकता | डॉ.संजय भालेराव | १२०-१२४ |
| २५ | आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका | प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार | १२५-१३० |
| २६ | राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जीवन व कार्य | प्रा. डॉ. सुनिता तुकाराम राठोड (गोरे) | १३१-१३५ |
| २७ | महात्मा गांधी: सत्याग्रह चळवळ आणि स्वातंत्र्य एक दृष्टिक्षेप | डॉ. प्रा. कारभारी लक्ष्मण भानुसे | १३६-१४0 |
| २८ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | १४१-१४६ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गोवंश हत्या संदर्भात धर्मचिकित्सा | विजय ज्ञानोबा साळवे | १४७-१५२ |
| ३० | पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य | डॉ. आर. व्ही. मोरे | १५३-१५६ |
| ३१ | महात्मा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य | डॉ. बावलगावे सी. एम. | १५७-१६२ |
| ३२ | महात्मा ज्योतिबा फुलेः विचार आणि कार्य | प्रा. डॉ. डी. के. खोकले | १६३-१६९ |
| ३३ | अण्णा भाऊ साठे: समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे पाईक | प्रा. डॉ. भालेराव सुधाकर नारायण | १७०-१७५ |
| ३४ | शिवकालीन प्रशासन | प्रा. डॉ. बिडवे टी .एस | १७६-१८२ |
| ३५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार हितांचे रक्षण | प्रा. उद्धव शिवाजी जमधाडे | १८३-१८५ |
| ३६ | राजर्षी शाहू छत्रपती यांचे शैक्षणिक विचार | डॉ. बाळासाहेब मुळिक | १८६-१९१ |
| ३७ | आधुनिक भारताच्या जडणघडणीत, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री-शिक्षणाकरिता महात्मा फुले यांचे योगदान | सहा. प्रा. यु. एस. बनकर | १९२-१९५ |
| ३८ | राजश्री शाहू महाराजांचे स्त्रियांविषयीचे कार्य | डॉ.देवानंद सखाराम अंभोरे | १९६-२०४ |
| ३९ | महात्मा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे | २०५-२१३ |
| ४० | राजा राममोहन राय यांचे स्वातंत्र्य विषयक विचार | प्रा. दत्तात्रय मुकुंदराव ढवारे | २१४-२१७ |
| ४१ | महात्मा ज्योतीराव फुले यांचे राजकीय विचार | प्रा. एस. एस. तायडे | २१८-२२४ |
| ४२ | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक -एक विज्ञानवादी जीवनमार्ग.... | प्रो. भगवान वाघमारे | २२५-२३२ |
| ४३ | छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवचरित्र व राष्ट्रीय एकात्मता | प्रा. माणिक डोखळे | २३३-२३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | गो. ग. आगरकरांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत योगदान | डॉ. विष्णू नामदेव लांडे | २३८-२४३ |
| ४५ | महात्मा जोतीराव फुलेचे शिक्षणाबाबतचे विचार : एक आढावा | प्रा. सुभाष पवार | २४४-२४७ |
| ४६ | दयानन्द सरस्वती - आर्य समाज के संस्थापक व समाज-सुधारक | गणेश कुमार सोपानराव पेठकर | २४८-२५९ |
| ४७ | महात्मा गांधी के विचारों की वर्तमान युग में प्रासंगिकता | डॉ. दीपक राघोजी दामोदर | २६०-२६८ |
| ४८ | कौटिल्य के राज्य संबंधी विचार | डॉ. अतुल नारायण खोटे | २६९-२७२ |
| ४९ | महात्मा बसवेश्वर के वचन साहित्य में स्त्री दर्शन | सहा. प्रा. शिवकुमार उस्तुर्गे | २७३-२७५ |
| ५० | डॉ. अंबेडकर और सामाजिक न्याय | प्रा. डा. बंडू एस. मानवटकर | २७६-२७९ |
| ५१ | Dr. B. R. Ambedkar: Women Empowerment in India | Chaitanya Ajabrao Ghuge and Unmesh Ajabrao Ghuge | २८०-२८३ |
| ५२ | Raja Ram Mohan Roy - The Indian Renaissance | K.M. Ranjalkar | २८४-२८७ |
| ५३ | Manohar Malgaonkar's depiction in Indo-Anglican Fiction | Dr.Prachi Sharad Patharkar, | २८८-२९१ |
| ५४ | Father of the Nation Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar Struggle and Coordination | Mr. Amardeep R. Jadhao, Dr. Pramod S. Phatak | २९२-२९६ |
| ५५ | Biography of Punyaslok Rajmata Ahilyadevi | Kiran F. Shelke and Adinath D. Badar | २९७-३०१ |
| ५६ | Maharaja Sayajirao Gaikwad: The forerunner of Grand Literary Movement. | Prof. Dr Balvant Patil | ३०२-३०९ |

# १. समाज परिवर्तनात सावित्रीबाईचे योगदान व साहित्य

**प्रा. डॉ. मीना भगवानराव बोर्डे**
जालना समाजकार्य महाविद्यालय रामनगर,जालना.

**प्रस्तावना:**

सावित्रीमाई फुले प्रतिभाशाली कवीयत्री उत्तम अध्यापिका, निस्वार्थी समाजसेविका महात्मा फुले यांच्या मूत्यूनंतर सत्यशोधक समाजाच्या नेतृत्व करणाऱ्या महान नेत्या होय.वकृत्वसंपन्न, परिवर्तनवादी व्यक्मित्व ही त्यांची खास ओळख.सावित्रीबाईनी स्त्रीयांना शिक्षण देण्यासाठी घराच्या उंबारठयाबाहेर ठाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनची सुरुवात होय.ज्योतीबा सोबत कार्य करत असतांना त्यांना समाजाचा खूप त्रास सहन करावा लागला.त्यांना त्यांचे घर ही सोडावे लागले परंतू त्यांनी त्यांचे कार्यात खंड पडू दिला नाही.शिक्षणामुळे व्यक्तीला मनुष्यत्व येते पशूत्व हटते  हा विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडंणाऱ्या सावित्रीमाई खरे शिक्षणतंज्ञ होय.

❖ **समाजपरिर्वतनात सावित्रीमाई फुले यांचे योगदान-**

महात्मा ज्योतीबांनी पहिली मुलीची शाळा १८४८ ला भिडयाच्या वाडयात सुरु केली.शाळेत अध्यापनाचे कार्य मोठया निष्ठेने व समाजातील लोकांचा होणारा विरोध शिव्या शाप अंगावर शेण मातीचे व दगडाचा मारा करत परंतु त्या आपल्या कामात मागे सरले नाहीत.सावित्रीमाई व ज्योतीबांची परिस्थिती हालाखीची होती.स्व:ची खाण्या पिण्याचे हाल अशा परिस्थितीत इ.स.१८६३ ला राहत्या घरात बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना केली.तेथे येणारे प्रत्येक स्त्रीचे बाळंतपण सावित्रीमाई फुले यांनी पोटच्या लेकीप्रमाणे केले असे ज्योतीबांनी आपले मृत्यपत्र करुन ते उपनिंबधकाच्या कार्यालयात नोंदविले त्यात ते मोठया अभिमानाने नमून करतात.याच बालहत्या प्रतिबंधक गृहातील काशीबाई नावाच्या स्त्रीचा मुलगा दत्तक घेतला त्याला डॉक्टर बनविले.त्याचे नांव यशवंत.ब्राम्हण विधवाच्या केशवनाविरुध्द नाभिकांना संघटीत करुन त्यांचा संप घडवून आणण्याचा कल्पक उपक्रम दीनबंधू चे संपादक कामगार नेते नारायण लोंखडे यांनी घडवून आणला त्यामागची प्रेरणा या सावित्रीबाईच होत्या.सावित्रीबाईने महिला सेवा मंडळाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मिसेस जोन्स होत्या कार्यक्रम पत्रिकेत त्यांनी सर्व जाती धर्माच्या बायकांना हळदी कुंकवाच्या

कार्यक्रमासाठी बोलविले व लेकी सुनांना घेऊन यावे तसेच सर्व स्त्रीयांना एका जागेवर बसविण्यात येईल अशी परिवर्तनवादी पत्रिका छापली त्यातून परिवर्तनवादी भूमिका व विचार दिसून येतात.

सावित्रीमाईचा पोशाख तात्याप्रमाणेच साधा होता त्यांच्या अंगावर अंलकार नसत.गळयात एक पोत आणि मंगळसूत्र असे.कपाळावर भलमोंठ कुंकू लावलेले असे.स्व:तच करीत व त्यांची खाण्याची आणि प्रकृतीची त्या फार काळजी घेत. ज्योतीबा सावित्रीमाईला बोलतांना अहो जाहो करत या बहुमानदर्श शब्दांनी हाका मारित असत .सावित्रीमाई उत्तर आयुष्यात तात्यांना शेटजी म्हणत.त्या दोघात पती पत्नीचे खरे प्रेम होते.सावित्रीबाईनी नको म्हटले काम तात्या कधीही करत नसत.सावित्रीमाई सुविचारी आणि दूरदृष्टीच्या होत्या त्यांच्या विषयी सर्वांना आदर होता. ज्योतिबाच्या मृत्यूनंतर यशवंत हा दत्तक पुत्र असल्याने भावकीने वाद करायाला सुरुवात केली.त्यावेळेस सावित्रीमाई पुढे आले व पतिच्या प्रंतापुढे टिटवे धरले व पतिला अग्नी दिला इतिहासात प्रथमच स्त्रीने पतीला अग्नी दिला होता.खरे तर ती परिवर्तनाची सुरुवातच होती.ज्योतिबाच्या मृत्यूनंतर सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व सावित्रीमाईने केले.शेवटपर्यंत त्या काम करत राहिले.प्लेगच्या साथीत लोकांचे जीव वाचवण्याची धडपड १८९३ मध्ये सासवड येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेचेअध्यक्षस्थान सावित्रीमाईने भूषविले.१८९७ साल उजाडले तेच प्लेगचे थेमान घेऊनच पुणे शहरात शेकडो माणसे मरु लागली.सरकारने रँड अधिकाऱ्याचे नेतृत्वाखाली प्लेगचा बंदोबस्त करण्याच काम हाती घेतले.सावित्रीमाईने डॉ.यशवंताला रजा काढून बोलावून घेतलं.आणि हडपसर महंमदवाडीला ससाण्यांच्या माळरानावर त्यांनी यशवंताला दवाखाना घालायला लावला.त्या स्व:त आजारी माणसांना उचलून दवाखान्यात आणीत त्यांच्यावर उपचार करीत प्लेग हा संसर्गजन्य आजार आहे त्यांना माहित होते.त्यांनी रुग्णांची सेवा केली. मुंढवा गावाच्या गावकुसाबाहेर महारवाडयात पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुलाला प्लेगची लागण झाल्याचे कळताच सावित्रीमाई तिकडे गेले व मुलाला पाठीवर घेऊन पायी आठ किलोमीटर प्रवास करुन दवाखन्यात पोहचल्या यातच त्यांना प्लेगची लागण झ ाली.१० मार्च १८९७ ला रात्री ९ च्या सुमारास त्यांचा प्लेगमुळे मृत्यू झाला. सावित्रीबाई फुले १८४८ ते १८९७ अशी सलग ५० वर्ष लोकांसाठी राबत होत्या.सेवा आणि करुणेचा एक अनोखा आदर्श त्यांनी घालून दिला.बालहत्या प्रतिंधक गृह, सत्यशोधक विवाह, दुष्काळात १००० गरिब मुलांचे संगोपन करणे आणि ब्राम्हण विधवाच्या केशवनाविरुध्द नाव्यांचा संप घडवणे या कामात सावित्रीमाईने नेतृत्व केले.

### ❖ सावित्रीमाई फुले यांनी लेखन केलेले साहित्य:-

प्राचीन मध्ययुगीन कालखंडाचा इतिहास सांगून पेशवाईच्या रावबाजीचे व किडल्यासडल्या समाजाचे विदारक चित्रण केले आहे.यानंतर ज्योतिरांवानी त्या परिस्थितीवर कशी मात केली.आणि शुद्रांतिशुद्रांसाठी त्यांनी आपले सर्वस्व कसे अर्पण केले याचे काव्यमय विवेचन आहे.

- ❖ काव्यफुले-कवितासंग्रह १८५४
- ❖ ज्योतिबांची भाषणे संपादक सावित्रीबाई फुले २५ डिंसेबर १८५६ .
- ❖ सावित्रीबाईचे पत्रे
- ❖ मातृश्री सावित्रीबाईची भाषणे १८९२
- ❖ बावनकक्षी सुबोधरत्नाकर १८९२

वरिल सर्व वाङःमय १९४ पृष्ठांच्या सावित्रीमाई फुले संमग्र वाङःमय या ग्रंथात एकत्रित करण्यात आले आहे.त्याचे संपादन डॉ.मा.गो.माळीने केलेआहे.तर या ग्रंथाला सुप्रसिध्द तत्वज्ञ डॉ.नरेंद्र बारलिंगे यांनी प्रस्तावना दिली आहे.

i. काव्यफुले हया १८५४ साली प्रकाशित झालेल्या सावित्रीमाईच्या पहिल्या काव्यसंग्रहात एकूण ४१ कविता आहेत.त्यात निसर्गकविता, सामाजिक बोधपर आणि ऐतिहासिक कविता आहेत.

ii. ज्योतिबाची भाषणे हे पुस्तक सावित्रीमाईंनी संपादीत केलेले असून त्यांचे शब्दाकंन चार्लस जोशी यांनी केलेले आहे.हे पुस्तक १५ डिंसेबर १८५६ रोजी प्रस्धि्द करण्यात आले असून त्यात ज्योतीरांवाची ४ भाषणे आहेत.

iii. सावित्रीमाईंनी ज्योतिरांवांना लिहलेली पत्रे एकूण ३ (तीन) असून ती नायगांव व ओतूरहून लिहलेली आहे.

iv. सावित्रीमाईची भाषणे या पुस्तकात उधोग, विधादान ,सदाचरण, व्यसने, कर्ज या विषयावरिल त्यांची भाषणे शास्त्री नारो बाबाजी महाघट, पानसरे पाटींल यांनी संपादीत करुन १८९२ साली वत्सल बडोदा प्रेस येथून प्रकाशित केलेली आहेत.

v. बावनकशी सुबोध रत्नाकर, या कवितासंग्रहात देशाचा इतिहास काव्यरुपाने सांगितला असून ज्योतिरांवाच्या कार्याचे चित्रण त्यात केले आहे.यात सलग ५२ रचना आहेत.हे काव्य ज्योतीरावांच्या मृत्यूनंतर १८९१ साली केले.असून पुस्तकरुपाने १८९२ साली प्रकाशित करण्यात आले. १८५४ साली काव्यफुले हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला.हयाचे

काव्यफुले हे नांव अतिशय समर्पक होते.या नावात गुंफलेले फुले हा शब्द एकाचवेळी दोन गोष्टी स्पष्ट करतो.फुले हे त्यांचे घराण्याचे नांव वडिलोपार्जित फुलांचा व्यवसाय सावित्रीचे भावविश्व फुलांनी बहरुन गेले. पिवळा चाफा, जाईची फूल ,जाईची कळी, गुलाब फुल आदि त्यांच्या कवितांच्या शीर्षकावरुन लक्षात येते.या संग्रहातील फुलाविषयीच्या कवितांचा अविष्कार अंत्यत आधुनिक आहे.अविष्कार पध्दती आधुनिक मराठी काव्यात फार पूर्वीपासून होती व तिचा उगम सावित्रीबाईचे तारुण्यसुलभ कवितेत होते.

**कोण कुठली कळी फुलांची,  जुनी विसर नवीन पाही**
**रीत जगाची उत्सृंखल ही, पाहूनियामी स्तिमिंत होई.**

या कवितेतून मानवी नराच्या भ्रमरवृत्तीवर प्रतिकरुपाने प्रकाश पाडालाआहे.स्त्रीशोषण व पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रहार केला आहे.

**रुप तियेचे करी विच्छिनन, नकोसे केले निडाला त्याने**
**शोधून काही मध तिथेचा, चिपाड केले तिला तयाने.**

या कवितेतून मानवी भावभवनांचे दिग्दर्शन निसर्ग प्रतिकातून सावित्रीमाईने अचूकपणे व समर्थपणे करते.या संग्रहातील काही कविता हया शिक्षकी पेशातून निर्माण झालेल्या आहेत.ज्योतिरावांच्या सम्यक विचारातून स्फुरलेल्या आहेत.स्वागपर, पथ ,बोलली बाहुली, सदाकि, पध श्रेष्ठ, धन, शिकनेसाठी जागे व्हा या कविता शिक्षणासंबधित आहे.ज्योतिबांना नमस्कार ज्योतिबांचा बोध व सावित्री ज्योतिबा संवाद या कवितेतून त्यांची पार्श्वभूमी व नाटय अतिशय प्रभावी आहे.

**काळरात्र गेली अज्ञान पळाले, सर्वा जागे केले सुर्याने**
**शुद्र या क्षितीजी, ज्योतिबा हा सुर्य, तेजस्वी अपूर्व उगवला**

अशी ज्योतीरांवाना ज्ञानसूर्य मानणारी महान कवयित्री अठराव्या शतकातील प्रेरक व प्रेरणादायी कवयित्री होती.१८९२ साली ज्योतीरावांच्या पश्चात सावित्रीबाईने ज्योतिरावांचे एक पधमय चरित्र लिहले आहे.त्यांचे नांव बावनकक्षी सुबोध रत्नार हा काव्य चरित्रग्रंथ दस्तुरखुध्द सावित्रीमाईनेच लिहिले आहे.फुले चरित्राबाबत तो अंत्यत विश्वसनीय दस्तऐवज मानला पाहिजे.चरित्रग्रंथाला बावनकशी म्हटले आहे.त्यात बावन कडवी आहेत.लग्न झाले तेव्हापासून ज्योतीराव आपली पत्नी सावित्री आणि आऊ सगुणाबाई यांनासुध्दा शिक्षणाचे पाठ देत असे हे चरित्र सांगते म्हणूनच या चरित्र काव्यग्रंथात कृतज्ञतेची भावना अभिव्यक्त झालेली आहे. सावित्रीमाई फुले यांचे काव्य जाणीव जागृतीचे काव्य होते.

**सारांश :-**

सावित्रीमाई फुले यांची समाज परिर्वतनातील भूमिका महत्वपूर्ण होती.त्यात स्त्रीयांना शिक्षण बालहत्या प्रतिबंधकगृहातील महिलांचे बांळतपण व मुलांची सर्वस्वी काळजी.बालविवाहला विरोध, पुर्नविवाह घडवून आणणे, केशवपनाला केला जाणारा विरोध त्यासाठी त्यांनी नाव्यांचा संप घडवून आणला.

काव्यफुले व बावनकशी सुबोधरत्नाकर सावित्रीमाईचे दोन काव्यसंग्रह आहेत.काव्यफुले यात शिक्षण फुलांवरिल कविता आल्या आहेत.१८९२ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहात सावित्रीबाईंनी ज्योतिबाकडून कशि दिव्य प्रेरणा मिळाली व्यक्त करुन देशाच्या प्राचीन काळापासून सामाजिक इतिहास काव्यस्वरुपात सांगितला .सावित्रीमाईंनी प्रत्येक कामात ज्योतिबांना दिलेली साथ महत्वाची होती.त्यांनी घालून दिलेला स्त्री पुरुष समतेची आणि शांततामय सहजीवनाचा आदर्श होता.शिक्षण सामाजिक न्याय जातीनिर्मलन, पुरोहीत हटाव या क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान इतिहासाबरोबरच वर्तमान व भविष्यकाळाला उजळून ठाकणारे आहे.

सावित्रीमाई सलग ५० वर्ष लोकांसाठी राबत होत्या.सेवा आणि करुणेचा एक अनोखा आदर्श त्यांनी घालून दिला .फक्त महात्मा फुलेंच्या पत्नी आहेत असे नाही तर स्त्रीमुक्तीच्या अद्यप्रेणेत्या आहेत.त्यांचे संपूर्ण जीवन क्रं ातीकारक आहे.शिक्षण सामाजिक न्याय जातीनिर्मुलन स्त्री पुरुष समानता या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य इतिहासाबरोबर वर्तमानालाही उजळून टाकणारे आहे. सावित्रीमाईनी दिलेली शिदोरी सदैव आपले जीवन समृध्द करेल.

**संदर्भग्रंथ:-**

१ महात्मा फुले साहित्य आणि चळवळ- हरी नरके.
२ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले-हरी नरके.
३ सावित्रीबाईंची काव्यसंपदा-कृ.प.देशपांडे.
४ बावनकशी व सुबोधरत्नाकर काव्य संग्रह-डॉ.मा.गो.माळी.
५ सावित्रीबाई जयंतीनिमित्त प्रकाशित अंक
६ सावित्रीबाई फुल-जाणीव जागृतीचे काव्य. वेबदुनिया.

# २. गोर बंजारा समाज: विशेष संदर्भ श्री सद्गुरु संत सेवालाल महाराज

**डॉ. बंजारा दिलीप लालू**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

सद्गुरू सेवालाल महाराजांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३४ साली धर्मनी याडी (आई)आणि श्री भीमा नाईक यांच्या पोटी साधारणतः २७१ वर्षांपूर्वी या पवित्र भूमीत झाला. त्या वेळी हा परिसर रामगुंडल किंवा रामजी नाईक तांडा या नावाने ओळखला जात होता. (रामजी नाईक हे सेवाभाया यांचे आजोबा होते जे ह्या परिसरात साधारणतः ३६० कुटुंबाच्या तांड्यासोबत आणि ३७५५ बैलगाड्यासोबत ह्या ठिकाणी वास्तव्यास आले.) १८ व्या शतकाच्या शेवटी जेन्वा हा तांडा नष्ट झाला तेंव्हा ह्या लोकांनी मग एका खेड्याची निर्मिती केली ज्याचे नाव चेन्नरायनिपल्ली असे ठेवले होते आणि गाव आता आंध्र प्रदेशातील अनंतपुर जिल्ह्यातील गुत्ती तालुका म्हणून ओळखले जाते.

वयाच्या साधारण १२ वर्षापर्यंत सेवाभाया ह्या ठिकाणी आपल्या आई-वडिलांसोबत राहिले. त्यांच्या दिनचर्येत रोज ते कालिया कुंडात स्नान करत असत (ह्या कुंडाचे पाणी अतिशय स्वच्छ स्फटीकासमान नैसर्गिक धबधब्याचे होते आणि म्हणून स्नान पवित्र होते.) आणि चेन्नकसिवा (शिव) मंदिरामध्ये जाऊन पूजा करायचे. हे मंदिर चेणाऱ्यान डोंगरावर होते जे रामजी नाईक तांड्या जवळ होते, आणि मग आपले गुरे त्या ठिकाणच्या जंगलात ते चरण्यास घेऊन जात असत.

ज्या ठिकाणी सेवाभाया गुरांना चरण्यासाठी न्यायचे त्या ठिकाणाला झेंडी झोल किंवा पाम वृक्षाचे जंगल असे म्हणत होते. आजही शेकडो वर्षानंतर याच्या अस्तित्वाच्या खुणा आपल्याला आढळतात. रामजी नाईक तांड्यात बंजारा आणि बंजारेत्तर लोकांची वस्ती एकत्रित पहावयास मिळत होती. हि सर्व लोक भीमा नाईक कद्द यावर आपली श्रद्धा असणारी होती त्याचे कारण सद्गुरू सेवालाल महाराज या कद्द याखालीच त्यांच्या अवशेष रूपाने सदैव जागृत आहेत अशी बंजारा समाजाची भावना होती व आहे. त्यामुळेच बंजारा समाजातील एक परंपरा अशी होती कि नवीन मुल जन्माला आल्यानंतर त्याला देखील या कद्द याचे दर्शन करवण्याची प्रथा परंपरेने बंजारा समाजात रुजली. इतकेच नव्हेतर ह्याच भीमा नाईक कद्द यावर उभे राहून सेवाभायानी कित्येक तांड्यावरील बंजाराना

न्याय दिला आणि मौलिक मार्गदर्शन देखील केले. सेवाभायाच्या जीवनाचा आणि कारकीर्दीचा अभ्यास केलातर बरेचसे लोकगीत आणि लोककथा बंजार्यान्क्डून आणि बंजारेत्तर समाजाकडून त्यांच्या बाबतीत गायलेल्या आणि सांगितलेल्या साधारणतः २५० वर्षांपासून आढळून येतात. असेही पहावयास मिळते कि गुत्ती नावाचा तालुका हा त्याकाळी म्हैसूर मधील बेल्लारी जिल्ह्यात होता अर्थात त्या काळी म्हैसूर राज्य हे ब्रिटीश राजवटीच्या अमलाखाली होते. ह्याच बेल्लारी जिल्ह्यात अनंतपुर नावाचे एक गाव होते जो आता अनंतपुर नावाचा जिल्हा झालेला पहावयास मिळतो. त्या काळातील भूमिलेखातून असे हि दिसते कि जवळपास १८ एकर जमिनीवर रामजी नाईक तांडा प्रस्थापित झाला होता. सदरील लेखात या तांड्याचे नाव ‘नाइकुणी भूमी’ असल्याचे देखील पहावयास मिळते. हि सर्व माहिती पोहोराग्द येथील श्री रामराव महाराज यांच्या **सेवादास लीलामृतात** वाचण्यास मिळते. जसे गुत्ती बेल्लारी मध्ये सेवाभायाचा जन्म झाला तसेच पोहोराड हे सेवा भयाचे समाधी स्थान होय, म्हणून सेवादास लीलामृत या ग्रंथाचे निर्माण पोहोरागड येथे झाले. संत श्री रामराव महाराज हे श्रे सेवाभायाचे सातव्या पिढीतील संत म्हणून आजही गोर बनजारा समाजाला त्यांचा इतिहास, बंजारा प्रथा आणि परंपरा यांचे मौलिक मार्गदर्शन करताना दिसतात. महाराष्ट्रातील यवतमाळ येथील एक सुप्रसिद्ध कवी तसेच बंजारा लोकगीतकार श्री आत्माराम राठोड यांनी देखील त्यांच्या प्रसिद्ध अश्या **श्री संत सेवादास लीला चरित्र** या ग्रंथामधून सेवाभायांच्या जन्मठीकानाचे माहिती व दाखले दिलेले आहेत.

**गोर बंजारा समाजाचा उगम**

गोर बंजारा समाज हा आज काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत पसरलेला आढळून येतो. हा समाज प्रामुख्याने २९ राज्य आणि ७ केंद्रशासीत प्रदेशात आढळतो. जरी इतक्यासाऱ्या राज्यांत आणि प्रदेशात गोर बंजारा समाज राहत असला तरी त्यांचे एक वैशिष्ट्य असे कि त्यांची परंपरा, संस्कृती, वेश-भूषा, विशिष्ट बोली पद्धत, सामाजिक आणि धार्मिक प्रथा परंपरा आणि प्रामुख्याने त्यांचे विशिष्ट रंगीबेरंगी पोशाख आणि गीत हे सर्व ठिकाणी सारखेच आहेत. या त्यांच्या विशिष्ट पेहाव्यामुळे गोर बंजारा समाजातील स्त्रिया ह्या भारताच्या विस्तीर्ण भूमीत कुठेही चटकन ओळखू येतात. बंजारा समाजाचा अभ्यास करताना काही गैरसमजुती प्रामुख्याने आढळून येतात. त्यामध्ये

गोर लोक कवी किंवा धाडी किंवा भात यांच्या बऱ्याचश्या लिखानामधून गोरांच्या बाबतीत राज सतत, राज वैभव, त्यांचा उगम आणि प्रसार हा प्रामुख्याने पहावयास मिळतो.

गोर लोकांचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे ते कधीच स्थानबद्ध रहात नाहीत. त्यांचे कारण म्हणजे ई. सन १७०० पर्यंत हा समाज भटक्या प्रवृत्तीचा सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करणारा, कांही अंशी निर्वासित असल्यासारखा होता, याच कारणांनी गोरलोकांमध्ये शिक्षणाचा अभाव, परंपरेत सातत्य नसणे, आणि त्यामुळेच मग अंधश्रद्धेसारख्या अपसामाजिकतेला बळी पडणे यांच्या वाट्याला आले. अश्या पद्धतीने अनेक धीर गंभीर दाखले धाडींनी आणि भात लोकांनी  लिहिलेले आढळतात.

**तांडा: गोर-बंजारांची राजधानी**

युरोपियन लेखक राल्फ फिंच याने १५८५ साली असे लिहिले आहे कि तांडा हि गोर-बंजारांची राजधानी आहे. यांच्या माध्यमातून कापूस आणि सुती कपडयांची निर्मिती अतिशय चांगल्या प्रकारे केल्या जाऊ शकते. गोर बंजारा अशी माणसे आहेत कि ती अर्धनग्न अवस्थेत फक्त कमरेवर कपडा बांधून राहणारी होत. त्यांच्या म्हणण्यानुसार हि जमात बंगाल माह्वून आलेली असावी ज्यांच्याकडे भरपूर नैसर्गिक साधन सामुग्री, शेळया-मेंढ्यांचे मोठ्या प्रमाणावर पालन होत असे म्हणून गोर-बंजारा समाज हा निसर्गाचा आदर्श मानला पाहिजे. राल्फ फिंच पुढे असे लिहितो कि, निसर्गाच्या महाप्रलयात अनेक राज्य शहरे गावे वाहून गेली नष्ट झाली परंतु गोर बंजारा मात्र स्वतःला कायम शिल्लक ठेवू शकला.

शेवटी असे म्हणावेसे वाटते कि, केवळ गोर बंजारा समाज हा निसर्गाधीष्टीत असल्यामुळे निसर्गाच्या सर्व हालचालींची व बदलांची ह्या समाजाला होते म्हणून एकूणच गोर-बंजारा समाज हा निसर्गाचा एक आदर्श मानला पाहिजे. याक्षणी मला राजाराम जाधव उलवे नवी मुंबई यांनी दिनांक 18 ऑगस्ट दोन हजार एकोणवीस रोजी लिहिलेली कविता आठवते ती अशी की,

## सेवालालेर भविष्यवाणी

सणों गोरमाटी तम करो मत वेला, सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥धृ॥
भजोमत पूजोमत भायार वाणीं। जाणंन छाणंन पचं मानजो केनी॥
बापूर बोलेन आचरणेंम लान तोला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥१॥
रपीया कटोरो पाणीं वकजायं। रपीयार येके तेरं चणां मळीयं॥
आब तरी रपीयान समजन लेला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥२॥
वानावानार बेमारी आयं दनीयाम। नाडी रोगेरी कोनी कळं हकीमेनं॥
भविष्येरी वाते वू ध्यानेमायी लेला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥३॥
सतभगतेरे खुटा मुंगरीन म सायी। मोलेरो जीवणं घालजो मत वायी॥
आपसेम कटूता यी विषेरो छं पेला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥४॥
बारं कोसेपर येक दिवलो बळीयं। दिलीरो सिंहासन जना ढळजायं॥
नायकी करेरी आब सोगन खाला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥५॥
घटीर दाणांनायी सेज भल्डाजायं। भगत मारो वू खिल्डीकन रेजायं॥
सेवामृतेरी धार पेट भरताणीं पीला, सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥६॥
विज्ञानवादी विचारेर पेरणीं करा। अंधश्रद्धानं घरेम दा कोनी थारा॥
धोळे झेंडारो जयजयकार बोला। सेवालाल वतायो जे वाटेती चाला॥७॥

**संदर्भ सूची**

१) लोकराज्य २०१८ महाराष्ट्र शासन पृष्ठ क्रं. ३८
२) संत सेवालाल महाराज जयंती २००४
३) संत सेवालाल महाराज जयंती निमित्त आलेला चव्हाण प्रभू यांचा लेख
४) गुगलवर असलेली माहिती
५) बाबूसिंग राठोड, पुसद
६) गुलाब सिंग चव्हाण, अध्यक्ष आश्रम शाळा लोहारा.
७) प्रेमदास राठोड (कवी बंजारा समाज व समाज प्रबोधनकार)
८) रामधन लालू चव्हाण रूपचंद नगर, तालुका रेणापूर जिल्हा लातूर
(सेवालाल महाराजांवर गायलेले गीतकार आणि प्रवचनकार)

# ३. आधुनिक मुंबईचे शिल्पकार नाना उर्फ जगन्नाथ शंकर शेठ

**प्रा. डॉ. सुनील दत्त एस गवरे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
शां.घो. कला, विज्ञान व
गो. प. वाणिज्य महाविद्यालय शिवळे
फोन नं ८२०८७०४६८७
Email : sunildattgavarae@gmail.com

मुंबईने ज्यांना श्रीमंत केले असे लक्षावधी लोक आपल्याला भेटतील, पण आपल्या कर्तृत्त्वाने आणि दातृत्वाने ज्यांनी मुंबईला श्रीमंत केले असे अगदीच मोजके आहेत. नाना उर्फ जगन्नाथ शंकरशेठ हे त्यातील अग्रगण्य नाव आहे. आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करत, नानांनी या मुंबईत चोख व्यापार केला. मुबलक पैसे कमाविले आणि कमाविलेल्या या पैशाचे फक्त उंच इमले न बांधता त्यातून समाज घडविणाऱ्या संस्था उभ्या केल्या. नानांनी उभारलेल्या संस्था पाहिल्या की आजही आवाक व्हायला होते. नानांच्या या खऱ्याखुऱ्या श्रीमंतीचे मॉडेल समजून घेण्याचा केलेला हा माझा प्रयत्न आहे.

नानांचा जन्म १० फेब्रुवारी, १८०३ मध्ये मुरबाड (मुंबई—महाराष्ट्र) मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव भवानीबाई होते. नाना शंकरशेट मुरकुटे हे मराठी शिक्षणतज्ज्ञ उद्योगपती होते. मुबई शहराच्या घडणीत त्यांचा मोठा वाटा होता. नानांचा काळ हा इंग्रजाविरूद्ध सुरू झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या आधीचा काळ. मुबंई हे शहर म्हणून आकाराला येण्याचा हा कालावधी. समुद्री व्यापारामुळे हे शहर घडत होते आणि रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी लोक या शहरात येत होते. नानांचे कुटुंब या अशा मुंबईत येणाऱ्या लोकामधील अगदी सुरूवातीला आलेल्या लोकांमधील एक होते. नानांचे पूर्वज बाबूलशेठ मुरकुटे अठराव्या शतकात कोकणातून मुंबईत आले. मुंबईच्या आघाडीच्या व्यापाऱ्यांमध्ये त्यांची गणना त्याकाळी होत होती.

नानांचे वडील शंकरशेटजी ईस्ट इंडीया व इंग्रजांचेही सावकार होते. सन १८००मध्ये त्यांची एकूण संपत्ती १८ लाख रूपायांच्या घरात होती, असे संदर्भ सापडतात. नानांची आई त्यांच्या लहानपणीच गेली. त्यामुळे वडिलांनीच त्यांना

मोठे केले. त्यावेळच्या पद्धतीनुसार घरीच मास्तर येऊन त्यांनी नानांना भारतीय आणि इंग्रजी असे दोन्ही पद्धतीचे शिक्षण दिले. त्यामुळे मराठी, संस्कृत आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांवर नानांचे प्रभुत्व होते. या ज्ञानाचा उपयोग करून नानांनी आपला व्यापार यशाच्या शिखरावर पोहचविला.

ज्या शिक्षणाने आपण घडलो ते शिक्षण आज (त्याकाळी) सर्वांना सहज उपलब्ध होणार नाही, हे नानांनी जाणले होते. त्यासाठीच शिक्षण सर्वांपर्यंत पोहचण्यासाठी नानांनी प्रयत्न सुरू केले. देशातील मुलांना उत्तम शिक्षण मिळायला हवे यासाठी सुरू झालेल्या 'नेटिव्ह स्कूल सोसायटी' नावाच्या पश्चिम भारतातील पहिल्यावहिल्या शिक्षणसंस्थेचे नाना संस्थापक होते. याच संस्थेन पुढे मुलींच्या शिक्षणाचा आग्रह धरला. अर्थातच त्यावेळी त्याला सनातनी लोकांकडून विरोध झाला. नानांनी हा विरोध आपल्या अधिकाराने मोडून काढत आपल्या घरात मुलींची पहिली शाळा सुरू केली. आजही नानांची ही शाळा 'स्टुडंट्स लिटररी अॅण्ड सायंटिफिक सोसायटी'च्या रूपाने गिरगावात आपले अस्तित्व टिकवून उभी आहे. नाना यांनी मुंबईत पहिली मुलींची शाळा सुरू केली. एखादा समाज किंवा शहर उभे राहते ते संस्थांच्या जोरावर. समाजातील संस्था जेवढ्या ताकदीच्या तेवढा तो समाज बलबत्तर किंवा भाग्यवान म्हणून ओळखला जातो. ऑक्सफर्डसारखे शहर तिथल्या विद्यापीठामुळे ओळखले जाते, तर न्यूयॉर्कमधला शेअर बाजार जगातील सर्वात मोठा ठरतो. या अशा संस्था शहरे घडवित असतात. हे नानांमधल्या दूरदृष्टीच्या शिल्पकाराने जाणले होते. म्हणूनच मुबईच्या जडणघडणीच्या काळात नानांनी दीर्घ काळ टिकतील, समाजाला समृद्ध करतील अशा संस्थांच्या उभारणीकडे प्रामुख्याने लक्ष दिले. नानांचे हे संस्थाकारण आज पुन्हा एकदा समजून घ्यायची वेळ, गरज आली आहे.

१८१९ मध्ये माऊंट स्टअर्ट एल्फिस्टन मुंबई इलाख्याचे गव्हनेर झाले. नानांची आणि एल्फिस्टन यांची ओळख झाली. एल्फिस्टन यांचा शिक्षणविषयक कामांमध्ये नानांनी त्यांना मदतीचे आश्वासन दिले. या दोघांच्या प्रयत्नातून १८२२ मध्ये 'मुंबईची हैंदशाळा आणि शाळापुस्तक मंडळा'ची स्थापना झाली. सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण न्यायचे असेल तर मातृभाषेतून शिक्षण दिले जावे याबद्दल

दोघांचेही एकमत होते. त्यामुळेच मराठी, गुजराती व हिंदी भाषांमध्ये प्रथमच क्रमीक पाठ्यपुस्तके छापली गेली.

१८२७ मध्ये एल्फिस्टन इंग्लंडला परत जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांच्या सत्कारासाठी जो निधी गोळा केला गेला, त्यातून एल्फिस्टन कॉलेज सुरू झाले. याच एल्फिस्टन महाविद्यालयातून दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे यांसारख्या विद्वानांची पहिली पिढी तयार झाली. याच पिढीने नवे शिक्षण घेऊन समाजात नवा विचार रूजविला. या नव्या विचाराने पुढे काँग्रेसची स्थापना झाली आणि देशाचा स्वातंत्र्यलढा उभारला गेला. त्यामुळे आजच्या आधुनिक भारताची मुळे शिक्षणाच्या प्रसारात आणि नानां सारख्यांच्या दूरदृष्टीत आहे, हे विसरून चालणार नाही.

महिलांच्या शिक्षणाप्रमाणेच सतीच्या अमानुष प्रथेविरोधातही नानांनी आपला विरोध नोंदविला. सतीबंदीसाठी १८२३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटकडे जो अर्ज करण्यात आला होता, त्यावर राजा राममोहन रॉय आणि जगन्नाथ शंकरशेठ यांच्या प्रमुख सह्या होत्या. या सतीबंदीमुळे मुंबई इलाख्यात सनातन्यांकडून काही प्रतिक्रिया उमटली तर नाना ते सांभाळून घेतील, यावर इंग्रजांचा विश्वास होता. म्हणूनच डिसेंबर १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिकने सतीबंदीच्या कायद्यावर सही केली आणि हजारो वर्षांच्या क्रूर प्रथेचे उच्चाटन झाले. तसेच बालविवाह, सती या रूढी समाजाला किती घातक आहेत हे ठिकठिकाणी व्याख्याने देऊन पटवून देण्याचे काम त्यांनी केले. फक्त लोकानुनय करून नव्हे तर, प्रसंगी कटू वाटतील पण भविष्यवेधी असतील असे ठोस निर्णय समाजाच्या नेत्याला घ्यावे लागतात, हेच नानांच्या सतीबंदीच्या वेळच्या वागण्यातून स्पष्ट दिसून येते किंवा स्पष्ट होते.

१८४५ मध्ये एतद्देशीयांच्या भागीदारीने पश्चिम भारतात वाफेच्या गोष्टींचा पाया घालणारी 'द बॉम्बे स्टीमशिप नेव्हिगेशन कंपनी' उभारण्यात नानांचा पुढाकार होता. त्याच वर्षी जे. जे रूग्णालय आणि ग्रँट मेडिकल महाविद्यालय, १८५१ मध्ये संस्कृतचे शिक्षण सर्वांसाठी खुले करणारे 'पूना संस्कृत कॉलेज' (आजचे डेक्कन कॉलेज), १८५५ मध्ये पहिले कायदा महाविद्यालय, १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठ आणि जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, १८६२ मध्ये व्हिक्टोरिया गार्डन (आजची राणीची बाग) अशा महाकाय संस्थांच्या स्थापनेत नानांनी आपला सिंहाचा वाटा उचलला. या व्यतिरिक्त शासकीय मध्यवर्ती वस्तूसंग्रहालय, मर्कटाइल बँक, सेंट्रल बँक ऑफ

वेस्टर्न इंडिया सारख्या बँकांच्या उभारणीतही नानांनी प्रयत्न केले आहेत. एकंदरीत या कालावधीत मुंबईत झालेल्या शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक बदलांवर नानांनी आपला ठसा उमटविला आहे.

१६ एप्रिल १८५३ रोजी आशियातील पहिली रेल्वे बोरिबंदर ते ठाणे अशी धावली. या रेल्वेसाठी नानांचे प्रयत्न महत्त्वाचे होते. म्हणूनच या पहिल्या रेल्वेप्रवासात जे काही मोजके मान्यवर होते, त्यात नानांचाही समावेश होता. एवढेच नव्हे तर बोरिबंदर स्थानकाच्या इमारतीवर (आजचे सी.एस.एम.टी.) आजही ज्या एकमेव भारतीयाचा पुतळा आहे, तो म्हणजे नानांचा. रेल्वेमुळे मुंबईत आधुनिकता धावू लागली आणि या शहराचा वेग प्रचंड प्रमाणात वाढला, हे कोणीही नाकारू शकत नाही. तेव्हापासूनच नाना शंकरशेठ यांना ‘भारतीय रेल्वेचे जनक’ म्हणून ओळखले जाऊ लागले.

भारतीयांच्या समस्या इंग्लंडपर्यंत पोहाचाव्या यासाठी १८५१ मध्ये ‘बॉम्बे असोसिएशन’ नावाची पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्था स्थापन झाली. या संस्थेचे ‘प्रतिष्ठित’ अध्यक्ष म्हणून जमशेठजी जेजीभाई, तर अध्यक्ष म्हणून जगन्नाथ शंकरशेठ यांना निवडले गेले. या संस्थेतर्फे ब्रिटिश पार्लमेंटकडे सुधारणांसाठी अर्ज केले गेले आणि ते मंजूरही झाले. १८५७ च्या उठावात क्रांतिकारकांना मदत केल्याचा आरोप नानांवर करण्यात आला. त्यात नानांची चौकशीही करण्यात आली. पण काही पुरावे न आढळल्याने त्यांच्यावर कारवाई मात्र झाली नाही.

पुढे १८६१ साली लेजिस्लेटीव कौन्सिलमध्ये एतद्देशीय स्थान देण्याचे ठरले तेव्हा या परिषदेचा पहिले सदस्यत्व नाना यांना मिळाले आणि नाना अधिकृतरित्या भारतीयांचे प्रतिनिधी झाले. याच बॉम्बे असोसिएशनचे रुपांतर १८८५ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनमध्ये झाले. पुढे बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या सभासदांनीच गोवालिया टँक इंडियन नैशनल कॉंग्रेसची स्थापना केली आणि स्वातंत्र्यलढ्याला अधिकृतरित्या सुरूवात झाली.

नानांच्या मालकीची प्रचंड मोठी जमीन मुंबईत होती. असे म्हणतात की आजच्या मरिन लाईन ते मलबार हिल परिसरात जी जमीन होती ती नानांची होती. ही जमीन शहराच्या उभारणीसाठी नानांनी दिली. त्यावेळी मृतदेहावर अंत्यसंस्कार

करण्याची योग्य ती व्यवस्था शहरात नव्हती म्हणून नानांनी स्वत:ची जमीन त्यासाठी दिली व अंत्यविधीसाठी लागणारी व्यवस्था तेथे लावून दिली. आजही त्याच नानांच्या मालकीच्या जागेवर मरिन लाइन येथील जगन्नाथ शंकरशेठ स्मशानभूमी उभी आहे.

भारतीयांना कलाशिक्षण मिळावे म्हणून सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या स्थापनेत सक्रिय भाग घेतला. याशिवाय ग्रँड ज्यूरीत भारतीयांचा समावेश व्हावा, तसेच जस्टिस ऑफ द पीस अधिकार भारतीयांस मिळावा यासाठी त्यांनी खटपट केली व काही अधिकार मिळविले. महानगरपालिकेत आयुक्त असताना त्यांनी आरोग्यव्यवस्था, विहिरी, तलाव इत्यादी योजना अंमलात आणल्या. गॅस कंपनी सुरू केली. धर्मार्थ दवाखाना काढून तसेच पुढे जे. जे हौस्पिटलचा पाया घालून त्यांनी रूग्णसेवेस चालना दिली.

नाना शंकरशेठ काऊंसिल असतानाच १८६४ साली मुंबई शहरातील जनतेला पायाभूत सुविधांबरोबर आरोग्य—सुखसोयी मिळवण्यासाठी मुंबईसाठी स्वतंत्र म्युनिसपल आयोग नेमला. त्याचे पुढे मुंबई म्युनिसिपल कॉपरेशनमध्ये रूपांतर केले गेले. आज मुंबई महानगरपालिकेचा जो भव्य—दिव्य वटवृक्षाचा डोलारा वाढला ते रोपटे नानांनी लावले होते. नानांनी अंधश्रद्धा आणि ताठर धार्मिक चालीरितींवर कठोर शब्दात टीका केली. या चालीरितींमुळे समाजाचे होत असलेले नुकसान त्यांनी समाजाच्या निदर्शनास आणून दिले. याची दखल इंग्रती राजवटीने घेऊन १८३० मध्ये इंग्रजांनी अंधश्रद्धोबरोबर जुन्या रूढींना आळा घालण्यासाठी सतीची चाल, बालविवाह या चाली कायद्याने बंद केल्या. तसेच विधवांना पुनर्विवाह करण्यासाठी कायद्याने संरक्षण दिले. अशा रूढींवर बंदी आणण्यात नानांचा वाटा मोलाचा आहे.

नानांनी अनेक मान्यवर संस्थांना देणगी दिल्या आहेत : रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेला रू.५०००/—, व्हिक्टोरिया ॲन्ड अलबर्ट वस्तुसंग्रहालयाला रू.५०००/—, जगन्नाथ शेकरशेठ स्कूलला रू.३००००/—, एल्फिस्टन शिक्षण निधीस रू.२५०००/— आणि जिजामाता बागेसाठी (रणीची बाग) रू.२५०००/—, पुणे येथील संस्कृत ग्रंथालयासाठी रू.५०००/—, नेटिव्ह लायब्ररी रिडींग रूमसाठी रू.१०००/—, बोटीच्या दळणवळणासाठी संस्थेला रू.१०००/—, धर्मार्थ दवाखाना कायम चालू राहावा

यासाठी रू.३००००/— इत्यादी. मुंबई विद्यापीठात संस्कृत विषयासाठी जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती आजही सुरू आहे. तसेच मुंबई विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नानांनी खास शिष्यवृत्ती दिल्या. नाना यांना जस्टिस ऑफ द पीस, 'मुंबईचा अनभिषिक्त सम्राट', 'मुंबईचे शिल्पकार' म्हणतात. ब्रिटिश राजवटीतील वर्णभेद नाहीसा झाला पाहिजे असे ते म्हणत असत.

नाना यांचे मुंबई आणि प्रांताच्या विकासासाठी खूप मोलाचे योगदान आहे. त्यांनी भूषविलेल्या काही महत्त्वांच्या पदांची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल —

१) संस्थापक अध्यक्ष— बॉम्बे असोसिएशन
२) सभासद— बोर्ड ऑफ कॉन्झरवंसी
३) उपाध्यक्ष— स्कुल ऑफ एज्युकेशन
४) अध्यक्ष— डेव्हिड ससून रिफॉर्मेटरी इस्टिटयूट
५) सदस्य— म्युनसिपल कायदा व बिल
६) विश्वस्त— एल्फिस्टन फंड
७) अध्यक्ष— शिक्षण प्रसार समिती
८) संस्थापक— जगन्नाथ शंकरशेठ स्कुल
९) सदस्य— मुंबई विद्यापीठ व्यवस्थापक मंडळ
१०) अध्यक्ष— हॉर्टिकल्चर व जिओग्राफिकल सोसायटी
११) आद्य संचालक— रेल्वे (मुंबई ते ठाणे)
१२) संचालक— बँक ऑफ वेस्टर्न इंडिया
१३) संचालक/अध्यक्ष— बॉम्बे नेटिव्ह डिस्पेन्सरी (पहिला धर्मार्थ दवाखाना)
१४) पहिले देशी मॅजेस्ट्रट

नानांनी उभारलेले हे काम पाहिले की आपल्याला यासाठी एक जन्म पुरणार नाही असे वाटत राहते. पण नानांनी आपल्या ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि श्रीमंतीचा उपयोग समाजासाठी केला. जेवढे या शहराकडून घेतले, त्याच्या कैकपटीने या शहराला, समाजाला परत दिले. म्हणूनच नानांच्या या श्रीमंतीचा थोडा तरी अंश प्रत्येकाने घेतला तरी समाज म्हणून आपण खूप श्रीमंत होऊ. मुंबई शहराच्या विकासाचा पाया रचणाऱ्या त्याचबरोबर मुंबई शहराच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थापनाची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणाऱ्या नाना उर्फ जगन्नाथ शंकरशेठ यांना आधुनिक मुंबईचा शिल्पकार मानण्यात आले आहे. नानांचे वयाच्या बासष्टाव्या वर्षी सन ३१ जुलै १८६५ रोजी मुंबईत देहावसान झाले.

# ४. मध्ययुगीन भारतातील समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर महाराज

**प्रा. डॉ सिध्देश्वर शेटकर**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
संजीवनी महाविद्यालय चापोली ता चाकुर जि लातुर

---

**प्रस्तावना** :-

बाराव्या शतकात सर्वात प्रथम समाज जागृती करणारा समाजसुधारक म्हणून लिंगायत धर्माचे संस्थापक श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांच्याकडे पाहिले जाते त्यांनीच या काळामध्ये राजकीय , सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचा अंदाज घेऊन या ठिकाणी असणारी जातीव्यवस्था , धर्मव्यवस्था , ,स्त्री-पुरुष विभाजनाची परिस्थिती आणि त्यामधून निर्माण होणारे सामाजिक प्रश्न थांबवण्यासाठी सर्व धर्म समभाव पद्धतीमधून समाज जागृती करण्याचे काम करून समाजव्यवस्थेत राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे त्यामुळेच या महान विभूतींना सर्वप्रथम नमन युरोप खंडात वैचारिक क्रांतीची सुरुवात होण्यापूर्वीच भारतामध्ये असणाऱ्या कर्नाटक राज्यात भूतपूर्व क्रांती झालेली आपणास दिसून येते या क्रांतीचे जनक श्री महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या समकालीन शिवशरण त्या काळामध्ये कल्याण-नगर नावाने प्रसिद्धीस असणारे शहर की जे आज बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण या नावाने प्रसिद्ध आहे याच शहरांमध्ये श्री महात्मा बसवेश्वर महाराजांनी क्रांतीची ज्योत पेटवली आहे व त्यावेळी त्यांनी त्याच ठिकाणी अनुभव मंडपाची उभारणी केली या क्रांतीचा प्रभाव प्रामुख्याने या ठिकाणी असणारे जातिभेद स्त्री-पुरुष भिन्नता वेगवेगळया धर्मात असणाऱ्या अनिष्ट प्रथा पुराणिक देव पूजन अज्ञान रुडी परंपरा यादृष्टीने उच्चाटन होण्यासाठी मदत मिळाली आज प्रत्येक विद्यापीठातून अनेक निरीक्षण परीक्षण करून संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध लिहिले जातात परंतु बाराव्या शतकात श्री महात्मा बसवेश्वर महाराजांनी अनुभव मंडप या नावाने अद्भुत असे जनजागृतीचे विद्यापीठच उभे केले होते साहित्याचे सुंदर असे जणू दालनच त्यांनी त्या काळात उभे केले होते या अनुभव मंडपात केवळ धार्मिकच विषयावर

संशोधन केले जाते असे नाही तर सामाजिक,राजकीय व आर्थिक संदर्भात पण विचार मंचाच्या माध्यमातून संशोधन करण्यात येते काळानुसार काळाची पावले ओळखतो मानवी मतांचा वेध घेण्याची ज्यांच्यामध्ये शक्ती आहे भविष्याची ज्यांना जाण आहे जो या सर्व विषयांचा विनम्र भावनेने विचार मंथन करतो व ज्यामध्ये निर्णय घेण्याची योग्य पद्धतींची क्षमता आहे असे योग पुरुष म्हणून त्यांना जागतिक स्तरावर ओळखले जाते असे विश्वगुरू बसवांन्ना आपणास पाहावयास मिळतात त्यामुळेच श्री महात्मा बसवेश्वर यांना आद्य क्रांतिकारक संत म्हणून संबोधले जाते.

श्री महात्मा बसवेश्वरांच्या बसववादी शरणांनी बाराव्या शतकामध्ये असणारी वर्णाश्रम पद्धती ,जातीव्यवस्था ,वर्गव्यवस्था ,अस्पृश्यता आणि लिंग भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे बसवन्ना हे मानवतावादी होते दया त्यांचा धर्म होता समता हे श्री महात्मा बसवेश्वरांचा ध्यास व श्वास होता श्री महात्मा बसवेश्वरांनी याठिकाणी लिंगभेद आवर आधारित समाज व्यवस्था नष्ट करून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला आहे आणि त्यातून स्त्री आणि पुरुष हे लिंगावर आधारित भेद नीती संपुष्टात आणली आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने समाजात ही भेदनीति कमी होण्यास सुरुवात झाली त्याच वेळी जवळपास 70 स्त्रियांनी श्री महात्मा बसवेश्वर यांनी स्थापन केलेल्या अनुभव मंडपाचे सदस्य स्वीकारले आहे वंचित बहुजन समाज हा श्री महात्मा बसवन्ना यांच्या चळवळींचा केंद्रबिंदू होता बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार हे बसवन्ना यांचे सोबती आणि शिलेदार असताना आपणास पहावयास मिळते ज्या काळामध्ये शुभ-अशुभ या मानसिकतेत वावरणाऱ्या समाजांच्या मनातून जातीचे मूळ उच्चाटन करणे खरोखरच अवघड काम होते हेच काम श्री महात्मा बसवेश्वर यांनी करून आदर्श समाज व्यवस्थेची स्वप्न पाहिले आहे त्यामुळेच श्री महात्मा बसवेश्वर यांनी आणि त्या काळात त्यांच्या सोबत असणाऱ्या अठरापगड जाती मध्ये शरण यांनी ही जातीयता नष्ट करण्याचे काम केले आहे अशा या महान विभूती प्रणाम !

**श्री महात्मा बसवेश्वर महाराजांचे बालपण:-**

म्हैसूर राज्यातील विजापूर जिल्ह्यात बागेवाडी या तालुक्यांच्या गावी या महान समाजसुधारक संत श्री महात्मा बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला तो दिवस होता वैशाख शुद्ध अक्षय तृतीया सन ११०५ त्यांच्या वडिलांचे नाव मंडगेय मादीराज आणि आईचे नाव मंदाबी असे

होते.वडिलांचे घराने वैश्य ब्राह्मण होते.स्त्री महात्मा बसवन्ना आहे लहान वयापासूनच बुद्धिमान होते.त्यांच्या आई-वडिलांचे छत्र वयाच्या सोळाव्या वर्षीच हरवले आणि श्री महात्मा बसवेश्वर अनाथ झाले.त्यावेळी समाज कुटते त्यांच्यासी वागू लागला त्यामुळेच ते त्यांच्या बहिणीसोबत बागेवाडी सोडून कुडलसंगम येथे आले.कुडलसंगम हे मलप्रभा व कृष्णा नदीच्या संगमावर वसलेले विजापूर जिल्ह्यातील रमणीय गाव या गावांमध्ये संगमेश्वर यांचे देऊळ आहे.या ठिकाणी जाऊन बसवन्ना संगम नाथाच आपले माता- पिता आणि सर्वस्व मानू लागले.या गावांमध्ये बसवन्नाची धार्मिक व सामाजिक पायाभरणी झालेली आहे.

**श्री महात्मा बसवेश्वर महाराजांचा जीवन प्रवास :-**

१ जन्म - बागेवाडी जिल्हा -विजापूर (कर्नाटक ) ११०५-१११३ (८ वर्ष )

२ उपनयन -संस्कार १११३ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी

३ कुडलसंगम जिल्हा विजापूर (कर्नाटक )आगमन व ज्ञानसाधना १११३-११२६(१३ वर्ष)

४ मंगळवेढा जिल्हा सोलापूर (महाराष्ट्र )येथे आगमन व वास्तव्य११२७-११२६(६वर्ष)

५ बसवकल्याण -जिल्हा बिदर (कर्नाटक )येथे आगमन व राजा बिजल दरबारात प्रधानमंत्री म्हणून कार्य ११३२-११६७(३६ वर्ष)

६ बसवकल्याण -जिल्हा बिदर (कर्नाटक )येथे अनुभव मंडप स्थापना इसवी सन११४१

7 समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर यांचा एकूण कार्यकाळ ११०५-११६७(६५ वर्ष)

**समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर यांचे समाज उपयोगी कार्य :-**

**१ जगातील पहिली संसद (अनुभव मंडप):-**

श्री महात्मा बसवेश्वर महाराजांनी बाराव्या शतकात अठरापगड जाती धर्मातील स्त्री-पुरुषांना एकत्र करून आपापसातील मतभेद,मनभेद विसरून वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी अनुभव मंडपांची जे की सामाजिक संस्कृती विचारपीठ स्थापन केले त्यामुळे त्यांना आज पण खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही संस्थेची स्थापना झालेली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही हे निश्चित इंग्लड पार्लमेंटच्या अगोदर श्री महात्मा बसवेश्वर यांनी ही संसद उभारली म्हणून जगातील पहिली संसद उभारण्याचा मान समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर यांच्याकडे जातो.या

सभामंडपातून समाजात निर्माण होणाऱ्या समस्या का निर्माण होतात आणि त्या समस्येची सोडून सर्वांच्या सहकार्यातून कशा पद्धतीने करता येईल.यासाठी विचारमंथन यांच्या माध्यमातून उपाय योजना सुचविण्याचे काम केले जात असे.त्यावेळी समाजात असणाऱ्या अनिष्ट प्रथा परंपरा रूढी यांचे उच्चाटन करून समाज एकसंघ राहण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी अस्पृश्यता निर्मूलनाचे काम केले असताना आपणास पहावयास मिळते त्यावेळी महात्मा बसवेश्वरांनी समता,बंधुता,न्याय एकता हक्क आदी बाबीवर विचार मंथन केले आहे तेच आत्ताच्या शासनकर्त्यांनी केले तर विषमता भेदनीति आणि जातीय राजकारणावर पायबंद बसेल आणि चांगले सुशासन व प्रशासन व्यवस्था निर्माण होईल.

**२ जातिभेद निर्मूलन:-**

श्री महात्मा बसवेश्वर यांना जात हा शब्द मुळात मान्य नव्हता त्यांनी जातिभेद निर्मुलनासाठी महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते त्यांनी वेदप्रामाण्य व पुराण ग्रंथ प्रामाण्य नाकारले कारण या ग्रंथांमध्ये मुलांमध्ये विषमता केलेली दिसून येते. समाजांच्या सुखसोयी साठी ऋग्वेदामध्ये श्रमविभाजन यावर आधारित वर्णव्यवस्था निर्माण करण्यात आल्यामुळे त्यांना हे मान्य नसल्याचे दिसून येते.या वर्णव्यवस्थेचे रूपांतर कालांतराने जातीव्यवस्थेत झाले ऋग्वेदात म्हटले आहे की,त्या सर्वात्मक पुरुषाने मुखातून ब्राह्मण,बहुपासुन क्षेत्रीय,मांड्यातून वैश्य तर पायापासून शुद्ध बनला.त्यामुळे जाती जन्मापासून ठरू लागली तेव्हा सूत्रावर शारीरिक,मानसिक आणि आर्थिक शोषण होऊ लागले.त्या सर्वांचे समर्थन करणारी मनुस्मृति कर्दनकाळ ठरत होती. त्यामुळेच श्री महात्मा बसवेश्वर यांनी या सर्वांना विरोध केलेला दिसून येतो. जातीचा अभिमान मांडणाऱ्या साठी श्री महात्मा बसवेश्वर यांनी एका वचनात म्हटले आहे की,

"व्यास मत्स्यगंधा यांचा पुत्र
मार्कंडेय मातंगी चा पुत्र
मंडोदरी मांडू कन्या अगस्ती कोळी आहे
दुर्वास चांभार आहे कश्यप लोहार आहे
कोंडीन्या न्हावी आहे तिन्ही जगात प्रसिद्ध आहेत
श्रपच असला तरी शिवभक्तच कुलीन श्रेष्ठ आहे"

यावरील वचनातून सर्व जातींना कनिष्ठ मांडण्यात आले आहेत.परंतु प्रत्येकाने आपल्या कर्तृत्वाने आपले आगळेवेगळे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे पुढे श्री संत महात्मा बसवेश्वर महाराज म्हणतात,

**"अस्पृश्य असला तरी काय झाले ?**
**लिंग भक्त श्रेष्ठ कुलीन आहे**
**श्रद्धा ठेवून संदेह करणे योग्य नाही पहा**
**तरी काय प्रयोजन असेल तर ?**
**भाव शुद्धि विना भक्ती होणार नाही कुडलसंगम देवा ".**

वरील वचनाच्या माध्यमातून श्री संत महात्मा बसवेश्वर यांनी जातिव्यवस्था निर्मूलनासाठी बाराव्या शतकात प्रयत्न केलेले असताना दिसून येतात.

**३ आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन :-**

भारतीय समाजव्यवस्था की कर्मकांडावर आधारित समाजव्यवस्था आहे. भारतात पूर्वीपासूनच अनेक जाती धर्माचे लोक वास्तव्यास आहेत.प्रत्येक धर्माचे तत्वज्ञान राहणीमान वागण्याची पद्धती एकमेकांपेक्षा वेगळ्या स्वरूपाची आहे.त्यामुळे आजही आंतरजातीय विवाह समाज मान्यता देताना दिसून येत नाही.परंतु श्री महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात समाजातील भेदभाव कमी करून समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी रोटी-बेटी व्यवहार होणे आवश्यक आहे.असे वाटल्यामुळे त्यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेमधील राजसत्तेने लाभलेल्या बंधनातून मुक्ती मिळवण्यासाठी बाराव्या शतकात मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुरस ब्राह्मण मंत्री यांची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडून आणला त्या काळामधील समाजव्यवस्थेला विरोध करून ब्राह्मण व मागास (शूद्र )जाति विवाह घडवून आणणे निश्चितच क्रांतिकारी पाऊल होते तो त्यांचा निर्णय ऐतिहासिक होता.

**४ महिलांच्या सर्वांगीण विकासाची कार्य :-**

भारतीय समाजात स्त्रियांना पुरुषांपेक्षा कनिष्ठ स्थानआहे .स्त्री दुय्यम समजले जाते या पुरुषप्रधान समाजात स्त्रियांचा ही सन्मान झाला पाहिजे असे श्री महात्मा बसवेश्वर महाराजांना बाराव्या

शतकात वाटत होते.त्यामुळे त्यांनी त्या वेळी समाज जागृतीच्या माध्यमातून स्त्रियांवर होणारे अन्याय कमी करण्याचे प्रयत्न केले आहे त्यात सतीप्रथा बंदी,विधवा पुनर्विवाह अशा अनिष्ट प्रथेस विरोध करून विधवा वेश्या निराधार स्त्रियांना दिलेला सामाजिक आधार अत्यंत क्रांतिकारक निर्णयामुळे पुढील काळात झालेल्या समाजसुधारकांना निश्चितच प्रेरणा देणारा ठरला बसवन्ना यांनी 16000 वेश्यांचा उद्धार केला यांचा उल्लेख पुराणात येतो पुढे बसवन्ना यांनी स्थापन केलेला अनुभव मंडपात 770 सभासद होते त्यापैकी 700 शरण पुरुष आणि 70 शरण स्त्रिया होत्या यामध्ये अक्का महादेवी महादेवी आद्दाक्की लक्काम्मा , मुक्ता एक्का गंगा यांचा समावेश आहे

**५ अंधश्रद्धा निर्मूलनाचे पुरस्कर्ते :-**

बाराव्या शतकात संपूर्ण जग हे कर्मकांडावर आधारित दैववादाच्या आहारी गेलेले होते. त्यामुळे त्यावेळी भारतात अधिक प्रमाणात अंधश्रद्धा हो पावलेली दिसून येते.त्या काळामध्ये श्री महात्मा बसवेश्वरांनी जातीभेद,वर्णभेद आणि लिंगभेदविरोध केला आहेआणि सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे यांचा पुरस्कार केला कोंबडे-बकरे कापू नका,भिक्षा मागू नका ,सो कष्टावर जगा,समाजसेवा करा , पर्यावरणाचे रक्षण करा ,ज्योतिष भविष्य वास्तुशास्त्र पाहू नका ,होम-हवन करू नका ,खोटे बोलू नका ,चोरी करू नका ,व्यसनाधीन बनु नका या आणि अशा कितीतरी गोष्टी समाजाला शिकवण्याचे काम करून समाज प्रबोधन करण्याचे काम तत्कालीन समाज व्यवस्थित यांनी केलेले आहे.बसवन्ना हे येणारे सर्वच दिवस शुभ असतात असे सांगितले त्यामुळे या चळवळीचे आद्य प्रवर्तक करून श्री महात्मा बसेश्वर होते आपणास मान्यच करावे लागेल.

## साम्यवादी बसव

**"नागाने बसचा तयासी वदवु**
**पिसाचा पळवु मंत्रोद्वारे**
**धनाचे पिशाच्य जाईना मंत्राने**
**दारिद्र्य गरुड याने जाईल ते**
**कुडलसंगम देवा दारिद्र्य गारुड**
**होतीचि आरुढ पळकाठी"**

**संदर्भ :-**


१ डॉ घुगरे सूर्यकांत - वीरशैव व इतर धर्म आणि समाज साधना बुक स्टॉल गडहिंग्लज कोल्हापूर, १९९९

२ डॉ सोलापुरे राजेश्वर - लिंगायत स्वतंत्र धर्म अरुण प्रकाशन लातूर द्वितीय आवृत्ती २०१४

३ माता महादेवी - लिंगायत धर्म दर्पण विश्वकल्याण मिशन बेंगलोर १९९७

४ डॉ अशोक मेनकुदळे - महात्मा बसवेश्वर महाराष्ट्र बस्व परिषद भालकी तिसरी आवृत्ती २०१९

५ डॉ एच. थिप्पेरूद्र स्वामी - बसवेश्वर साहित्य अकादमी नई दिल्ली १९८२

६ प्रा भीमराव पाटील / प्रा विजयकुमार करंजकर - युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर प्रिंट पॅक बिजनेस फॉर्म्स लातूर २००६

# ५. गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक विचार

**प्रा.डॉ. विकास बी. चांदजकर**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
एम. एस. गोटे माहाविद्यालय, वाशिम

---

**प्रास्तावना** — आगरकरांचा जन्म सातारा जिल्हयातील टेंभू खेडयात झाला. घराच्या गरिबीमुळे शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी त्यांना अनेक मार्ग चाखाळावे लागले. कधी मामलेदार कचेरीत उमेदवारी करून, कधी मधुकरी मागून तर कधी कंपाउडरचे काम करून त्यांनी आपले मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठी ते क—हाड, अकोला आणि रत्नागिरी येथे गेले. १८७५ साली ते मॅट्रिक झाले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते पुण्यात आले. पुण्यात त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वर्तमानपत्रात लिखाण करणे, वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा यात भाग घेवून बक्षिसे जिंकणे, शिष्यवृती मिळवणे अशा प्रकारे त्यांची गुजरान चालत असे. गोपाळ गणेश आगरकर व लो. टिळक यांची ओळख १८८९ मध्ये एम. ए. करतांना झाली. त्यांनी एकत्र शिक्षण घेतले होते. त्यांनीच त्यावेळेस केसरी वृतपत्र सुरू करण्याचे ठरवले होते. त्यात लो. टिळक, गोपाळ गणेश आगरकर व विष्णुशास्त्री चिपळूणकर या तिघांचा पुढाकार होता.

गोपाळ गणेश आगरकर हे महाराष्ट्रातील विचारवंत, समाजसुधारक, पत्रकार व शिक्षणतज्ञ होते. आधुनिक महाराष्ट्राच्या ईतिहासात सामजिक जागृतित आगरकरांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी समाजप्रबोधन करण्यासाठी सुधारक, केशरी व मराठा या वृतपत्राचा आधार घेतला. सामाजिक समानता, स्त्री पुरूष समानता आणि विज्ञाननिष्ठा ही त्यांची जिवनमूल्य होती. मुलींना सुध्दा शिक्षण मिळायला पाहिजे असा लेख त्यांनी सुधारक या वृतपत्रात लिहिला. बुध्दिप्रामान्यवादाचा पुरस्कार करून महाराष्ट्रामध्ये समाजसुधारणा करणा—या समाजसुधारकामध्ये गोपाळ गणेश आगरकरांचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या मांदियाळीतील क्रांतीकारी समाजसुधारक म्हणून आगरकर हे महत्वपूर्ण ठरतात.

आगरकर हे बाळ गंगाधर टिळक यांनी सुरू केलेल्या केसरी वृतपत्राचे पहिले संपादक (१८८०—१८८१) होते. पुण्यात महाविद्यालयील शिक्षण घेत असतांना लो. टिळक व आगरकर या दोघांच्याही मनात स्वदेशीची प्रेरणा जागी झाली. दिनांक १ जानेवारी १८८० रोजी विष्णुशास्त्री चिपळूनकरांनी न्यू इंग्लीश स्कूलची स्थापना केली. आगरकर १८८१ मध्ये एम. ए. झाल्यानंतर चिपळूणकरांना जावून मिळाले. आगरकर व टिळक यांनी १८८१ मध्ये इंग्रजीतून मराठा व मराठीतून केसरी अशी दोन वृतपत्रे सुरू केली. केसरीचे संपादकत्व आगरकरांनी स्वीकारले. पुढे लो. टिळक व आगरकरांनी २४ ऑक्टोंबर १८८४ मध्ये डेक्कन एज्यूकेशनची सीापना केली व त्या अंतर्गत १८८५ साली फर्ग्यूसन कॉलेजची सीापना केली. आगरकर याच कॉलेजमध्ये शिकवू लागले. पुढे ते फर्ग्युसनचे प्राचार्य झाले.

**समाजिक सुधारणासंबंधीचे विचार** — गोपाळ गणेश आगरकर हे भौतिकता ऐहिकता, बुध्दिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंन्र्य या आधुनिक तत्वांना प्रमाण मानून जिवाच्या दुराराने समाजसुधारणांचा पाठपुरावा करणारे समाजप्रबांधक होते. महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला विवेकाचे, बुध्दिप्राण्याचे व व्यक्तिस्वातंन्र्याचे अधिष्ठान देवून परिर्वतनाचे विज्ञाननिष्ठ तत्वज्ञान निर्माण करण्याचे श्रेय गोपाळ आगरकराकडे जाते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गती या काळामध्ये प्राप्त करून देण्याचे काम गोपाळ गणेश आगरकरांनी केले. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून ग्रंथ ब्राम्हण्याला विरोध करून बुध्दिप्रामाण्य चिक रास धरणारे तत्कालीन सुधारकांनी आपला विचार परखडपणे मांडणारे सुधारक म्हणून आगरकर हे उल्लेखनिय आहेत.

आगरकरांनी बुध्दिवादाचा आधार घेवून सामाजिक सुधारणंचा प्रयत्न केला. बुध्दिला जे पटेल तेच स्वीकारले पाहिजे केवळ आंधानुकरण करून ग्रंथामध्ये दिले आहे म्हणून ते स्वीकारणे अयोग्य ठरते. रूढी प्रामाण्याऐवजी

वैज्ञानिक कार्यकारणभावांनी युक्त बुध्दिप्रामाण्यवाद रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री सुधारणेचा प्रयत्न करतांना स्त्रियज्ञना देखिल पुरूषाच्या बरोबरीने हक्क आणि अधिकार असले पाहिजेतहा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडला. स्त्रियांनी जॅकिटे घातली पाहिजेत असे ते म्हणत, याचाच अर्थ असा होतो की पुरूषाच्या बरोबरीने समाजात स्त्रियांना महत्वपूर्ण स्थान असले पाहिजे.

राजकीय स्वातंन्र्याआधी समाजसुधारणा महत्वाची आहे. बालविवाह, अस्पृश्यता यासारख्या समाजातील अनिष्ट रूढी अगोदर नष्ट झाल्या पाहिजेत, अशा विचारांचे ते होते. समाजसुधारना विरूध्द राजकीय स्वातंन्र्य याच वादातून १८८७ च्या ऑक्टोबर मध्ये केसरीचे संपादकत्व सोडले. १८८८ साली सुधारक हे वृतपत्र सुरू केले.

व्यक्तिस्वातंन्र्य, बुध्दिवाद, भौतिकता या मूल्यांचा प्रचार त्यांनी सुधारकमधून केला. तसेच जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य, बालविवाह, ग्रंथप्रामाण्य, धर्मप्रामाण्य, केशवपन इत्यादी अन्यायकारक परंपरांना त्यांनी विरोध केला. अंधश्रध्दा, पाखंडीपणा यांच्यावर प्रहार केले. सुधारक हे वृतपत्र मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतून प्रकाशीत होत होते. इंग्रजी सुधारकाची जबाबदारी काहीकाळ नामदार गोखले यांनी सांभाळली होती. आगरकरांनी व्यक्तिस्वातंन्र्याचा पुरस्कार केला, समाजाने व्यक्तिस्वातंन्र्याचा पुरस्कार करून समाजातील त्या त्या घटकांना स्वातंन्र्य देणे आवश्यक आहे याला स्त्रिया देखील अपवाद असता कामा नयेत. स्त्री स्वातंन्र्याचा देखिल पुरस्कार झाला पाहिजे याचा पुनरूच्चार आगरकरांनी केला.

आगरकर व्यक्तिवादाचे पुरस्कर्ते होते. बुध्दिला जी गोष्ट पटेल ती बोलने व शक्य तितके आचरणात आणणे मग त्याला इतरत्र पुज्यगंथांत वा लोकरूढीत आधार असो वा नसो हे आगरकरांचे महत्वाचे तत्व होते. स्त्रियांच्या पेहराविषयी त्यांनी आधुनिक विचार समाजासमोर मांडले होते. राजकीय व सामाजिक बाबतीत समता, संमती व स्वातंन्र्य हे घटक महत्वाचे आहेत. मनुष्यकृत विषमता शक्य तितकी कमी असावी, सर्वास सारखे निदान होईल

तितके सारखे सुख मिळवण्याची व्यवस्था होत जाणे अशी त्यांची सुटसुटीत विचारसरणी होती. विचारकलह हा समाजव्यर्सीला आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या या विचारसरणीमूळे त्यांना टोकाचा विरोध झाला. सनातनी लोकांनी त्यांच्या जिवंतपणीच त्यांची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काझली होती. पण तरीही निग्रहाने आणि निश्चयाने त्यांनी आपल्या विचारांचा पाठपुरावा केला.

**टिळकांशी मतभेद —**

आगरकरांचे म्हणणे राजकीय स्वातंन्र्यापेक्षा सामाजिक सुधारणेला महत्व देणे असे होते.तर टिळकांच्या मते राजकीय सुधारणा आधी सामाजिक सुधारणा नंतर करता येतील. संमतीवय व बालविवाहाच्या प्रश्नावर त्यांचे मतभेद वाढले. सहाजिकच केसरीतून सुधारणावादी मते मांडतांना आगरकरांची कुचूंबना होउ लागली. याची परिनती पुढे केसरी सोडण्यात झाली. कोल्हापूर प्रकरणात दोघांना झालेली शिक्षा भोगण्यासाठी त्यांना डोंगरी येथील करागृहात ठेवण्यात आले होते.त्यावर आगरकरांचा डोंगरीवरील दिवस हा लेख प्रसिध्द आहे. त्यात दोघांच्या संबंधावर लिहिलेले आहे. त्यावेळेस कोठडीत असतांना कॉलेजमधील दिवस, सामाजिक सुधारणांची वचने त्यातील किती साध्य केली या विषयावर आपण दोघे चर्चा करीत असु असे आगरकरांनी लिहिले आहे.

१८८७ या वर्षीच्या २५ ऑक्टोंबरला केसरीच्या पाच ओळीचे स्फुट आले आज पासून रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल. एल. बी. हे केसरीपत्राचे प्रकाशक झाल्यामुळे प्रकाशकत्वाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे. रा. गोपाळ गणेश आगरकर एम. ए. यांच्यावरती जबाबदारी राहिली नाही. आगरकरांनी स्वतंत्र व्‌तपत्र काढून आपल्यातील दुही स्पष्ट करू नये असे टिळकांचे म्हणणे होते. त्यांनी केसरीत स्वतंत्रपणे आपले नाव लिहून आपले मत मांडायला टिळकांची काहीच हरकत नव्हती.सुरूवातीच्या काळात आगरकरांनी तेही केले. विशेष अग्रलेखाविरोधात भुमिकाही त्यात असत आणि टिळकही त्या छापत.फीमेल हायस्कूलातील शिक्षणक्रम या नावाने केसरीच्या अग्रलेखातून मोठालेख आगरकरांनी लिहिला यापूर्वी केसरीने छापलेल्या चार

अग्रलेखाचा प्रतिवाद करणारा हा लेखही केसरीने काटछाट न करता छापला. दोघांमधील संबंधाचे हे एक उदाहरण आहे.

अखेरच्या दुखण्यात आगरकरांनी टिळकांची आठवन येउन त्यांनी त्यास मुद्दाम भेटीला बोलावून आपले दु:ख हलके केले होते. त्याच प्रमाणे केसरीतला आगरकरावरील मृत्यूलेख लिहित असतांना टिळक रडत होते व तो दोन कॉलमचा लेख लिहिण्याला त्यांना या उमाळयाच्या अडथळयामुळे चारतास पुरले नाही. या लेखात टिळकांनी असे लिहिले आहे की, मृत्यूच्या उग्रस्वरूपापुढे बारीकसारीक मतभेदाच्या गोष्टी विसरून गेलोत व जुन्या आठवणी जागृत होवून बुध्दि व लेखणी गोंधळून गेली.आगरकर हे मूळचे गरीब स्थितीतील असता त्यांनी आपला शिक्षणाचा उपयोग द्रव्य न मिळवता समाजाचे ऋण फेडण्याकरिताच केला या गोष्टीला त्यांनी नेहमीच महत्व दिले होते.

**पुरस्कार** — महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे सुधारककार गोपाळ गणेश आगरकर नावाचा पुरस्कार दिला जातो. इ. स. २०१० मध्ये हा पुरस्कार डॉ. श्रीराम लागु यांना तर २०१२ मध्ये मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते सय्यद भाई यांना देण्यात आला. महाराष्ट्र संपादक परिषद ही संस्था आदर्श पत्रकारीतेसाठी गो. ग. आगरकर पुरस्कार देते.

### संदर्भ —

१) कठारे डॉ. अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत प्रब्लिकेशन जळगाव जून २०१५ पेज नं. ३०

२) सोनवणे स्नेहल, आधुनिक महाराष्ट्र, सक्सेस पब्लिकेशन, पुणे २०१४ पेज नं. १०

३) नातु म. ग. दि. ए. देशपांडे, आगरकर वाडमय खंड १ ते ३

४) चवसाळकर अशोक, तानाजी ढोंबरे, डॉ. भा. ल. भोळे, आगरकर विचार

५) चवसाळकर अशोक, आगरकरांचे राजकीय विचार २००५

६) मराठी विश्वकोष, आगरकर गोपाह गणेश,१४ जुलै १८५६ ते १७ जून १८९५

७) Google cache of- http:/www.dailykesari.com/sund2htm

# ६. महिला विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**प्रा. डॉ. मीना भगवानराव बोर्डे**
जालना समाजकार्य महाविद्यालय रामनगर जालना

प्रस्तावना:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विकासात योगदान याविषयी अध्यान करतांना असे दिसून येते की, भारतातील जातिव्यवस्थेने स्त्रियांवर किती घोर अन्याय केलेला आहे. याविषयी १९१६ मध्ये त्यांनी भारतातील जाती या शोधनिबंधात जातिव्यवस्थेचा उगम, रचना आणि विकास यांची मांडणी केली आहे.

भारतातील जातिव्यवस्थेने स्त्रियांवर किती मोठा अन्याय केला याविषयी बाबासाहेब चर्चा करतात. स्त्रीयासंबंधीच्या सती, सक्तीचं वैद्यव्य आणि बालविवाह यांचा अनिष्ठ प्रथेचे मूळ जातीव्यवस्थेत असल्याचे बाबासाहेबानी दाखवून दिले. निरनिराळया काळात काही संस्था जन्माला येतात. काही संपतात काही टिकतात. परंतु भारतातील जन्माला काही आली ती हजारो वर्ष अशी टीकली याच्या मुळाशी बाबासाहेब जातात.

टोळयाटोळयांनी वास्तव्य करणाऱ्या आदिम समाजव्यवस्थेत स्त्रिया व पुरुष यांची समान संख्या राबवण्याचा प्रयत्न केला जाईल.

टोळीतील एखाद्या पुरुष मेला तर अतिहित ठरणाऱ्या स्त्री धोकादायक ठरू नये म्हणून पुरुषाच्या चितेवर तिला जाळण्याची व टोळीतील स्त्री-पुरुष संख्या समान ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता. जातिप्रथेचे मूळ त्यात सापडते. पुढे स्त्रीला जिवंत जाळणे ही क्रूरपणा असल्याची भावना जागू लागली. त्याचवेळी त्या स्त्रीवर सक्तिचे वैद्यव्य लादले जाऊ लागले.

आता एखादी स्त्री मेली तर अतिरिक्त ठरणाऱ्या पुरुषाचे काय करायचे. स्त्रीच्या शोधात तो बाहेर गेला तर आपल्या टोळीला तो धोकादायक ठरू शकतो. म्हणून त्यांने आपले पुढले आयुष्य ब्रह्मचारी म्हणून जगावे असे ठरले. परंतु त्याचे पालन करणे अगदीच अवघड झाले. मग त्याचे वयात न आलेल्या मुलीशी लग्न लावून देणे हा पर्याय पुढे आला. त्यातूनच बालविवाह ही पद्धत पुढे आली.

जातीअंतर्गत विवाहपद्धती आणि त्यातून रक्त संस्करनाला घालण्यात आलेली बंदी यामुळेच जातिव्यवस्था टिकून राहिली अशी बाबासाहेब मांडणी करतात त्याच जातीव्यवस्थेमुळे स्त्रियांच्या अन्यायात वाढ झाली व तिच्यावर जास्तीत जास्त बंधने लादले जाऊ लागले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू कोड बिल**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल बनवले. हिंदू कोड बिल गॅझेटमध्ये छापून प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच लोकसभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले. देशात हिंदू कोड बिलाविरुद्ध देशात वातावरण तापले. बाबासाहेबांच्या विरोधात घोषणाबाजी, आंदोलन, मोर्चा मोठ्या प्रमाणात निघाले. हिंदू कोड बिल आत काय होते ?

- ❖ सर्व जाती जमातीच्या स्त्रियांना समान संधी पुरुषाबरोबर समान हक्क आणि अधिकार राहतील.
- ❖ मुलींना वारसा हक्क असावा व वडिलांच्या संपत्तीत तिचा मुलाबरोबर वाटला असावा.
- ❖ स्त्रिला पोटगी मिळावी.स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार असावा.
- ❖ सार्वजनिक ठिकाणी धार्मिक कार्याला स्त्रिला शुद्र मानले जाऊ नये. तिला कमी लेखले जाऊ नये.
- ❖ पती-पत्नीमध्ये कोणताही शारीरिक दोष नसल्यास व पहिली पत्नी जिवंत असतांना दुसरा विवाह करण्यास कायद्याने बंदी करावी.

- ❖ स्त्रिला वारसा नसल्यास तिला दत्तक घेण्यास मान्यता असावी. मुलगी दत्तक जाण्यास कायद्यांनी संमती असावी.
- ❖ तिने कमविलेल्या संपत्तीवर तिची मालकी असावी
- ❖ स्त्रियांना आंतरजातीय विवाह करण्यास परवानगी असावी.

ज्या स्त्रियांच्या उत्कर्षासाठी, उन्नतीसाठी हिंदू-कोड बिल होते. त्याच स्त्रियांने विरोध केला. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाला विरोध करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत चौकशी केली. तेव्हा जी वस्तुस्थिती स्त्रियांनी सांगितली त्यातून समाजात स्त्रियांची काय स्थिती स्पष्ट होते. त्या स्त्रियांना हिंदू कोड बिल आत नेमके काय आहे याची माहिती नव्हती. त्या रस्त्यावर येऊन हिंदू कोड बिलाला विरोध करीत होत्या. नवऱ्याने घराबाहेर काढण्यापेक्षा / घटस्पोट देण्यापेक्षा आम्ही हिंदू कोड बिलाचा निषेध करण्याचे मान्य केले. मोर्चात व आंबेडकर यांच्या विरोधात घोषणा दिलेल्या महिलांनी सांगितली.

हिंदू कोड बिल पास झाली नाही त्यावर जर तात्काळ प्रतिक्रिया ही कोणाची आली असेल तर डॉ.आंबेडकरांची त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. नंतर ते बिल एक एक करून पास झाले. परंतु ते सर्वच बिल एकत्रित पास झाले असते. तर स्त्रियांचे ज्यास्त कल्याण झाले असते.

स्त्रियांच्या प्रश्नांवर रणसंग्राम मनात उतरलेल्या डॉ.आंबेडकरांना स्त्रियांच्या चळवळीचा पाठिंबा मिळाला नाही. खरे तर कोणत्याही देशाची प्रगती स्त्रीयांच्या प्रगतीवर अवलंबून असते. म्हणून भारतीय समाजातील स्त्री ही प्रगत असावी. अशी भूमिका होती. डॉ.आंबेडकरांनी नागपूर अधिवेशनात महिलांना उपदेश करतात. त्यात त्यांना स्वच्छ राहण्यास शिका व दुर्गुणापासून मुक्त रहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. त्यांच्या मनात महत्वकांक्षा रुजवा. त्यांच्यातील न्यूनगंड कमी करा. तू थोर पुरुष होणार आहे. असे त्यांच्या मनावर विंबवा. लग्न करण्याची घाई करू नका. लग्न म्हणजे जबाबदारी, लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याइतपत

आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लादू नका. जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की अतिरिक्त मुले होणे हे दृष्टकृत्य आहे. आपल्या लहानपणी आपणाला मिळू शकली त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलाला देणे हे आई-वडिलांचे कर्तव्य आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलींने लग्न झाल्यानंतर पतीची मैत्रीण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. परंतु पती जर गुलामीची वागणूक देत असेल तर त्याला खंबीरपणे तिने नकार द्यावा. व समतेसाठी आग्रह धरावा. हा उपदेश दलित स्त्रियापुरता मर्यादित नव्हता तर तो समाजातील सर्वच स्त्रियांसाठी होता.

भारतीय विवाह व्यवस्थेमध्ये मुलीचे मत फारसे विचारात घेत नाही हे चांगले नाही.त्यावर डॉ.आंबेडकरांनी जाहीरपणे मते मांडली. विवाहाच्या बाबतीत मुलींना स्वातंत्र्य दिले पाहिजे. तसेच मुलगा लग्नात मुलगी सुंदर आहे काय ? मी आपणास पसंत आहे काय ? वगैरे गोष्टी पाहतो. पण तोच हक्क मुलींना द्या. बऱ्याच सुंदर स्त्रिया कुरूप माणसाच्या स्वाधीन झालेल्या मी पाहिले आहेत. विवाह व्यवस्थेत स्त्रियांनाही हक्क द्यावेत. त्यांची पसंती विचारात घ्यावी यासाठी ते जाहीर भूमिका घेतात. स्त्रियांच्या राहणीमानात, वर्तमानात, आत्मविश्वासात झालेला बदल पाहून त्यांना आनंद झाला होता. चळवळीने विचारांने आणि शिक्षणाने हा बदल झाल्याचे डॉ.आंबेडकर नमूद करतात.

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू-कोड बिल निर्माण केले. तसेच संविधानात सर्वच स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार दिले. त्यात कोणताही फरक केला नाही. स्वाभिमानाने, स्वलंबनाने, आत्मसन्मानाचे जीवन या विचारातून मिळेल आणि म्हणून डॉ.आंबेडकर भारतीय स्त्रियांच्या चळवळीतिल महत्त्वाचे क्रांतिकारक सुधारक

आहेत. भारतीय स्त्रियांनी सुद्धा डॉ.आंबेडकर फक्त दलित स्त्रियांचे नेते नसून सर्वच भारतिय स्त्रियांच्या उत्कर्षासाठी व विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :-**


i. चांगदेव खेरेगोडे डॉ.आंबेडकर आणि हिंदु कोड बिल सुगावा प्रकाशन,पुणे

ii. दिलीप सुरवाडे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री सुधारणा लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद.

iii. वि.रा. घाटे स्त्री चळवळीतील वाटा.

iv. डॉ. लीला पाटील. भारतीय स्त्री जीवन. मेहता पब्लिकेशन हाऊस, नागपूर

v. प्रा.व्ही.बी. पाटील. मानवी हक्क. के. सागर पब्लिकेशन

vi. डॉ.आंबेडकर स्त्री जागृतीचे कार्य. इंगोले प्रतिभा. इंटरनेट सर्च

# ७. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य व बहुजनांसाठीचे शैक्षणिक कार्य

**सहा. प्रा. ज्ञानेश्वर सुभाष कव्हर**
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय,वाशिम

**प्रस्तावना**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील आणि राधाबाई ह्या त्यांच्या जन्मदात्री माता होत्या. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असतांना कोल्हापूरच्या छत्रपतीची गादी रिकामी झाली तेव्हा कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांच्या राणी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी शाहू महाराज म्हणजेच पूर्वीचे यशवंत यांना दत्तक घेतले, आणि त्या दिवसापासून ते छत्रपती शाहू महाराज झाले.

महाराज गादीवर बसताच त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्राथमिक शिक्षण मोफत असावे या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केलेली दिसून येते. शाहू महाराजांनी प्रत्येक गावात प्राथमिक शाळा सुरू केलेली दिसून येते. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये स्पृश्य-अस्पृश्यांसाठी एकच शाळा असावी यासाठी आपले धोरण राबवले. अस्पृश्यता कमी करण्यासाठी त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र असलेल्या शाळा बंद केल्या आणि त्या सर्वांना एकत्रितपणे शिकता येईल याची व्यवस्था केली.

**शाहू महाराजांचे कार्य**

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे राजाराम महाविद्यालय उभारले. हे महाविद्यालय दक्षिण भारतातील उच्च शिक्षण देणारी एक महत्त्वाची संस्था म्हणून नावारूपाला आलेले होते. या संस्थेत बहुजनांना हक्काने व आनंदाने उच्च शिक्षण दिले जात होते. या कॉलेजमध्ये बहुजनांची अनेक मुले उच्च शिक्षण घेऊन पुढच्या पिढ्यांसाठी शिक्षण आणि समाज सेवा करण्यासाठी तयार झालेली दिसून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठी शाहू महाराजांनी सहकार्य केले. चित्रकार अबलाल रहमान यांच्यासारख्या

कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागास वर्गासाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा निर्णय घेतला.

राजाराम महाविद्यालयाच्या अनुषंगानेच महाराजांनी कोल्हापूर येथे वस्तीगृह चळवळ उभारली. ही चळवळ देशातली पहिली चळवळ म्हणून गणली जाते. राजाराम कॉलेजला जोडून खेड्यापाड्यातून येणाऱ्या मुलांना राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी, यासाठी महाराजांनी एक सर्वसमावेशक वसतिगृह स्थापन केले. पण या वसतिगृहांमध्ये ब्राह्मणांकडून ब्राह्मणेतरांना त्रास होऊ लागला. त्यातून हळूहळू ब्राह्मणेतरांची संख्या घटत जाऊन सरतेशेवटी ती संख्या शून्य झाली. त्यामुळे महाराजांना फार वाईट वाटले. आणि त्यांनी प्रत्येक बहुजन जातीसाठी एक स्वतंत्र वस्तीगृह निर्माण केले. त्यातूनच व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग स्थापन झाले. त्याचे कार्य हे १८ एप्रिल १९०१ रोजी सुरू झाले. पी.सी. पाटील हे या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी होते,त्यांनी एक कृषीतज्ञ म्हणून नावलौकिक मिळवला. त्याच नंतर छत्रपती शाहू महाराजांनी जैन, लिंगायत, मुस्लिम, अस्पृश्य, सोनार, शिंपी, पांचाळ, गौड-सारस्वत, इंडियन ख्रिश्चन, ढोर-चांभार, सुतार, नाभिक अशा विविध जाती धर्माची वीस वस्तीगृहे स्थापन केली. अशी जातवार वस्तीगृह निर्माण करण्यामागे महाराजांची खूप दूरदृष्टी होती. त्यांच्या मते, विविध जाती-धर्माचे मुले शिक्षित झाली, तर त्यांच्या नंतरच्या पीढीत अस्पृश्यता आणि उच्च-निच्चपणा कमी होऊन त्यांच्याकडून समतेवर आधारित समाज निर्माण होईल.

शाहू महाराजांनी अस्पृश्य शिक्षणासाठी खूपच तळमळीने शैक्षणिक धोरणे ठरवली आहेत. त्यांनी २४ नोव्हेंबर १९११ रोजी आदेश काढून अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारचे शिक्षण मोफत केले. महाराजांनी अस्पृश्यांसाठी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. १९१९ साली एका आदेशाद्वारे अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र शाळा बंद करून एकाच शाळेतून स्पृश्य आणि अस्पृश्य यांची मुले शिक्षण घेतील असे स्पष्ट केले.

बहुजनांची परिस्थिती सुधारायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण सर्वसामान्य समाजातील बहुजन व दलित बांधवांसाठी खुले

केले. शोषित व मागास वर्गाला आरक्षण देण्याची कल्पना सर्वप्रथम जर कुणी मांडली असेल तर ती शाहू महाराजांनी मांडली. समाजातील विषमता, भेदाभेद नष्ट करण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांना तत्कालीन उच्चवर्णीयांचा कडवा विरोध सहन करावा लागला पण त्यांनी ह्या विरोधाला न जुमानता आपले कार्य पूर्णत्वास नेले. आज मागास, दलित, बहुजनांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारली ह्याचे कारण छत्रपती शाहू महाराजांचे कठोर प्रयत्न, त्यांनी आखलेल्या व पूर्णत्वास नेलेल्या योजना.

बहुजनांच्या मुलांना व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे, यासाठी सुद्धा शाहू महाराजांनी पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळाव्यतिरिक्त व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या. त्यांनी शिक्षणावर खर्च करण्यासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केली. अस्पृश्यांना उच्च शिक्षणाकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराज हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्तेसुधारक होते.

शिक्षणानंतर बहुजन व मागासलेल्या वर्गाच्या रोजगाराचीही सोय व्हावी, ते आर्थिक दृष्ट्यासुद्धा सक्षम व्हावेत ह्यासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण लागू करण्याची संकल्पना त्यांनीच मांडली व म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक म्हटले जाते. १८९४ साली जेंव्हा त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा कारभार आपल्या हाती घेतला तेंव्हाच त्यांनी बहुजन व मागासवर्गीयांच्या उन्नतीचे उद्दिष्ट ठरवले व आपल्या दूरदर्शी योजनांद्वारे ते उद्दिष्ट पूर्णत्वास नेले.

हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आहे हे आपण अनेक नेत्यांच्या भाषणातून नेहमीच ऐकत असतो आणि पुरोगामी महाराष्ट्राचा उल्लेख आला कि एका नावाचा हमखास उल्लेख होतो, ते नाव म्हणजे छत्रपती शाहू महाराज. आज भारतात जातीवाद असला तरी त्याची धार बरीच बोथट झालेली आहे. आजही समाजात विषमता दिसून येत असली तरी त्याची तीव्रता व प्रमाण पूर्वीसारखे राहिलेले नाही. ह्याचे श्रेय शाहू, फुले, आंबेडकर ह्यांना व ह्यांच्यासारख्या अनेक समाज सुधारकांना जाते.

काळाच्या पुढे पाहण्याची दृष्टी लाभलेल्या या महामानवाने समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाला पर्याय नाही हे अचूकपणे जाणले. त्यामधूनच शिक्षण सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी धोरणे आखून अमलात आणली.

रयतेचा राजा अशी पदवी रयतेनेच बहाल करावी ह्यातच शाहू महाराजांची महानता व त्यांनी लोक कल्याणासाठी केलेले कार्य व त्यामुळे बहुजनांच्या मनात त्यांना मिळालेले मानाचे स्थान ह्याची कल्पना येते. आजपर्यंत भारतात अनेक समाजसुधारक होऊन गेले, परंतु शाहू महाराजांचे वेगळेपण असे कि त्यांनी बहुजनांची केवळ सामाजिक परिस्थिती सुधारण्याकडेच लक्ष न देता त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल ह्याची प्रत्यक्ष तरतूद केली.

विषमता, अज्ञान, जातीयवादाचे निर्मूलन, स्त्री वर्गाला त्यांचे अधिकार मिळवून देणे, शिक्षणाचा प्रचार व प्रसार अशी अनेक कार्य त्यांनी केले. शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून १९१९ साली कानपूर येथे कुरमी क्षत्रिय सभेने त्यांना 'राजर्षी' पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतीतांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

**संदर्भ**


१) राजर्षी शाहू छत्रपती- जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार.

२) राजर्षी शाहू छत्रपती यांचे निवडक आदेश- संकलन, शामराव पाटील,भास्कर धाटावकर.

३) स्वामी व्ही. एन., महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत,साहित्यिक आणि थोर विचारवंत, २००७,विद्याभारती प्रकाशन,लातूर.

४) कांबळे नारायण, राजर्षी शाहू-नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

५) प्रियंका वाणी, 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष-राजर्षी शाहू महाराज', महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्रातील लेख, २६ जून २०२१.

# ८. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे दलित साहित्य आणि कार्य

**सहा. प्रा. सचिन रवींद्र इंगोले**
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम
मो. नं. ७०२०६१४९३७

---

प्रस्तावना.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सुधारणावादी आणि पुरोगामी विचाराचे विद्वान समाजसुधारक भारताला लाभलेले आहे. वास्तववादी जीवनाला बाजूला ठेवून पिढ्यानपिढ्या बुरसटलेल्या विचारांच्या विळख्यात असलेल्या जनतेस उदारमतवादी व पुरोगामी बनविण्याचे महान कार्य आपल्या साहित्य व वांग्मयाच्या जोरावर ज्यांनी केले असे, तुकाराम भाऊराव ऊर्फ शिवशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० साली सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगांव या गावी झाला. तमाशा या कलेला लोकनाट्याची प्रतिमा मिळवून देण्याचे महान कार्य देखील अण्णाभाऊ साठे यांनीच केले १९४४ सली त्यांनी 'लाल बावटा' पथक स्थापन केले, आणि बघता बघता ते शाहीर झाले. त्यांची 'माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली' ही गाजलेली लावणी होय. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात घरगडी, कोळसेवाला, रंग कामगार, खाण कामगार, हमाल, तमाशातील सोंगाड्या अशा विविध भूमिका त्यांनी वठवल्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्या नंतरच्या काळात राजकीय प्रश्नांविषयी त्यांनी मोठी जागृती केली. त्यात गोवा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळी मध्ये त्यांनी योगदान दिले. १६ ऑगस्ट १९४७ साली "ये आझादी जुठी है, देश कि जनता भुकी है" असा नारा देत अण्णाभाऊ भर पावसात न डगमगता उभे राहिले.

अण्णाभाऊंनी ३० पेक्षा अधिक कादंबऱ्या आणी २१ कथासंग्रह असे अफाट लेखन त्यांच्या जीवन प्रवासात लिहिले. त्यापैकी त्यांच्या सात कादंबऱ्या वर नामवंत दिग्दर्शकांनी नावाजलेले चित्रपट देखील काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीला समर्पित केलेल्या फकीरा या कादंबरीत मांग समाजातील लढवय्या तरुणाचे चित्रण कमालीचे आहे.

सन १९६१ सली महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार देखील 'फकीरा' या कादंबरीत मिळाला. अण्णांची 'माकडीचा माळ' या भटक्या-विमुक्त समाजावर व त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भारताच्या साहित्यातील एकमेव कादंबरी पण तिची देखील तथाकथित समीक्षकांनी योग्य ती नोंद घेतली नाही अशा या महान युगपुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य चिरागनगर झोपडपट्टीत काढले याच झोपडपट्टीत त्यांच्या आयुष्यातील एकापेक्षा एक अशा उत्कृष्ट कलाकृतीची निर्मिती झाली.

उद्दिष्टे

1. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती अभ्यासणे
2. अण्णाभाऊ साठे यांचे समाज विकासातील कार्य अभ्यासणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून, यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित प्रलेख, साप्ताहिक, मासिक, वर्तमानपत्रे, लिखित-अलिखित प्रलेख, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी १९५० नंतर आपले लिखाण काम सुरू केले. आणि पाहता-पाहता एखाद्या वादळा प्रमाणे आपले विचार कथा-कादंबरी, पोवाडे आणि कविता इत्यादी च्या माध्यमातून जनतेसमोर आणले त्यांचे लेखन हे आत्मकेंद्री नसून समाजकेन्द्री होते. अण्णा भाऊंच्या साहित्यात सर्वच समाजाचे प्रतिबिंब अगदी स्पष्ट उमटलेले दिसून पडते. स्वातंत्रोत्तर काळामध्ये बुरसटलेल्या समाजाला एक नवी दिशा देण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांच्या लिखाणाने केले. समाजाला एक उन्नत अवस्थेत घेऊन जाण्यासाठी लोकशाहीर अण्णा भाऊंचे साहित्य महत्त्वाची भूमिका आजही बजावत आहेत.

वास्तव जीवनाची विदारकता व तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहता पाटील व कुलकर्णी यांच्या बेताल वागण्याचा त्यांच्या अत्याचारांचा आणि चांगुलपणा याचाही अनुभव अण्णाभाऊंनी घेतला. त्याचबरोबर सह्याद्रीच्या कुशीत वसलेला सांगली, सातारा, कोल्हापूर चा परिसर कृष्णा, कोयना, पंचगंगा या नद्यांच्या काठचा समृद्ध निसर्ग त्या प्रदेशातील ग्रामीण सण, संस्कृती, ब्रिटिशकालीन जीवन, दाट जंगल झाडी, डोंगर वाटा यांच्या आश्रयाने सुरू असणाऱ्या क्रांतिकारकांच्या चळवळी, गुंड दरोडेखोरांच्या दंगली, गावातील भाऊबंदकी, दोन

गावांमध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेले वैर त्यात भरडला जाणारा अस्पृश्य समाज, खून, मारामाऱ्या, तरण्याताठ्या देखण्या पोरीबाळींना वर होणारे अत्याचार या साऱ्या गोष्टी अण्णाभाऊ आपल्या साहित्यात मांडत होते.

धनदांडग्याकडून होणारे शोषण, गावाकडील माणसांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, श्रेष्ठ-कनिष्ठ ते चा भाव, बलुतेदारांची स्थिती गती, सावकारशाही श्रीमंतांची मुजोरी, महारवाडा, मांगवाडा, भटके–फीरस्ते अशा साऱ्या गोष्टीचे अण्णांनी केलेले बारीक-सारीक चित्रण त्यांच्या साहित्यातून आपसूकच दिसून पडते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या लिखाणाचा व विचाराचा त्यांच्यावर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. दलित व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क मिळावे, बुरसटलेल्या सामाजिक विचारांना एक नवीन दिशा देण्याचे कार्य लोकशाहीरांच्या लिखाणातून झाल्याचे दिसते. ह्या अशा वास्तववादी लेखनाने त्यांचे साहित्यास आपोआपच वैश्विक आयाम प्राप्त झालेला दिसतो. भारतीय भाषांमध्ये त्यांचे साहित्य अनुवादित तर झालेच, झाले पण धर्म जातीच्या व देश काळाच्या सीमा ओलांडून ती जर्मन जॅक इंग्लिश पोलीस रशियन स्लोव्हाक या परराष्ट्रीय भाषांमध्ये भाषांतरित झाले.

अण्णाभाऊंच्या साहित्याचे विलोभनीय यश म्हणावे लागेल. अण्णाभाऊ साठे वर मार्क्सवादी विचार सरणीचा प्रभाव होता. त्यांच्या साहित्यातून आधीपासूनच समतावादी विचारांचा अविष्कार दिसून पडतो. मुंबईतील कामगार जीवन त्यांचे वर्गसंघर्षाचे तत्वज्ञान, तेथील कामगारांचे संप, मोर्चे व त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न, कामगारांच्या चळवळीतील फाटाफूट या साऱ्या अनुभवातून अण्णांच्या विचारांना पाठबळ मिळत गेले. मुंबईच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांचे जीवन चित्रण करताना त्यांच्यातील मार्क्सवादी दृष्टीकोनाचा आविष्कार प्रभावीपणे व्यक्त होतो. अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक तर होतेच पण, शोषणमुक्ती हा त्यांचा खरा ध्यास होता. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर साऱ्या जगाच्या पाठीवरील सर्व कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी मानवतावादी व समतावादी लिखाणाच्या माध्यमातून त्यांनी आयुष्यभर लढा दिला. वर्ग विरहित समाजाचे स्वप्न आपल्या उराशी बाळगून त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे ध्येयवादी लोकशाहीर व मानव मुक्ती चे खरे शिलेदार होत.

## निष्कर्ष

स्वातंत्र्यपूर्व काळ व तत्कालीन सामाजिक परिस्थिती अत्यंत दयनीय असताना अण्णाभाऊंचे उदारमतवादी व पुरोगामी विचार समकालीन पिढीला एक नवीन विचार करावयास लावणारे आहेत. कुत्र्या-मांजरांच्या सारखे जीवन जगणाऱ्या दलित, शोषित, बहुजन समाजाला त्यांचे हक्क मिळावेत याकरिता त्यांचे क्रांतिकारी लेखन उपयुक्त ठरते. अण्णाभाऊंच्या साहित्यात सामाजिक जाणिवांच्या वेदनांचा विद्रोह स्पष्ट दिसून येतो. सामाजिक दृष्ट्या उपेक्षित, दलित, पीडितांच्या व्यथा वेदनांना मराठी साहित्यात अगदी साहजिकच त्यांनी आपल्या लेखनातून स्पष्ट केले. भटक्या विमुक्तांचे भटकंतीचे जीवन पहिल्यांदा अण्णाभाऊंनी त्यांच्या लिखाणातून समाजाला दाखविले. "कुत्र्या- मांजरांचा सारखे जीवन जगू नका अन्यायाचा प्रतिकार करा मनगटाच्या भरोशावर जगा" असे अण्णाभाऊ वारंवार म्हणायचे. स्वतः एक सामान्य कष्टकरी व कामगारांचे जीवन जगणारे अण्णाभाऊ म्हणतात की, "ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकऱ्यांच्या व कामगारांच्या तळहातावर तरली आहे" अशा या महान युगपुरुषाचे लेखन व कार्य अत्यंत वाखाणण्या जोगे होय. तरीदेखील तथाकथित समीक्षकांनी त्याची योग्य ती नोंद घेतली नाही.

## संदर्भ

१) स्वामी व्ही.एन.,महाराष्ट्रातील समाजसुधारक,संत,साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत,विद्याभारती प्रकाशन,लातूर,२००७.

२) राठोड एन.डी., सामाजिक विद्रोहाचे जनक-अण्णाभाऊ साठे, वाघमारे संग्राम(सपा),साहित्यसुर्य विशेषांक.

३) डांगळे अर्जुन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाण्मय,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,१९९८.

४) साठे शंकर भाऊ, माझा भाऊ अण्णा भाऊ, सुगावा प्रकाशन,पुणे,१९८०.

# ९. राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार - सरदार वल्लभभाई पटेल

**प्रा. डॉ. गौरव गोविंदराव जेवळीकर**
लोकप्रशासन विभागप्रमूख,
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

---

भारतीय राजकारणात कार्यकर्तृत्वाच्या अनुषंगाने अनेक नामाभिधाने बहाल करण्यात आली आहेत. त्यामध्ये छत्रपती, राजर्षी, लोकमान्य, महात्मा, नेताजी, स्वातंत्र्यवीर, भारतरत्न याप्रमाणेच 'लोहपुरूष' ही बिरुदावली लावली जाते ती सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नावापूर्वी ! सरदार वल्लभभाई पटेल हे भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रमुख शिल्पकारांपैकी एक ! स्वातंत्र्य प्राप्तीचे संकेत मिळाल्यावर आणि स्वातंत्र्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर भारताच्या नेतृत्वापुढे अनेक मोठी आव्हाने होती, त्यापैकी एक प्रमुख आव्हान होते ते 565 संस्थानांच्या विलीनीकरणाचे ! सरदार पटेलांनी हे काम जवळ - जवळ एक हाती पार पाडलं. बहुसंख्य जनता सरदार पटेल यांना प्रामुख्याने ओळखते ते या संदर्भातच. परंतु पटेल यांची थोरवी एवढ्यापुरतीच सिमीत नाही. प्रखर देशभक्त, चतुर पुढारी आणि कठोर प्रशासक ही त्यांची तीन रूपे अजूनही सर्वश्रुत नाहीत. प्रशासनासाठी वापरला जाणारा 'स्टील प्रेम' हा शब्द पटेल यांच्या व्यक्तिमत्त्वावर सुचला असावा.

'गांधीजींना एकनिष्ठ साथ देणारे सरदार पटेल', 'जिनांचे दात त्यांच्याच घशात घालणारे पटेल', पाकिस्तानच्या पहिल्या आक्रमणावेळी काश्मीर वाचणारे पटेल', 'संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सहजपणे सोडवून बलवान भारत उभा करणारे पटेल', अशा एक ना अनेक भूमिका पटेल यांनी लीलया पेलल्या आहेत. 'हैदराबाद आणि जुनागड'चा प्रश्न सरदार पटेलांनी ज्या कौशल्याने आणि निर्धाराने सोडवला ते पाहता त्यांच्यातील 'एक कणखर प्रशासक' सर्वांसमोर येतो. प्रखर देशभक्ती आणि स्वच्छ चारित्र्य हे सरदार पटेलांचं मुख्य भांडवल होतं. त्यांचे व्यक्तिमत्त्व कणखर आणि करारी होते. वकिलीच्या व्यवसायामुळे त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेला धार चढली होती. गांधीजींवरील असीम निष्ठेमुळे व्यवहारांना एक संस्कारसुचिता

आणि निस्वार्थीपणा लाभला होता. ग्रामीण भागातल्या एका साध्या शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उपजतच साधेपणा आणि व्यवहारवाद होता.म्हणूनच विनोबा भावे पटेलांना, "महात्मा गांधींच्या लढ्यातले धनुर्धारी म्हणत असत". ते गांधीजींचे शिष्य होते आणि त्यांचे सेनापतीही. त्यांना माघार घेणे ठाऊकच नव्हतं. 'युद्ध काळात ब्रिटन साठी जसे चर्चील होते तसे सुमारे तीन दशके भारतासाठी पटेल होते'. त्यामुळे एम. एन. रॉय त्यांना "मास्टर बिल्डर" असे म्हणतात. सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रशासकीय कौशल्यावर भाष्य करताना स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय नागरी सेवेतील अधिकारी आपापसात बोलताना असं म्हणत की, "सरदार पटेल यांचा मृतदेह जतन करून ठेवला असता आणि नुसता तो जरी खुर्चीवर बसवला असता तर तो देखील उत्तम प्रकारे राज्यकारभार व प्रशासन चालवला असता, याबाबत कोणाचेही दुमत असणार नाही." वल्लभभाई पटेल यांच्या व्यक्तिमत्त्वातचं तेवढी जरब होती. सरदार पटेलांच्या प्रशासकीय कौशल्यावर केवळ भारतीय नेत्यांचाच नव्हे तर लॉर्ड माऊंटबॅटन सारख्या ब्रिटीश अधिकाऱ्यांचाही विश्वास होता. लॉर्ड माऊंटबॅटन म्हणाले होते, "तुमचा पाठींबा असेल तर जवाहरलाल नेहरू भारतीय राज्यकारभार चालविण्यामध्ये अयशस्वी होणार नाहीत". सरदार पटेलांना माणसांची उत्तम पारख होती आणि एखाद्याला त्याच्या चुकीबद्दल चार शब्द सुनावण्याची त्यांच्यात धमक होती. वल्लभभाई पटेल म्हणतात, "सततची भीती तुम्हाला सौम्य बनवते. सौम्यपणा हा गुण आहे पण त्याच्या अतिरेकाने तुम्ही एवढे नेभळट बनता की अन्यायाशी लढण्याची उर्मीच तुमच्याजवळ उरत नाही". व्यापक अर्थाने यालाच भित्रेपणा म्हणतात. पटेलांनी ज्याप्रमाणे विचार मांडले, त्याप्रमाणे आचरणातही आणले. त्यामुळेच त्यांना पोलादी पुरुष किंवा लोहपुरूष म्हणून संबोधले जाते.

आज महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल विरोधात्मक राजकारण करण्याची स्पर्धा सुरू आहे परंतु खरा इतिहास तसा नाही. गांधीजी स्वतः सांगतात, "मला वल्लभभाई सारखा सहकारी मिळाला हे देवाचे माझ्यावर केवढे उपकार आहेत." श्रीनिवास शास्त्री यांनी गांधीजींच्या तब्येतीची विचारपूस करणारे पत्र लिहल होतं. त्याला उत्तर देताना गांधीजी पत्रात लिहितात, "पटेल माझ्याबरोबर आहेत. दिवसातून अनेक वेळा ते मला विनोद सांगत असतात. त्यांच्या विनोदावर मी पोट धरून हसतो. पटेल माझी आईसारखी काळजी घेतात." ही सर्व विधानं पटेल - गांधी यांच्या विरोधी राजकारण करणाऱ्यांच्या

डोळ्यात अंजन घालणारी आहेत. 1930 च्या महात्मा गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाचा वेळी म्हणजेच दांडी यात्रेच्या वेळी सरदार वल्लभाई पटेल यांना 'जॉन द बाप्टीस्ट ' असं नामाभिधान मिळालं होतं. येशू ख्रिस्तांचं आणि सेंट जॉन यांचं नातं होतं तेच गांधीजी आणि पटेल यांचं होतं, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. दांडी यात्रेच्या वेळी पटेल यांनी नेमकी हीच भूमिका पार पाडली होती. गांधीजी येशू ख्रिस्तासारखे होते - अत्यंत कृश पण त्यांचा आवाज ऐकणाऱ्याच्या काळजाचा वेध घेत असे तर पटेल जॉन सारखे शरीराने धट्टेकट्टे आणि गांधीजींच्या पुढे धावणारे त्यांचे शिष्य होते. मिठाच्या सत्याग्रहासाठी सुरत जवळच्या 'दांडी' या समुद्रकिनाऱ्यावरील छोट्या गावाची निवड करण्यात आली होती, ही निवड पटेल यांनीच केली होती. गांधीजींचा मार्ग सोपा करण्यासाठी पटेल त्यांच्या आधी पुढे जाऊन लोकांना हा प्रश्न समजावून देत होते. सरकार देखील गांधीजी इतकेच सरदार पटेल यांना घाबरत असत ते यामुळेच ! भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना देण्यात आलेल्या फाशीमुळे भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिश सरकार विरुद्ध तीव्र असंतोष पसरला होता. त्याबाबत बोलताना पटेल म्हणाले, "भगतसिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अवलंबलेल्या मार्गाला माझा पाठिंबा नाही पण त्यांच्या मनातल्या देशभक्तीबद्दल मला तिळमात्र शंका नाही. त्यांचा त्याग आणि बलिदान यापुढे माझं मस्तक नम्रतेनं झुकत आहे. त्यांना फाशी देऊन सरकारने आपली हृदयशून्यताच दाखवून दिली आहे". पटेल पुढे म्हणाले, सरकारबरोबर आमचा लढा चालू आहे पण त्यात शस्त्राला स्थान नाही. अहिंसात्मक मार्गाने आम्ही विजय मिळवू". पण स्वातंत्र्योत्तर काळात सरदार पटेलांच्या या अहिंसात्मक विचारांमध्ये बदल झाल्याचे दिसून येते. महात्मा गांधीजींच्या अहिंसा तत्त्वा विषयी पटेल यांच्या मनात आदर होता, पण तो आदर मनात ठेवत पटेल गांधीजींना म्हणाले होते, "मला राज्य चालवायचंय ! तोफा, बंदुका आणि सैन्य बाळगायचंय ! गांधीजी आपण म्हणतात की याची काहीच आवश्यकता नाही पण मी तसं वागू शकत नाही; कारण मी तीस कोटी जनतेचा विश्वस्त बनलोय. सर्वांचं रक्षण करण्याचे उत्तरदायित्व माझ्यावर आहे. देशावर हल्ला झाला तर मी तो सहन करणार नाही. कारण तो परतवणं ही माझी जबाबदारी आहे". त्यामुळे पटेल गांधीजींना म्हणाले, "तुमचा मार्ग चांगला आहे पण मी तिथपर्यंत जाऊ शकत नाही".

1947 च्या मध्यरात्री ब्रिटनची माघार सुरू झाली पटेल आन साठी मात्र ब्रिटिशांनी परत जाणं ही एका नव्या कामगिरीचे सुरुवात ठरणार होती आता त्यांच्या पुढे अधिक महत्त्वाचं काम होतं ते ब्रिटिश आम्हाला खालचा भारत आणि संस्थानांचा भारतात अशा दोन पूर्णपणे वेगळ्या भारतामध्ये ऐक्य साधून त्यांना एकसंघ बलशाली राष्ट्र उभं करायचं होतं. चर्चिल यांना भारताची 'भारत, पाकिस्तान आणि विविध राज्य अशी फाळणी करायची होती' आणि कोणत्याही परिस्थितीत पटेलांना ते होऊ द्यायचे नव्हते. 15 एप्रिल 1947 रोजी संस्थानिकांसमोर केलेल्या भाषणात पटेल म्हणाले, "येत्या काही दिवसात भारत स्वतंत्र होणार आहे. यावेळी काँग्रेसच्या बाजूने जे उभे आहेत त्या - त्या सर्व राजांचे मी अभिनंदन करतो. जे राजे त्यांच्या राज्यातील लोकांबरोबर राहतील तेच राज्य करू शकतील. जे लोकांबरोबर असणार नाहीत, त्यांची सिंहासनं  नष्ट होतील. अनेक राजे अद्यापही काय घडतंय याची वाट पाहत कुंपणावर बसून आहेत. अशा राजांनी आत्ताच भारतात सामील व्हावं, असं आवाहन आपण करत आहोत. भावी काळात त्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांना असं सामील होता येणार नाही, असा सज्जड दम 'राष्ट्रीय एकात्मते'साठी सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच दिला होता, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. "एकीच्या अभावामुळे भारताचा बळी गेला. परस्परांशी असलेली आपली भांडणं, आपापसातील मतभेद, एकमेकांचा केला जाणारा द्वेष यामुळे आपली अधोगती झाली. त्यामुळे इतिहासात आपण अनेक वेळा परकीय आक्रमणाचे बळी ठरलो. त्या चुकांच्या सापळ्यात पुन्हा अडकणं आता आपल्याला परवडणार नाही. आपण आता स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभे आहोत. आपली सुरक्षा आणि राज्यांचं व त्याच बरोबर देशाच अस्तित्व कायम राखण्यासाठी ऐक्य आणि परस्पर सहकार्याची गरज आहे. त्यासाठी सर्व संस्थानिकांनी पुढे यावे",अशी भावना सरदार पटेल यांनी व्यक्त केली.

जम्मू - कश्मीर संस्थानाबाबत नेहरुंनी पटेलांचा शब्द मान्य केला असता तर पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखला जाणारा कश्मीर खऱ्या अर्थाने स्वर्ग ठरला असता परंतु दुर्दैवाने शेख अब्दुल्ला  व नेहरू यांचे असलेले  मैत्रीपूर्ण संबंध, त्यामुळे शेख अब्दुल्लांनी नेहरूंच्या मागे लागून काश्मीर प्रश्नांचे सूत्र पाटलांकडून काढून घ्यायला लावली. यातून जम्मू-काश्मीरला मिळालेले वेगळे अस्तित्व, त्यातून झालेली कलम 370 ची निर्मिती हे सरदार वल्लभाई पटेल यांना मान्य नव्हते. सरदार पटेल नेहरुं म्हणाले होते, काश्मीरचं भारतातलं

विलीनीकरण शेख अब्दुल्लांनी मान्य केलं ते काही धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे नव्हे तर जीनांपासून आपला बचाव व्हावा यासाठी ! पटेलांनी प्रतिकूल परिस्थितीत काश्मीरला दिलेली भेट, त्यांनी काश्मीरच्या महाराजांना श्रीनगरहून  जम्मूला जाण्याचा दिलेला सल्ला आणि काश्मीरशी संपर्क ठेवण्यासाठी सर्व ऋतूत चालू राहील असा रस्ता बांधणं- या पटेलांच्या  धोरणात्मक निर्णयामुळे काश्मीर पाकिस्तानच्या ताब्यात जाण्यापासून वाचण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. आज जम्मू काश्मीर भारतात टिकून आहे. त्याला सरदार वल्लभभाई पटेल यांनी दाखविलेला प्रशासकीय बाणा कारणीभूत आहे, हे मान्यच करावे लागेल. पटेलांनी सहानुभूती, समजूतदारपणा आणि सर्वसमावेशकता यातूनच राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट साध्य केलं. 1956 साली रशियाचे अध्यक्ष ख्रुश्चेव्ह यांनी भारतचा दौरा केला असता, त्यांनी काढलेले उद्गार सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रशासकीय नेतृत्वाचे कौशल्य दर्शविणारे आहेत. ते म्हणतात, "तुम्ही भारतीय अजबच आहात, राजांना नष्ट न करता तुम्ही त्यांची राज्य कशी नष्ट केलीत हे एक न उलगडणारं कोडं आहे." पटेलांनी  मूल्यांवर आधारित राजकारण केलं. त्यातूनच ते खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार ठरले.

संदर्भ ग्रंथ

1. सरदार वल्लभभाई पटेल - भारताचा पोलादी पुरुष, लेखक - बलराज कृष्णा
( अनुवाद - भगवान दातार), रोहन प्रकाशन, पुणे
2. लोहपुरुष सरदार पटेल - अनिता गौड, राजा पॉकेट बुक्स, दिल्ली
3. राष्ट्र निर्माता सरदार पटेल - आचार्य चंद्रशेखर शास्त्री, सोसायटी फार पार्लमेंटरी स्टडीज, दिल्ली
4. वल्लभभाई पटेल - चरित्र व काळ, त्र्य. र. देवगिरीकर, भारत ग्रंथमाला प्रकाशन, पुणे
5. सरदार पटेल - सेठ गोविंद दास, राजपाल अँड सन्स, दिल्ली
6. हिंद के सरदार - रावजी भाई पटेल (अनुवाद सोमेश्वर पुरोहित), नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

# १०. महात्मा गांधीचे सत्य व  अहिंसा संबंधीचे विचार

**डॉ. आर. जी. बोंडे**
ग्रंथालय विभाग,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,वाशिम
मो.न. ९५५२२६४१५६

---

**प्रस्ताविक**

श्री.मोहनदास करमचंद गांधी यांचे राजकीय तत्वज्ञानातील व राजकारणातील स्थान अव्दितीय आहे.मॅचेस्टर गार्डियनने त्यांचे वर्णन राजकारण्यांमधील संत व संतांमधील राजकारणी (a saint among Politicians ans politician among saints) आसे केले. 'वेश असावा बावळा', हे त्यांच्या बाबतीत पूर्णांशाने सत्य ठरते.दोन खादीचे वस्त्रे परिधान करुन आपले फक्त अर्धे शरील झाकणा—या गांधींनी संपूर्ण ब्रिटिश राजवट, भारतीय जनता आणि जगातील राष्ट्रांचे लक्ष वेधुन घेतले. गांधी हे जणू काही एक राजकीय संमोहनतज्ज्ञ (a political hypnotist ) होते. गांधी राजकारणात पडले असले तरी धार्मिक प्रवृत्तीचे होते. टिळक राजकारणात पडले नसते. तर एक संशोधक झाले असते.आणि गांधी राजकारणाकडे वळले नसते तर साधुसंत बनले बसते. किंबहुना. त्यांच्यातील मानवतेबद्दलच्या तीव्र तळमळीमुळेच ते राजकारणात आकर्षिले गेले. दक्षिण आफ्रिकेतील अल्पसंख्यांकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सत्याग्रह आरंभिला.त्यात जे अनुभव आले ते टिपून ठेवले.तो सत्याग्रहाचा पहिला राजकीय प्रयोग होता. मोठया क्षेत्रात मोठया ध्येयसिध्दीस्तव तो करुन पाहण्यासाठी गांधी भारतात आले.म्हणजेच त्यांचा मूळ पिंड राजकारणी पुरुषाचा नव्हता.

आध्यात्मिक व नैतीक कल्पना हा त्यांच्या विचारांचा पाया होय. हिन्दुधर्मग्रंथांजील गीता.रामायण.महाभारत. उपनिषदे. पातंजजीची योगसूत्रे इत्यादींचा त्यांच्या विचारांवर बराच प्रभाव पडलेला आढळतो.जैन आणि बौध्द धर्मातील कल्पनांचाही त्यांच्या विचारांवर प्रभाव दिसतो.विशेषत. अहिंसेची कल्पना प्रामुख्याने

या धर्मातील तत्वज्ञानातून त्यांनी उचलली असावी.ख्रिश्चनांच्या New Testament' मधील काही गोंष्टींचा बराच प्रभाव त्यांच्या विचारांवर झालेला आहे. 'Father forgive them for they know not awat they do' जीझस्च्या शेवटच्या प्रार्थनेशी अनुरुप अशीच त्यांची शत्रूकडे पाहण्याची दृष्टी आहे. इस्लामचाही त्यांनी अभ्यास केला होता.कुराणातील 'Turn away avil with that which is better' तसेच मोक्ष (salvation) इत्यादी कल्पनांनी ते प्रभावित झालेले आढळतात.

इ.स.पूर्व ५५० वर्ष चीनमध्ये कॉनफयूशस व लाओत्से प्रचलीत होते. लाओत्सेच्या Taoison ( Tao means the way ) मधील शांतता आणि अहिंसा तसेच अराज्यवादाचा त्यांच्यावर प्रभाव पडला.

गांधीजींच्या विचारावंर धर्मातील अशाही विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडला असल्याचे आढळते.तसेच थोरीओ (Thoreau) पासून त्यांनी सविनय कायदेभंगाची कल्पना घेतली.रस्किनच्या 'Unto this Last' आणि 'Crown of wild Olives' मधून श्रमप्रतिष्ठा व इतर कल्पना घेतल्या. टॉलस्टॉयपासून अराज्यवाद आणि अहिंसात्मक असहकाराची कल्पना स्वीकारली.

**गांधीजींचे अहिंसेसंबंधी विचार**

अहिंसेचे तत्व भारतीयासाठी नवीन नाही.महात्मा गांधींनी अहिंसेला भारतीय राजकारणात आणि समाजजीवनात नवीन स्वरुप प्राप्त करुन दिले हे त्यांचे फार मोठे योगदान आहे.अहिंसेला त्यांनी राजकीय चळवळीचा केंद्रबिंदू मानले. गांधीजींच्या मते सत्य आणि अहिंसेंचा अन्योन्यश्रिज संबंध आहे.सत्यापर्यंत पोहचण्यसचे अहिंसा एक माध्यम आहे.

**अहिंसेचा व्यापक अर्थ :—**

सर्वसाधारणपणे आपण अहिंसेचा जो सामान्यत:अर्थ लावतो असा संकुचित अर्थ गांधीजींना अभिप्रेत नव्हता. **हिंसेचा अभाव म्हणजे अहिंसा नाही**.राग,लोभ, स्वार्थ याव्दारे इतरांना शारीरिक किंवा मानसिक दुखापद न करणे म्हणजे अहिंसा होय.आपल्या वागण्याचे बोलण्याने किंवा कार्याने कोणालाही दु:ख किंवा त्रास हाऊ नये हा अहिंसेचा खरा मार्ग होय.मनात एखाद्याबद्दल असूयेची भावना येणे देखील हिंसा होय.

**क्रोधाला प्रमाणे जिंकले:**

क्रोधाला प्रेमाणे,हिंसेला अहिंसेने,अपकाराला उपकाराने शत्रुत्वाला मित्रत्वाने उत्तर देणे म्हणजे अहिंसा होय.गांधीजींच्या अहिंसेत राग,लोभ,क्रोध मोह,मत्सर हेवा हिंसा यांना स्थान नाही.दुष्टासमोर शरणागती न पत्करता व त्याचे दुष्ट इरादे बदलविण्यासाठी आत्मबदलाचा वापर करणे अहिंसा होय.

**बौध्दिक नैतिक गैरव्यवहार हिंसा होय :**

लोकांची लुबाडणूक,फसवणूक हाणमारी जखमी करणे,लुटणे हे सर्व हिंसेत मोडतात.या सर्वापासून परावृत्त होणे म्हणजे अहिंसेचा मार्ग स्वीकारणे होय.हा गुण प्रत्येकाने आपल्या मनात जोपासणे व वाढविणे आवश्यक आहे.प्रेमाची भावना हे अहिंसेचे दुसरे रुप होय.आपल्या दु:खाची पर्वा न करता दुस—याच्या सुखासाठी प्रयत्नशील राहणे ही खरी अहिंसा होय.

अशाप्रकारे गांधीजींनी अहिंसेचा व्यापक अर्थाने उपयोग केला.अहिंसेच्या मर्यादा त्यांनी रुंदावल्या त्यांनी अहिंसेच्या विविध रुपांचे स्पष्टीकरण केले.

**अहिंसेचे प्रकार :**

म.गांधिनी अहिंसेचे तीन प्रकार मानले आहे.

(१) भित्र्या व्यक्तीची अहिंसा.

(२) दुर्बलांची अहिंसा.

(३) शक्तीशाली व्यक्तीची अहिंसा.

(१) भित्र्या व्यक्तीची अहिंसा.

गांधीजी म्हणतात की,भीती आणि अहिंसा एकत्र राहू शेकत नाही. व्यक्तीमध्ये जेव्हा परिस्थितीचा सामना करण्याचे धैर्य नसते तेव्हा ती व्यक्ती घाबरुन अहिंसेचा आश्रय घेते.अशा अहिंसेपेक्षा हिंसा बरी असे गांधिजी म्हणतात.एक वेळ हिंसाचारी व्यक्तीला अहिंसक बनविणं सोपे आहे पण अहिंसेचे पाघंरुण घेतलेल्या भित्र्या व्यक्तीला अहिंसक बनविता येत नाही.

(२) दुर्बलांची अहिंसा.

जिवनातील काही क्षेत्रात एखादे ध्येय डोळयासमोर ठेऊन अशा अहिंसेचा उपयोग करण्यात येतो.एखाद्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी एक साधन म्हणून अशा अहिंसेचा स्वीकार करण्यात येतो.स्वीकारण्यात कोणत्याही प्रकारची नैतिकता नासते.

अशा व्यक्तींना हिंसा करावीशी वाटते.पण त्यांच्याजील दुर्बळतेमुळे त्यांना तसे करता येत नाही.अशा अहिंसेपेक्षा हिंसा चांगली असे गांधीजी म्हणतात.तत्व म्हणून स्वीकारलेली अहिंसा केव्हाही श्रेष्ठ असते.दुर्बलांच्या अहिंसेत नाईलाजाने अहिंसेचा स्वीकार करण्यात येतो.अशाप्रकारची अहिंसा ही सक्तीची अहिंसा होय.त्यामुळे गांधीजी याला दुर्बलाची अहिंसा म्हणतात.

(३) शक्तीशाली व्यक्तीची अहिंसा.

ही.सर्वात श्रेष्ठ अहिंसा आहे.म्हणूनच गांधीजी त्याला वीर पुरुषाची अहिंसा म्हणतात.वीरांची अहिंसा ही प्रचंड आत्मविश्वास आणि अत्युच्च नैतिक पातळी यावर अवलंबून असते.राजकीय आणि सामाजिक जीवनात अशाप्रकारची अहिंसा सर्वोत्कृष्ट स्वरुपाची मानजी जाते.वीराची अहिंसा त्यालाच शक्य असते ज्याचा आत्मिक विकास पूर्णपणे झाला आहे.हिंसा करण्याची शारीरिक आणि मानसिक क्षमता असून देखील अहिंसेचा स्वीकार करण्यात येतो.यासाठी फार मोठे मन लागते.सर्वसाधारण लोकांच्या आवाक्या बाहेरील ही गोष्टी असल्यामुळे त्याला गांधीजी वीरांची अहिंसा म्हणतात.वीर पुरुषाच्या अहिंसेत आक्रमण करण्याचे सामर्थ्य असते पण आक्रमणाची इच्छा नसते यासाठी मनाची तयारी असायला पाहिजे. गांधीजींनी वीर पुरुषाच्या अहिंसेला सर्वश्रेष्ठ मानले आहे.वीर पुरुषांनी तत्व म्हणून अहिंसेचा स्वीकार स्वेच्छेने केलेला असते सक्तीने नाही.विनम्रता आणि धैय अहिंसेसाठी आवश्यक आहे.न मारता मरण्याचे शौर्य त्यासाठी लागते.

**गांधीजींची अहिंसा व्यवहारवादी आहे. :**

पूर्ण अहिंसेच्या मार्गाने मार्गक्रमण करणे फार कठीण आहे.कारण एवढी उच्च नैतिक पातळी मनुष्य गाठू शकत नाही.मनुष्य जीवनात थोड्याफार प्रमाणात हिंसा करित असतो.

**अस्तित्व टिकविण्यासाठी :**

आपल्या प्राणाचे रक्षण करण्यासाठी किंवा आपले अस्तित्व टिकवण्यासाठी पुष्कळदा हिंसा करावी लागते आणि तसे करणे स्वाभाविक आहे,ते गांधीजींना मान्य आहे.त्यामुळे अहिंसेबद्दलचे गांधिजींचे विचार पुर्णपणे व्यवहारवादी होते.जसे इतरांची कत्तल करित सुटणा—याची हिंसा करणे हिंसा ठरत नाही किंवा सैनिक जेव्हा युध्दात शत्रु राष्ट्राच्या सैन्याचा वध करतात तेव्हा.ती हिंसा ठरत नाही.

अशाप्रकारे अहिंसेचे व्यवहारवादी स्वरुप गांधीजींनी आपल्यासमोर प्रतिपादित केले.अहिंसा एक तत्व म्हणून त्याचे महत्व सर्वमान्य आहे.पण व्यवहारात त्यासाठी जी तडजोड करावी लागते ती गांधीजींना मान्य नाही म्हणूनच गांधीजींचे अहिंसेचे विचार व्यवहारवादी.

**बाह्य आक्रमणापासून बचाव करण्यासाठी अहिंसेचा उपयोग :**

आत्मिक प्रतिकारच्या मार्गाने राष्ट्रांतर्गत आणि बाह्य आक्रमणापासून व्यक्ती स्वता:चा बचाव करु शकतात.यासाठी अहिंसेचा उपयोग कसा करावा यासाठी गांधीजी पुढील मार्ग सांगतात.अहिंसेची शक्ती बाहेरुन दिसत नाही तरी हिंसेपेक्षा ती जास्त असते.प्रतिकाराचा मार्ग अनुसरुन आपली मालमत्ता त्यांना देऊन सहकार्य करण्यास नकार देणे.अहिंसक प्रतिकाराच्या मार्गाने त्यांचे मन द्रवल्यावाचून राहणार नाही.युध्दासाठी पूर्वतयारीची आवश्यकता असते,तशीच तयारी अहिंसक मार्गाने बचाव करण्यासाठी पूर्वतयारीची आवश्यकता आसते.जसे सामाजिक संबंधात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणे.धैय,निग्रह,सहनशीलता इत्याती गुणांची जोपासना करणे ही पूर्वतयारी झाल्यानंतर अहिंसक सत्याग्रहींना कोणत्याही प्रकारचे शस्त्रबळ नमवू शकत नाही असा गांधीजींचा विश्वास होता.अहिंसेचा मार्ग अनुसरला तर प्रतिपक्ष जागतिक जनमताची सहानुभूती गमावतात आणि शेवटी अहिंसेचा विजय होते.सुडाची भावना न बाळगता लढा देत राहणे हीच खरी अहिंसा होय.

**संदर्भ :**

(१) देवगांवकर श.गो., राजकिय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर, पु.क्र. २१७.२१८

(२) मुठाळ राम,राजकिय सिध्दांत आणि विचार, अंशुल पब्लिकेशन नागपूर,पु.क्र.. ७९.८०

(३)लोटेरा.ज.,पाश्चिमात्य आणि भारतीय विचारवंताच्या संकल्पना, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर

(४) गांधी मोहनदास क. , संक्षिप्त आत्मकथा मराठी गांधीजी,नवजीवन प्रकाशन अहमदाबाद.

# ११. एक महान योद्धा, कुशल राजनीतिज्ञ आणि प्रभावशाली शासक महाराणी अहिल्याबाई होळकर

प्रा.कु.पल्लवी र.देशमुख
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड जि.वाशिम.

अहिल्याबाई होळकर या केवळ एक महान शासकच नव्हे तर पराक्रमी योद्धा आणि सर्वश्रुत अश्या धनुर्धर देखील होत्या. अनेक युद्धांमध्ये साहसी योध्याप्रमाणे विचारपूर्वक निर्णय घेत त्यांनी युद्धाचे नेतृत्व केले आणि विजय संपादन केले.शिवाय अहिल्याबाई अश्या शासकांमधून एक होत्या ज्या आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ व अन्याया विरुद्ध आक्रमण करण्यास कधीही मागेपुढे पाहत नसत.जे आपल्या प्रजेच्या हिताचे आहे त्याकडेच त्यांचे लक्ष असायचे.

महाराणी अहिल्याबाईंची ओळख मावळ प्रांताच्या राजमाता म्हणून होती, त्यांच्यातील अद्भुत साहसाला आणि अदभूत प्रतिभेला पाहून मोठ-मोठे राजे आणि प्रभावशाली शासक देखील आश्चर्यचकित होत असत. अहिल्याबाई महिलांच्या सशक्तीकरणाच्या बाजूने होत्या. स्त्रियांची परिस्थिती बदलण्या करता त्यांनी बरेच प्रयत्न केलेत. शिक्षणाने माणूस सुसंकृत होतो हे त्यांना लहानपणीच जाणवले त्याकरिता त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला.

विधवा स्त्रियांना त्यांचा हक्क मिळण्याकरता अहिल्याबाईंनी कायद्यात बदल करत विधवा महिलांना त्यांच्या पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला व मुल दत्तक घेण्याचा हक्क देखील प्राप्त करून दिला. अहिल्याबाईंचे हृदय दया, परोपकार, निष्ठा या भावनांनी ओतप्रोत भरलेले होते, म्हणूनच करुणेची देवी…कुशल समाजसेविका…या प्रतिमेने त्यांना ओळखलं जात होतं.

कुशल शूरवीर मराठा प्रांताच्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 ला महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात जामखेड नजीकच्या चौंडी गावी झाला. अहिल्याबाई या चौंडी गावचे पाटील माणकोजी शिंदे आणि सुशीलाबाई यांची लाडकी कन्या! अहिल्याबाईंचे वडील पुढारलेल्या विचारधारेला मानणारे होते त्यांना वाटायचं की महिलांनी शिक्षित व्हायला हवं. ज्या काळात महिलांना घराचा उंबरा देखील ओलांडण्याची परवानगी नव्हती त्या काळात माणकोजी शिंदेनी आपल्या अहिल्येला शिक्षणाची गोडी लावली.

अहिल्याबाईंचे बरेचसे शिक्षण आपल्या वडिलांकडेच झाले. बालपणापासून अहिल्याबाई विलक्षण प्रतिभेच्या धनी होत्या, कोणताही विषय त्यांना फार लवकर अवगत होत असे. पुढे आपल्यातील अद्भुत साहस आणि विलक्षण प्रतिभेने त्यांनी सगळ्यांनाच अवाक् करून सोडले… अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि कठीण संघर्षाच्या काळात देखील विचलित न होता त्यांनी आपलं लक्ष्य प्राप्त केलं. पुढे अवघ्या विश्वाकरता त्या एक आदर्श ठरल्या.

अहिल्याबाईंचं आयुष्य सुखासमाधानाने व्यतीत होत असतानांच अचानक त्यांच्यावर दुखःचा डोंगर कोसळला. 1754 साली जेंव्हा अहिल्याबाई फक्त 21 वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांच्या पतीला खंडेराव होळकरांना कुंभेर येथील युद्धात वीरमरण प्राप्त झाले.

इतिहासकारांच्या मते आपल्या पतीवर अत्यंत प्रेम करणाऱ्या अहिल्याबाईंनी पतीनिधनानंतर सती जाण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांचे सासरे मल्हारराव होळकरांनी त्यांना असे करण्यापासून रोखले. पुढे 1766 साली मल्हारराव होळकरांचे देखील निधन झाले.

अहिल्याबाईंना अतिशय दुखः झाले, तरीदेखील निराश न होता पुढे मावळ प्रांताची जवाबदारी अहिल्याबाईंच्या नेतृत्वात त्यांचे चिरंजीव मालेराव होळकर यांनी आपल्या हातात घेतली. राज्यकारभाराची सूत्र हाती घेतल्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्ये 1767 साली मालेरावांचा देखील मृत्यू झाला.

अहिल्याबाईंवर आभाळ कोसळलं. पती, तरुण मुलगा, वडिलांप्रमाणे असलेले सासरे यांच्या मृत्यूपश्चात अहिल्याबाईंनी ज्या पद्धतीनं राज्यकारभार सांभाळला ते केवळ कौतुकास्पदच नव्हे तर आदर्श घेण्यासारखेच आहे.

आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळल्या नंतर देखील अहिल्याबाईंनी धीर खचू दिला नाही. वैयक्तिक दुःखाचा प्रभाव त्यांनी प्रजेवर पडू दिला नाही. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ढासळणाऱ्या आपल्या मावळ प्रांताला पाहून त्यांनी स्वतः उत्तराधिकारी होण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी पेशव्यांच्या पुढे विनंती केली.

11 डिसेंबर 1767 रोजी त्यांनी मावळ प्रांताची सूत्र आपल्या हाती घेतली. अहिल्याबाईंनी राज्याची सूत्र हाती घेतल्यानंतर राज्यातील बऱ्याचलोकांनी याचा विरोध देखील केला. परंतु हळू-हळू त्यांच्यातील अद्भुत शक्ती आणि पराक्रमाला पाहता प्रजा त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवू लागली.

इतिहासातील सर्वात पराक्रमी आणि कुशल योद्धा महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी माळवा प्रांताची सूत्र हाती घेतल्यावर मल्हाररावांचे दत्तक पुत्र आणि सगळ्यात विश्वासू सुभेदार

तुकोजीराव होळकर यांना सैन्याचा प्रधान सेनापती म्हणून नियुक्त केलं. आपल्या कार्यकाळात अहिल्याबाईंनी अनेकदा युद्धात प्रभावशाली रणनीती आखत सैन्याचे कुशल नेतृत्व केले.

आपल्या प्रजेच्या रक्षणार्थ अहिल्याबाई सतत तत्पर रहात असत. युद्ध प्रसंगी हत्तीवर स्वार होऊन अहिल्याबाई पराक्रमी योध्याप्रमाणे शत्रूवर बाण चालवीत असत. ज्या सुमारास अहिल्याबाईंनी मावळ प्रांताची सूत्र आपल्या हातात घेतली त्यावेळी प्रांतात अशांततेचं वातावरण पसरलं होतं.

राज्यात मोठ्या प्रमाणात चोरी, लुट, हत्या, या घटनांमध्ये वाढ झाली होती. यावर अंकुश आणण्यात अहिल्याबाईं यशस्वी झाल्या. आणि आपल्या नेतृत्वात त्यांना प्रांतात शांतता आणि सुरक्षेचं वातावरण स्थापन करण्यात यश आलं. पुढे त्यांच्या राज्याचा कला, व्यवसाय, शिक्षण, या क्षेत्रात उत्तम विकास झाला.

कालांतराने अहिल्याबाईंच्या शौर्य आणि साहसाची चर्चा अवघ्या विश्वात होऊ लागली. त्या एक दुरदृष्टीकोन बाळगणाऱ्या शासक होत्या, आपल्यातील नैपुण्याने त्या शत्रूचा हेतू ओळखून घेत असत. ज्या सुमारास पेशव्यांना एका प्रकरणात इंग्रजांचा दृष्टं हेतू लक्षात आला नाही त्यावेळी अहिल्याबाईंनी पुढे होत पेशव्यांना त्याविषयी अवगत केले होते. महान शासक अहिल्याबाईंनी आपल्या राज्याच्या विस्ताराकरता अनेक चांगली कामं केलीत.

आपल्या राज्याचा विकास व्यवस्थित होण्याच्या उद्देशाने त्यांनी राज्याला वेगवेगळे तालुके आणि जिल्ह्यांमध्ये विभागले. ग्रामपंचायतीचे काम सुरळीत करून न्यायालयांची स्थापना केली. अहिल्याबाईंची गणना आता आदर्श शासकाच्या रुपात सर्वदूर होऊ लागली होती.

संदर्भ : १) अहिल्यादेवी होळकर यांचे नेतृत्व एक राजकीय अभ्यास : विक्रम पाटील

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : रमाकांत देशपांडे

३) https://www.majhimarathi.com

4) https://hi.wikipedia.org

# १२. महामानव पंडित मदन मोहन मालवीय यांचे समाज कार्यातील योगदान.

**प्रा. पूजा हिरामण गांगोडे**
म.वि.प्र. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वणी
ता. दिंडोरी जि. नाशिक
मो.न. ९५२७००३५१३
Email : poojagangode1996@gmail.com

**सारांश -**

भारत स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झाले. इंग्रजांपासून भारत देशाला स्वातंत्र्य मिळून देण्यात देशभक्तांना संपूर्ण आयुष्याचे बलिदान द्यावे लागले. स्वातंत्र्य काळात जे लढे आणि संघर्ष उभारले गेले, ते कधी वैचारिकतेने तर कधी समाज हितासाठी बंड पुकारून उभारले गेले. भारतातील स्वातंत्र्य चळवळ हि केवळ भारतीय चळवळ नाही तर, संपूर्ण जगातील सर्वाधिक सामान्य जनतेची चळवळ होती. या चळवळीनी समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला प्रभावित केले. यामुळे प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य संग्रामातील आपली भूमिका समजू लागली. जन-सामन्यांच्या मनात हि जाणीव निर्माण करण्याचे श्रेय हे या स्वातंत्र्य सैनिकांना जाते. भारत स्वातंत्र्य, जातीव्यवस्था, बाल-विवाह, विधवांच्या समस्या इ. अशा अनेक समस्या सोडविणे हे या लोकांसामोरील प्रमुख आव्हान होते. भारत देश हा विविधतेने तसेच सांस्कृतिकरित्या नटलेला देश आहे. याकाळात शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक बदल प्रामुख्याने घडून आले.

**प्रस्तावना :**

देशातील युवकांना विशेषतः देशभक्तीचे महत्व पटवून देण्यासाठी भारतातील अनेक व्यक्तींनी सामाजिक, शैक्षणिक, आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. या सामाजिक कार्यकर्त्यांनी आपले संपूर्ण जीवन हे देशभक्तीसाठी अर्पण केले. भारत स्वातंत्र्यलढ्यात या लोकांचे योगदान अमुल्य आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय अशा अनेक चळवळी या स्वातंत्र्य पूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात उभ्या राहिल्या. लोकांच्या

मनात जन-जागृती निर्माण करण्याचे काम हाती घेऊन "राष्ट्रीय एकात्मता" निर्माण केली. भारत स्वातंत्र्य करायचा असेल तर प्रत्येकाने या चळवळीमध्ये सहभाग घेतलाच पाहिजे. अशी जाणीव संपूर्ण देशाच्या जनतेत निर्माण करण्याचे श्रेय हे या देशभक्तांना जाते. पंडित मदनमोहन मालवीय हे यापैकीच एक.

**पंडित मदनमोहन मालवीय :**

पंडित मदन मोहन मालवीय हे अशा व्यक्तीपैकी आहे ज्यांनी 'राष्ट्र-निर्माण' चे स्वप्न पाहिले, त्यासाठी विशेष असे योगदान दिले. एकप्रकारे त्यांनी स्वतःला राष्ट्र हितासाठी समर्पित केले होते. ४ फेब्रुवारी १९१६ मध्ये त्यांनी 'बनारस हिंदू विश्वविद्यालय' सारख्या प्रतिष्ठित अशा संस्थानाची स्थापना केली. पंडित मदन मोहन मालवीय यांचा जन्म २५ डिसेंबर १८६१ मध्ये अलाहबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पंडित ब्रिजनाथ आणि आईचे नाव भूनादेवी होते. त्यांचे वडील संस्कृत मधील प्रख्यात असे विद्वान होते. मदन मोहन मालवीय हे एक प्रमुख स्वातंत्र्य सेनानी, राजकीय नेतृत्व, आणि शिक्षा विशारद, एक उत्तम वकील, समाज सुधारक होते. अनेक प्रकारच्या गुण वैशिष्ट्यांनी समृद्ध असणारे मालवीय यांनी संपूर्ण भारतामध्ये आपल्या कार्यांद्वारे एक विशिष्ट असे स्थान निर्माण केले. त्यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांना 'महामना' हि उपाधी देण्यात आली. २४ डिसेंबर २०१५ मध्ये त्यांना "भारतरत्न" या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

"ईश्वर भक्ती आणि देश भक्ती" हेच मालवीय यांच्या जीवनाचे दोन मूलमंत्र होते. तसेच व्यक्तिमत्व गुण देखील होते. 'सनातन धर्म' प्रिय असणारे मालवीय यांचे गांधीयुग प्रारंभ होण्याअगोदर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात महत्वाचे योगदान होते. महात्मा गांधी यांनी पंडित मदन मोहन मालवीय यांना मोठे भाऊ असे संबोधले होते. तसेच जवाहरलाल नेहरू यांनी मालवीय यांना अशी एक महान व्यक्ती संबोधले ज्याने "आधुनिक भारतीय राष्ट्रीयतेचा" पाया रचला. मालवीय हे पेशाने वकील आणि साहित्यकार होते. त्यांनी हिंदी प्रसारासाठी हिंदी उद्धारिणी प्रतिनिधी सभा, नागरी प्रवर्धन सभा, हिंदी साहित्य सम्मेलन अशा वेगवेगळ्या सभांमध्ये ते सहभागी झाले. भारत स्वातंत्र्य संग्रामात अनेक चढ-उतार आले पण मालवीय यांनी आपल्या सृजनतेने भारत स्वातंत्र्य संग्रामात विशिष्ट स्थान निर्माण केले.

**पंडित मदन मोहन मालवीय यांचे कार्य :**

**१. पंडित मदन मोहन मालवीय यांची स्वातंत्र्य संग्रामात भूमिका :**

मालवीय हे 'राष्ट्रीय कॉंग्रेस' च्या अधिवेशनात चारवेळा अध्यक्ष म्हणून निवडले गेले. १९०९ मध्ये लाहोर, १९१८ आणि १९३० मध्ये दिल्ली आणि १९३२ मध्ये कोलकत्ता येथे कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष होते. मालवीय यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेऊन ३५ वर्ष कॉंग्रेस ची सेवा करून राष्ट्र सेवेत आपले योगदान दिले. ब्रिटीश शासनाने चौरी-चौरा (उत्तर प्रदेश) कांड मध्ये १७० लोकांना फाशीची शिक्षा दिली होती. तेव्हा मालवीय न्यायालयीन खटला लढून १५१ लोकांना वाचवले होते. वर्ष १९२० मध्ये 'असहयोग आंदोलन', लाला लजपत राय यांच्या बरोबर 'साइमन कामिशन' चा विरोध केला. 'मिठाचा सत्याग्रह' आणि सविनय 'कायदेभंग चळवळ' इ. मध्ये मालवीय यांनी प्रमुख भूमिका बजावली. मालवीय यांनी १९३१ मध्ये पहिल्या 'गोलमेज परिषदेत' देशाचे प्रतिनिधित्व केले. वर्ष १९३७ मध्ये राजकारणातून सन्यास घेऊन समाजसेवेला सुरुवात केली.

**२. पंडित मदन मोहन मालवीय यांचे शैक्षणिक योगदान :**

जीवनाचा सर्वांगीण विकास शिक्षेचा मूलमंत्र आहे. असे मालवीय मानायचे. शिक्षणाची अशी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे, ज्यात विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनात्मक शक्तींचा विकास झाला पाहिजे. ज्यामुळे कुठलीही व्यक्ती स्वाभिमानाने आपला उदरनिर्वाह आणि समाजात आदराचे स्थान निर्माण करू शकेल. 'एक आदर्श नागरिक' हा त्याच्या संपूर्ण देशाची ओळख असतो असे मालवीय मानायचे. याच विचाराने त्यांनी 'बहुआयामी शिक्षणाला' महत्वाचे मानले. 'राष्ट्र निर्माण करिता' शिक्षण अनिवार्य आहे असे ते मानायचे. शिक्षणाला त्यांनी 'चेंज एजेंट' च्या स्वरुपात मानले. राष्ट्र निर्माणच्या संकल्पनेत त्यांनी प्रजासत्ताक मुल्ये आणि राष्ट्रीय सहमती यांना नेहमीच वरचे स्थान दिले. भारतात 'शिक्षण क्रांतीची' ज्योत पेटवण्याचे श्रेय मालवीय यांना जाते. 'बनारस हिंदू विश्व विद्यालय' हे मालवीय यांच्या देशभक्ती आणि प्रजातांत्रिक मूल्यांचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी 'मकरंद' या उपनावाने कथा-कादंबऱ्या लिहल्या. त्या काळात अत्यंत प्रसिद्ध होत्या.

तत्कालीन ब्रिटिश शासन काळात देशभक्त राजा रामपाल सिंह यांच्या आदेशावरून हिंदी आणि इंग्रजी वृत्तपत्र 'हिंदुस्थान' चे १८८७ मध्ये संपादन केले. तसेच 'इंडियन ओपिनियन' च्या संपादनात आपले सहकार्य दिले. १९०७ मध्ये 'साप्ताहिक अभ्युदय' वृत्तपत्रात काम केले. त्यानंतर वर्ष १९०९ मध्ये लीडर आणि मर्यादा पत्रिकाद्वारे लोकांच्या मनात जन-जागृतीचे काम केले. स्वातंत्र्य काळात या वृत्तपत्र आणि पत्रिका यांचे प्रमुख योगदान होते.

**३. पंडित मदन मोहन मालवीय यांचे सामाजिक योगदान :**

ब्रिटीश काळात मालवीय यांनी सामाजिक न्याय आणि समानता यासाठी मजबूतपने आपला पक्ष ठेवला. अस्पृश्यता, अशिक्षा, बाल-विवाह, विधवा-विवाह या सर्व सामाजिक कुरीतींना मालवीय यांनी प्रचंड विरोध केला. आपल्या संपूर्ण जीवनात या प्रथा नष्ट करण्यासाठी ते प्रयत्न करीत राहिले. आपल्या साध्या स्वभाव आणि कणखर भाषाशैलीमुळे लोकांच्या मनात त्यांच्या बद्दल आदर निर्माण झाला होता. ब्रिटिशावर त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला होता. आज सुद्धा मालवीय यांना उदारवादी आणि राष्ट्रवादी यांच्यातील एक सेतू म्हणून ओळखले जाते. मालवीय यांनी मंदिरांमध्ये असणाऱ्या जाती व्यवस्थेविरोधात आंदोलने करून यात सामान्य जानेतेच्या मनात जनजागृती देखील केली.

एनी बेसेंट यांनी मालवीय यांच्या संदर्भात म्हटले होते कि, मी ठामपणे सांगू शकते कि, विभिन्न अशा विचार आणि मतांमध्ये मालवीय हे एकमेव 'एकता' असणारी मूर्ती बनून उभे आहेत. पंडित मदन मोहन मालवीय यांनी भारताच्या स्वराज्यासाठी शेवट पर्यंत प्रयत्न केले. पण स्वातंत्र्य मिळण्याचे काही काळ अगोदर १२ नोव्हेंबर १९४६ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**संदर्भसूची**

१. पाण्डेय श्रीनिवास - 'प्रज्ञा : १५० वी महामना मालवीय जयंती विशेषांक', प्रकाशन : 'बनारस हिंदू विश्वविद्यालय', २०१२.

२. डॉ. पाण्डेय विश्वनाथ - 'महामना पंडित मदन मोहन मालवीय जी का विद्यार्थियो के लिये संदेश', प्रकाशन - 'छात्र अधिष्ठ्ता' काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणसी - २२१००५,

३. डॉ. परवीन नाझ - 'शिक्षा समानता और ज्ञाय के पैरोकार 'महामना पंडित मदन मोहन मालवीय जी' अमर उजाला.२५ डिसेंबर २०२०.

४. पांडेय निरंकार नाथ - 'महामना मदन मोहन मालवीय के सामाजिक और राजनैतिक विचार'. राजनीती विज्ञान विभाग इलाहबाद विश्वविद्यालय इलाहाबाद, वर्ष - २००४.

# १३. आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारक डॉ बाबा आढाव यांचे योगदान

**डॉ प्रविण मानसिंग कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
म. वि. प्र. समाजाचे के. आर. टी. कला व वाणिज्य महाविद्यालय,वणी,नाशिक
Email - pravinkamble76121@gmail .com
mobile-9921839591

---

**गोषवारा -**

डॉ. बाबा आढाव यांनी मंडळ आयोगाचा लढा,मराठवाडा नामांतर चळवळ, रिडल्स प्रकरण अशा अनेक प्रश्नांवर दलित चळवळी बरोबर कार्य केले आहे.बाबा आढाव यांचे कार्य दुर्लक्षून स्वातंत्र्योत्तर काळातील दलित चळवळीवर भाष्य करता येणार नाही. डॉ बाबा आढाव यांच्या कार्याबरोबरच अनेक परिवर्तनवादी संघटना,अनेक पुरोगामी संघटना तसेच कार्यकर्त्यांनी दलितांच्या प्रश्नांवर सहकार्याची भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रातील पुरोगामी संघटनांच्या कार्यामुळे सवर्णांचा विरोध कमी होण्यास मदत झाली. याशिवाय सवर्णातील एका फार मोठ्या गटाची दलितांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मदत झाली.डॉ बाबा आढाव यांचे हे कार्य आजच्या आधुनिक पिढीतील तरुणांना निश्चितच प्रेरणादायी तसेच मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

**प्रस्तावना -**

१९७० च्या दशकात डॉ बाबा आढाव तत्कालीन समाजवादी पक्षाचे सदस्य होते.तसेच ते रिक्षा पंचायतीचे नेते म्हणूनही कार्य करत होते. समाज परिवर्तन ही त्या त्या काळात समाजवाद्यांची मक्तेदारी होती. समाज वादी संघटना आणि राष्ट्र सेवादलासारख्या संघटना सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी घेतल्यासारखे बोलत असत. अशा काळात " एक गाव एक पाणवठा " नावाची मोहीम चालविली जात होती. बाबा आढाव हे त्याचे प्रणेते होते.भारतीय घटनेतील सतराव्या कलमात

अस्पृश्यतेला कायमस्वरूपी प्रतिबंध करून ती संपुष्टात आणल्याचे म्हटलेले आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यतेच्या मानसिकतेला विरोध म्हणून धर्मांतर केले.घटनेत बदल केले.डॉ आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले तरी अस्पृशता अजूनही टिकून आहेच.हे लोकशाहीला मारक आहे.त्यामुळे लोकशाही कमकुवत होते. अमेरिकेत हा प्रश्न सोडविण्यासाठी अब्राहम लिंकन सारख्या नेत्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनतेनेही समानता, स्वातंत्र्य या मूल्यांचा मनोमन स्वीकार करून एकसंधतेचे प्रयत्न केले आहेत. दलितांचा प्रश्न सोडवायचा असेल तर हा प्रश्न काळावर सोपवून चालणार नाही.त्यासाठी शैक्षणिक व सांस्कृतिक पातळीवरच अमूलाग्र बदल करायला हवेत.आपण एकसंध आहोत अशा सामुदायिक निर्धाराची गरज आहे.धर्मातले स्पृश्या स्पृश्यतेचे स्थान घालवायला हवे.अशा मताची मांडणी करून डॉ बाबा आढाव मराठी साहित्यालाही प्रश्न करतात.''मराठी साहित्यानेही किंवा मध्यम वर्ग साहित्यानेही एवढ्या मोठ्या प्रश्नाची दाखल घेतलेली नाही.मग मराठी साहित्य कुणाचे?समतेच्या संकल्पाची आवश्यकता आहेच,पण केवळ राजकीय पक्षापूर्त मर्यादित ठेवून चालणार नाही. यासाठी स्वतंत्रपणे जनसंघटन उभारण्याची गरज आहे.स्वातंत्र्योत्तर काळात अनेक पुरोगामी चळवळीचा उदय झाला.या चळवळीनी दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी साकारात्मक भूमिका घेतलेली दिसून येते.दलित चळवळ कधीही एकाकी पडली नाही कारण दलित चळवळी मध्ये अनेक नेते व कार्यकर्ते तसेच विचारवंतानी चळवळीत भरीव असे योगदान दिले.स्वातंत्र्योत्तर काळातील कोणताही प्रश्न असो पुरोगामी चळवलळीनी त्याविषयक समर्थनाची भूमिका घेतलेली देसून येते.

**डॉ बाबा आढाव यांचे सामाजिक कार्य**

डॉ बाबा आढाव यांनी शोषित,उपेक्षित कष्टकर्यांचे लढे संघटीत केले.मोलकरणीचे प्रश्न,पथारीवाल्यांचे प्रश्न,हमाल व त्यांचे प्रश्न, हातगाडी वाल्यांचे प्रश्न सोडविले.हमालांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा म्हणून त्यांनी हमाल पंचायतची स्थापना केली. संयुक्त महात्राष्ट्राच्या चळवळीत व गोवा मुक्ती आंदोलनात त्यांचा सहभाग होता.

बाबा आढाव यांनी अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ राबविली.तसेच विडी कामगारांचे प्रश्न व देवदासींच्या हक्कासाठी लढा दिला. सामजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी "सामाजिक

कृतज्ञता निधी"स्थापन करण्यासाठी त्यानी पुढाकार घेतला. त्यामुळे त्यांना दरमहा मानधन मिळू लागले व त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. डॉ बाबा आढाव यांनी सामजिक प्रतिष्ठानची स्थापना केली. तसेच त्यानी पुरोगामी सत्यशोधक हे नियतकालिक सुरु करून सामाजिक समतेच्या विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविला.परिवर्तनवादी चळवळीला गती यावी म्हणून त्यानी विषमता निर्मुलन परिषदेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. त्यांनी आपल्या ग्रंथांमधून आणि लेखांमधून सामाजिक विषमतेवर सडेतोड टीका केली. बाबा आढाव यांनी दलित पंथर आणि भटक्या विमुक्तांच्या चळवळी बरोबर कार्य केले आहे.

१९७३ साली त्यांनी सत्यशोधक समाज जन्मशताब्दी व १९७४ मध्ये राजश्री शाहू छत्रपती आणि विठल रामजी शिंदे यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून महाराष्ट्रात "एक गाव एक पाणवठा" ही मोहीम सुरु केली.महत्मा फुले यांनी अस्पृशांसाठी आपल्या घरातला पाण्याचा हौद केला होता. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृशांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह केला होता.बाबा आढाव यांनी हीच पाण्याची चळवळ अधिक गतिमान केली.बाबा आढाव यांनी दलित व गावकरी यांना एकत्रित केले.बाबा आढाव यांनी ही चळवळ वेगाने वाढविली.या चळवळीस काही ठिकाणी विरोधही झाला. दलितांवर सामाजिक बहिष्कार टाकून पुन्हा त्यांचा छळ केले जात असे.त्यामुळे गावात सामाजिक तेढ निर्माण व्हायची.त्यामुळे एक गाव एक पाणवठा ही चळवळ पुढे वाढू शकली नाही.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात दलित चळवळ गतिरुद्ध झालेली दिसून येत्रे.परिवर्तनवादी चळवळीतील ही पिछेहाट चिंताजनक आहे.पुरोगामी चळवळीची फाटाफूट झालेली दिसून येते. सध्याच्या काळातील आघाड्यांवर आधारीत राजकारण तत्वशून्य होत चालले आहे.राजकारणाचे गुन्हेगारीकरण,ध्येयहीनता,सत्तेसाठी वाटेल त्या मार्गाने जाण्याची तयारी, कमालीचा स्वार्थीपणा यामुळे परिवर्तनाच्या चळवळीत अडसर निर्माण झाला आहे.

आजच्या काळात परिवर्तनवादी बदल घडवून आणण्यासाठी बाबा आढाव यांनी पुढील कार्यक्रम सूचित केले आहे.

१.प्रत्येक समाजात सत्यशोधक चळवळीतील विचार परंपरा पोहचविली पाहिजे.हिंदू-मुस्लीम व धार्मिक अल्पसंख्यांक यांच्यातील सामाजिक-सांस्कृतिक दरी कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न झाले पाहिजेत.यामधून गोवंश हत्याबंदी,समान नागरी कायदा.कुटुंब नियोजन इत्यादी प्रश्नांवर भर दिला पाहिजे.

२.अंधश्रद्धा निर्मूलनात सहभाग वाढविला पाहिजे. मूर्तीपूजा,बुवाबाजींचे स्तोम थांबविले पाहिजे.

३.विषमतेविरुद्ध सामाजिक,आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर जनजगृती मोहिमा राबविल्या पाहिजेत.

४.शांततामय सविनय नागरी प्रतिकार मोहिमा राबविल्या पाहिजेत.

५.स्त्री-शुद्रातिशुद्रांसाठी ठोस कार्यक्रम राबविले पाहिजेत. स्त्री-शुद्रातिशुद्र वर्गांसाठी कष्टकरी पातळीवर संघटन उभारले पाहिजे.शोषणाविरुद्ध आवाज उठविला पाहिजे.

**समारोप -**

डॉ बाबा आढाव यांनी मंडळ आयोगाचा लढा,मराठवाडा नामांतर चळवळ ,रिडल्स प्रकरण अशा अनेक प्रश्नांवर दलित चळवळी बरोबर कार्य केले आहे.बाबा आढाव यांचे कार्य दुर्लक्षून स्वातंत्र्योत्तर काळातील दलित चळवळीवर भाष्य करता येणार नाही.डॉ बाबा आढाव यांच्या कार्याबरोबरच अनेक परिवर्तनवादी संघटना,अनेक पुरोगामी संघटना तसेच कार्यकर्त्यांनी दलितांच्या प्रश्नांवर सहकार्याची भूमिका घेतली आहे.महाराष्ट्रातील पुरोगामी संघटनांच्या कार्यामुळे सवर्णांचा विरोध कमी होण्यास मदत झाली. याशिवाय सवर्णातील एका फार मोठ्या गटाची दलितांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मदत झाली.डॉ बाबा आढाव यांचे हे कार्य आजच्या आधुनिक पिढीतील तरुणांना निश्चितच प्रेरणादायी तसेच मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ-**

१. डॉ बाबा आढाव, एक गाव एक पाणवठा, कथासंग्रह, मौज प्रकाशन गृह,१ जानेवारी २००५.

२. डॉ नारायण चौधरी, डॉ जोत्स्ना बाबट, डॉ विरोचन जोशी, सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी (पुनर्रचीत अभ्यासक्रम ) SOC-222 पुस्तक पहिले-सामाजिक परिवर्तन:प्रक्रिया व घटक, प्रकाशन- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.

३. डॉ बाबा आढाव, सामाजिक कार्याची नवनीती, द वायर मराठी २ जून २०२१.

४. साप्ताहिक साधना लेख, २१ नोव्हेंबर २०२१

५. ई सकाळ रविवार लेख,२२ जानेवारी

६. महाराष्ट्र टाईम्स,३१ मे २०२० ज्योती देवरे यांचा लेख

७. WWW.ibn lokmat.tv September 27,2016

# १४. राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार आणि आजची परिस्थिती

प्रा. डॉ. बन वशिष्ठ गणपतराव
लोकप्रशासन विभागप्रमुख
पंडीत दीनदयाल उपाध्याय,
महाविद्यालय देवणी जि. लातूर
मोबा. ९८५०९२८२५६
banv1977@gmail.com

**प्रस्तावना -**

बहुजन समाजाच्या उध्दाराचे कंकण ज्यांनी हाती बांधले त्या म. फुल्यां पासून सर्व समाजसुधारकांनी 'शिक्षण' ही सर्व सुधारणांची गुरूकिल्ली मानली होती. शिक्षण म्हणजेच 'विद्या' तिच्यापासून बहुजन समाज शतकानुशतके वंचित राहिल्यामुळेच तो अज्ञान व दाद्रिय यांच्या गर्तेत खितपत पडला होता. शिक्षणाचा अभाव म्हणजेच अविद्या, तिच्यापासून बहुजन समाजात किती अनर्थ निर्माण झाले याचे वर्णन म. फुल्यांनी कसे यथार्थपणे केले होते. त्या सर्व अनर्थांच्या मुळाशी अविध्या जातीभेद व अविध्या असली तरी त्या अविध्येच्या ही मुळाशी त्या अनुषंगाने वरीष्ठ जातीने कनिष्ठ जातींवर लादलेली विद्याबंदी ही कारणे होती. या विद्याबंदीनेच आपला देश अधोगतीस जाऊन पोहोचल्याचा मुद्दा प्रतिपादन करताना शाहू महाराज म्हणतात, "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्यी व लढवय्ये वीर कधीही निपजनार नाहीत. म्हणुनच सकतीचे व मोफत शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. त्यांनी इतरासाठी विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले होते ही विद्याबंदी तोडण्याचे पहिले काम या देशात म. फुले व शाहू यांच्या आग्रहाने इंग्रज राज्यकर्त्यांनी केले. म. फुल्यांचा शिक्षणाचा विचार शाहू महाराजांनी पुढे चालविला. शिक्षण

हीच त्यांनी सर्व सामाजिक सुधारणाची व प्रगतीची जननी मानली, आणि समाजातील मागसलेल्या वर्गाच्या बौध्दिक गुलामगिरी नष्ट होण्यास त्यास किमाण प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याच्या सुधारणेचा त्यांनी जोरकस पुरस्कार केला. नाशिकच्या एका भाषणात त्यांनी म्हटले होते,“खालंच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर हे जे जड व जूलमी जू जादले गेले आहे ते झुगारुन देण्याची शक्ती बहूजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार गरज आहे”.

समाज समत्ध्द व बलवान करण्यासाठी बहुजन उत्तम शेतकरी, उत्तम शिक्षक, उत्तम व्यापारी, उत्तम उद्योगपती,उत्तम सैनिक निर्माण झाले पाहिजेत. आणि त्यासाठी शिक्षण—गंगेचे पाट खेडयापाडयातील गोरगरीब जनतेच्या दरापर्यंत नेले पाहिजेत, असे शाहू महाराजांना वाटत होते.

**उदिष्टे :—**

१) शाहु महाराजाचे शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे हे प्रमुख उद्यिष्ट आहे.

२) शाहू महाराजांनी सांगितलेल्या शिक्षण विषयक विचार आजच्या शिक्षण पध्दतीत रुढ झाले का?

३) त्यांनी सांगीतलेल्या मोफत व सक्तीच्या शिक्षण पध्दतीचा, बहुजन समाजासाठी कितपत फायदा झाला हे जाणुन घेणे हे उद्यिष्ट आहे.

४) त्यांच्या विचाराचा व आतच्या शिक्षण पध्दतीत रुढ झाले का ?

५) त्यांनी सांगितलेल्या मोफत व सक्तीच्या शिक्षण पध्दतीचा, बहुजन समाजासाठी कितपत फायदा झाला हे जाणून घेणे हे उदिष्ट आहे.

६) त्यांच्या विचारांचा व आजच्या पध्दतीचा अभ्यास करणे हे उद्यिष्टये आहे.

**गृहितकृत्ये:—**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक विचारांचा आजच्या शिक्षण पध्दतीत शोधणे

२) त्यांच्या शिक्षण विषयक महान विचारांची समाजात जागत्ती निर्माण करणे.

३) त्याच्या योगदानाची वास्तविक शिक्षणात पाहणी करणे.

**संशोधन पध्दती :—**

या विषयावर संशोधन करत असताना विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र या व्दितीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**शाहू महाराजाचे शैक्षणिक विचार :—**

शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार समाजाला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारे होते. त्यांनी आर्थिक गुंतवणुक पैक्षा शिक्षण विषयक मानवी गुंतवणुकीला विशेष महत्व दिले होते. त्यांच्या मते, “शिक्षणा शिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही. अज्ञानात बुडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सदी आणि लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. ‘सर्व समाज शिक्षण’ हे शाहू महाराजांच्या शिक्षण चळवळीचे प्रमुख सुत्र होते. शिक्षण ही व्यक्ती विकास आणि समाजविकास यांची गंगोत्री आहे. अशा गंगोत्रीमध्ये आत्मवलोकन, आत्मबळ आणि आत्मप्रचीती आहे. त्याच्या अचुक अवलंबनाने माणसे नुसती शहाणी होत नाहीत तर “ज्ञानी” होतात. ‘ज्ञानीपणा’ शाहु महाराजांना शिक्षणातून अभिप्रेत होते. त्यासाठी आपला समाज सुशिक्षित झाला पाहिजे. असे त्यांना वाटे.

शाहु महाराजांच्या कार्यकालापुर्वी कोल्हापुर संस्थानात गावोगावी प्राथमिक शाळा नव्हत्या. त्यामुळे बहुजन समाज अज्ञानी व दारिद्रयात होता. राजर्षींना राजकीय गुलामगिरी पेक्षा सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक गुलामगिरी मान्य नव्हती. कारण उच्चवर्णीय, धनिक आणि जमीनदार यांचीच शिक्षण क्षेत्रात मक्तदारी होती. समाजावर अंधश्रध्दा व धर्म भोळेपणा यांचा पगडा पडलेला होता. शिक्षण घेणे हे आपले काम नाही. अशी सर्वसामन्य माणसांची समजूत होती. हे संपूर्ण चित्र बदलण्यासाठी महाराजांनी १८९४ नंतर “ज्ञानाचा दिवा घरोघरी लावण्यासाठी सक्तीच्या सार्वर्त्रिक शिक्षण प्रसारावर भर दिला.

**शिक्षण विषयक सवलती, शिष्यवृत्त्या, देणग्या इ.**

बडोद्यांच्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याप्रमाणे शाहू महाराजांनी उच्च शिक्षण घेउ, इच्छिणा—या बहुजन समाजातील होतकरु तरुणांना देणग्या व शिष्यवृत्यारुपाने वेळोवेळी सहाय्य केल्याचे दिसुन येते. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावब पी.सी. पाटील यांची उदाहरणे तर इतिहास प्रसिध्दच आहेत. याशिवाय नामवंत शिक्षणतज्ञ म्हणुन व प्रसिध्द पावलेल्या प्रि.सी. आर. तावडे यांना अमेरिकेस उच्चशिक्षणास जाण्यासाठी व नामवंत कलावंत,समाज सुधारक नेते म्हणुन उदय पावलेल्या भाई माधवराव बांगल यांना जे. जे. स्कुल ऑफ आर्टमध्ये शिकण्यासाठी केलेल्या सहाय्याची नोंद घेतली पाहिजे. तसेच १९१४ साली व १९२० साली तीन विद्यार्थ्यांना महाराजांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविण्याच्या नोंदी मिळतात. कांही शिष्यवत्त्या कला, कायदा, तंत्रज्ञान वैद्यकीय या विषयांत उच्च शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांसाठी ठेवल्या

गेल्या होत्या. सर्व क्षेत्रातील विद्यार्थी व संस्था यांना सढळ हाताने शिष्यवत्त्या आणि देणग्या दिलेल्या आढळतात. उदा. ‘डॉ. नायर मेमोरियल स्कॉलरशीप’ सुरु केली. संस्थाना बाहेरील संस्थानाही मोठी देणग्या दिल्या होत्या. शाहुमहाराजांच्या पुरोगामी व धडाधडीच्या शिक्षण धोरणाची दत्श्यफले त्यांच्या कारकर्दीतच दिसून आली. विद्यार्थी संख्येत मोठी वाढ झाल्याची दिसुन येते.

यामध्ये शिक्षण संस्थांची निर्मिती, शिक्षण संस्थांना मदत, शिक्षण विषयक विविध उपक्रमाचे संयोजन इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्याचा समावेश करण्यात आला.

**प्रत्यक्ष शिक्षण विषयक कार्य :**

राजर्षी शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थान मध्ये १९१२ मध्ये प्रत्येक खेडयात नव्याने शाळा काढल्या. त्यासाठी त्यांनी वतनदारी शिक्षक नेमण्याची योजना आखली. मात्र त्यामध्ये कांही अडचणी झाल्याने १९१४ मध्ये राजर्षीनी पगारी शिक्षक नेमले. त्यांनी प्राथमिक शिक्षक सक्तीचे व मोफत करण्यासाठी एक समिती नियुक्त केली.समितीच्या शिफारशी नुसार कोल्हापुर शहरात आणि तालूक्यातील गावोगावी सक्तीच्या प्राथमिक अंमलबजावणी सप्टेंबर १९१६ पासून केली. २४ जुलै १९१७ रोजी महाराजांनी काढलेली हुकुमाने ‘प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केल्याचे घोषित केले. १६ ऑगस्ट १९१८ रोजी महाराजांनी शिक्षण खर्च भागविण्यासाठी कोल्हापुर संस्थानातील त्यावेळी ज्याचे उत्पन्न शंभर रुपयापेक्षा अधिक आहे अशा मंडळावर शिक्षण कर आकारला.

शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थांनची राज्यसूत्रे हाती घेताच हायस्कुल आणि राजाराम कॉलेज मधील सर्व गरीब विद्यार्थ्यांना नादारी (इ.बी.सी.) सवलत फी माफी दिल्याचे घोषित केले. तेंव्हापासून आजपर्यंत अशा विद्यार्थ्यांना आजही सवलत मिळत असल्याचे दिसुन येत आहे.

**वस्तीगृहे :—**

गरीब, गरजू, दलित आणि मागसलेल्या अशा सामान्य जनतेच्या मुलांसाठी वस्तीगृहे काढण्याची धाडसी व महत्वकांक्षी योजना सन १९०० पासून महाराजांनी आमलात आणली. त्यामध्ये खालील वस्तीगृहांचा समावेश होता.

| अ.क्र | स्थापना वर्ष | वस्तीगृहे |
|---|---|---|
| ०१ | १९९४ | कॉलेज विद्यार्थी वस्तीगृह |
| ०२ | १९०२ | व्हिकटारिया मराठा बोडींग |
| ०३ | १९०१ | जैन वस्तीगृह |
| ०४ | १९०२ | मुस्लीम वस्तीगृह |
| ०५ | १९०३ | टेकनीकल स्कुल |
| ०६ | १९०४ | मराठा स्टुडंट इन्टियुशन |
| ०७ | १९०७ | लिंगायत वस्तीगृह |
| ०८ | १९०८ | मिस कलार्क हॉस्टेल |
| ०९ | १९११ | गाव कामगार पाटील स्कुल |
| १० | १९१२ | नामदेव वस्तीगृह |
| ११ | १९१५ | प्रभु वस्तीगृह |
| १२ | | सारस्वत वस्तीगृह |
| १३ | १९१९ | तलाठी स्कुल |
| १४ | | खिश्चन मिशन |
| १५ | १९१७ | तपोवन, आश्रम व विद्यापीठ हायस्कुल |
| १६ | | छत्रपती संस्कत्त विद्यालय |
| १७ | | इंदुमती वस्तीगृह |
| १८ | १९१९ | श्री शिवाजी क्षर्त्रिय वैद्यकीय विद्यालय |
| १९ | १९२० | प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग |
| २० | १९१८ | शिवाजी मराठा हायस्कुल पुणे |
| २१ | १९२० | ताराबाई वस्तीगृह, पुणे |
| २२ | | चोले शिवाजी महाराज विद्यर्थी वस्तीगृह अहमदनगर |
| २३ | | उडोली विद्यार्थी वस्तीगृह व वंजारी समाज विद्यार्थी वस्तीगृह, नाशिक |

वरील वस्तीगृहे व संस्था स्थापन करुन गरीब मुलासाठी वस्तीगृहे निर्माण करुन एक संघ समाज निर्माण करण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले.

**आरक्षण :—**

मागासलेल्या जाती जमातीसाठी महाराजांनी १९०२ मध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा हुकुमही काढला. “विद्या हेच महादान” हे महाराजांनी ओळखून शिक्षणाची गंगा त्यांनी घरोघरी पोहचविली.

**वैदिक शिक्षण :—**

२९ ऑगस्ट १९१९ या दिवसी वैदिक शिक्षण देण्याचा मुहुर्त महाराजांनी केला. वैदिक शिक्षणासाठी “शिवाजी वैदिक विद्यालय” सुरु करण्यात आले. ब्राम्हणेत्तर विद्यार्थी वैदिक शिक्षण घेवू लागले. ब्राम्हणेत्तर हिंदूचे धर्मविधी वैदिक पध्दतीने करण्यात ब्राम्हणेत्तरांना सशस्त्र शिक्षण देणारी ही भारतातील एकमेव संस्था असल्याचे आढळून येते.

**स्त्री शिक्षण :—**

स्त्री—शिक्षणाच्या बाबतीत तर महात्मा फुले यांचा वारसा शाहू महाराजांनी चालविला. स्त्रियांनी केवळ चुल आणि मुल यातच आपले जिवन व्यथीत न करता त्यांनी जीवनाच्या प्रत्येक कार्यात पुरुषांच्या बरोबरीने पुढे आले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. आणि म्हणुन स्त्री—शिक्षणाच्या सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्या. शाहु महाराज हे ख—या अर्थाने समाजाभिमुख सच्चे कार्यकर्ते होते. समाजातील स्त्री हा घटक विद्यार्जनापासून वंचित राहु नये. याची त्यांना काळजी होती. स्त्री शिक्षणाप्रमाणेच पिढयानपिढया अस्पत्श समजल्या जाणा—या व शिक्षणापासून दूर असलेल्या दीन—दलित बांधवाची शिक्षणाची नुसती सोयच त्यांनी केली नाही, तर त्यांच्यावरील अस्पत्श्यतेचा कलंकही नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**शिक्षणातून ग्रामविकास :—**

शाहु महाराजांनी स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा सार्थ अभिमान होता. शिक्षणाची गंगा ही केवळ शहरापुरतीच मर्यादीत न राहता तो खेड?यां पर्यंत

पोहचली पाहिजे असे त्यांना वाटत होते. म्हणुन त्यांनी खेड?यांतील शिक्षण व्यवस्थेकडे लक्ष घातले. आपला खरा भारत खेड?यांत राहतो. खेड?यांचा कारभार गावचा पाटील पाहतो. यथा राजा तथा प्रजा या उक्तीप्रमाणे पाटीलच अडाणी असेल तर गाव अडाणी ! त्यामुळे हा पाटील शिकुन सुशिक्षीत व्हावा. गावाचा कारभार व्यवस्थीत चालविण्याची त्यांच्या अंगी बौध्दीक क्षमता निर्माण व्हावी म्हणुन शाहु महाराजांनी पाटील शाळा सुरु केल्या. गावाच्या पाटलांना जमीन महसूल इत्यादी संबंधीचा सुक्ष्म माहिती व्हावी त्याला आपला गावगाडा नीट चालविता यावा म्हणुन १९१२साली दिल्ली दरबार मेमोरीअल पाटील शाळा उघडली.

**गाव तेथे शाळा :—**

बहुजन समाजातील बौध्दीक जागत्ती करण्याचे एक प्रभावी साधन म्हणुन त्यांनी शिक्षणाकडे पाहिले. वर्षानुवर्षे ज्या मुठभर लोकांच हाती ज्ञानदानाची सुत्रे होती ती समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचली पाहिजे. अशी त्यांची इच्छा होती. म्हणुन त्यांनी गाव तेथे शाळा असा संकल्प केला.प्रत्येक गावातील शाळा व्यवस्थितपणे चालविण्यासाठी व तिची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळा—पंच पध्दती सुरु केली.

शाहु महाराजांनी विविध जाती—धर्मांच्या मुलांना शिक्षण देवून राष्ट्राला डोळस करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे बहुजन समाज प्रकाशमय झाला. आजही शाहू महाराजांच्या प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या विचारांची देशाला नितांत आवश्यकता आहे.

**शिक्षण वास्तव स्थिती/आजची परिस्थिती/आजचे शिक्षण :—**

बहुजन समाजाच्या उध्दाराचे कंकण ज्यांनी हाती बांधले होते ते म. फुले व शाहु महाराज समाजसुधारकांनी 'शिक्षण' ही सर्व सुधारणांची गुरुकिल्ली मानली होती. याच पायावर आजची शिक्षण पध्दती अस्तित्वात आहे. जे विचार राजर्षी शाहु नी शिक्षणासाठी वास्तवात आणले त्याच

विचाराची आज पर्यंत महाराष्ट्र राज्याला अमलबजावणी करता आली त्यांच्या महान विचारांना आज २१ व्या शतकात का होईना ख-या अर्थाने दिशा मिळाली असे वाटते. त्यांनी जे १९ व्या शतकात पेरले त्याचे फळ आम्ही आज २१ व्या शतकात पाहत आहोत असे दिसते.

आज राज्याच सर्व शिक्षा अभियानातून राजर्षी शाहू महाराजाचे विचार दिसतात त्यांच्या विचारातून ग्राम शिक्षण समिती, १४ वर्षाखाली सक्तीचे शिक्षण उच्च शिक्षणासाठी शिष्यवत्तती आर्थिक मदत, सामाजीक न्याय विभागामार्फत मिळणारी शिक्षणासाठीची सोय, महिला शिक्षण, गावातील शिक्षण सामाजिक आरक्षण, मागास जाती जमातींना शैक्षणिक सवलत, शहरी व ग्रामीण भागात शिक्षणाचा समान दर्जा, आरक्षण, वस्तीगहे, गाव तेथे शाळा, सुज्ञ शिक्षक वर्ग, स्त्री—पुरुष समानता, राष्ट्रीय एमात्मता हे सर्व त्या महान पुरुषाने १९ व्या शतकात स्वप्न पाहिले. त्यांचे ते विचार आज सर्वत्र दिसत आहेत.

आज राज्यात शिक्षणाचा दर्जा उंचावत आहे. प्रत्येक नागरीकास शिक्षण घेणे हा त्याचा मुलभूत हक्क झाला आहे. व शिक्षण घेणे सक्तीचे झाले आहे. आज राज्याच्या कल्याणकारी धोरणामुळे प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षणाची सोय झालेली आहे. राजर्षी शाहू महाराजांनी सांगीतल्या प्रमाणे शिक्षणाची गंगा घरोघरी पहोचली आहे. या ज्ञान गंगेत सर्वाचेच हित आहे. पण आज मोफत शिक्षणावरील विश्वास कमी होत जात असल्याचे दिसत आहे. परंतु मक्तेदारी स्वरुपाचे लोक शिक्षण क्षेत्रात हस्तक्षेप करताना दिसतात. मोफत शिक्षणापेक्षा खर्चीक शिक्षणाला महत्व वाढत जात आहे. सर्व समाज आज शिक्षीत झाला आहे. शिक्षीतांची संख्या वाढली परंतू गुणवत्ता असलेली दिसून येत नाही. म्हणुन या शिक्षणाचा दबदबा शिल्लक उरलेला दिसत नाही. शिक्षण हे सर्वांना समान असावे असे मत मांडणा—या महापुरुषांना मान देत शिक्षणाची दिशा बदललेली आहे. सामान्य मानसाच्या तुलनेत उच्च वर्गीयात धंडे ही वेगळी दिली जात असल्याचे चित्र आज समाजात दिसत आहे.

सर्व शिक्षा अभियाना मार्फत व सक्तीचे शिक्षण देणा—या शाळा वस पडत जात आहेत. हे वास्तव आहे. मोफत शिक्षणापेक्षा महागडे शिक्षण गरजचे अशी परिस्थिती आज राज्या राज्यात निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षणाची स्थिती एका वेगळया बाजूस जात आहे असे दिसते. आज गाव तेथे शाळा निर्माण होउनही गावातील शाळेत मात्र विद्यार्थी शिकत नाहीत. समाजातील बदलामुळे शिक्षणाला महत्व न देता त्यातील उपयोगितेला महत्व दिला जात आहे.

आजच्या शिक्षण पध्दतीची रुपरेषा त्या महान पुरुषांनी ३०० वर्षापूर्वी सांगीतली त्याची अंमलबजावनी मात्र या राज्यात ख—या अर्थाने आजही झाली नाही असे दिसते. आजही शिक्षणापासून वंचित असणारे बालके समाजात दिसतात. त्या महापुरुषाचे स्वप्न तेव्हाच खरी होतील जेव्हा समाजातील स्त्री—पुरुष विषमता नष्ट होईना. समाजातील जातीय भेदभाव नष्ट होईल. समाजातील अंधश्रध्दा नष्ट होईल. समाजातील प्रत्येक व्यक्ती शिक्षण घेईल. मागास जाती जमातीचा संपूर्ण विकास होईल. ते कोणत्याही कारणात शिक्षणापासून वंचीत राहणार नाहीत.शाहुमहाराजाची जी सामाजिक न्यायाची भूमिका आहे ती आज भोंगळ झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. राजर्षी शाहू महाराज — धनंजय कीर
२. राजर्षी शाहू आणि भूमिका — डॉ. एस.एस.भोसले.
३. कोल्हापूरचे शाहू छत्रपती — ए.के.घोरपडे.
४. छत्रपती राजर्षी शाहू महाराज — तु.का.नाईक.
५. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ — डॉ. जयसिंगराव पवार
६. राजर्षी शाहु महाराज — श.रा. देवळे.
७. शाहू व्याख्यानमाला — न.र.पाठक

# १४. भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. गोविंद सदाशिव धुर्ये यांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार

**प्रा. राजेश नारायण इंगोले**
सहाय्यक प्राध्यापाक (समाजशास्त्र विभाग)
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम
Email-ingoleraj74@gmail.com

**प्रस्तावना**

प्राचीनकाळापासून मानवी समाजाचे अध्ययन करणारी सामाजीक शास्त्रे अस्तित्वात होती. सामाजीकशास्त्रात अर्थशास्त्र,राज्यशास्त्र,इतिहास यांचा अंतर्भाव होतो. शास्त्रीय पध्दतीने अध्ययन पाश्चामात्य समाजशास्त्रज्ञांनी १९ व्या शतकापासून सुरू केला. प्रामुख्याने ऑगस्ट कॉम्ट,हर्बर्ट स्पेन्सर,जॉर्ज सिमेल,कार्ल मार्क्स,मॅक्स वेबर,चार्लस कुले इत्यादी समाजशास्त्रीय विचारवंतानी अभ्यास केला आहे.

डॉ.जी.एस.धुर्ये यांनी भारतातील बुध्दीवादी आणि शैक्षणिक जीवनात सर्वोच्च दर्जा प्राप्त केला. भारतीय समाजशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी जे अव्दितीय योगदान होते. त्यामूळे त्यांना भारतीय समाजशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते.भारतीय समाजाचा वैज्ञानीक पध्दतीने अभ्यास करण्यास खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात सुरूवात झाली. भारतीय समाजामध्ये विविध सामाजीक संस्था,कृषी व्यवसाय याशिवाय रूढी,प्रथा,परंपरा अज्ञान,अंधश्रध्दा, बेरोजगारी वेश्या व्यवसाय इत्यादी विविध कारणामूळे अनेक विचारवंताचे लक्ष भारतीय समाजाच्या अध्ययनाकडे आकर्षीत झाले. अनेक समाजसुधारकांनी सामाजीक संघटना आणि भारतीय विचारवंत यांनी भारतीय सामाजीक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. परंतू भारतीय समाजाचे वैज्ञानीक पध्दतीने अध्ययन करण्याचे कार्य प्रामुख्याने समाजशास्त्रज्ञांनी केले. त्या समाजशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांने भारतीय समाजशास्त्राचा पाया घालण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये डॉ.जी.एस.धुर्ये यांचा समावेश होतो.

**उद्देश**—डॉ.धुर्ये यांच्या जाती उत्पती विषयक सिध्दांताचे अध्ययन करावे.
**संशोधन पध्दती**—प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासीके, वर्तमानपत्राचा उपयोग करण्यात आला आहें.

**जीवन परिचय :**

भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ.गोविंद सदाशिव धुर्ये यांचा जन्म १२ डिसेंबर १८९३ रोजी मालवण येथील एका व्यापारी कुटूंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मालवन,जुनागढ व देवगढ येथे झाले. ज्यांचे जेष्ठ बंधु वासुदेव आपल्या संपूर्ण कुटूंबियांना घेऊन मुंबईला आले. त्यामुळे उच्च शिक्षण मुंबई येथे झाले. १८१८ मध्ये संस्कृत व इंग्रजी विषय घेऊन ते मुंबई विद्यापीठातून एम.ए.झालेत. १९१९ मध्ये सर पॅट्रिक गिडीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विषय सुरू झाला होता. सर पॅट्रिक गिडीस यांच्या प्रेरणेमूळे धूर्ये हे समाजशास्त्राकडे वळले. धुर्ये यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी इंग्लंड विद्यापीठाला रवानगी केली. त्यामूळे धुर्येना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व केंब्रीज विद्यापीठात प्रवेश मिळाला. डॉ. रिव्हर्स व हॅडन यांच्या मार्गदर्शनखाली १९२३ मध्ये 'जातीचा मानववंशासंबधीचा सिध्दांत' या प्रबधांबद्दल त्यांना पीएच. डी.मिळाली.

१९२४ मध्ये डॉ.धुर्ये यांना एल्फीन्स्टन कॉलेजमध्ये समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरूवात केली. जून १९२४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात प्रपाठक आणि विभागप्रमूख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९२४ ते १९५९ पर्यंत जवळपास ३६ वर्षे ते मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभाग प्रमूख म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९३८ मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्रातील पहिली पीएच.डी ही आचार्य पदवी श्री.एस.सी प्रधान यांच्या श्नदजवनबींइसम पद ठवउइंलश या प्रबंधासाठी देण्यात आली. १९६० मध्ये मुंबई विद्यापीठात 'गुणश्री प्राध्यापक' म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनास चालना मिळाली म्हणून डॉ. जी.एस. धुर्ये यांनी १९५१ मध्ये **'Indian Sociological Society'** या संस्थेची स्थापना करण्यात विशेष पुढाकार घेतला इतकेच नव्हे या संस्थेचे वतीने'समाजशास्त्रीय

पत्रीका' हे द्वैवार्षीक नियतकालीका प्रकाशीत करण्यास त्यांनी सुरूवात केली. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात 'मुंबई' समाजशास्त्रीय अध्ययनाचे प्रमूख केंद्र म्हणून विकसित करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**डॉ.जी.एस.धुर्ये यांची ग्रंथसंपदा**

डॉ.जी.एस.धुर्ये यांनी ग्रंथसंपदा खूप आहे.त्यांनी जवळपास २३ संशोधनपर ग्रंथ लिहिले आहेत. तसेच त्यांचे असंख्य शोधनिबंध नियतकालाकांमधून प्रसिध्द झाले.त्यांची ग्रंथसंपदा पूढीलप्रमाणे

- Caste and Race in India 1932
- The Aboriginal, so called their future-1943
- Family and kinships in Indo European Culture-1953
- BharatNatyam and its custom-1958
- Caste, Class and Ocupation-1961
- Gods and men, 1962
- The Scheduled Tribes, 1963
- Indian Custom-1966
- Religious Consciaousness-1965
- Social Tensions of India-1968

**डॉ.जी.एस.धुर्ये जाती व्यवस्थेबाबत विचार.**

"Caste and Race in India" या आपल्या पहिल्या ग्रंथात डॉ. जी. एस. धुर्ये यांनी भारतीय समाजमनात खोलवर रूजलेल्या जातीव्यवस्थेचे विश्लेषन केले. डॉ. धुर्ये यांच्या मते' उतरत्या श्रेनीमध्ये झालेल्या स्तरामध्ये विभाजन हे सर्व मानवी समाजाचे एक लक्षण मानता येईल स्तरामध्ये विभाजन हे सर्व मानवी समाजाचे एक लक्षण मानता येईल. या सामाजीक स्तरीकरणाचे इस्टेट व्यवस्था,जातीव्यवस्था आणि वर्गव्यवस्था असे भिन्न स्वरूपाचे प्रकार आढळुन येते. हिंदूमधील पारंपारीक स्तरीकरण जातीव्यवस्थेचे स्वरूपात आढळुन येते. पुढे डॉ.धुर्ये म्हणतात की, हिंदूची जातीव्यवस्था ही जातीव्यवस्थेचा विस्तृत,सुविहीत नमुना आहे.

**जातीव्यवस्थेची उत्पत्ती.**

डॉ.धुर्ये यांच्यापूर्वीच अनेक विदेशी आणि काही भारतीय अभ्यासकांनी जातीव्यवस्थेचे अध्ययन केले परंतू जातीव्यवस्थेचा संकीर्ण विचार यांच्यापूर्वी क्वचितच कोणी केला नाही. डॉ.धुर्ये यांनी जातीव्यवस्थेचा उत्पत्तीसंधधीचे अभ्यासपूर्व विचार मांडले आहेत.

जातीव्यवस्थेचा निर्मितीबाबत प्रामुख्याने पुढील चार विचार प्रवाह आढळत असल्याचे

१. **वांशिक भेद** — डॉ.जी.एस.धुर्ये यांच्यामते, जातीव्यवस्थेचा निर्मितीसाठी जन्म आणी वंश हे दोन मूलभूत घटक जबाबदार आहेत.भारतामध्ये निरनिराळया वंशाचे लोक राहत होते. या निरनिराळया जाती या वांशिक भेदामूळे निर्माण झाल्या.

प्राचीन काळात हिंदूमध्ये जी वर्गव्यवस्था अस्तित्वात होती. त्यातील वर्ग हा शब्द शारीरीक गुणधर्माशी व विशेषत: रंगासी निगडीत होता असे

डॉ.धुर्ये यांचे मत होते. पाश्चात्य राष्ट्रामध्ये प्रचलीत असणाऱ्या वांशिक संकल्पना त्वचेचा रंग,डोळयाचा रंग, नाकाची ठेवण,केसाची रचना, इत्यादी गुणधर्माच्या आधारलेली आहे. त्याचप्रमाणे आर्य—अनार्य यांच्यातील वेगळेपना ही शारीरीक गुणधर्मावर आधारलेला आहे. व्यक्तीचा सामाजिक दर्जा निर्धारीत करतांना शारीरीक गुणधर्मातील वेगवेगळया आधार प्राचीन हिंदू समाजात जसा घेतला जातो त्याचप्रमाणे पाश्चमात्य राष्ट्रामध्ये घेतला जातो. असे डॉ. धुर्ये यांनी व्यक्त केले आहे.

डॉ.धुर्ये यांच्या मते, इ.स पूर्व २००० च्या सुमारास आर्य जेव्हा भारतात आले होते. तेव्हाच त्यांच्या मध्ये ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण,वर्ग आधीपासूनच अस्तित्वात होते. भारतात आल्यानंतर प्रथम येथील मूळ रहिवाशांना या शुद्र वर्ण बणलेला होता अनुलोम विवाहाने त्यांच्याशी प्रारंभीक काळात जरी संबध असले तरी नंतर अंतर्विवाही पध्दतीने त्यांच्याशी संबध तोडले त्यातूनच वांशिक शुद्रता व सांस्कृतीक समान गुणधर्म धारण केलेल्या आपल्या समुदायातच केली जावी. ज्यामूळे शारीरीक संबंधातून निर्मान झालेल्या संततीला सुध्दा स्वाभावीकरीत्या समान शारीरीक गुणधर्म आढळुन येतील अशापध्दतीने विभिन्न वांशिक समुदायात

आपली शारीरीक गुणवैशिष्टये अबाधीत ठेवण्याच्या दृष्टीने वैवाहीक संबध जोडले जात होते. त्यामूळे काही वांशिक समुदायांमध्ये रक्त शुध्दीकरणाची संकल्पना विकसीत होऊ लागली. त्यातून पुढे जातीची अगणित संख्या व जातीव्यवस्थेतील काटेकोरपणा निर्माण झाला. असे जातीव्यवस्थेच्या संदर्भात डॉ.धुर्ये यांनी असा निष्कर्ष काढला आहे.

**२. व्यवसाय भिन्नता :**

डॉ.धुर्ये यांनी जातीव्यवस्थेच्या निर्मितीस व्यवसाय भिन्नतेचा असलेल्या संबंध मान्य केलेल्या असल्याचे दिसून येते. भारतीय समाजात निरनिराळे व्यवसाय करणारे लोकांचे सुसंघटीत असे संघ निर्मान झालेले होते. अनेक व्यवसाय त्यांच्या संघामध्ये वंशपरंपरेने केले जाते. या व्यावसायीक संघाने आपले जीवन आपल्या कृतेस मर्यादीत केलेले होते. निरनिराळे व्यवसाय करणारे घटक परस्परापासून वेगळे,प्रवेश बंद असे व्यावसायीक गट निर्माण झालेले होते. या गटांनी —आर्यानी स्वीकारलेली अंतर्विवाहाचा नियम काटेकोरपणे पाळावयास सुरूवात केली. तेव्हापासून या गटांना जातीचे स्वरूप प्राप्त असे डॉ. धुर्ये यांनी स्पष्ट केले आहे.

डॉ.धुर्ये मते व्यवसायाचा दर्जावर व प्रतीवर जातीव्यवस्था निर्माण झाल्यामूळे कनिष्ठ जातीचा व्यवसाय करणाऱ्या जाती समुदायात जन्मलेल्या व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ समजण्यास येउ लागला वरिष्ठ दर्जाचा व्यवसाय करणाऱ्या जाती समदायात जन्मलेल्या व्यक्तीचा दर्जा वरिष्ठ समजला जाऊ लागला. त्यामूळे व्यवसायाच्या आधारावर व्यक्तीचा दर्जा निर्धारीत करण्याची प्रथा जातीव्यवस्थेत रूढ झाली.

३. **वैवाहीक निर्बंध** :

डॉ.धुर्ये यांच्या मते, प्राचीकाळी हिंदू समाजव्यवस्थेत आर्य व अनार्य या लोंकामधील फरक हा गुणवैशिष्टयांवर आधारलेला आहे. त्यामूळे ही शारीरीक गुणवैशिष्टये कायम टिकविण्यासाठी ते आपल्याच वांशिक समुदायातील वधू—वंराच्या वैवाहीक संबंध प्रस्थापीत करीत असत. त्यातूनच अंतर विवाहाची पध्दती रूढी झाली असा त्यांचा दावा आहे. डॉ.धुर्येया मते, अंतर्गत विवाहांचा व निरनिराळया गटांमधील रोटी व्यवहारातील निर्बंध हे ब्राम्हण आर्यानी स्वत:ची शुध्दता अबाधित राखण्यासाठी केले व ते इतरांनाही पाळायला उत्तेजन दिले त्यामूळे जातीव्यवस्था प्रस्थापीत होण्यास मदत झाली. आर्य जेव्हा भारतात आले होते तेव्हा

त्या समुदायात पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी होते. त्यामूळे अंतर्विवाहाचे पालन करणे तांत्रीक दृष्टया अडचणीचे ठरू लागले. त्यामूळे आर्यवंशातील लोकांनी बर्हिविवाहाचा करण्यास मान्यता दिली. या विवाहप्रकारात अनुलोम—प्रतिलोम विवाह पध्दती स्वीकरण्यास सुरूवात झाली. या अनुलोम—प्रतिलोम विवाह पध्दतीमूळेच संमिश्र स्वरूपाची गुणवैशिष्टये आढळुन येते हे जीवशास्त्रीय दृष्टया स्वाभावीक आहे. असा संमिश्र संतती कोणत्या वर्गात आणि वंशात अंतर्भाव करावा याबाबतच मतभेद  निर्माण होऊ लागले. या मतभेदतूनच जातीव्यवस्थेची निर्मिती झाली आहे असा दावा डॉ.धुर्ये यांचा आहे.

४. **धार्मीक व सांस्कृतीक भेद** —

भारतात बहुसंख्याक हिंदू धर्मीय आहेत. तसेच अल्पसंख्याक विविध धर्मीयसुध्दा आहेत. या प्रत्येक धार्मीक समुदायाची जीवन जगण्याची पध्दती संस्काराच्या पध्दती,धार्मीक सण—समारंभ आयोजीत करण्याची पध्दती, प्रार्थना पध्दती इत्यादी बाबतीत प्रत्येक धर्मात वेगळेपन असतो. एवढेच नव्हे तर हा वेगळेपना टिकविण्यासाठी उद्देशाने सातत्याने प्रयत्न केले जातात. याशिवाय आपल्या कर्मकांडात इतर कोणत्याही समुदायांनी हस्तक्षेप करू नये अशी समुदायाची अपेक्षा असते.

**जाती—उपजातीची निर्मिती :**

डॉ.जी.एस.धूर्ये यांनी जातीव्यवस्थेचा निर्मिती सोबतच धार्मीक समुदायातील पंथभेद व जाती समुदायातील पोटजाती यांचे तुलनात्मक अध्ययन करूण उपजाती व पोटजाती निर्माण होण्यास कारणीभूत असणाऱ्या घटकांचीही चर्चा केलेली आहे. डॉ. धुर्येच्या मते,‘‘ जातीव्यवस्थेचे अंतर्गत विवाह हे प्रमूख वैशिष्टये असून जाती याच केवळ अंतर्विवाही गट आहेत असे नाही तर उपजातीही अंतर्तिवाहाची नियम पाळतात म्हणून त्यांनाही जातीसमान मानले पाहीजे’’ असे मत व्यक्त केले.

डॉ.जी.एस.धुर्ये यांनी उपजाती व पोटजाती निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या घटकाचे विश्लेषन त्यांच्या जीम म्जीपब जीमवतल व बिेंजम या ग्रथांत केले आहे. त्यांच्या मते, उपजाती व पोटजाती निर्मान होण्याची कारणे पूढील प्रमाणे.

१. एकाच जातीचे लोक निरनिराळया प्रदेशात राहात असतील तर वास्तव्य करणाऱ्या प्रदेशानुसार त्या मुख्य जातीमध्ये उपजाती आणि पोटजाती निर्माण होतात. जसे कोकनस्थ ब्राम्हण,देशस्थ ब्राम्हण इत्यादी.

२. उपजाती व पोटजाती निर्माण होण्यासाठी जाती संकर अथवा वर्गसंस्कार हे महत्वाचे कारण आहे. विभिन्न जाती समदाय वैवाहीक संबंध अथवा शारीरीक संबंध प्रस्थापीत होतात. तेव्हा दोन जातीच्या संकटातून जन्मलेल्या काही उपजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. भिल्लाल ही उपजात राजपूत पुरूष व भिल्ल स्त्री यांच्या संबंधातून निर्मान झालेल्या लोकांची आहे.

३. जातीच्या व्यवसायाचा संदर्भात जसा डॉ. धुर्ये यांनी विचार केला तसाच त्यांनी उपजातीच्या संदर्भात केला. एकाच व्यवसाय करणाऱ्या जातीमध्ये व्यवसायाचा निरनिराळया तंत्रावरून व साधनावरून उपजाती निर्माण होतात. उदा. महाराष्ट्रात कुभांरामध्ये लहान चाके (लहान चाके वापरणारे) व थोर चाके (मोठे चाके वापरणारे) असा दोन उपजाती आहेत.

४. भारतीय समाजातील काही धार्मीक पंथ व उपपंथानासुध्दा उपजातीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. निरनिराळया धार्मीक चळवळीतून सुध्दा उपजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. उत्तर प्रदेशामधील ब्राम्हणांची विष्णोई उपजात आहे.

५. काही वेळ विशिष्ट रूढी किंवा वर्तन प्रकार पाळयाव्यावरून सुध्दा उपजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. कातकरी जातीमध्ये गाई बैलाचे मास खाणारे एक ढोर उपजात आहे. इतर जातीचे गाई बैलाचे मास खात नाहीत.

अशा प्रकारे भारतीय समाजव्यवस्थेत मूख्य जातीमधून विविध उपजाती अथवा पोटजाती निर्माण होतात असे डॉ. धुर्ये यांचा दावा आहे.

**निष्कर्ष :**

डॉ.धुर्ये यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीच्या संदर्भात प्रजातीय अथवा वांशीक सिध्दांत मांडला आहे. जातीव्यवस्थेचा निर्मितीसाठी जन्म वंश हे घटक जबाबदार असल्याचे सिध्द केले आहे. जातीव्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन व संशोधनात्मक अध्ययनाचा वेगळा दृष्टीकोन आहे.

डॉ धुर्ये यांनी इतिहास,मानवशास्त्र,पुरानत्वशास्त्र,वास्तुशास्त्र,साहित्य,कला, धर्म या विज्ञानाची त्यांनी समाजशास्त्राशी सांगड घातली. भारतातील जाती,आणि वंश,आदीवाशी,कुटूंब,संस्था वैवाहीक संबंध, सामाजीक ,भारतीय परंपरा, धर्मविषयक जाणीव इत्यादी विषयावर लिखान केले.

डॉ.धुर्ये यांनी भारतीय समाजव्यवस्थेत आढळुन येणाऱ्या विविध जाती व उपजाती निर्माण होण्यास कोणकोणाचे घटक कारणीभूत आहेत. याचे सविस्तर विवेचन केले आहे. प्रादेशिक भिन्नता, मिश्रविवाह पध्दती, व्यावसायीक भिन्नता,धार्मीक पंथभेद, आहार विषयक रितिरितीवाज संकल्पना हे घटक जाती व उपजाती निर्मीतीस कारणीभूत आहेत.

संदर्भ :—


१. आगलावे डॉ. प्रदिप—अभिजात समाजशास्त्रीय विचार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

२. कऱ्हाळे डॉ.बी.एम —समाजशास्त्रीय विचार, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर.

३. कुलकर्णी प्रा.पी.के—सामाजीक विचार प्रवाह, श्री मंगेश प्रकाशन,नागपूर.

# १६. पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार - लोकहितवादी (१८२३-१८९२)

**डॉ. नवनाथ रासकर**
(तत्वज्ञान विभाग प्रमुख)
मुधोजी महाविद्यालय, फलटण
जिल्हा सातारा
मो. नं. ९६६५४०९४१७

---

लोकहितवादींचे नाव गोपाळ हरी देशमुख असे होते. त्यांची लोकहितवादी बरोबरच रावबहाद्दूर अशीही ओळख होती. महात्मा फुल्यांच्या समकालीन त्यांच्या बरोबरीने इतर सर्वच पुढऱ्यांपेक्षा हिंदुधर्म, ब्राह्मण, पुरोहित आदींवर त्यांनी अधिक कोरडे ओढल्याचा अनुभव शतपत्रातून येतो. त्यांनी हिंदुधर्मातील उणीवा, जात-पाती, अंधश्रद्धा यावर कडाडून हल्ला केल्याचे दिसते. लोकहितवादींचा मुख्य भर समाजसुधारणेवर होता. तरी धर्म सुधारणा हा समाज सुधारणेचा एक महत्वाचा भाग असल्याने या लेखात त्यांच्या या पैलूवर प्रकाश टाकला आहे.

धर्माच्या संदर्भात लोकहितवादींचे मत असे आहे. अर्जुनाला कर्मयोगी करण्यासाठीच गीता सांगितली आहे. गीता प्रवृत्तिपर आहे. ‘‘वैराग्य हे मूर्खपण आणि ईश्वराने जे दिले व ज्याकरिता मनुष्य देह केला, त्यास टाकून जनावरांप्रमाणे रानात फिरणे आहे...’’ वैराग्य व संन्यासावर टीका करुन त्यांनी धर्मकल्पनेत प्रवृत्तीला महत्त्व दिले आहे. आश्रमाप्रमाणे व वर्णाप्रमाणे प्रत्येकाने वागावे असे त्यांचे मत आहे पण त्यांना प्रचलित वर्णकल्पना अभिप्रेत नाही. ते जन्मावरुन नव्हे तर कर्मवरुन जात ठरवतात. जात म्हणजे कर्मावरुन योग्यता एवढेच. सर्व माणसांचे मूळ एक यासाठी लोकहितवादी संत तुकारामांचा अभंग देतात.

‘‘तुम्ही नका करु गर्व । नीज जाती म्हणुनी सर्व ।।
शुक्रशोणिताची खाणी । तुम्हा आम्हा एकच योनी ।।
रक्तमांस चर्महाडे । सर्वाठायी सम पाडे ।।
अन्नउदक घरोघरी । निष्ठा नाही हो दुसरी ।।
तुका म्हणे हेचि खरे । नाही देवाशी दुसरे ।।१।।’’

तात्पर्य त्यांचा जातिभेदाला विरोध आहे. त्यांनी मुर्तिपूजेला विरोध केला आहे. ईश्वर निर्गुण असून त्याला फळा-फुलांची कशाचीही गरज नाही, त्याची पूजा ध्यानाने/मननाने करता येते. माणसाची सेवा हीच ईशपूजेची बाह्यपद्धती आहे असे लोकहितवादी म्हणतात. त्यांना वेदांत्यापेक्षा धादांती बरा वाटतो. कारण वेदान्ती जग. मिथ्या म्हणून काहीच करत नाही, आळशी बनतो. तसे धादांत्याचे नाही. त्याच्या दृष्टीने जग खरेच असते. म्हणून नित्याचे व्यवहार तो चोखपणे, क्रियाशील राहून पार पाडतो म्हणून तो बरा. धादांती कोणत्याही अंगाने चांगलाच (क्रियाशील-कर्मशील या अर्थाने) असतो, लोभी असेल तर द्रव्यार्थ खटपट करितो आणि साधू असला तर लोकांचे हिताकरिता खटपट करतो.

१८४९ च्या प्रभाकरपत्रात ‘धर्मसुधारणा’ या लेखात त्यांनी धर्म सुधारणेची १६ कलमे दिली आहेत. यातून त्यांना हिंदुधर्माची सुधारणा अभिप्रेत होती.

- ❖ सर्वांनी ईश्वराला अंतःकरणापासून भजावे,
- ❖ जसा आपला जीव तसाच दुसऱ्याचा जीव असतो.
- ❖ लग्न, मुंज, प्रेतक्रिया हे तीन संस्कार ठेवून बाकीचे सोडून द्यावेत.
- ❖ कोणतेही भजन, पूजन, संस्कार स्वभाषेत असावे.
- ❖ विचाराला आचारात स्थान असावे.
- ❖ मनुष्यमात्राला कमी तुच्छ समजू नये.
- ❖ स्त्री-पुरुष समता (आर्थिक व सांसारिक दोन्ही पातळीवर)
- ❖ गुण व योग्यतेनुसार व्यक्तीमध्ये फरक करावा, यादृष्टीने त्यांना वर्णाश्रम मान्य होता.
- ❖ सत्याने वर्तावे इ. १६ कलमे लोकहितवादींनी सांगितली आहेत.

वरील कलमांच्या माध्यमातून त्यांना नवा धर्म अभिप्रेत होता. त्यांना हा धर्म मानवतावादी, समतेवर अधिष्ठित आणि ऐहिकतेला महत्व देणारा असा हवा होता. धर्माचा उगम मानवी बुद्धीतून झाला आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या धर्माचा अर्थ व्यापक आहे. त्यात व्यक्तिगत, सामाजिक व

पारमार्थिक या तिन्ही घटकांचा समावेश होतो. स्वतःविषयी सावधगिरी बाळगणे व स्वकर्म आचरणे हाही धर्मच, दुसऱ्याविषयी सहानुभूती व दया दाखवणे हा सामाजिक धर्म तर ईश्वराचे स्मरण करण्याने पारमार्थिक धर्म पाळला जातो. त्यांच्या धर्माच्या व्याप्तीत सामाजिक व राजकीय अंगांचाही समावेश होतो. ज्ञान व पारंपारिक भक्तिला गौण स्थान देवून त्यांनी कर्म व भक्तिमार्गाला (त्यातल्या ईश्वरी स्मरणाला महत्त्व) महत्त्व दिले आहे. कर्ममार्गातही कर्मकांडाला फाटा देवून खऱ्या कर्ममार्गाला पसंत केले आहे. लोकहितवादींना अभिप्रेत धर्म नीतिप्रधान होता. आचाराचे स्तोम नाकारुन भक्तीला स्थान दिले आहे. प्रार्थनासमाजासी तुलना करता भांडारकर, रानडे यांच्याइतके लोकहितवादी आध्यात्मिक नव्हते. त्यांनी आत्मादेहसंबंध, जगतनिर्मिती याविषयी अधिक विचार न करता धर्माच्या लौकिक भागावर लक्ष केंद्रित करुन आपले विचार मांडले आहेत. कारण लोकहितवादींना धर्माच्या सामाजिक आशयात अधिक रस होता. धार्मिक, सामाजिक प्रगतीला जो अडसर निर्माण झाला होता तो लक्षात घेऊन ते धर्माकडे वळतात.

धार्मिक सुधारणेचा विचार करताना सामाजिक जीवन व नीती ही धर्मापासून अलग करण्याकडे लोकहितवादींनी लक्ष दिले. धर्माबद्दल अधिकतचे विवेचन टाळून ते धर्माचे सामाजिक जीवनातील स्थान मर्यादित करताना दिसतात. त्यांच्यामते संसार आणि परमार्थ ही दोन कामे पृथक आहेत. त्यांची मिसळ करु नये. परंतु अनेक लोक फक्त संसाराकरता काही कामे करतात आणि देवाकरता केली असे म्हणतात. ही दोने क्षेत्रे एकमेकांपासून वेगळी केल्याशिवाय सुधारणेचे कार्य पुढे जाणार नाही असे त्यांना वाटते. असा मूलभूत स्वरुपाचा विचार त्यांनी मांडला असे म्हटले जाते.

तात्पर्य लोकहितवादींचा धर्मविचार समाजसुधारणेच्या अंगाने सांगितला गेला. धर्मविचारात मानवी जीवन (ऐहिक अंगाने) प्रगल्भ कसे होईल, हे लक्षात घेवून त्यांनी आपले धर्मचिंतन केल्याचे दिसते. ईश्वराची एकता, त्याचे निर्गुणत्व या गोष्टी त्यांना मान्य होत्या. माणूस हा बुद्धीने इतर प्राण्याहून अलग आहे, भक्तीने देवाशी संबंध प्रस्थापित करता येतो, नीतीला मानवी जीवनात महत्त्व आदी गोष्टींची त्यांनी मांडणी केली पूजापाठ, कर्मकांड, मूर्तिपूजा, अवतार आदींना त्यांनी विरोध केला आहे.

लोकहितवादींच्या चिंतनातून एक महत्वाचा मुद्दा बाहेर येतो तो हा की, भारतीय तत्त्वज्ञानातील जे एक द्वंद्व मधल्या काळात बोथट झाले होते – चैतन्यवाद विरुद्ध जडवाद – त्याला लोकहितवादींनी 'वेदांत' विरुद्ध धादांत या शब्दांत अधोरेखित केले. धादांताचा पुरस्कार करुन, एक वेगळी जीवनदृष्टी दाखवून द्यायचा प्रयत्न त्यांनी केला आहे. वेदान्ती जीवनदृष्टी कशी समाजाच्या, माणसाच्या प्रगतीला रोखून धरते हे दाखवून दिले आहे. वेदान्ती म्हणजे चिद्वादी तर धादान्ती म्हणजे जडवादी किंवा वास्तववादी होय. धादान्ती मत माणसाला प्रवृत्तीकडे झुकवते, इहलोकाला महत्व देते व माणसाची प्रगती घडवून आणते. लोकहितवादींनी हाताळलेल्या या विचारद्वंद्वाचे अधोरेखन ज्येष्ठ तत्त्वचिंतक डॉ. प्रदीप गोखले यांनी आपल्या मांडणीत केले आहे.

**संदर्भ-**

१) मराठी विश्वकोष खंड १५, संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई – १९९५, पृ. ७७२ ते ७७६
२) आधुनिकता आणि परंपरा, संपा. राजेंद्र व्होरा, २०००
३) भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड -१०, संपा. डॉ. ग. ना. जोशी, १९९५
४) लोकहितवादींची शतपत्रे, संपा. ना. र. इनामदार, १९६०
५) लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गोवर्धन पारीख, १९७१

# १७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज: एक समाजसुधारक

**प्रा. रजनी आनंदराव काळे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अमरावती

---

भारतीय संस्कृती ही अध्यात्मावर आधारित आहे. अध्यात्माच्या पायावर उभे राहून विज्ञानाच्या दिशेने वाटचाल करीत आपला विकास करावा. आपले जीवन सुखी करावे व सामान्य लोकांनी समाधाने दैनंदिन जीवनात वाटचाल करावी हाच संदेश आपल्या देशातील ऋषी मुनी, संत महात्मे यांनी दिलेला आहे.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वर गुरूमाऊलीने देशकाळ परिस्थितीनुसार साडेसातशे वर्षीपुर्वी आपल्या ग्रंथातून अध्यात्माचे पाठ देत असतांना "मार्गाथरे वर्ताने विश्व, ते मोहरे लावावे अलौकीक नोहावे लोकांप्रती।" असे प्रत्येकाने आपले व्यक्तिमत्व घडवावे असा हितोपदेश केला आहे. त्यांच्याच पावलावर पावल टाकीत संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, स्वामी रामदास यासारख्या अनेक संतानी जनसागराला मार्ग दाखविला. एकोणिसाव्या व विसाव्या शतकात महात्मा ज्योतिबा फुले, वैराग्यमुर्ती गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सुध्दा याच मार्गाने पावल टाकीत जनसमुदायाला चालायला लावले. त्यांच्या विचारांचा व आचारांचा जनसागरावर प्रभाव पडण्याचे एकमेव कारण म्हणजे त्यांचे अलौकीक व्यक्तिमत्व होय.

संताचे व्यक्तिमत्व हे धर्म, पंथ संप्रदायापलिकडिल असते. संत हे मुर्तीचे व्यक्तिचे पुजारी नसुन ते तत्वाचे पुजारी असतात. त्यांचा मानवता हाच धर्म असतो. सर्व धर्माचे मुळ तत्व मानवतेतच आहे, असाच सर्व संताचा महान विचार होता. अशा संतापैकी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एक संत होते त्यांनी वयाच्या नवव्या वर्षापासूनच "मानवताही पंथ मेरा" या तत्वानुसार जीवनामध्ये आचार केला. वाढत्या वयानुसार व कार्यानुसार सर्व पंथाचा समन्वय साधन्यासाठी अथक प्रयत्न केले. राष्ट्रसंताच्या या सर्व कामाचा प्रत्यय आपणास प्रत्यक्षरित्या येतो. त्यांनी युगग्रंथ 'ग्रामगिता' यामध्ये देशाविदेशातील १४५ संत महात्म्यांना स्थान दिलेले आहे. त्यांच्या भाषणात, लेखात सर्व संप्रदायाच्या संत महात्म्याच्या विचारांचे

आचाराचे सार आहे. राष्ट्रसंताच्या श्री गुरूदेव सेवा मंडळामध्ये सर्व जाती धर्म संप्रदायाचे एकत्रीकरणाच आहे.

वंदनीय महाराजांच्या जीवन चरित्रांचा अभ्यास करीत असतांना आपणास त्यांच्या अलौकीक व विशाल व्यक्तिमत्वाचे दर्शन घडले म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्व अभ्यासकांच्या  सामान्य जनतेच्या ,समोर ठेवण्यासाठी प्रस्तुत लेखाचा विचार करण्यात आला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या व्यक्तिमत्वात अध्यात्म व विज्ञानाचे अनेक पैलु असल्याचे सहजपणे आपल्या लक्षात येते. त्यापैकी काही पैलु वाचक आपल्या जीवनात सहजपणे उतरवतील या अपक्षेने प्रस्तुत लेखाचे लेखन करण्यात आले आहे.

‘विदर्भ म्हणजे संतजनांची एक सरिताच होय’. संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडाजी महाराज म्हणजे या सरितेचे दोन किनारे होत. या दोनही संताच्या हदयात गोरगरिहांकरीता अपार कळवळा होता. म्हणूनच कोणत्याही अपेक्षेशिवाय गोरगरिबांवर प्रीत करण्याची त्यांची अनेखी रित होती. लोकसेवेतून परिवर्तन करणे हा बाणा या दोनही संताचा होता. माणसातल्या मांगल्याची उंच शिखरे गाठणे हा या दोनही संताच्या कार्याचा गाभा होता. या दोनही संतानी आपले व्यक्तिमत्व, कर्तृत्व आणि साधूत्व लोकसेवेतून निर्माण केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक विदर्भातील एक थोर संतकवी होते. राष्ट्रीय स्वातंत्रासाठी आणि स्वातंत्रानंतर देशोन्नतीसाठी स्वत:ला आजन्म वाहू घेतलेले एक महान लोकसंत होते. ग्रामोध्दार, ग्रामशिक्षण, आरोग्य, संपन्नता, सहजीवन, सदविचार, स्वावलंबन, स्वयंपुर्णता, सहकार्य आणि सर्वोदय व विचार धारणेतून आलेले ते एक श्रेष्ठसंत होते. राष्ट्रसंताची जनजागृती व्यापक स्वरुपाची होती. आपल्या देशालाच ते देव मानत असे. सकलांच्या जीवनात सुखाची निर्मीती करणारा सकलांणा तारणारा असा त्यांचा राष्ट्रधर्म होता. समाज प्रबोधनासाठी त्यांनी संपुर्ण जगभर प्रवास केला.

महात्मा जोतिबा फुले यांनी सर्वकष मानवी प्रतिष्ठेसाठी सर्वप्रथम रणशिंग फुकले. राष्ट्रसंतानी प्रथमत: सामान्य माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी झेंडा रोवला. मानवी जीवनात जे जे कालबाह्य आहे, कुरूप आहे, त्याज्य आहे, लांछनास्पद आहे, हानीकारक आहे, गतिबाधक आहे, भ्रममूलक आहे. त्याविरुध्द त्यांनी ,सर्वप्रथम युध्द पुकारले आज २१ व्या शतकामध्ये सुध्दा हे युध्द अजून संपले असे नाही. आज विज्ञानाच्या युगामध्ये सर्व

प्रकारची प्रगती चालू आहे. परंतु माणसामधील माणुसकी संपली आहे, ही आजही खरी शोकांतिका आहे. राष्ट्रसंतानी आपल्या तत्त्वज्ञानातून 'माणुसकी' ची महापुजा मांडली आहे. विश्वशांती हेच राष्ट्रसंताच्या तत्त्वज्ञानामागील प्रकाशस्तंभ आहे. याच आधारावर राष्ट्रसंतांनी सामाजिक समतेच्या उभारणीची पताका आपल्या हाती घेतली.

स्वातंत्रपुर्व कालखंडात आपला भारतीय समाज अज्ञान, अंधश्रध्दा, अनारोग्य, हिंसा, व्यसनाधिनता दुराचार, लोभ, व्देष, निंदा, परपीडा आणि अनेक वेदनांनी ग्रासलेला होता. राष्ट्रसंतानी भारतीय समग्र समाजाचे दु:ख ज्यावेळी पाहिले तेव्हा त्यांचे हृदय संवेदनशील झाले, विशेषत: भारतीय ग्रामीण समाजातील माणूस सुशोभित, स्वयंपुर्ण, सुरक्षित, सुजाण आणि सुसंस्कृत व्हावा यासाठी राष्ट्रसंतानी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील शोषित, पिडीत, पददलित, दु:खी वेदनाग्रस्त आणि गरिब लोकांचे दु:ख दूर करण्यासाठी ते रात्रंदिवस राबले, समाजातील क्रुर, दृष्ट, शोषक, हिसाचारी, व्यसनी आणि दुराचारी लोकांना सन्मार्गाने कसे जगावे ते सांगितले. माणसाला एक सदाचारी माणूस, एक समर्थ माणूस, एक सिध्दहस्त माणूस, एक स्वयंपुर्ण माणूस आणि एक जाणता माणूस बनवावे हेच राष्ट्रसंताचे मोठे कार्य होते.

भारतीय जनजागृतीसाठी राष्ट्रसंताच्या हृदयात करुणेची गंगा वाहत होती. सुविचारांचा सागर हेलावत होता. त्यामुळेच राष्ट्रसंतानी प्रसंगविशेषी भक्ती सेवा अणि माणूसकिच्या माधमातून समाजपरिवर्तनाची नवी लाट निर्माण केली. समाज जागृतीची नवी चळवळ उभी केली. राष्ट्रसंताच्या विचारांची उंची आणि कृपेची करुणा त्यांच्या भजन, प्रवचनातून ओसंडून वाहताना दिसते. 'हे विश्व मोहरे लावावे' या आंतरिक प्रेरणेने चाललेली राष्ट्रसंतानी भजने, प्रवचणे म्हणजे जनसामान्यांच्या आचार विचारांमध्ये आमुलाग्र क्रांती घडवून आणणारीच होती. राष्ट्रसंताचे भजन म्हणजे ग्रामीण समाज जीवनाची आर्थिक, समाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक घडी व्यवस्थित बसावी व सामान्य माणसाच्या काळजाला जावून भिडावी अशी ती एक आर्त किंकाळीच होती.

" हे प्रार्थना गुरूदेव से स्वर्गसम हो संसार, अति उच्चतम जीवन बने परमार्थमय व्यवहार हो" हेच त्यांच्या जीवनातील ईप्सित होते. राष्ट्रसंताची सामुदायिक प्रार्थना म्हणजे समुहमनाच्या बांधणीचे ते एक सर्वोत्तम साधन होते. सामुदायिक प्रार्थना म्हणजे सहजपणे चित्त शुध्दी होणे होय. त्यातुनच मानसिक शांती लाभते आणि माणूसकिची भावना वाढीस

लागते. परंतु राष्ट्रसंतांना सामुदायिक प्रार्थनेतून विश्वप्रेम  विश्वशांती आणि विश्वकर्मा अशा त्रिवेणी सविचारांची गंगा सामुदायिक मानसभूमीत निर्माण करावयाची होती. “एक माणूस एक विश्व” ही व्यापक जाणिव समाज मनात जागृत करावयाची होती. सर्व धर्माचा समन्वय विश्वशांतीचा उपाय हा विचार सामुदायिक प्रार्थनेमधून लोकमनात रुजवायचा होता.

राष्ट्रसंत एक द्रष्टे महापुरूष होते. आपला देश एक ग्रामप्रधान देश आहे. प्रत्येक ग्रामातील ग्रामनाथा च्या मनात आणि मस्तकात जोपर्यंत तेज आणि ओज निर्माण होत नाही, तोपर्यंत तो स्वालंबी आणि समर्थ होऊ शकत नाही. हे राष्ट्रसंतानी ओळखले होते. ग्रामसंस्थांच्या पायात पारतंत्र्यांची बेडी, हातात निष्क्रियता, मनात उदासिनता, स्वभावात व्यसनाधिनता आणि जीवनातील दैना पाहूनच राष्ट्रसंतांनी ग्रामीण भागातील माणसाच्या स्वालंबी, स्वाभीमानी आणि समर्थ जीवनाच्या तयारीसाठी चौफरे प्रयत्नांची पराकष्ठा केली. राष्ट्रसंतानी ‘ग्रामनाथ’ म्हणजे श्रमजीवी भूमिपुत्र व शेतकरी, श्रमिक आणि स्वातंत्रकांक्षी जनसेवक यांचा निर्देश केला आहे. राष्ट्रसतांनी रंकापासून रावनापर्यंत आणि दगडापासून गावापर्यंत सर्वोतोपरी कायापलट करण्याचा एक ध्यासच घेतला होता. यात त्यांनी ज्ञान, भक्ती आणि कर्म या त्रिवेणी संगमावर उभे राहून ग्रामनाथाला नवचैतन्याचा मार्ग दाखविला. राष्ट्रसंत ग्रामनाथाचे पहीले कैवारी होते. ग्रामनाथाच्या मरगळलेल्या जीवनात नवचैतन्याचे वारे निर्माण करून जगण्यात आनंद आहे हा विचार त्यांच्या मनात निर्माण केला. सदाचारातून सुखाकडे, श्रमातून आनंदाकडे आणि शिक्षणातून प्रगतीकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त केला.

**“ देव मस्तकी धरावा, अवघा हल्लाकोळ करावा”**

असे समर्थ रामदासांनी सागितले, परंतु राष्ट्रसंतानी देशच मस्तकी धारण करून अवघा हल्लाकल्लोळ केला. ‘देश हाच देव होय.’ हा राष्ट्रसंताच्या जीवन यात्रेतील अमृत विचार आहे. देश माझ्यासाठी नसून मी देशासाठी आहे. या प्रेरणेतून राष्ट्रसंत ग्रामोन्नतीकडून देशोन्नतीकडे झेप घेतात. स्वातंत्र प्राप्तीच्या दिशेने जनजीवनात नवी चेतना निर्माण करण्यासाठीच राष्ट्रसंत म्हणतात.

**“ प्यारा हिंदूस्थान है। गोपालो की शान है।**
**वीरो का मैदान है। उसमे भक्तो के भगवान है।”**

अशी पथंसचलन गीते गात देशातल्या तरुणाईत शारिरीक, मानसिक बलसंवर्धनाचे चैतन्य निर्माण केले.

**" झाड झडूले शस्त्र बनेंगे । भक्त बनेगी सेना।**

पत्थर सारे बम बनेंगे। नाव लगेगी किनारे। आते है नाथ हमारे।"

अशी प्रणादायी भजने गात त्यांनी व-हाड परिसरात स्वराज्य प्राप्तीच्या आकांक्षेचे बीज रोवले. जनमानसात आत्मबल व आत्मनिष्ठा यात परिवर्तन घडवले. राष्ट्रसंतांनी पुढे आपले कार्य भूदान यज्ञ, गोवा, हैद्राबाद मुक्तीसंग्राम, राष्ट्रभाषा प्रचार भारत सेवक समाज, भारत साधू समाज आणि ग्रामनवनिर्माण यासाठी भारतभर दौरे काढले आणि राष्ट्रसंत म्हणजे राष्ट्र चेतना, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्ती जनमनात निर्माण करणारे 'एक फिरते विद्यापिठ' होते. त्यांच्या ठिकाणी असलेले उत्कंठ राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रोधरासाठी आयोजिलेले कार्यक्रम यामुळेच ते राष्ट्रसंत या उपाधीस पात्र ठरले. यामुळेच ते १९४२ च्या स्वातंत्र लढ्याला प्रेरणा देणारे एक प्रणास्त्रोत ठरले.

" या भारतात बंधूभाव नित्य वसू दे." हेच त्यांचे संदेशगीत होते. संत हे चिरंतन नारे देणारे प्रवासी असतात. समाज मनाला इष्ट ते वळण लावावे. समाजाला वाईट रूढी पासून वाचवावे. आणि सा-या जगात बंधूभावाच्या बागा फुलवाव्यात याचसाठी ते या पृथ्वीतलावर आलेले असतात.

राष्ट्रसंताची वाणी ही रेडीयमच्या तारेप्रमाणे समाजाला प्रकाशाचे अखंड स्फुलिंग देत राहतात. माणसा-माणसातील विषमतेचा जाच आणि अंधश्रध्दांचा काच दूर करुन जगातील माणूस हा इथून तिथून सारखाच आहे. या सुविचारांचे संतानी जगाला दिलेले योगदान चिरंतन स्वरुपाचे आहे. त्यामुळे तुकडोजी महाराज केवळ समाज प्रबोधक करणारे राष्ट्रसंतच नव्हे तर समाजाला देशप्रेमाने भारावून टाकणारे राष्ट्रसंत होते.

' शांतीसे क्रांती कर दिखलायेंगे '. अशीच त्यांची प्रतिज्ञा होती. माणसा माणसामध्ये रुजलेल्या वैषम्याच्या खानाखुणा पुसून टाकून मानतावादी विचारांची पताका हाती घेवून राष्ट्रसंतांनी भारताच्या कानाकोप-यात माणसामाणसाच्या मनामनात समतेचा नंदादीप तेवत ठेवला.

राष्ट्रसंत उच्चशिक्षित नसून देखील त्यांनी केलेले विपुल ग्रंथरचना गौरवपूर्ण आहे. ग्रामोन्नतीकडून राष्ट्रोन्नतीकडे, राष्ट्रन्नोतीकडे, राष्ट्रन्नोतीकडून विश्वोन्नतीकडे आणि

विश्वन्नोतीकढून विश्वशांतीकडे जाण्याचा मार्ग राष्ट्रसंताच्या तत्तवज्ञानातून सूकर झाल्याचे स्पष्ट होते. 'सबकी भलाई धर्म मेरा,' हा त्यांच्या तत्वज्ञानाचा 'आत्मपंथ' आहे. महामानवाला पुरोगामी विचारांचा मार्ग दाखवला त्याला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळविण्यास सक्षम करावे या व्यापक उद्देशाने राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतील तत्वज्ञान मांडले. राष्ट्रसंताच्या सर्व रचनाचा कंठमणी म्हणजे ग्रामगीता होय. भारतीय संस्कृती आणि लोकजीवनाचे समग्र दर्शन घडविणारा एक अनन्यसाधारण ग्रंथ होय. आदर्श लोकजीवनाला वाहीलेले एक सुगंधीत कमलपुष्प म्हणजे 'ग्रामगीता' होय. भारतीय समाज धारणेचे सत्य ग्रामगीतेतून प्रकट झालेले आहे. त्यात समान मानवी तत्वाला जाग आणण्याचा प्रयत्न झाला आहे. निखळ मानव निष्ठांची मांदीयाळी त्यांच्या ग्रामगीतेमधून दिसून येते.

**'हर देश मे तू, हर भेस मे तू, तेरे नाम अनेक, तू एक ही है।**

राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेतील तत्वज्ञानाला आत्मीयतापुर्ण वैश्विक समतेची श्रीमंती ओलांडून वाहतांना दिसून येते. 'मानसा तू माणूस हो।' या धर्म हाकेला साथ देणारे राष्ट्रसंताचे तत्वज्ञान म्हणजे मानव धर्माची एक श्रेष्ठ महापूजाच. यावरूनच आपण असे म्हणू शकतो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे समाजाला जागृत करणारे महान समाज सुधारक होय.

**संदर्भ ग्रंथसूची :-**


1. डॉ. सौ. योगिता पिंजळकर - 'ग्रामगीतेची निर्मितीप्रक्रीया', साई नगर, अमरावती.
2. डॉ. सुभाष सावरकर व प्राचार्य रा. तू. भगत - राष्ट्रसंत तुकडोजी गौरवग्रंथ, चैतन्य प्रकाशन १७५८, ए वॉर्ड अनिरुध्द अपार्टमेंट, कोल्हापुर.
3. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीता.
4. श्री गुरूदेव मासिक.
5. सुदाम सावरकर - जीवनयोगी खंड १ ते ११.
6. प्रा. रघुनाथ कडवे – 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्व', प्रकाशक, अमोल कडवे, २०६ रहाटे कॉलनी, वर्धा रोड, नागपूर .
7. प्रा. रघुनाथ कडवे, 'मानवतेचे महानपुजारी - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज'.
8. सपा. बाबा मोहोड -राष्ट्रसंताची पत्रे.

# १८. ईश्वरचंद्र विद्यासागर : समाजसुधारणेचा

**डॉ. आश्लेषा मुंगी**
ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट चे
शारदाबाई पवार महिला महाविद्यालय आर्टस्, कॉमर्स, सायन्स, कॉलेज बारामती.

**सारांश** :

समाजसुधारणेचा, समाज परिवर्तनाचा वसा घेणारे असंख्य समाजसुधारक महाराष्ट्राला लाभले. अनेक लोकांनी आपले सारे आयुष्य सुधारणांच्या कार्याला वाहून दिले. परंतु बंगाल मधे जन्म झालेल्या या सामाजिक कार्यकर्त्याचे नाव ईश्वरचंद्र बन्दोपाध्याय (२६ सप्टेंबर १८२०-२९ जुलै १८९०) हलाखीची परिस्थिती असून सुध्दा शिक्षणाच्या वेडाने यांना स्वस्थ बसू दिले नाही. संस्कृतचा गाढा अभ्यास करता करता हिंदू धर्मशास्त्रविषयक परिक्षेत उत्तीर्ण झाल्याने मिळालेल्या प्रमाणपत्रात त्यांच्या नावापुढे विद्यासागर ही उपाधी लागली. आणि ती कायम स्वरूपीच झाली. शिक्षणाचा प्रसार समाजसुधारणा आणि साहित्य निर्मिती अशा विविध भूमिका त्यांनी बजावल्या होत्या. आज कोविड सारख्या महाभयंकर विषाणूनी जगावर अधिराज्य करू पाहत असताना ईश्वरचंद्र सारख्या ध्येयवेडी व्यक्तींचे शब्द आपणा सर्वांना मार्गदर्शन ठरू शकतील ते म्हणायचे, "मी वास्वत जगाचा व त्यात राहणाऱ्या जीवनाचा विचार करीत असतो. माणूसकीने वागणे हाच मी माझा धर्म मानतो." ते विचार आजच्या तरूणांनी आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

**प्रस्तावना :**

बंगालमध्ये जन्मलेल्या या समाजसुधारकाचा सर्वत्र आजही आदर्श घेतला जातो. स्वत: प्रतिकूल परिस्थितीत राहूनही स्वत:चा विकास करत करत जगातील दु:खावर फुंकर घालण्याची उत्तुंग मानसिकता अशाच व्यक्तीमध्ये येऊ शकते. म्हणून इतकी वर्ष लेटली तरी समाजाने हे नाव बाजूला टाकलेले नाही.

ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा जन्म बंगालमधील मिदनापुर जिल्ह्यातील वीरसिंह गावात अतिशय गरीब ब्राह्मण कुटुबांत झाला. वडिलांचे नाव ठाकूरदास बन्दोपाध्याय त्यांनी शिक्षणाची गोडी व प्रसार, सामाजिक परिवर्तनासाठी आमूलाग्र विचार घ्यायचा वारसा दिला होता. वयाच्या नवव्या वर्षापासून वडिलांचे बोट धरून कलकत्ता येथे चाळत जाऊन संस्कृत अध्ययनास प्रारंभ केला.शारिरीक व्याधी व आर्थिक कमकवत नाजूक असूनही ईश्वरचंद्र यांनी प्रत्येक परिक्षेत उत्कृष्ट

यश संपादन केले. १८४१ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण करून फोर्ट विलियम महाविद्यालयात पन्नास रूपायांवर काम करू लागले. १८४६ मध्ये संस्कृत महाविद्यालयात सहकारी संपादक म्हणून नियुक्त झाले. परंतु मतभेदामुळे थोड्याच दिवसात त्याचा त्याग करावा लागला. विद्यार्थी जीवनात त्यांनी गरजू विद्यार्थ्यांची मदत करून समाजिकरणाचा पाया रचला होता. १८३९ साली हिंदू धर्मशास्त्र विषयक परिक्षेत उत्तीर्ण झाल्याने मिळालेल्या प्रमाणप्रत्रात त्याच्या नावापुढे "विद्यासागर" ही उपाधी लागली होती. म्हणून बन्दोपाध्याय हे त्यांचे उपनाव मागे पडून विद्यासागर हे नाव रूढ झाले. महाविद्यालयात असताना व्याकरणाचे वर्ग घेण्याचे काम त्यांच्यावर सोपवलेले होते.

**"संशोधनाची उद्दिष्ट्ये"**:

१) कोरोना सारख्या प्रतिकुल परिस्थितीत अशा समाज सुधारकाचे व्यापक विचार तळागळातील व्यक्तीपर्यंत पोहचावा.

२) आजच्या आधुनिक तरूण पिढीपुढे सामाजिक परिवर्तनाचे विचार आदर्श म्हणून ठेवावेत.

**शैक्षणिक विकासाची पायाभरणी :**

ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी शिक्षण खात्यात साध्या शिक्षणापासून शिक्षक निरीक्षकाच्या हुद्यापर्यंत काम केले. शरिरीक अवस्थता, आर्थिक विवंचनांना सामोरे जात स्वत: शिक्षणाची धुरा आविरत वाहणारे, ज्यांचा आदर्श तरूणांनी घेवून शिक्षणाची बीज रोवली पाहिजे. शिक्षणाची धुरा वाहण्याचे काम फक्त स्वत:पुरते मर्यादित न ठेवता समाजातील स्त्रीयांनी शिक्षित झाले पाहिजे. या विचारांनी झपाटलेले व्यक्तिमत्व होत. सरकारी शिक्षण खात्यात असताना शिक्षण खात्यातर्फे मुली शिकविल्या पाहिजेत. या हेतूने त्यांनी पस्तीस नवीन बालिका विद्यालये, एक मध्यवर्ती अध्यापक विद्यालय आणि बंगालमधील प्रमुख शहरात आदर्श विद्यालये स्थापन केली. समाजातील जात व्यवस्था उपटून टाकली पाहिजे. त्यासाठी त्यांनी खूप मोठा झगडा केला. संस्कृत महाविद्यालयात ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत नसे. यासाठी त्यांनी आवाज उठवला. ते धोरण रद्द करून त्यांनी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश मिळवून दिला. १९५८ साली अधिकाऱ्यांशी मतभेद झाल्याने ते शिक्षण खात्यातून बाहेर पडले.

**विधवा विवाह अधिनियम कायदा :**

शिक्षणाचा संदेश साऱ्या समाजात पसरवत असतानाच समाजातील विविध प्रश्नांनी ते सातत्याने ते अस्वस्थ होत असत. त्यातीलच विधवा विवाहाचा प्रश्न खूप मोठा अवलंबून उभा होता.

त्यांनी विधवांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. संस्कृत पंडित असल्याने पराशर अंहिसेत विधवा विवाहास मान्यता असल्याचा दाखला त्यांनी काढून दाखविला.

१८५६ साली विधवा विवाहाचा अधिनियम संमत करून घेण्यात त्याचा मोठा वाटा होता. ईश्वरचंद्र हे स्वत: कर्ते सुधारक होते स्वत:च्या मुलींची लग्ने त्यांनी चौदा-पंधरा वर्षाच्या होईपर्यंत केली नाहीत. आपल्या मुलाचे लग्न त्यांनी एका बालविधवेशी लावून दिले होते. कुलीन ब्राह्मणवर्गातील बहुपत्नीकत्वाची चाल, बालविवाह, मद्यपान इ. अनिष्ट चालींविरुद्ध त्यांनी बंगालमध्ये चळवळी केल्या.

**बंगाली गद्यांचे जनक :**

ईश्वरचंद्र विद्यासागर हे आधुनिक बंगाली गद्याचे जनक समजले जातात. त्यांची भाषा सुबोध व सामान्य जनांना सहज समजेल अशी आहे. बंगाली भाषेच्या प्रकृतीला अनुरूप अशी गद्यशैली त्यांनी प्रचलित केली आणि त्यामुळेच बंगाली गद्याच्या जनकत्वाचा मान त्यांना दिला जातो. त्यांच्यापूर्वी राजा राममोहन रॉय यांनी गद्यशैली रूढ केली होती; ती गद्यशैली त्यांनी विकसीत केली होती ती पंडिती वळणाची होती. सर्वसामान्यांना ती सहजगत्या समजत नव्हती. त्यांची स्वतःची प्रकृती तत्त्वचिंतकाची असल्याने भाषाशिल्पाकडे त्यांनी कधी लक्षच दिले नाही.

**साहित्य लेखनाची प्रग्लभता :**

साहित्यक्षेत्रात ईश्वरचंद्र यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांची जीवनशैली तशीच साहित्य रशिकांची व सामाजिक संस्कारांची होती. म्हणून आजही त्यांचे साहित्य अभ्यासले जाते. त्यांचे लेखन मुख्यतः बंगाली आणि संस्कृत भाषांत आहे. ईश्वरचंद्रांनी मुख्यतः शिक्षणाचा प्रसार, समाजसुधारणा आणि साहित्यनिर्मिती अशा त्रिविध भूमिकांतून लेखन केले. संस्कृत भाषेच्या सुलभ अध्ययनासाठी त्यांनी बोधोदय (१८५१), उपक्रमणिका (१८५१), ऋजुपाठ (१८५१ – ५२), व्याकरणकौमुदी (१८६२) व वर्णपरिचय (१८५५) हे ग्रंथ लिहिले. त्याचप्रमाणे बंगाली भाषा शिकण्यासाठी कथामाला (१८५६) तसेच शब्दमंजरी नावाचा शब्दकोश तयार केला. बांगलार इतिहास (१८४८), जीवन चरित (१८४९), चरितावलि (१८५६) आणि भूगोल-खगोल-वर्णन (१८९२) हे ग्रंथ त्यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोणाचे आणि चतुरस्र जिज्ञासेचे द्योतक आहेत. त्यांची पहिली साहित्यकृती वेताल पंचविंशति (१८४७) ही सुलभ बंगाली भाषेचे प्रतीक म्हणून आजही लोकप्रिय आहे. पुनर्विवाहाचा संदेश सर्वत्र जावा याकरित त्यांनी विधवाविवाह (१८५३) हा ग्रंथ लिहिला. विधवाविवाहाला पाठिंबा देणारे दाखले धर्मशास्त्रातूनच दाखविणारा आणि पंडितांना त्यांनी

प्रमाणभूत मानलेल्या ग्रंथांच्या आधारेच निरुत्तर करणारा ग्रंथ म्हणून तो आदर्श ठरला. याव्यतिरिक्त शकुंतला उपअध्यान सितारवनभास, अध्यायन भंजरी, भ्रांतिविलास ह्या त्यांच्या इतर कलाकृती प्रसिध्द आहेत. सर्वांगाने लिखाण करणारा साहित्यीक खऱ्या अर्थाने विविधांगी साहित्यकार ठरला. ईश्वरचंद्र यांनी संस्कृत नाटकाचे तसेच महाभारतातही इतर बारा ग्रंथाचे संपादन केले आहे. राजाराममोहन रॉय यांनी विचारसरणी त्याने अवलंबवले होते. सामाजिक कार्यामागील निकोप बुध्दिवाद त्यांनी राजाराममोहन रॉय यांच्यापासूनच उपलब्ध होता त्यामुळे त्यांना त्यांचे वारस मानत. १८७७ साली कलकत्यस भरलेल्या दरबारात ईश्वरचंद्र यांना इंग्लंडच्या राणीकडून बहुमानाची सनद मिळाली व पुढे 'सी. आय. इ.' ही पदवीही मिळाली.

'मी वास्तवादी आहे असे ते म्हणायचे देव धर्म कधीच अडकले नाहीत. माणुसकीने वागणे हाच मी माझा धर्म मानतो', असे ते म्हणत. हा आपला धर्म त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत निष्ठापूर्वक आचरिला. त्यामुळे सारे जग त्यांना 'विद्यासागर' म्हणून ओळखीत असले, तरी बंगालमधील सर्वसामान्य जनता त्यांना 'दयासागर' म्हणूनच अधिक ओळखते.

**संदर्भ :**

1) Banerjee, Hiranmay, Iswarchandra Vidyasagar, Delhi, 1968.

2) साने गुरुजी, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, पुणे, १९६६.

3) विनयधोष, विद्यासागर ओ बाडाति समाज - बंगाल प्रकाशन कलकत्ता.

4) महम्मद अब्दुल हाय आभिसुज्ञामम : विद्यासागर रचना संग्रह, स्दुडेन्टस् ओयेज, ढाका १९६८.

5) https://www.wikiwand.com

6) https://hi.m.wikipedia.org

7) https://marathivishwash.org

8) https://bharatidiscoxery.org

# १९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सशक्तिकरण

**डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव**
(लोक प्रशासन विभाग प्रमुख)
कै.डॉ.शंकरराव सातव महाविद्यालय कळमनुरी. जिल्हा :- हिंगोली.
मोबाईल नंबर(9404070923)

---

**प्रस्तावना**

**"नव्या युगाची मी नवा महिला आहे मनस्वीनी
मी न दासी मी न देवता जगेन माणूस म्हणुनी
नागरिक मी नव्या युगाची शांती वरती श्रद्धा माझी
शिक्षणातुनी उजळीत जीवन जगेन माणूस म्हणुनी"**

असे गीत आज 21 व्या शतकातील विविध क्षेत्रात भरारी घेतलेली महिला गात आहे. एक काळ असा होता की आपत्य निर्मितीच्या प्रक्रियेत पुरुषांचे काही स्थान असते हे मानवाला अवगत नव्हते. स्त्रीला आपत्य निर्मितीची अलौकिक देणगी लाभलेली आहे असेच त्याला वाटत होते. अशीच निर्मिती प्रचिती त्याला पृथ्वीमध्ये सापडत होती. शिवाय गर्भधारणेच्या वेळी एका जागी स्थिर राहून लागलेल्या स्त्रीनेच शेतीचा शोध लावला होता. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत 'स्त्री' आणि पृथ्वीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. अर्थात या काळात मातृसत्ताक समाज व्यवस्था अस्तित्वात होती. परंतु पुढे कालांतराने आपत्त निर्मितीतील पुरुषांचे स्थान स्पष्ट झाले त्याबरोबर शेती देखील नांगराची सुरुवात झाली. त्यातून स्त्रीचे महत्व कमी-कमी होत जाऊन पुरुषप्रधान व्यवस्था स्थिराऊ लागली. याच परिस्थितीत आर्य आणि अनार्यात मोठा संघर्ष झाला. या संघर्षात पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या आर्यांचा विजय झाला. त्यामुळे मुळात देवतेचे महत्त्व लाभलेल्या स्त्रीला नंतरच्या काळात 'दासीचे' स्थान मिळाले. विविध मार्गाने ते घट्ट करण्यात आले. म्हणजेच 'चूल आणि मूल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र बनले. तिच्या कार्य क्षेत्राला मर्यादा आल्या. नैतिकतेच्या, संयमाच्या, लज्जेच्या इत्यादी संकेताच्या अनेक लक्ष्मणरेखा आखून देण्यात आल्या.

**"बाईचा जन्म नको रे शिरीहरी, रात अन् दिस पुरुषाची ताबेदारी||"**

असे म्हणून अपमानाचे कडू बोट पचवत होती. सती जाणे, केशव पन, बालविवाह यासारख्या गोष्टींमुळे तिचे जीवन करुणामय बनले होते. पुढे काळ बदलला सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे यासारख्या समाजसुधारकांनी समाज विरोध पत्करून स्त्री शिक्षणाचे, स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. या कार्याला पुढे कायद्याचे अधिष्ठान देऊन ही चळवळ किंवा मानवी समाजाच्या 50 टक्के असणारा घटक म्हणजे स्त्रिया आणि या स्त्रियांना सकक्ष करण्याचा विडाच जणू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उचलला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतिसूर्य महात्मा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांनी भारतातील स्त्रीदास्याची समस्या मांडताना महात्मा फुलेंचीच भूमिका स्वीकारली होती. अस्पृश्यतेचा आणि जातीव्यवस्थेचा प्रश्न समजून घेण्यासाठी बाबासाहेबांनी 'मनुस्मृती' बरोबर सर्व धार्मिक ग्रंथाची कठोर चिकित्सा केली. यातून त्यांच्या असे निदर्शनास आले की समाजातील सतीप्रथा, बालविवाह, विधवापुनर्विवाहास बंदी या स्त्रियांच्या गुलामगिरीच्या प्रथांचा संबंध जातिव्यवस्थशी कसा आहे ते त्यांनी आपल्या काही ग्रंथातून समप्रमाण सिद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या मते "जातीव्यवस्था ही केवळ गटातील विषमता श्रेणीबद्ध करणारी व्यवस्था नव्हती तर स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील विषमता बळकट करणारे होती." दुसरे असे की मानवी व्यवहारांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला ती न पचणारी असल्याने ती टिकवून ठेवण्यासाठी हिंसाचाराचा वापर आवश्यक होता. परिणामी भारतीय समाजात कौटुंबिक, सामाजिक दोन्ही पातळीवर हिंसेला एक प्रकारची मान्यताच जणू प्राप्त झाल्याचे आढळून येत होते. यावरून असे स्पष्ट होते की त्याकाळी स्त्रिया विरुद्धची हिंसा ही केवळ व्यक्तिगत विकृती नसून ती सामाजिक विकृतीचाच परिपाक होता. असे म्हटले तर वावगे ठरू नये.

प्राचीन काळी स्त्रियांना राजकीय, सामाजिक, कौटुंबिक जीवनात प्राप्त असणारा सन्मानजनक उन्नत दर्जा कोणी नष्ट केला? या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात मनूने हे पारंपरिक धर्माला अनुसरून स्त्रियांना हीन लेखणारे अधिकार नाकारणारे स्वातंत्र्य नाकारणारे कायदे केले जणू काही मनूने आपल्या मूल्य संस्कारातून मनुस्मृतिद्वारे स्त्रीदास्याचा सैध्दांतिक पायाच घातला. या अशा मनुस्मृती मध्ये नेमके असे काय लिहिले होते? ते असे "मनुस्मृति" म्हणजे पती-पत्नीला सोडू शकतो, गहाण ठेवू शकतो किंवा विकू शकतो. पण पत्नी स्वतःहून पतीला कोणत्याही परिस्थितीत सोडू शकत नाही, स्त्रीला स्वतःची संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाही. कारण ती स्वतः पिता, पती किंवा पुत्राची संपत्ती असते. जनावर, वेडा, शूद्र आणि स्त्री हे सर्व छळ करण्यास योग्य आहेत. स्त्रियाही अपवित्र आहेत. म्हणून त्या शिक्षण घेण्यास पात्र नाहीत. अर्थात अशा स्त्रियांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या

मनुस्मृतीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी महाड येथे जाहीर दहन करून स्त्रीमुक्तीचे पहिले पाऊल उचलले.

भारतीय स्त्रियांच्या कळवळा असणाऱ्या या आधुनिक युगात क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर. मात्र आंबेडकरांनंतर दुसरे कोणीही सापडणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी सतत उपदेश करत राहिले. "प्रतिकूलतेचा सामना केल्याशिवाय आपण स्वतःला ओळखू शकत नाही. आपली तगून राहण्याची क्षमता कळत नाही." त्यासाठी तुम्ही स्वतःला ओळखा.

स्त्रियांना सक्षम बनविण्याच्या उद्देशाने त्यांना नेहमी असे वाटत असे की, सामाजिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा परिपूर्ण सहभाग असलाच पाहिजे. हा त्यांचा विचार फक्त विचार नसून तो ते प्रत्यक्ष अमलात आणत असत. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांना घराच्या परिघा बाहेर काढून त्यांना सामाजिक आंदोलनात राजकीय चर्चेत समाविष्ट करून घेत. याचाच परिपाक म्हणजे महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह असो, अथवा काळाराम मंदिर प्रवेश इतर अनेक सत्याग्रहात स्त्रियांचा मोठा, निर्णायक सहभाग दिसतो. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "जनता" वृत्तपत्राच्या कार्यकरणीत "सावित्रीबाई बोराडे" आणि "अंबुताई गायकवाड" यांचा समावेश केला गिरण्या, कारखान्यात काम करणाऱ्या कामगार स्त्रियांना पुरूषांइतकेच समान वेतन मिळावे, स्त्रियांना बाळंतपणाची पगारी रजा मिळावी, त्यांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी बाळ पाळणाघराची सोय असावी, प्रौढ झालेल्या सर्व स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मतदाराचा समान अधिकार असावा. अशा प्रकारच्या वरील सर्व तरतुदी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना सक्षम बनवण्यामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी असे म्हणावेसे वाटते की, "आंधळ्याची काठी होणं, मुक्याचा आवाज होणं, बहिऱ्यांचा कान होणं आणि आधु माणसाचा आधार होणं हाच आपला खरा धर्म आहे. यापलीकडे आयुष्यात आपल्याकडे दान करण्यासारखं दुसरं काही नाही." हा विचार त्यांनी आपल्या जीवनात रुजविला आणि आचरणात देखील आणला हे वरील कार्यातून आपल्याला निदर्शनास येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकसभेत मांडलेले "हिंदू कोड बिल" ही भारताच्या इतिहासातील स्त्रियांना सक्षम बनविण्याचा दृष्टिकोनातून एक फार मोठी ऐतिहासिक घटना मानली जाते. केवळ दलित व बहुजनच नव्हे तर भारतातील संपूर्ण स्त्री वर्गाच्या स्वातंत्र्याचा मार्ग बाबासाहेबांच्या "हिंदू कोड बिल" यामुळे मोकळा झाला. मनुस्मृती सारख्या ग्रंथांनी स्त्रियांचे सर्व

हक्क नाकारले होते. ती समाजात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या दावणीला बांधलेल्या जनावरासारखी गुलाम होती. तिला कौटुंबिक-सामाजिक सन्मान नव्हता. कोणत्याही प्रकारचे आर्थिक अधिकार नव्हते. परंपरेने स्त्रियांच्या वाट्याला केवळ दुःख आणि अन्याय दिला होता. तो अन्याय दूर करण्यासाठी मानवतावादी व करूण हृदयाच्या बाबासाहेबांनी "हिंदू कोड बिल" तयार केले. इ.स. 1947 पासून चार वर्ष रात्रंदिवस कष्ट करून त्यांनी हा स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिले कायदेमंत्री होते. त्यांनी 21 सप्टेंबर 1951 रोजी ते संसदेत मांडले संसदेत मांडले. परंतु भारतातील पुरुषप्रधान व सनातनी मनोवृत्तीच्या लोकप्रतिनिधींना स्त्रियांचे स्वातंत्र्य रुचले नाही. त्यांनी कडाडून विरोध केला. या बिलामुळे स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार होती. स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा व प्रतिष्ठा मिळावी हेच बाबासाहेबांचे स्वप्न होते. प्रारंभी या बिलाचे एकूण सात भाग करण्यात आले होते.

जसे:-

- ❖ स्त्रियांना मालमत्तेचा वडलोपार्जित अधिकार
- ❖ मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार
- ❖ पोरगी
- ❖ विवाह
- ❖ घटस्फोट
- ❖ दत्तक विधान
- ❖ अज्ञानत्व आणि पालकत्व इत्यादी

अशा प्रकारे भारतीय राज्यघटनेने जात, धर्म किंवा लिंगभेद यातील भेद अमान्य करून सर्व स्त्री-पुरूषांना समान दर्जा दिला आहे. मग स्त्रियांना समान दर्जा देणारे "हिंदू कोड बिल" का मान्य होऊ नये. परंतु लोकशाही विरोधी पुराणमतवादी वृत्तीमुळे ते बिल मंजूर झाले नाही. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकटे स्त्रियांच्या बाजूने कणखरपणे उभे राहिले. यासंदर्भात ते असे म्हणतात की, "समाजातल्या वर्गा-वर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता त्यांच्या अशीच कायम ठेवून, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे मंजूर करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजमहाल बांधल्यासारखे होय."

अखेर 27 सप्टेंबर 1951 ला स्वतंत्र भारताचा पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळातून महिलांच्या हक्कासाठी असलेले "हिंदू कोड बिल" पास न झाल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. थोडक्यात असे म्हणता येईल की, "बाबासाहेबांनी तत्त्वासाठी सत्ता सोडली आज लोक सत्तेसाठी तत्व सोडून देत आहे." स्त्रियांच्या हक्कासाठी राजीनामा देण्यातून बाबासाहेबांची तत्त्व निष्ठा तर कळतेच पण स्त्री मुक्तीबाबत असो अथवा स्त्री सक्षमतेबाबत असो ते किती आग्रही होते हेही स्पष्ट होते.

बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत. पुढे मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन इ.स. 1955 मध्ये हे बील वेगळ्या का स्वरुपात होईना मंजूर करण्यात आले. त्याचे चार भाग करण्यात आले ते असे,

- हिंदू विवाह कायदा
- हिंदू वारसा हक्क कायदा
- हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा
- हिंदू दत्तक व पोटगी कायदा इत्यादी

अशाप्रकारे अंशतः का होईना पण स्त्री स्वातंत्र्याचे बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले. या कायद्यामुळे भारतीय स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा मिळाला. ती आज एक व्यक्ती म्हणून समाजात स्वाभिमानाने जगण्यास पुढे येऊ शकत आहे. महात्मा फुले यांनी केलेले स्त्रीमुक्तीचे बीज आपल्या प्रज्ञाने व कर्तुत्वाने प्रचंड संघर्ष करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाढविले. हे त्यांचे कार्य केवळ भारतीय स्त्रियांच्या संदर्भात नव्हते तर एकूण मानवी जातीच्या दृष्टीने ऐतिहासिक आहे. असेच आपणास म्हणावे लागेल.

अशा प्रकारे वरील विवेचनातून असे स्पष्ट होते की, युगानुयुगे गुलामगिरीत खितपत पडलेल्या आणि अन्याय अत्याचारांना बळी पडत असलेल्या भारतीय महिलांना न्याय देण्यासाठी बाबासाहेबांनी केलेले अथक प्रयत्न फार महत्त्वाचे आहेत. भारतीय महिलांना आत्मसन्मान आणि आत्मविश्वास मिळवून देण्यासाठी त्यांनी बजावलेली भूमिका अत्यंत मोलाची ठरते. ते खऱ्या अर्थाने स्त्रियांचे उद्धार करते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत असत, "स्त्रियांच्या प्रगती वरून मी त्या समाजाचे मोजमाप करतो." असेच सांगणाऱ्या स्त्रियांना, समाजांच्या प्रगतीचा मानदंड मांडणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोठेपण हे त्यांच्या मूलगामी समाज चिंतनात आहे. तसेच काळाच्या पुढे जाऊन पाहण्याच्या त्यांच्या दृष्टेपणातही आहे. त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे सुटा प्रश्न

म्हणून कधीच पाहिले नाही. जातीग्रस्त समाजव्यवस्थेच्या विषम **उतरंडीत** त्यांनी त्यांची मुळे शोधली. त्यामुळे जातिव्यवस्थेचा विध्वंस करून संपूर्ण समाजव्यवस्थेची समतेच्या नवीन मानवी मूल्यावर उभारणी केल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत. हा विचार करून प्रत्यक्ष आचरणात आणला. आणि स्त्रियांना घटनात्मक संरक्षण देऊन एक 'स्वतंत्र मानव' म्हणून दर्जा प्राप्त करून दिला. म्हणूनच 21 व्या शतकातील प्रत्येक जाती धर्मातील स्त्री लेखाच्या सुरवातीचे गीत मुक्तपणे गात सक्षमपणे विविध क्षेत्रात आज पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून यशस्वीपणे कार्य करताना आढळून येत आहे. ही बाबासाहेबांची देण आहे. हे विसरता कामा नये. म्हणून बाबासाहेबांविषयी म्हणावेसे वाटते, "एखाद्या मनुष्याच्या आत्म्याचे अमरत्व आपण पाहू शकत नाही. पण या जगात जन्म घेऊन मरण पावल्यावर व्यक्तीच्या मूल्यांची आठवण म्हणून काही पिढ्यांपर्यंत काही राहील तरी खूप झालं. तेच त्या व्यक्तीचं अविनाशित्व म्हणता येईल. हे अविनाशित्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवलं आहे. हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते. त्यांनी मानवाच्या हक्का बरोबरच मानवाला मानवी जीवन जगत असताना एकूण चार पारमिता समजावून सांगितल्या त्या अशा:

- 1.प्रज्ञा:- विद्येबरोबर भगवान बुध्दांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपण.
- 2. शील:- सदाचाराने संपन्न असे मानवाचे वर्तन असावे.
- 3. करूणा:- सर्व मानव जाती संबंधी प्रेमभाव असावा.
- 4. मैत्री:- प्राणीमात्रांविषयी आत्मीयता असावी इ.

**संदर्भसूची:-**

1. डॉ. भीमराव आंबेडकर - प्रा खैरमोडे
2. आंबेडकर चळवळ - फडके
3. आंबेडकरांचे अंतकरण - गोखले
4. आंबेडकरांची भाषणे
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नेतृत्व - भगवान धांडे
6. डॉ. माईसाहेब (शरू) आंबेडकर - विजय शी गवारे
7. लोकराज्य (मासिक) एप्रिल 2017
8. शिक्षण संक्रमण (मासिक) मार्च 2012
9. सकाळ वर्तमान पत्रातील लेख.

# २०. यशवंतराव चव्हाण यांचे कृषिक्षेत्रातील योगदान

**डॉ. प्रवीण भास्करराव हाडे**
सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड जि. वाशीम
Email: - pravinhade81@gmail.com

प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्र एक महत्वपूर्ण क्षेत्र म्हणून ओळखले जाते. कृषीक्षेत्राच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न कृषीक्षेत्राचा वाटा अतिशय महत्वाचा राहिला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण अन्नधान्य उत्पादन २९१.९५ दशलक्ष टनापर्यंत राहिले असून ते २०१९- २०२० या चालू वर्षात मागीलवर्षी पेक्षा ६.७४ मेट्रिक टन अधिक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८.८४ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असल्याने ती लोकसंख्या प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या कृषीक्षेत्र व कृषीसंबधित उद्योगावर अवलंबून आहे. अन्नासाठी लोकांना कृषीवरच अवलंबून राहावे लागत असल्याने कृषीक्षेत्राकडे एक महत्वपूर्ण क्षेत्र म्हणून पहले जाते. पण भारतात स्वतंत्र मिळाल्या नंतरही पुढील काही वर्षे म्हणजेच १९५६ ते १९६६ या कालावधीत अमेरिकेकडून “गहू करार”अंतर्गत गहू आयात करून रेशनिंग व्यवस्था चालवावी लागत होती. भारतात १९७० च्या दरम्यान हरितक्रांती झाली. कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणत वाढ झाली. आज कृषी मध्ये शेतकर्यांच्या आत्महत्या एक अधिक गंभीर प्रश्न होत चाललेला आहे. तशेच गेल्या दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून दिल्ली येथे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नवीन कृषी कायदा २०२० कायद्याविरोधात शेतकऱ्यांचे ऐतिहासिक आंदोलन चालू आहे. या प्रश्नावर सरकार किती गंभीर आहे. त्या आंदोलनावर सरकारने काय पर्याय शोधला आहे. हे सर्व प्रश्न अजुनीही उनुत्तारी आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शेती आणि शेती व्यवसायाकडे एक राजकीय नेता म्हणून यशवंतराव चव्हाण कसे बघत होते. त्यांचा शेतीविषयक काय दृष्टिकोन होता, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. त्याचाच उहापोह या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

संशोधनाचा उद्देश :-

यशवंतराव चव्हाण यांचा जीवन परिचय करून देणे.

यशवंतराव चव्हाण यांच्या कृषिक्षेत्रातील योगदानाचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून, हे संशोधन दुय्यम सामग्रीवर आधारित आहे.

जीवन परिचय :-

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ मध्ये महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. तर मृतू २५ नोव्हेंबर १९८४ मध्ये झाला. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम केले होते. तर काही काळ ते भारताचे संरक्षणमंत्री सुद्धा होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. 'सर्वांगीण विकास' हा यशवंतराव यांचा परवलीचा शब्द होता. एका क्षेत्रामध्ये प्रगती झाली म्हणजे विकास होतो असे ते मानत नसत. सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती म्हणजे विकास अशी विकासाची ते व्याख्या करत. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. “युगांतर”, “सह्याद्रीचे वारे”, “कृष्णाकाठ”, “ऋणानुबंध” ही त्यांची साहित्यसंपदा आहे.

कोणत्याही प्रश्नांचा विचार करताना यशवंतराव अतिशय गांभीर्यपूर्वक आणि दूरदृष्टीने विचार करत असत. शेतीच्या प्रश्नांविषयी ते म्हणत असत की, शेतीचा प्रश्न हा रावणासारखा आहे. राम आणि रावणाच्या कथेतील रावण हा दहा तोंडाचा होता तर, आमच्या शेतीचा प्रश्न हा शंभर तोंडाचा आहे. जेथे पाहावे तेथे त्याला तोंड आहे. शेती विषयात त्यांना पूर्वी पासूनच खूप आवड होती. त्यामुळेच शेतीची रचना कशी असावी, शेतीची धारणा कशी असावी, शेतीमध्ये ज्या अवजारांचा उपयोग करावयाचा आहे त्याचे स्वरूप कसे असावे, शेतीला लागणारे भांडवल कोणत्या पद्धतीने घ्यावे, शेतीचा उपयोग कोणत्या कामासाठी करावा, शेतीवर आधारलेल्या धंद्यांचा उपयोग कसा करावा, त्याची बाजारपेठ कशी हस्तगत करावी असे शेती संबंधीचे हजारो प्रश्न आहेत, असे त्यांचे मत होते. ते प्रश्न्न सोडवण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असायचे. अशा व्यक्तिमत्वाचा आभ्यास करणे औत्सुक्याचे ठरेल.

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनाचा प्रवास तीन कालखंडात सहजपणे विभागला जाऊ शकतो. त्यातला पहिला कालखंड स्थूलमानाने १९३० ते १९४५ असा धरता येतो. या काळात स्वतंत्र लढ्यातील या प्रत्यक्ष सहभागाबरोबरच त्यांच्या राजकीय आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांसंबंधी च्या विचारांची जडणघडण झाली आणि त्यांच्या भविष्यकाळातील कर्तृत्वाचा आराखडा या जडणघडणीच्या पायावर उभा राहिला. या काळातील स्वतंत्र लढ्यातील त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. दुसरा कालखंड हा तसाच स्थूलमानाने १९४५ ते १९६५ असा धरला. तर या काळात त्यांच्यावर अनेक क्षेत्रात अनेक महत्त्वाची धोरणे ठरविण्याची निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी घेऊन त्यांनी अत्यंत चोखपणे पार पडल्याचे चित्र दिसते. त्यामुळे त्यांच्या अनेक निर्णयांचा त्यांच्या मागचा उद्देश यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने हा काळ अत्यंत महत्वाचा आहे. या काळात त्यांनी अनेक धोरणावर काम केले. अनेक निर्णय घेतले त्याचे फळ पुढच्या काळात दिसून येतेत. आधुनिक महाराष्ट्राची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम त्यांनी याच काळात केल्याचे दिसून येते. तिसरा कालखंड म्हणजे साधारण १९६५ ते १९८४ हा या काळातील त्यांच्या अनेक निर्णयावर टीका केली जाते. टीकाकारांच्या मते त्यांच्या या काळातील निर्णय हे गोंधळलेले वाटतात. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचा खरा अभ्यास करायचा असल्यास तो पहिल्या आणि दुसऱ्या कालखंडातच केला जाऊ शकतो. महाराष्ट्रात १९५६ ते १९६२ या त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत जे निर्णय घेतले त्यातूनच महाराष्ट्राच्या विकासाचा एक आकृतीबंध तयार झाला. महाराष्ट्र राज्यात मुंबई वगळता उद्योगाचा विकास झाला नव्हता. पश्चिम महाराष्ट्र वगळता मराठवाडा-विदर्भात शेतीचा विकास झाला नव्हता. मराठी समाज त्यांच्या उद्योगधंद्यातील व व्यापारातील सहभागाबद्दल प्रसिद्ध नव्हता. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या विकासासंबंधी यशवंतराव चव्हाण यांनी काही धोरणात्मक निर्णय घेतले. त्यातूनच आधुनिक महाराष्ट्राचा आकृतीबंध तयार झाला. त्यांनी अनेक विषयावर काम केले, पण त्यांचा आवडीचा विषय होता शेती आणि म्हणूनच शेती संदर्भातील त्यांचे योगदान अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

कृषिक्षेत्रातील योगदान :-

शेतीचा प्रश्न हा या देशातील मूलभूत असा प्रश्न आहे आणि तो आजच्या आधुनिक काळात अधिकच ज्वलंत झाला आहे. इतर क्षेत्रातील उत्पादन आणि शेतीमधील उत्पादन या मध्ये मूलभूत असा फरक आहे. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन हे केंद्रभूत स्वरूपाचे तर, शेतीचे उत्पादन हे विकेंद्रित स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या उत्पादनाच्या आघाडीवर सतत लढाई चालू ठेवावी लागते.

महाराष्ट्रातील शेती उत्पादन व्यवस्थेत असलेला समाज शिक्षण व शेती - उद्योगांमार्फत महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत आणणे हे यशवंतराव चव्हाण यांचे ध्येय होते. महाराष्ट्रातील शेती व्यवस्थेतील जलसिंचनाचा मर्यादा व जमीन फेरवाटपाच्या मर्यादा लक्षात घेऊन शेतीवर आधारित उद्योगांचा विकास करणे, ग्रामीण व शहरी भेद कमी करणे हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत धोरणाचा रुपाने आलेला आहे.

ग्रामीण भागातील शेती क्षेत्राच्या मर्यादा लक्षात घेऊन छोट्या उद्योगात मराठी समाजाने प्रवेश करावा, ही भूमिका यशवंतराव यांची होती. ग्रामीण भागातील शेतमजूर पुन्हा शेती क्षेत्राकडे वळविण्यासाठी कमाल जमीन मालकीवर मर्यादा याचा फारसा उपयोग नसल्याने शेती क्षेत्रावरील भार कमी करण्यासाठी उद्योग वाढीला प्रोत्साहन देऊन. त्या माध्यमातून शेती विकास करण्याचे ध्येय यशवंतराव चव्हाण यांचे होते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून उद्योगवाढीवर भर असल्याने व शेती क्षेत्रातील गुंतवणूक काही प्रमाणात कमी झाली. तरीही कृषी आणि उद्योगाच्या वाढीमुळे महाराष्ट्राचा फायदा झाला. १९६० पासून आजपर्यंत भारताच्या सकल उत्पादनात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्रातील नागरिकांचे per capita income हे १९६० पासून भारताच्या सरासरीपेक्षा जास्त राहिले. महाराष्ट्र अंतर्गत पश्चिम महाराष्ट्रात ते महाराष्ट्र सरासरीपेक्षा जास्त राहिले. याचे श्रेय उद्योग व कृषी उद्योग यांना जाते. याचे नियोजन १९६० पासून च्या धोरणात्मक निर्णयात आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी जातींना १९९० पर्यंत उद्योग क्षेत्रात तांत्रिक कौशल्य असणारे कामगार यांना संधी उपलब्ध झाल्या तर १९९० नंतर तृतीय सेवा क्षेत्रात प्रचंड संधी याच काळात क्षेत्रातील व्यावसायिक गटात त्यांची उद्योजकता विकसित झाली. जलसिंचन सुविधा असणाऱ्या शेती क्षेत्रातील विकासामुळे ही शक्य झाले. गाव व शहर हा भेद देखील कमी झाला याबद्दल यशवंतराव चव्हाण विशेष आग्रही होते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पन्नास वर्षांनी सधन शेतीचा हा भौगोलिक विभाग महाराष्ट्र शासनाने औद्योगिक पट्टा जाहीर केला. त्यात पुढील काळात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक झाली तर त्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांनाच जाईल.

यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. म्हणून विकास योजना आखताना अविकसित विभागांचा आधी विचार केला पाहिजे. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. त्यामध्ये गुंतलेला वर्ग हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल समजला जातो. ग्रामीण औद्योगिकीकरणाबाबत ते म्हणतात की, ग्रामीण भागात उद्योग सुरु करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली जावी. ज्यामुळे ग्रामीण भागात विखुरलेल्या शेतकऱ्याला शेतीसोबतच जोडधंदा करून आपल्या उत्पन्नात वाढ

करता येईल. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविता येईल. औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्त्वपूर्ण आहे. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लानची कल्पना मांडून शेतीवर आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी नेहेमी प्रयत्नशील होते. अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. याशिवाय, राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी ते सहकाराचा पुरस्कार करतात. भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या विकासासाठी सहकारी तत्वे फार उपयुक्त ठरेल असा त्यांचा ठाम विश्वास होता.

यशवंतराव चव्हाण यांनी कृषिविषयक विचार मांडताना शेतीच्या मालकीहक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठी उपाय यावर अधिक भर दिला. त्यांच्या मते, जमीन कसणारा शेतजमिनीचा मालक असावा. तो त्या जमिनीचा मालक झाल्यास तो आपल्या जमीन कसण्याच्या पद्धतीत यशस्वी बदल करून शेतीच्या उत्पादकतेत निश्चितच वाढ होईल. यासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले. यशवंतरावांनी सामाजिक क्षमता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहीनांची संख्या अधिक आहे. म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीचा एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी. या जमिनीचा वापर भूमिहीनांना वाटप करणे. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्वाने केली पाहिजे. त्यामध्ये नगदी पिकाची लागवड करून शेती क्षेत्राने आधुनिकतेची कास धरावी यासाठी ते नेहेमी प्रयत्नशील होते. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. या सर्व बाबी मधून शेती विकासाबद्दलची व भूमिहीन लोकांबाद्दलाची  त्यांची तळमळ व धोरणाची जान दिसून येतात.

शेती आणि शिक्षणाचा, प्रशिक्षणाचा जवळचा संबंध आहे. शेतकऱ्याला शिक्षणाची नितांत गरज आहे असे आजही आपण मानत नाही. पण  शिक्षण विषयक धोरणाबाबत यशवंतराव चव्हाण आग्रही राहिले. १९५६ मध्ये द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर मंत्रिमंडळात विरोध होऊनही मोफत शिक्षणाचे धोरण त्यांनी अमलात आणले. सर्वसामान्यांना शिक्षणाची दारे उघडून दिली शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांना माहित होते. म्हणून शिक्षणावर भर दिला. शिक्षणासाठी अनुदाने, इंग्रजी भाषेचा अभ्यासक्रमात समावेश, तांत्रिक शिक्षण, महाविद्यालय यांना अनुदाने, मराठवाडा (आत्ताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) व कोल्हापूर विद्यापीठ यांची

(शिवाजी विद्यापीठाची) स्थापना केली. विद्यापीठाची स्थापना यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला. राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतही संकल्पनात्मक सहभाग यशवंतरावांनी नोंदवला. शिक्षण व प्रशिक्षणाची सोय झाल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले. ग्रामीण शेती व्यवस्थेत फारशी संधी नसलेल्या गटांना शिक्षणामुळे विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या. शिक्षणाचा प्रसार वाढू लागला तशी शेतीवरील अवलंबून राहणे कमी झाले. ग्रामीण भागात शेती उद्योगातील संधी उपलब्ध झाल्या. शेतकरी आणि शेती संबंधित असणारा मनुष्य हा शहाणा झाल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून शेतीचे ज्ञान पावसाच्या पाण्यासारखे सर्वत्र गेले पाहिजे. वाहणारी नदी ज्या गावच्या काठाने जाते त्या त्या गावालाच फक्त पाणी मिळते पण पावसाचे पाणी हे सगळीकडे जाते. म्हणून पावसाच्या पाण्यासारखे शेतीचे ज्ञान सगळीकडे पसरले पाहिजे, वाढले पाहिजे आणि विविध महाविद्यालयात त्याची केंद्रे झाली पाहिजेत असा त्यांचा प्रयत्न होता.

१९३० पासून महाराष्ट्रात सहकारी क्षेत्राचा विकास होऊ लागला. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील समाजवादी विचारांच्या प्रभावामुळे सहकारी क्षेत्राचा विकास हा महाराष्ट्राच्या धोरणाचा मुख्य भाग राहिला. सहकार क्षेत्रामुळे अनेक वेगवेगळे लोक एकत्र येऊन एकमेकास मदत केल्या जात असल्यामुळे सहकाराची भावना वाढीस लागते. आणि त्यामुळेच एकमेकाच्या विकासात वाढ होते. यशवंतराव चव्हाण यांच्या काळात सहकारी साखर उद्योगाचा विकास झाला. राष्ट्रीय पातळीवर भांडवली चौकट स्वीकारून कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता सहकारी क्षेत्रातील ग्रामीण भागात शेती उद्योगांचा विकास व उद्योजक मराठी समाज या दोन्ही बाबी त्यांना साध्य करता आल्या. अनेकांना सहकारामुळे ग्रामीण भागात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या ग्रामीण भागाच्या विकासात वाढ झाली. उद्योगातील नफा केंद्रीकरणाला त्यांचा विरोध असल्याने नफा वाटपात संस्थात्मक निर्णय नियंत्रण व ग्रामीण भागात उद्योगाचा विकास या दोन्ही गोष्टी त्यांना एकत्रितपणे सहकारी क्षेत्राचा विकासातून साध्य करता आल्या. सहकारी साखर उद्योग, सहकारी दुग्ध संस्था या शेतमालाची संबंधित संस्था या उद्योगांना पतपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था व बँका, शेतमालाचा व्यापारात शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी मार्केट कमिटी या संबंधित कायदे करण्यात आले. यामुळे शेतकर्यांना आपला माल योग्य भावात विकता आला. याच काळात यशवंतराव चव्हाण यांच्या काळात १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना करण्यात आली. या सहकारी क्षेत्राच्या विकासामुळे ग्रामीण भागाचा विकास व शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग

यामुळे उद्योजकतेचा विकास झाला. सहकार क्षेत्रामध्ये नफा वाटपाचे केंद्रीकरण झालेले नाही. सर्व घटकांचा विकास झाला ग्रामीण भागाचे मागासलेपण दूर झाले. यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली.

सारांश :-

कोणतेही शास्त्रात काळानुसार बदल होत असतात. जगातील ज्ञान वाढते आहे या वाढत्या ज्ञानाचा परिणाम शेतीच्या ज्ञानावर आणि विज्ञानावर होत आहे. कृषीक्षेत्राने आज कात टाकून जागतिकीकरणाच्या पटलावर स्पर्धात्मक शक्ती स्वीकारणे काळाची गरज झाली आहे. म्हणून शास्त्रीय ज्ञानाची गरज इतर क्षेत्राबरोबरच शेतीला अधिक आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करण्याचे दिवस कधीच संपलेले आहेत या देशातील जास्तीत जास्त लोक शेतीमध्येच काम करत असल्याने. दोन एकरात शेतीचे काम करणारा शेतकरी आपल्या कामामध्ये पराभूत झाला तर, तो देशाचा पराभव होतो असे यशवंतराव चव्हाणांचे मत होते.

नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषीशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, अशा अनेक विकासात्मक विचारातून आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती करण्यात यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता. आज नवीन कृषी कायदा २०२०च्या संदर्भात लहान शेतकऱ्याच्या दुष्टीने काही बदल करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराची आवशकता आहे. एक राजनेता म्हणून जी दुष्टी यशवंतराव चव्हाणां कडे होती, ती आत्मियता आज बघायला मिळत नाही. खऱ्या अर्थाने यशवंतराव चव्हाण यांचे कृषिक्षेत्रातील योगदान निश्चीत प्रेरणादायी आहे. आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतीय शेती क्षेत्राच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराची आवशकता आहे.

संदर्भ :-

1. नितीन बिरमल, कृषी- ओद्योगिक विकासाचा आकृतिबंध आणि सद्यस्थिती, समाज प्रबोधन पत्रिका, जाने – मार्च २०१३.
2. खतीफ ए.के., भारतीय कृषीच्या समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
3. जोशी रामभाऊ, यशवंतराव चव्हाण इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन, पुणे, वर्ष १९७६.
4. यशवंतराव चव्हाण, कृष्णाकाठ, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९८४.
5. यशवंतराव चव्हाण, सह्याद्रीचे वारे, भाषण संग्रह, मुंबई, महाराष्ट्र शासन, प्रसिद्धी विभाग २६ जाने १९६२.

# २१. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार

**प्रा. सुधीर ना. देशमुख**
श्रीमती पी. डी. पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी ता. जि. अकोला

**प्रस्तावना**

शेतकरी हा भारतीय समाजातील सर्वात महत्वपुर्ण असा उत्पादक गट. त्यांच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तूंच्या आधारे समाजाचे व्यवहार चालतात. समाजाचे पोषण करणारा हा वर्ग पण त्यांच्या वाटणीला आलेले आहे ते चिरंतन दारिद्रय. हया गोष्ट सामाजिक वास्तविकतेचा अचून वेध घेणाऱ्या भाऊसाहेबांच्या नजरेतून सुटू शकल्या नाहीत आणि सुटणे शक्यही नव्हते. कारण अशाच नाडल्या गेलेल्या शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला होता. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक व फसवणूक त्यांनी अनुभवली होती. त्या परिस्थितीचे चटके सोशितच त्यांनी शिक्षण घेतलेले होते. शेतकऱ्यांच्या दारिद्रयाच्या कारणांवर त्यांनी नेमके बोट ठेवले.

लोकसंख्येचा व्यवसायावर पडणारा वाढता भार.

१. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्यांची इतरांकडून होणारी आर्थिक पिळवणूक व फसवणूक.

२. शेती पध्दतीचे मागासलेपण आणि वाईट स्थिती.

ब्रिटिशांपूर्वीच्या सरंजामी शासन व्यवस्थेत बादशहा, राजेरजवाडे हयांच्या लष्करामध्ये शेतकऱ्यांच्या कुटुंबातील लक्षावधी लोकांना चाकरी मिळे. पण ब्रिटीशांच्या काळात हे राजेरजवाडे व त्यांच्या तैनातीत असलेली सैन्यदल नाहीशी झाली. लष्करातील नोकरी सुटलेले असंख्य लोक शेतीवर गुजराण करण्यासाठी पुन्हा परत आले. परिणामी शेतीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नातील वाटेकरी वाढले व त्याचबरोबर शेतकऱ्यांचे दारिद्रयही वाढले.

**उद्देश :**

१. डॉ पंजाबराव देशमुख यांच्या कृषी विषयक विचारांचे अध्ययन करणे.

२. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचे कृषी आणि शेतकरी विकासासंबंधी कार्य अभ्यासणे.

३. डॉ पंजाबराव देशमुख यांनी दिलेल्या कृषी विषयक योगदान अभ्यासणे.

४. डॉ पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची सध्या स्थितीत उपयुक्तता अभ्यासने.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताअंतर्गत डॉ पंजाबराव देशमुख यांचे कृषी विचार, संदर्भ ग्रंथ व पुस्तकांचा तथ्य संकलनासाठी वापर करण्यात आला आहे.

**ब्रिटीशकाळ :**

विदर्भ, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रपंचाचा खरा आधार म्हणजे कापसाचे उत्पादन. पण सतत कापसाचे भाव पाडून मिल मालक, व्यापारी व त्यांच्या हितसंबंधीयांनी शेतकऱ्यांची फार मोठया प्रमाणात लुट केली. कल्याणकारी राज्याची कल्पना निश्चितच भाऊसाहेबांच्या मनात होती. कल्याणकारी शासनाला अभिप्रेत असणारी आर्थिक व्यवस्था त्यांना हवी होती. आर्थिक समता प्रस्थापित करायची असेल तर त्या ठिकाणच्या शेतीचे आधुनिकीकरण झाले पाहिजे. अशाप्रकारे शेतकरी व श्रमजीवी लोकांना दैन्य व दारिद्रयापासून मुक्त केले पाहिजे. कारण भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या पाठीचा कणा हा शेतकरी व कष्टकरी वर्गच आहे. ना. शामसुंदर मुश्रान म्हणतात — ‘‘किसानांच्या निर्जीव शरीरात भाऊसाहेबांनी जणू प्राण ओतला. आज किसान समजू लागलेत की आपण दुर्बल, असहाय अथवा नेतृत्वविहीन नाही’’.

**शोषणमुक्त कृषक :**

व्यापाऱ्यांच्या शोषणातून कृषक मुक्त व्हावा एवढ्यापुरते त्यांचे क्षेत्र मर्यादित नव्हते. त्यांना नव्या जाणिवा पचविलेला नवा कृषक निर्माण करायचा होता. कृषी क्षेत्रात त्यांना आमूलाग्र परिवर्तन अपेक्षित होते. शेतकऱ्यांची प्रगती कोणत्या मार्गाने होऊ शकेल ह्याचाच त्यांना ध्यास लागला होता. म्हणून सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी यासाठी त्यांनी १९३३ मध्ये कर्ज लवाद कायदा आणला. ह्या कायद्यामुळे आज विदर्भातील शेतकऱ्यांजवळ शेती दिसते आहे, नाही तर बिहारप्रमाणेच विदर्भाची स्थिती झाली असती. तिथे ज्याप्रमाणे जमीनदार व खडकरी वर्ग असे दोनच वर्ग दिसतात. तीच परिस्थिती विदर्भात भाऊसाहेबांच्या जागरूकतेमुळे होण्याचे टळले.

**कृषकक्रांती :**

कृषकक्रांती करणे म्हणजे एका नव्या अर्थव्यवस्थेची, समाजव्यवस्थेची आणि मूल्यव्यवस्थेची उभारणी करणे होय आणि हेच ध्येय समोर ठेवून त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. त्यांनी शासकांना, शासनाला व समाजाला कृषकांचा अभ्यास करायला प्रवृत्त केले. भारतीय कृषक म्हणजे या राष्ट्राचा मानबिंदू व अस्मिता. या शेतकऱ्यांनीच भारताला समृध्दी दिली. शेतकऱ्यांच्या कष्टाविना राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही, टिकू शकत नाही आणि नेमकी हीच गोष्ट राज्यकर्ते विसरले.

**कृषी शिक्षण :**

‘‘माझा शेतकरी विज्ञानवादी कसा होईल? इतर देशातील शेतकऱ्यांशी तो बरोबरी केव्हा करू शकेल ह्याची डॉ. भाऊसाहेबांना सतत तळमळ होती. आपल्या देशाच्या संपूर्ण विकास मंदिराचा पाया शेती हात आहे आणि शेतीची म्हणजे धनधान्याची समृध्दी नव्हे तर भारताच्या अर्थकारणाची, औद्योगिक जीवनाची किंबहुना

संपूर्ण समाजजीवनाची बैठक कृषी विकासावर अवलंबुन आहे हे गृहीत धरून विद्यालय व महाविद्यालयात कृषी शिक्षण व्यापक प्रमाणात दिले गेले पाहिजे असा भाऊसाहेबांचा आग्रह होता. कृषी शिक्षणाला प्रात्यक्षिक कषी शिक्षणाचा उपयोग होऊ शकेल अशी त्याची धारणा होती.

**कृषी शिक्षणक्रांती :**

कृषी शिक्षणात क्रांती झाली पाहिजे म्हणून कृषी विद्यापीठाचे स्वप्न भाऊसाहेबांच्या हयातीत जरी पूर्ण झाले नसले तरी आज ते पूर्ण झाले आहे. आजची कृषी विद्यापीठे कृषिवलांना विज्ञानवादी दृष्टी देण्याचे भाऊसाहेबांचे ध्येय खऱ्या अर्थाने पूर्ण करू शकतील अशी आशा करायला हरकत नाही. प्रजा समाजवादी खासदार श्री नारायण गोरे म्हणतात — ''भाऊसाहेबांनी शिक्षण कार्य केले नसते तर आज काही क्षेत्रात कार्य करणारी, चमकणारी नवी पिढी दिली नसती. ती तयार करण्याचे महान कार्य डॉ. देशमुखाचे आहे. ते भारतातील शेतकऱ्यांचे खरे मार्गदर्शक व मित्र आहेत.

**शेतकऱ्यांची स्थिती :**

भारतात दर दहा लोकांमधील सात लोक उपजिवीकेकरिता पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहेत. राष्ट्रीय उत्पन्नापैकी निम्मे उत्पादन शेती व पशुपालन आणि कृषी संबंधित व्यवसायातून मिळते. असे असतांनाही शेती हा अत्यंत विस्कळीत व असंघटित व्यवसाय झालेला आहे. शेती ही शेतकऱ्यांच्या श्रमावर अवलंबून असूनही नेहमी लहरी निसर्ग व अनिश्चित परिस्थिती याचाही त्याला फटका बसतो. शेतकरी कष्ट करतो, उन्हात, पावसात राबतो, घाम गाळतो, पण त्याने केलेला श्रमाचे फळ त्याला मिळत नाही, दुसरेच भांडवलाच्या जोरावर त्याचे, त्यांच्या कुटुंबाचे शोषण करतात. पिढ्यानपिढ्या भारतीय शेतकरी कर्जात बुडालेला असतो, या शेतकऱ्यांच्या विदारक जीवनाच्या बाबी भाऊसाहेबांनी हेरल्या होत्या.

**भारत कृषक सामाजाची स्थापना :**

इ.सन १९४८ ते १९५१ या काळात डॉ. पंजाबरावांना अमेरिका व युरोप खंडात प्रवास करण्याची संधी मिळाली होती. त्यांनी तेथील कृषी संघटनांच्या कार्याचे बारकाईने निरीक्षण केले व राष्ट्राचा सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनात या संघटना किती प्रभावी कार्य करू शकतात, शेतकऱ्यांना आर्थिक सुस्थिती प्राप्त करून देण्यासाठी या संघटनांचा किती उपयोग होऊ शकतो, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले होते. भारताला अशा एका सामाज संघटनेची किंवा संस्थेची गरज आहे. जी शेतकऱ्यांचा विचार व दृष्टिकोन व्यक्त करू शकेल आणि भविष्यातही ही संस्था कार्य करू शकेल.

**भारत कृषक समाजाचे योगदान :**

इ.स. १९५५ मध्ये संपूर्ण शेतकरी समाजाच्या उन्तीकरिता भारत कृषक समाज ही राष्ट्रीय संघटना डॉ. पंजाबरावांनी स्थापन केली. शेतकऱ्यांना स्वतंत्र व हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. सुरूवातीला केंद्रीय कृषी मंत्रालयाने या संघटनेला सर्व प्रकारची आर्थिक मदत दिली व इतर आवश्यक ते सहकार्य केले. चार—पाच वर्षातच कृषक समाज आर्थिक पायावर सुस्थिर झाला व लवकरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संस्थेच्या शाखांची स्थापना केली. कृषक समाजाच्या स्थापनेपासून तीन वर्षाच्या अल्पावधित देशातील सर्व राज्यात शाखा उघडल्या गेल्या.

**निष्कर्ष :**

डॉ. पंजाबराव देशमुखांनी जनतेच्या हितासाठी ज्याप्रमाणे कायदे केले त्याचप्रमाणे अन्यायी कायद्यापासून, आदेशापासून जनतेचे रक्षणही केले. शेतकऱ्यांच्या हिताला अखंड जपणे हा डॉ. पंजाबरावांचा खास पिंड होता. आपल्या ज्ञानाचा त्यांनी समाजाला पूर्णपणे उपयोग करून दिला. व्यापाऱ्यांच्या शोषणातून कृषक मुक्त व्हावा एवढ्यापुरते त्यांचे क्षेत्र मर्यादीत नव्हते तर त्यांना नवा कृषक निर्माण करावयाचा होता. शेतकऱ्यांची सावकाराच्या पाशातून सुटका व्हावी यासाठी त्यांनी कर्जलवाद कायदा आणला. भाऊसाहेबांनी कृषी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यासाठी त्यांनी कृषी शाळा व कृषी महाविद्यालये स्थापन केली. आर्थिक समता प्रस्थापित करायची असेल तर त्या ठिकाणच्या शेतीचे आधुनिकीकरण झाले पाहिजे. भारताचा शेतकरी विज्ञानवादी बनला पाहिजे. भाऊसाहेबांनी शिक्षण कार्य केले नसते तर आज काही क्षेत्रात कार्य करणारी, चमकणारी नवी पिढी दिसली नसती. ती तयार करण्याचे महान कार्य डॉ. देशमुखांचे आहे. ते भारतातील शेतकऱ्यांचे खरे मार्गदर्शक व मित्र आहेत. शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यात सुसंवाद घडविण्याचे काम भाऊसाहेबांनी केले. डॉ. पंजाबराव म्हणाले ‘भारतीय कृषी व कृषक ह्याबद्दल मला नितांत आदर वाटतो. मी शेतकऱ्याला सर्वश्रेष्ठ धननिर्माता समजतो. शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता इतर पुरक उद्योगही करावेत असे डॉ. पंजावरावांचे नेहमीच सांगणे असे. अशाप्रकारे त्यांना शेतकऱ्यांच्या हिताची कामे केलीत.

**संदर्भ सूची :**

१. समाज प्रवर्तक डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. पुष्पा किन्हीकर, प्रकाशक विसा बुक्स, अंबाझरी नागपूर ३३, आवृत्ती पहिली २००८.
२. राष्ट्रनिर्माते, प्रा.मा.म.देशमुख, शिवभारती प्रकाशन, कोतवालनगर, नागपूर २२.

# २२. कौटिल्याचे अर्थशास्त्र

**डॉ. जयश्री दिघे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय राहता.
ता.राहता जि. अहमदनगर.
Mobile no. 8379966808,
Email. jaydighe122@gmail.com

---

म्लेच्छैरुद्वेज्यमाना भुजयुगमधुना संश्रिता राजमूर्ते :
सा श्रीमद्बन्धुभृत्यश्चिरमवतु महीं पार्थिवश्चन्द्रगुप्त: ॥

- मुद्राराक्षस

विशाखादत्त याने "मुद्राराक्षस" या संस्कृत नाटकात नंदवंशाचा नाश करून आणि चंद्रगुप्त मौर्य याने मौर्यसाम्राज्याची स्थापना केली असे वर्णन केले आहे.

एका दंतकथेनुसार पुष्पपूर या नगरात मगध सम्राट धनानंदाने कौटिल्याला श्राद्धाच्या वेळी दरबारात बोलवून त्याला हाकलावून लावले व त्याचा अपमान केला. आणि चाणक्याने नंदकुळाचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली. चंद्रगुप्त आणि चाणक्य यांनी एकत्र येवून नंदाच्या मगध राज्यावर हल्ला करून विजय मिळवला व मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

कौटिल्य उर्फ आर्य चाणक्य परिचय:

'इ.स.न.पूर्व ४था शतकात तकक्षिला येथे एका ब्राम्हण कुटुंबात कौटिल्य उर्फ आर्य चाणक्याचा जन्म झाला. कौटिल्य याचे मूळनाव विष्णुगुप्त होते. चंद्रगुप्ताचा प्रधान मंत्री कौटिल्य उर्फ आर्य चाणक्य याने मौर्यकाळात अर्थशास्त्र हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला. चाणक्याचा अर्थशास्त्रावरील हा ग्रंथ "कौटिलीय अर्थशास्त्र" या नावाने प्रसिध्द आहे."

चाणक्याने आपल्या "कौटिलीय अर्थशास्त्र" या ग्रंथात राजाची कर्तव्य सांगितली आहेत. तसेच प्रशासन व्यवस्था कशी असावी याचे विस्तृत वर्णन केले आहे.

### कौटिलीय अर्थशास्त्राची संहिता:

कौटिलीय अर्थशास्त्रा हा ग्रंथ एकूण पंधरा भागात विभागलेला आसून हे पंधराभाग एकशेऐंशी उपभागात विभागलेले आहेत. आपल्या ग्रंथात कौटिल्याने सहा हजार श्लोकांच्या सहाय्याने प्राचीन आचार्यांच्या अर्थशास्त्र विषयक ग्रंथाचा अभ्यास करून प्रशासकीय, सामाजिक, धार्मिक स्थितीचे वर्णन केले आहे. कौटिल्याने आपल्या ग्रंथाच्या गद्यभागाच्या शेवटी त्याचा सारांश वर्णन करणारा श्लोक लिहिला आहे.

### कौटिलीय अर्थशास्त्राची प्रकरणे:

#### प्रकरण क्र. १.विनयाधिकार:

चाणक्याने आपल्या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात अमत्य, मंत्री आणि पुरोहित यांची नियुक्ती कशी करावयाची, योग्य व्यक्तीची नियुक्ती होण्यासाठी त्यांची परीक्षा कशी घ्यावयाची तसेच गुप्तविचार, राजकुमारांचे शिक्षण, रक्षण, कर्तव्य याचे वर्णन केले आहे.

#### प्रकरण क्र. २. अध्यक्षप्रचार:

चाणक्याने आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात राज्यकर्ता कसा असावा याचे वर्णन केले आहे. शासनसंस्थेतील प्रमुख म्हणजेच राजा किंवा राज्यकर्त्याची कर्तव्य, प्रशासनाचे विविध विभाग, किल्ले आणि किल्ल्याची उभारणी करणे, खनिज उत्पादन उदयोगांचे संचालन करणे. व्यवहारातील वजने-मापे यांचे वर्णन या विभागात दिले आहे. प्रशासनातील राज्य संरक्षणार्थ सेनापतीची कार्य, गुप्तहेर मंडळ, त्यांच्या योजना या विषयी विस्तृत माहिती दिलेली आहे.

#### प्रकरण क्र.३. धर्मस्थीय:

धर्मस्थीय या प्रकरणात चाणक्याने कायद्याचे वर्णन केले आहे. वाद, खटले, त्यांचे निर्णय या बाबाद माहिती दिली आहे. राज्यात विवाहसंस्थे विषयी नियम काय असावेत, त्याच बरोबर श्रम भांडवल या उत्पादन साधनांचा वापर कसा करावा. या वर प्रकाशटाकला आहे.

#### प्रकरण क्र. ४. कंटकशोधन:

या प्रकरणात राज्याच्या अंतर्गत शांतता व सुव्यवस्थेसाठी पोलीस यंत्रणा कशी असावी याचे वर्णन केले आहे. राज्यातील कारागीरवर्ग, व्यापारीवर्ग यांचे रक्षण कसे करावे. गुंड प्रवृत्तीच्या अत्याचारी लोकांचे नियमन कसे करावे. गुन्ह्यासाठी कोणत्या शिक्षा द्याव्यात या बाबाद चाणक्याने नियमावली स्पष्ट केली आहे.

प्रकरण क्र. ५. योगवृत्त:

चाणक्याने ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणात राजाविषयी सेवकांच्या कर्तव्याविषयी माहिती दिली आहे तसेच प्रशासनाचा विश्वासघात करणाऱ्या सेवकांना कोणती शिक्षा व दंड द्यावा हे सांगितले आहे.

प्रकरण क्र. ६. मंडलयोनी:

मंडलयोनी या प्रकरणात आपल्या शत्रुबरोबर राज्याने कसे संबंध निर्माण करावेत. शत्रूला वश कसे करावे व त्यासाठी वापरावयाचे उपाय सांगितले आहेत. तसेच शांती, उद्योग, सुव्यवस्था या बाबाद माहिती दिली आहे.

प्रकरण क्र ७. षाडगुण्य:

सातव्या प्रकरणात चाणक्याने कार्याचे सहा प्रकार सांगितले आहेत. राजाच्या सहा गुणाचा योग्य काळी योग्य प्रकारे अवलंब करणे. आपले कर्तव्य करताना संधी(तह), युद्ध, चढाई, चढाई न करता स्वस्थ राहणे तसेच एकाशी लढाई आणि दुसऱ्याशी तह, वेळ प्रसंगी बलवान राजाचा आश्रय घेणे या नीतीचा वापर करावा.

प्रकरण क्र. ८ व्यासानाधीकारिक:

ग्रंथाच्या या प्रकरणात राज्याच्या दुर्गुणाचे वर्णन सांगितले आहे. या माध्यामातून राज्यावर आलेल्या आपत्तीचे कारणे शोधणे व त्यावर उपाय योजने याचे वर्णन केले आहे.

प्रकरण क्र. ९ अभियास्यात कर्म:

अभियास्यात कर्म या प्रकरणात चाणक्याने युद्ध तयारीचे विवेचन केले आहे.

प्रकरण क्र. १० संग्रमिक:

प्रस्तुत प्रकरणात चाणक्याने प्रत्यक्ष युद्धभूमी वरील व्यूहरचना कशी असावी, युद्धाची तयारी, सैन्यतळ, युद्धनीती इत्यादीचे वर्णन केले आहे.

प्रकरण क्र.११. संघवृत्त:

ग्रंथाच्या या भागात चाणक्याने भेदनीती आणि कुटनीती याचा वापर राज्याच्या सार्वभैमत्वा साठी कशा रीतीने करावा याचे वर्णन केले आहे. चाणक्याने गणराज्याचे विलीनीकरण करून एकछत्री राज्याची निर्मिती केले. या राज्यात दोष निर्माण होऊ नये यासाठी चाणक्याने भेदनीती आणि कुटनीती याचा वापर करुन राज्याचे सार्वभैमत्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगितले आहे.

प्रकरण क्र.१२. अवलीयास:

सदर प्रकरणात दुर्बल राजाच्या राज्यनीतीचे वर्णन केले आहे. दुर्बल राजाने आपल्या राज्याचे संरक्षण करण्यासाठी युद्धनीती कशी वापरावी हे सांगितले आहे.

प्रकरण क्र.१३. दुर्गलंभोपाय:

ग्रंथाच्या या भागात सैन्याने घेरलेल्या नगरावर ताबा मिळवून, तसेच शत्रुच्या किल्याचा ताबा मिळवून राज्यात सुव्यवस्था कशी निर्माण करावी याचे मार्गदर्शन केले आहे.

प्रकरण क्र.१४. औपानिषदिक:

या प्रकरणात युद्धनीतीचा एक भाग म्हणून विषप्रयोगाचे विविध वापर व विषप्रयोगा पासून स्वसंरक्षणासाठी कोणते उपाय करावेत हे सांगितले आहे. विष उत्पादन, विषावरील औषधे याचीही माहिती दिली आहे.

प्रकरण क्र.१५. तंत्रयुक्ती:

पंधराव्या प्रकरणात अर्थशास्त्राचा अर्थ, बत्तीस युक्तीची नावे व अर्थ दिला आहे. कौटिल्याने आपल्या ग्रंथात राज्यसंस्थेचे राजा, मंत्री, देश, किल्ले, निधी, सैन्य, व सामंत हे घटक सांगितले आहेत. या प्रत्तेक घटकाचे गुण विशेष काय असावेत. त्यांची कर्तव्य, मर्यादा, याचे आपल्या ग्रंथात तत्कालीन राजांना आलेले अनुभव विचारात घेऊन विवेचन केले आहे. "कौटिलीय अर्थशास्त्र" या ग्रंथावरून तत्कालीन सामाजिक, राजकीय धार्मिक स्थितिची कल्पना येते.

संदर्भ:

1. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, प्रथम खंड, द्वितीय आवृत्ती,अनमोल प्रकाशन पुणे, १९८२.
2. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, द्वितीय खंड, द्वितीय आवृत्ती, अनमोल प्रकाशन पुणे, १९८२.
3. प्रा. डॉ. यशवंत रारावीकर प्रा. वि. ज. गोडबोले, प्रा. जॉन्सन बोर्जेस, डायमंड अर्थशास्त्रकोष, प्रथम आवृत्ती, डायमंड प्रकाशन पुणे, २००८.
4. डॉ. अनिल कठारे, प्राचीन भारताचा इतिहास, प्रशांत प्रकाशन, जळगाव, २०१२.
5. श्री. हेमचंद्र रायचौधुरी, अनुवादक डॉ. सदाशिव आठवले, डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, प्राचीन भारताचा राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, डायमंड प्रकाशन पुणे, २००६.

# २३. गांधीजींचे विचार आणि भारतीय संविधान

**डॉ. अतुल पूंजाजी राऊत**
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम
atulraut.wsm@gmail.com
9850298137

---

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील लोकशाही गुलामगिरी मुक्त करणारी आणि अंतर्गत भेदभाव विरहित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात आली. आणि ती राज्यघटना म्हणजेच भारतीय संविधान होय. जे अखंड भारतासाठी लागू करण्यात आले. जेव्हा भारताच्या संविधानाची प्रत संपूर्ण देशाला अर्पण केले गेली, तेव्हा संविधानाच्या उद्देश पत्रिकेमध्ये संपूर्ण राज्यघटनेचा सारांश उल्लेखलेला दिसून येतो. 26 जानेवारी 1950 पासून ही राज्यघटना सर्वांना लागू करण्यात आली. उद्देश पत्रिकेत कल्याणकारी शासन व्यवस्था, लोकशाही, स्वतंत्रता, सामाजिक न्याय, समता, समानता, बंधुत्व, सद्भावना इत्यादी मूल्याचा उल्लेख आहे म्हणजेच भारतातील सामाजिक व्यवस्था ही मानवतावादी, धर्मनिरपेक्ष समानताधिष्टीत, सर्वांगीण विकासाची असावी असे अपेक्षित आहे. आणि यासाठी अनेक समाजसुधारकांनी आपल्या विचारातून आणि कार्यातून सहकार्य दिलेले आहे. भारतीय इतिहासात अनेक समाजसुधारकानी देशाच्या स्वतंत्रतेसाठी, राष्ट्रीय एकात्मतेसाठी, सामाजिक समतेसाठी मदत केलेली आहे. त्यांच्या विचाराचा प्रभाव आपल्या साविधांनावर पण दिसून येतो. अनेक समाजसुधारक व सामाजिक चळवळीतील पुढारी पैकी एक म्हणजे महात्मा गांधी होय. ज्यांच्या विचारांची गरज आजही समाजव्यवस्थेला आहे. त्यांच्या कार्याचा व विचारांचा प्रभाव भारतीय संविधानावर निश्चितच दिसून येतो. ज्यांच्या विचाराची आणि तत्वज्ञानाची दखल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये मूल्याच्या स्वरूपात घेतली आहे. अशा विचारांची प्रासंगिकता समजून घेणे महत्वाचे आहे हा या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी अन्वेषणात्मक व ऐतिहासिक आराखड्याचा उपयोग केला गेला आहे.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत शोधनिबंध साठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. ज्यामध्ये पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, संबंधित शोध निबंध, इंटरनेट इ. समावेश करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :-**

१) महात्मा गांधींचे विचार अभ्यासणे.

२) महात्मा गांधीजीच्या विचाराचे संविधानातील योगदान अभ्यासणे.

३) संविधानभिमुख व्यवस्था निर्मितीत गांधी विचारांचे योगदान अभ्यासणे.

**उपकल्पना :-**

१) मानवतावादी व शांततामय व्यवस्था निर्माण करण्यासाठी जगाला महात्मा गांधीजींच्या विचारांची गरज आहे.

२) महात्मा गांधीजींच्या विचारांचा भारतीय संविधानावर काही प्रमाणात प्रभाव दिसून येतो.

३) भारतीय संविधानभिमुख व्यवस्था निर्माण करण्यात गांधी तत्वज्ञान सहाय्यभूत ठरेल.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाज इंग्रज राजवटीत होता. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतिकारी संघटना स्थापन करून क्रांतिकारकांनी जहाल प्रवृत्तीतून तर, समाजसुधारकांनी आपल्या विचारातून, कृतीतून, लेखणीतून, सत्याग्रह अशा मवाळ वादातून स्वातंत्र्यप्राप्ती साठी योगदान दिले. यामध्ये राजगुरू, भगतसिंग, सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा ज्योतिबा फुले, सुखदेव, धोंडो केशव कर्वे, राजा राम मोहन राय, महात्मा गांधी अशा अनेक सुधारकांनी सहभाग नोंदवला. 1920 मध्ये टिळकांच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यावर महात्मा गांधीजींचा प्रभाव दिसून येतो, तो त्यांच्या मृत्यूपर्यंत, म्हणजेच भारतीय स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंत. 1886 ला महात्मा गांधीजी इंग्लंडला गेले. तर 1893 साली ते दक्षिण आफ्रिकेत व्यवसायानिमित्त गेले व तेथे त्यांना वर्णभेदाला सामोरे जावे लागले. त्यांनी याविरुद्ध 1894 मध्ये संघटना स्थापन केली व 1914 पर्यंत ते आफ्रिकेत वर्णभेद व भारतीय प्रश्नावर तेथील शासनाशी झगडत राहिले. 1915 मध्ये ते भारतात आले व राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन गट निर्माण झाले. 1917 मध्ये त्यांनी चंपारण्यातील शेतकऱ्यांसाठी आंदोलन केले. 1989 मध्ये रॉलेत एक्ट ला विरोध म्हणून देशभर निदर्शने केली गेली.1921 मध्ये त्यांनी खिलाफत चळवळीचे एकीकरण केले त्याच कालखंडात त्यांनी यंग इंडिया, नवजीवन, हरिजन, वृत्तपत्राचे संपादनही केले. ज्यामधून जनजागृती झाली.1930

ते 1934 दरम्यान सविनय कायदेभंगाचा समावेश आंदोलनात केला गेला. 1942 मध्ये भारत छोडो आंदोलन गांधीजींनी सुरू केले. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले याकरिता गांधीजींनी सविनय मार्गाने शांततेने सत्याग्रह केले. भारतीय समाजात असणाऱ्या भेदभाव प्रवृत्तीला त्यांनी विरोध केला. सर्व धर्मांना सोबत घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यातून स्वातंत्र्यप्राप्ती व सामाजिक ऐक्य यावर त्यांनी कार्य केले असे दिसून येते.

**गांधी विचार :-**

सत्य, अहिंसा, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, श्रमप्रतिष्ठा, अस्तेय, स्वदेशी, निर्भयता, सर्वधर्मसमभाव, ध्येयनिष्ठा, निस्वार्थ अस्पृश्यता निवारण कृती इत्यादी गुण प्रत्येकाकडे असावेत यासाठी गांधीजींनी आपल्या जीवनात कार्य केले. यागुणा शिवाय भारतीयांना स्वातंत्र्य मिळणार नाही किंवा भारतीयांना अपेक्षित समाजव्यवस्था निर्माण होणार नाही ,अशा गुणाच्या रुजवणूकितुनच त्यांनी मांडलेल्या संकल्पना साकार होतील असे त्यांचे मत होते.

**सत्य** म्हणजे प्रामाणिक पणा, खरेपणा ईश्वर हेच सत्य आहे या ऐवजी त्यांनी, सत्य म्हणजे ईश्वर होय असे म्हटले आहे. यामुळे नफेखोरीला आळा बसेल.

**अहिंसा** या शब्दाचा अर्थ फक्त हिंसा न करणे असा नसून इतरांचे मन न दुखवणे, प्राणिमात्रांना त्रास न देणे म्हणजे अहिंसा होय, अशी व्यापक परिभाषा त्यांची होती.

**अपरिग्रह** म्हणजे संपत्तीचा संचयन न करणे,यातूनच भ्रष्टाचारास प्रोत्साहन मिळते असे त्यांचे मत होते.

**ब्रह्मचर्य** म्हणजे चारित्र्य संपन्नता होय. यातून आजचे बलात्कार, विनयभंग, छेडछाड असे गुन्हे घडणार नाहीत.

**अस्तेय** म्हणजे चोरी न करणे दुसऱ्याचे न बळकावणे इतराच्या संपत्ती वर अधिकार न दाखविणे.

**स्वदेशी** भारतीय वस्तूंचा स्वीकार करणे यामुळे आपली स्वयंपूर्णता टिकून राहील आर्थिक सक्षमता आपल्याला लागेल.

**निर्भयता** म्हणजे भय मुक्तता सर्व धर्माचा सन्मान करणे सर्वांच्या भावनांचा आदर करणे यामुळे जातीय दंगली होणार नाहीत. हिंसा घडणार नाही.

**ध्येयनिष्ठा** ध्येयाप्रति प्रामाणिकता प्रत्येकाची भावना ही निस्वार्थ सेवेची असावी कारण स्वार्थातून मोह वासना निर्माण होते. माणसामाणसातील भेद दूर होईल व समानता, समता निर्माण होईल. सामाजिक न्याय प्रस्थापित होईल

या गुणांबरोबरच महात्मा गांधींच्या काही संकल्पना ही महत्त्वाची आहेत उदाहरणार्थ ,
**रामराज्याची** संकल्पना स्वयंपूर्ण खेडी प्रत्येक खेडे हे बलशाली व शक्तिशाली व्हावेत यासाठी त्यांनी आग्रह धरला खेड्यातील गरजा खेड्यातच पूर्ण व्हाव्यात प्रत्येकाने खेड्याचे संरक्षण करावे खेड्यातील प्रत्येक व्यक्ती हा त्या समुदायासाठी त्यागकरेल अशी व सत्तेच्या विकेंद्रीकरणाची स्थिती अपेक्षित होती.
**विश्वस्तांची** संकल्पना धनसंचय न करणे आपण या सार्वजनिक मालमत्तेचे एक विश्वस्त म्हणून आहोत अशी भावना प्रत्येकामध्ये असणे अतिरिक्त धनसंचय न करता इतरांच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करावा, अवाजवी धनसंचय यातून आर्थिक विषमता निर्माण होते व भोगविलासी प्रवृत्ती निर्माण होते, त्यामुळे प्रत्येक व्यक्ती हा या संपत्तीचा फक्त विश्वस्त म्हणून आहे. मालक हा कोणीच नाही अशी त्यांची संकल्पना होय. त्यामुळे सर्वाच्या मुलभूत गरजा पूर्ण होतील.
**स्वराज्याची** संकल्पना म्हणजे स्वतः निर्माण केलेले राज्य. स्वराज्य म्हणजे फक्त ब्रिटिशांकडून सत्ता घेऊन काही भारतातील मोजक्या लोकांकडे देणे असा त्याचा अर्थ नसून गोरगरीब सर्वसामान्य जनतेने स्वतः स्वतःचे शासन चालविणे म्हणजे स्वशासन होय अशी त्यांची स्वराज्याची संकल्पना होती.
**सर्वोदय** संकल्पना रस्किन यांच्या मांडलेल्या सर्वोदय या संकल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला सर्वोदय म्हणजे सर्वांचा विकास झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता या मताला त्यांनी भारतीय व्यवस्थेमध्ये प्रोत्साहन दिले सर्वांचा विकास सोबत झाला पाहिजे असे त्यांचे आग्रही मत होते.

**सारांश :-**

अशाप्रकारे महात्मा गांधीजींचे विचार आणि संकल्पनातून स्पष्ट होते कि, भारतीय संविधानातून अपेक्षित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी गांधीजीच्या विचाराची गरज आहे मानवतावादी व्यवस्था राज्यांतर्गत व आंतरराष्ट्रीय शांतता निर्माण करण्यासाठी गांधीविचार उपयोगी आहेत.

संविधानामध्ये असलेल्या मूल्याचा आधार गांधीजीचे विचार व संकल्पना हा होय. म्हणजे भारतीय संविधानावर कमी अधिक प्रमाणात प्रभाव गांधी विचाराचा आहे. ज्यामध्ये समता, समानता, न्याय बंधुत्व, सद्भावना, गणतंत्र राज्य यामूल्याचा समावेश आहे.

व्यक्तीने धारण करावयाच्या गुणामुळे, पात्रता मुळे आज समाजामध्ये असणाऱ्या अनेक प्रश्नाचे समाधान होईल. म्हणजे संविधानाला अभिप्रेत समाजव्यवस्था ही गांधीजींच्या विचार व संकल्पना मुळे निर्माण होण्यास नक्कीच मदत होईल.

भारतीय समाजव्यवस्थेत आजही अशांतता, नफेखोरी, भ्रष्टाचार, असमानता, जातीयवाद, सीमाप्रश्न, आतंकवाद, दहशतवाद, गुन्हेगारी, हिंसाचार, वंशपरंपरागत राजसत्ता, लोकसंख्या वाढ, आरोग्याचे प्रश्न दारिद्र्य, विषमता इत्यादी अनेक प्रश्न मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत या सर्व प्रश्नांवर समाधान मिळवण्यासाठी गांधीजींच्या संकल्पना सहाय्यभूत ठरतात. भारतीय संविधानाने लोककल्याणकारी शासन व्यवस्थेचा अंगीकार केला असून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा उद्देश आपल्या संविधानाचा आहे सामाजिक शांतता सामाजिक सुव्यवस्थितता, प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रता प्रधान करणे व बंधुत्वाचे वातावरण निर्माण करणे हे संविधानाचे मुख्य उद्देश आहे. अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या गुणांची गरज आहे. जगाला शांतता निर्माण करून देशासाठी गांधी विचार महत्वाचे आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१) सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,साकेत प्रकाशन,औरंगाबाद 2009

२) प्रा.बी.बी.पाटील प्रा.उर्मिला चव्हाण,भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2008

३) मोहनदास करमचंद गांधी,सत्याचे प्रयोग,नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद

४) डॉ.वा.भा.पाटील,भारतीय राजकीय विचारवंत,मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. नीलप्रभा लक्खावार, समाजकार्याची रूपरेषा, रेखा प्रकाशन, नागपूर

६) डॉ. प्राजक्ता टांकसाळे, व्यवसायिक समाजकार्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

७) भारतीय राज्यघटना

# २४. कौटिल्याच्या भ्रष्टाचारासंबंधी विचाराची प्रासंगिकता

**डॉ.संजय भालेराव**
विभागप्रमुख,लोकप्रशासन विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय ,कन्नड.

**प्रस्तावना :**

व्यक्ती ही जन्मत: स्वार्थी असते असे म्हटले जाते,कारण प्राचीन ,मध्ययुगीन आणि आधुनिक काळात भ्रष्टाचाराचे अस्तित्व सामाजिक ,राजकीय ,आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रात असल्याचे पुरावे सापडतात.कौटिल्याने प्रशाकीय भ्रष्टाचारासंबंधी आपल्या कौटिल्य अर्थशास्त्रात सविस्तर आढावा घेतला आहे. कौटिल्याच्या मते , " ज्याप्रमाणे पाण्याच्या आतच इकडेतिकडे फिरणारे मासे पाणी पिताना समजून येऊ शकत नाही ,त्याप्रमाणे कार्य पार पाडण्यासाठी नेमलेले अधिकारी धनाचा अपहार करताना समजून येऊ शकत नाही '' ( कंगले : २०११:९९ ). म्हणजेच तळे राखील तो पाणी चाखील या उक्तीप्रमाणे प्रशासनातील भ्रष्टाचाराचे स्वरूप राहते . याशिवाय,
'ज्याप्रमाणे जिभेवर असलेल्या असलेल्या मधाचा किंवा विषाचा स्वाद न घेणे शक्य नाही त्याप्रमाणेच राज्याचे द्रव्य हाताळणारा अधिकारी त्यातील थोडे तरी द्रव्य चाखल्यावाचून राहणे शक्य नाही' ( कंगले : २०११:९९ )असे विधान कौटिल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांची भ्रष्टाचाराविषयीची मानसिकता विषद केली होती.

स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू म्हणाले होते , ' देशाची प्रगती होताना पाच टक्के भ्रष्टाचार झालातरी हरकत नाही .भ्रष्टाचारी लोकांना करंगळी गवसली व त्यांनी आता मनगटच नव्हे ,तर संपूर्ण हातच हस्तगत केला आहे' (धर्माधिकारी:२००८:८२ ). पुढे पंतप्रधान राजीव गांधी भ्रष्टाचाराचे भयावह स्वरूप विशद करताना म्हंटले होते, 'दारिद्र्य निर्मुलनाच्या योजनांसाठी मंजूर केल्या जाणाऱ्या शंभर कोटी रुपया पैकी केवळ १५ कोटी रुपयेच पोहचतात. कंत्राटदार, दलाल, आणि भ्रष्टाचारी लोक बाकीचे पैसे हडप करतात याची मला कल्पना आहे ' (वाळिंबे :२०१२:६३) या वरून भ्रष्टाचाराचे स्वरूप लक्षात येते .

वर्ल्ड ट्रान्स्परनशी या संघटनेने काढलेल्या २०२० भ्रष्टाचार धारणा निर्देशांकानुसार भ्रष्टाचार मुक्त असलेल्या क्रमवारीत न्यूझीलंड (८८/१) , डेन्मार्क (८८/१), आणि फिनलंड (८५/३) तर भारताचा क्रमांक (४०/८६) यावरून भारतातील भ्रष्टाचार निर्मुलना बाबतीत किती काम करणे गरजेचे आहे

लक्षात येते .म्हणून प्रस्तुत शोध निबंधात कौटिल्याने परंपारिक सांगितलेल्या भ्रष्टाचाराचे प्रकार आणि केंद्रीय सतर्कता आयोगाने सांगितलेले आधुनिक भ्रष्टाचाराचे प्रकार याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

प्रस्तूत शोध निबंधाचे उद्दिष्टे खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आली आहेत ;

१. कौटिल्याचे  भ्रष्टाचारासंबंधी विचार जाणून घेणे .

२. कौटिल्याने भ्रष्टाचाराच्यासंबंधी  सांगितलेल्या प्रकाराचा आढावा घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

प्रस्तूत शोध निबंधाचे **गृहितके** खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आली आहेत;

१. भ्रष्टाचाराचे कालपरत्वे स्वरूप आणि प्रकार बदललेले आहेत .

**२.** कौटिल्याचे भ्रष्टाचारासंबंधी विचार आजही प्रासंगिक आहेत

**भ्रष्टाचारासंबंधीचे मार्ग किंवा प्रकार :**

कौटिल्याने आपल्या ‘कौटिलीय अर्थशास्त्र ’ या ग्रंथात प्रशासकीय अधिकारी चाळीस मार्गाचा अवलंब करून भ्रष्टाचार करतात  असे नमूद केले आहे( कंगले :२०११: ९४-९५) .त्याचे सविस्तर विश्लेषण खालील प्रमाणे;

१. अगोदर तयार झालेले उत्पन्न कालावधीने वसूल केले .

२. सिद्ध व्हावयाचे असलेले उत्पन्न अगोदरच वसूल करणे.

३. जे करावयाचे ते केले नाही .

४. जे करावयाचे नाही ते केले .

५. जे तयार झाले आहे ते तयार झाले नाही असे दाखविले .

६. जे तयार झाले नाही ते तयार झाले आहे असे दाखविले .

७. थोडे सिद्ध झाले असता पुष्कळ झाले आहे असे दाखविले

८. पुष्कळ सिद्ध झाले असता थोडे दाखविले .

९. एक सिद्ध केले असता दुसरे दाखविले .

१०. एका उत्पादनाच्या सदरात सिद्ध झाले असता दुसऱ्या सदरात दाखविले .

११. जे द्यावयाचे होते ते दिले नाही.

१२. जे द्यावयाचे नव्हते ते दिले .

१३. योग्य वेळी दिले नाही.
१४. भलत्याच वेळी दिले
१५. थोडे दिले असता पुष्कळ दिले असे दाखविले .
१६. पुष्कळ दिले असता थोडे दाखविले.
१७. एक दिले असता दुसरे दिले असे दाखविले.
१८. एकास दिले असता दुसऱ्यास दिले असे दाखविले.
१९. भरणा केला असता भरणा केला नाही असे दाखविले.
२०. भरणा न करता भरणा केला असे दाखविले .
२१. ज्याची किमत दिली नाही असा जंगली माल आणून ठेवला .
२२. ज्याची किमत दिली तो आणून ठेवला नाही .
२३. विक्रीचा माल एकेच ठिकाणी ठेवला असता तो अनेक जागी ठेवला आहे असे दाखविले .
२४. अनेक ठिकाणी ठेवलेला माल एकत्र आणला आहे असे दाखविले
२५. भारी किमतीच्या वस्तूच्या जागी कमी किमतीची वस्तू ठेवली .
२६. कमी किमतीच्या वस्तूच्या जागी भारी वस्तू ठेवली .
२७. मालाची किमत वाढविली .
२८. किमत उतरवली.
२९. वर्षातील महिन्याच्या बाबतीत विषमता (बारा असता तेरा इत्यादी ).
३०. महिन्यातील दिवसाच्या बाबतीत विषमता दाखविले.
३१. उत्पन्नाच्या उद्गम स्थानाच्या बाबतीत विषमता.
३२. उत्पादनाच्या सदराच्या बाबतीत विषमता.
३३. कामगाराच्या बाबतीत विषमता.
३४. काम पार पाडण्याच्या बाबतीत विषमता.
३५. एकूण बेरजेच्या बाबतीत विषमता .
३६. मालाच्या प्रतीच्या बाबतीत विषमता.
३७. किमतीच्या बाबतीत विषमता.
३८. वजनात विषमता.
३९. मोजण्यात विषमता.

४०. माल ठेवण्याच्या भाजनाच्या बाबतीत विषमता .

मौर्यकालीन शासन व्यवस्थेत कौटिल्याने भ्रष्टाचाराचे उपरोक्त चाळीस प्रकार सांगितलेले होते .त्याकाळी राजेशाही होती परंतु भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर १९६४ मध्ये केंद्र शासनाने स्थापन केलेल्या केंद्रीय दक्षता आयोगाने भ्रष्टाचाराच्या एकूण सत्तावीस प्रकाराची यादी प्रस्तुत केली. ( माहेश्वरी २००६ :४३६-४३७) ती खालीलप्रमाणे (माहेश्वरी २००६ :४३६-४३७);

१.दुय्यम दर्जाच्या कामाचा किंवा भांडाराचा स्वीकार .

२.सार्वजनिक पैशाची अफरातफर आणि सामानाचे अपहरण किंवा त्याचे गैरव्यवहार.

३. ज्या व्यक्तीशी शासकीय व्यवहार आहेत अशा व्यक्तीकडून लोकसेवकाने काही धनविषयक उपहार स्वीकारणे .

४.अधिकाऱ्याबरोबर शासकीय व्यवहार असणाऱ्या ठेकेदाराकडून आणि व्यवसाय संस्थाकडून उधारी पैसे घेणे .

५. ठेकेदारांना आणि व्यवसाय संस्थाना अकारण अनकुलता दर्शविणे .

६. प्रवास भत्ता ,घरभाडे इत्यादीबाबत खोटेपणा करून फायदे मिळविणे .

७. उत्पन्नाशी विसंगत प्रमाणात संपती बाळगणे .

८.परवानगीशिवाय किंवा पूर्वमाहिती शिवाय स्थावर मालमत्ता खरेदी करणे .

९. दुर्लक्ष केल्याने अथवा अन्य कारणाने सरकारच्या नुकसानीस कारणीभूत होणे .

१०.आपल्या अधिकार पदाचा ,अधिकाराच्या गैरवापर करणे .

११.सेवकाच्या भरती ,नेमणुका, बदल्या आणि बढत्या या संदर्भात बेकायदेशीर परितोषिक स्वाकारणे .

१२.व्यक्तिगत कामासाठी शासकीय कर्मचाऱ्याचा गैरवापर करणे .

१३. वय ,जन्म ,आणि जात याचे खोटे दाखले तयार करणे .

१४. रेल्वे किंवा विमान प्रवासातील जागेच्या आरक्षणाबाबत नियम बाह्यता .

१५. मनी ऑर्डर ,विमा उतरवलेली कागदपत्रे आणि पार्सल यांचे वाटप न करणे .

१६.नव्या टपाल तिकिटाच्या जागी वापरलेली तिकिटे लावणे .

१७.आयात –निर्यात परवाने देताना केलेले नियमभंग .

१८.विविध व्यवसाय संस्थाच्या आयात व निश्चित केलेल्या कोटयाचा ,लोकसेवकाच्या संमतीने गैरवापर करणे.

१९. दूरध्वनी कनेक्शन देण्याबाबतच्या नियमाचे उल्लघन करणे .
२०.नैतिक अधोगती .
२१.भेटवस्तूचा स्वीकार .
२२.आर्थिक लाभ मिळावेत म्हणून प्राप्तीकर आणि संपत्तीकराचे हेतुपूर्वक कमी मूल्यमापन .
२३.दुचाकी व चारचाकी वाह्नाच्या खरेदीसाठी दिलेल्या आगाऊ रकमेचा .
२४.विस्थापित लोकांच्या मोबदल्यात दावे निपटण्यात अवाजवी दिरंगाई करणे.
२५. विस्थापित लोकांच्या दाव्याचे चुकीचे मूल्यमापन करणे .
२६.निवासी भूखंडाच्या खरेदी – विक्रीत फसवणूक करणे .
२७. शासकीय निवासस्थानात पोटभाडे ठेवणे किंवा त्यांच्यावर अनाधिकृत ताबा ठेवणे .

**सारांश :**

भ्रष्टाचाराच्या प्रकारात कालपरत्वे फरकात फरक पडला आहे हे वरील दोन्ही प्रकारचे आवलोकन केल्यानंतर लक्षात येते .त्याचे निर्मुलन करावयाचे झाल्यास डॉ .सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी म्हटले होते , ‘ भ्रष्टाचार एवढा वाईट आहे की , ज्याच्यावर सर्व बाजूनी ,सर्व पातळीवर मात केली पाहिजे’.( पाटील : १९९८ : २८५ )त्याचे हे विधान आजही प्रासंगिक ठरते . त्यामुळे सामाजिक ,राजकीय , आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारा विरुद्ध सामुहिक लढा उभारला पाहिजे ,कारण माहितीच्या अधिकाराचा उपयोग करून भ्रष्टाचारा विरुद्ध लढा देत आहेत परंतु त्याच्या हत्या होत आहेत पण हा लढा समूहाच्या पातळीवर उभा करून लढा दिला तरच भ्रष्टाचार निर्मूलनात यश प्राप्त करू शकू असा आशावाद वाटतो .

संदर्भ :

१. कंगले ,र.प.( २०११). कौटिलीय अर्थशास्त्र. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ ,पृ .क्र .९९.
२.कित्ता ,पृ .क्र.९९.
३.धर्माधिकारी , चंद्रशेखर .( २००८ ). अंतर्यात्रा ,पुणे : मंजुल प्रकाशन , पृ .क्र .८२ .
४. कंगले ,र.प.( २०११). कौटिलीय अर्थशास्त्र. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ ,पृ .क्र .९४-९५ .
५. माहेश्वरी,श्रीराम ( २००६). भारतीय प्रशासन .मुंबई: ओरीएंट लॉंगमन ,पृ .क्र.४३६-४३७

# २५. आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भुमिका

**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार**
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

प्रस्तावना :—

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीयन्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ, तत्वज्ञ, समाजसुधाकर, पत्रकार, वकील दलित बौध्द चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौध्दधर्माचे पुनरूज्जीवीत करणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. प्रंचड बुध्दिमता, समाजासाठी असीमत्याग करणारे दलित समाजाला हक्क मिळवून देणारे महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, मंदिसत्याग्र, शेतकऱ्यांचा कैवारी, गोलमेज परिषद, पुणे करार स्वतत्र मजूरपक्ष, बहिष्कृतहितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी कार्य , स्वातंत्र्य लढयात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या. समाजासाठर आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तीचां प्रामुख्याने विचार केला शिक्षणासाठी समाजाच्या कल्याणासाठी आयुष्य भर संघर्ष केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. असा गुरूमंत्र दिला. असामन्य कर्तुत्व गाजवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताच्या विकासातील महत्वाचे व्यक्ती आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय :—**

मध्यप्रदेशातील महू येथे बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. बाबासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई असे होत. मध्यप्रदेशा नंतर काही काळ दापोली. सातारा असे वास्तव्य करीत आंबेडकरांच कुटूंब मुंबईत राहण्यास आले. बाबासाहेबांनी शिक्षण घेण्यासाठी खुप कष्ट सोसले. वयाच्या १४—१५ व्या वर्षी बाबासाहेब आंबेडकर यांचा विवाह दापोली येथील भिकू वलंगकर यांच्या मुलीशी म्हणजेच रमाबाई यांच्याशी झाला. बाबासाहेब आपल्या शालेय जीवनात १८ तास अभ्यास करत असत.

उच्चशिक्षण :—

मॅट्रिकची परिक्षा यशस्वी पणे उत्तीर्ण झाल्या नंतर बाबासाहेबांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. ची पदवी घेतली. बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने बाबासाहेब उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत गेले. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए. केले. दोन विषयात पीएच.डी. मिळवीली. बार.ॲट.लॉ आणि डी. एस.सी पदवी घेतली ग्रेजइन येथून बॅरिस्टर ॲट लॉ ही पदवी घेऊन ३ एप्रिल १९२३ रोजी मुंबईत परतले. समाजकार्य कराव व अर्थाजनासाठी वकिली करावी असा निर्णय त्यांनी घेतला. सुरूवातीच्या काळात बाबासाहेबांनी उत्तम प्रकारे वकिली केली.

**आधुनीक भारताच्या विकासात डॉ. आंबेडकरांचे योगदान :—**

भारताच्या आधुनिक पायावरील राष्ट्र म्हणून जडणघडण विसाव्या शतकात १९२० ते १९५० च्या दशकात झाली. या काळात राजकीय स्वातंत्र्य तर मिळालेच पण राज्यघटना, राजकिय—आर्थिक आणि सामाजिक घडी, राज्यांची पुनर्रचना, फाळणी तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाचा कृती कार्याक्रम असे सारे या काळात घडत गेले. या पायावर आधुनिक भारतीय राष्ट्राची घडण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्यकाळही हाच आहे. मुंबईत १९१८ साली त्यांचे नेतृत्व राजकीय क्षितिजावर उदयास आले. सुमारे ४० वर्षाच्या काळात डॉ. आंबेडकर ज्ञानदान आणि नेतृत्व करीत होते, राष्ट्राच्या उभारणीत योगदान देत होते. समस्या सोडवण्यासाठी धारणे सुचवण्याची डॉ. आंबेडकरांची पध्दती त्यांच्या समकालीन नेत्यांपेक्ष निराळी होती. विषयाचा सखोल अभ्यास करून, कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्यात होती म्हणूनच त्यांनी सुचवलेले उपाय हे आजही राष्ट्रा पुढील समस्यांचा सामना करण्यासाठी समर्पक ठरतात.

**स्वातंत्र्याची आणि राष्ट्राची संकल्पना :—**

डॉ. बाबासाहेब स्वत:च्या पध्दतीने स्वातंत्र्य लढयात सहभागी होते. सन १९३०—३२ च्या पहिल्या गोलमेज परिषदेत ब्रिटिशांना त्यांनी सांगितले, ‘‘ केवळ स्वराज्यातील राज्यघटनेमूळेच दलित वर्गास राजकिय सत्तासहभागाची संधी मिळू शकते. तसे न झाल्यास आमच्या लोकांना मुक्ती मिळणार नाही.’’ मात्र स्वातत्र्या ची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कल्पना कॉंग्रेस व इतरांपेक्षा वेगळी होती. त्यांच्या मते, राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा निवळ एक भाग झाला. अन्य भाग म्हणजे सामाजिक आणि आर्थिक स्वांतत्र्य, असमान हक्कांपासून मुक्ती, अस्पृश्य मानले गेलेल्यांना समान सामाजिक व आर्थिक हक्क देण्यात जात हा अडथळा असल्यामूळे आधी सामाजिक आर्थिक समानतेच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी करा, मग ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्य घेऊच, असे त्यांचे मत होते. हा एकमेव मतभेद

कॉंग्रेस आणि डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेत होता, डॉ. आंबेडकर यांनी हा जो विषय तेव्हा लावून धरला, तो आजही महत्वाचाच ठरतो, कारण राज्यघटनेद्वारे अनूसुचित जातींना समान हक्क मिळूनही, त्यांना नागरिक म्हणून समान हक्क नाकारले जाण्याचे प्रंसग आजही येतात. राष्ट्राची ही संकल्पना विकसित होण्यात डॉ. आंबेडकरांची मदत झालीच, पण राष्ट्रीयत्वाची एक पूर्वअट आपल्या देशात पूर्ण झालेली नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले होते. त्यांचे याबाबतचे निरिक्षण असे की, स्वत:स राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता किती आहे, यावर ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळयांवर मोठी विषमता असताना आणि अलीकडल्या काळात आंतर—जातीय, वांशिक आणि धार्मिक तणाव वाढत असताना राष्ट्र विकसीत होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ. आंबेडकर यांच्याकडून शिकवण घेतली पाहीजे.

संसदीय लोकशाहीच्या यशाची देखील एक पूर्वअट डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केली होती. एक व्यक्ती एक मूल्य किंवा सर्वांना समान मूल्य हे लोकशाही मूलभूत तत्व आहे. राजकीय लोकशाहीत एक व्यक्ती एक मत या नियमाने हे तत्व आचारणात आणले जाते. पण राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळयांवरही सर्वांना समता आणि स्वातंत्र्य हवे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हे राजकीय लोकशाहीच्या पेशी आणि ततूसारखे आहेत. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. परंतू जातिव्यवस्थेमूळे एकतर सामाजिक आणि त्यामूळे आर्थिक लोकशाही नाकारली जाते आणि राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय किंवा जाती—आधारीत बनते. म्हणून राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर होता. त्याचप्रमाणे लोकशाही बळकट करण्यासाठी अहिंसक मार्गाचा वापर ही त्यांनी पूर्वअट मानली होती. कोणत्याही रक्तपाताविना क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासनपध्दती म्हणजे लोकशाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. परंतू आज जमावाचा हिंसाचार वाढत असताना डॉ. आंबेडकर यांची शिकवण साऱ्यांनी घ्यावी, अशी वेळ आली आहे.

**हक्करक्षणासाठी कृती कार्यक्रम :—**

लोकशाहीत अल्पसंख्याकांसाठी काही हक्क—संरक्षक उपाय असावेत, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदानही तितकेच महत्वाचे आहे. शासनसंस्था धार्मिक बहूसंख्येच्या बळावर सुरू राहणे टाळण्यासाठी त्यांनी तीन

संकल्पना पुढे आणल्या. १) बहूसंख्याक व अल्पसंख्याक यांच्या प्रतिनिधित्वाचा समतोल २) महत्वाच्या मुदयावरील निर्णय सर्वानुमते करणे ३) बहूमताच्या पक्षाइतकाच अल्पमतातील पक्षांनाही मंत्रिमंडळ निवडीचा अधिकार डॉ. आंबेडकर यांनी शासनसंस्थेला धार्मिक बहूसंख्याकतावादाचा धोका असण्याची शक्यता विचारात घेतली होती, म्हणून त्यानी या सुचना केल्या होत्या. त्यांचे भाकीत काहीसे आज प्रत्यक्षात दिसते आहे. त्यामूळे याही बाबतीत, डॉ. आंबेडकरांची शिकवण आज उपयोगी आहे.

अल्पसंख्याकांखेरीज स्त्रियांच्याही समान हक्कांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार केला आणि हिंदू कोड बिल हे विधेयक तयार केले. त्या विधेयकाच्या मसुद्याला जोरदार विरोध झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वाचे योगदान म्हणजे राज्य—पुनर्रचनेबाबतची त्यांची भूमिका, प्रादेशिकतावाद बळावू नये, म्हणून एकच भाषा बोलणाऱ्या प्रांताचीही अनेक राज्ये असायला हवीत, अशी त्यांची सूचना होती आणि आकाराने लहान, पण आर्थिक दृष्टया सक्षम राज्ये असावीत, असे त्यांचे मत होते. राज्ये आकाराने लहान असल्यास शासकता चांगली असते आणि अशी राज्ये दलित अल्पसंख्याकांना अधिक चांगल्या प्रकारे सामावून घेणारी असतात, असा विश्वास त्यांनी मांडला होता.

**आर्थिक विकास धोरण :—**

डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, पूनर्बांधणी आणि पुनर्वसन योजना १९४२—४६ तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१—५५ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेने त्या योजनेचा आधार घेतला डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातीविषयीचे धोरण आणि महत्वाचे म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते. आजही त्या कामगारविषयक धोरणाचा आधार घेतला जातो. कोलकत्यात पहिले रोजगार विनिमय केंद्र सुरू झाले, तेही याच धोरणामूळे अनूसुचित जातीसाठी सरकारी नोकऱ्या व शिक्षणसंधीमध्ये आरक्षण हे निर्णय त्यांच्या धोरणामूळे झाले. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरूवात डॉ. आंबेडकरांच्या पाणी आणि वीजविषयक धोरणातून झाली. दामोदर, हिराकूंड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाटबंधारे विकास हे या धोरणामूळे मार्गी लागले. वास्तविक, केंद्र सरकारचे पाणी आणि

वीजविषयक आद्य धोरणाचे कर्त्य असे रास्त श्रेय डॉ. आंबेडकर यांना मिळायला हवे.

**शेतकऱ्यांसाठी कार्य :—**

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधापुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. आर्थिक स्त्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणज ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल. असे बाबासाहेबांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडक यांनी सर्वात महत्वाची संकल्पना मांडली ती शेतीचे राष्ट्रीयकरण करण्याची पीकपध्दती पाणी उपल्बधता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवणव्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत, असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीन धारणा कायदा, सावकारी व खेती पध्दतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नंद्याच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमंलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. या मागे डॉ. बाबासाहेब यांच्या विचांराचाच प्रभाव दिसून येतो.

**निष्कर्षः—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या आर्थिक नियोजनाचे आणि आर्थिक विकासात्मक धोरणांचे शिल्पकार होते.एकटया व्यक्तीचे इतके मोठे योगदान, हा राष्ट्रनिर्माणासाठी मोठाच सहयोग आहे, राष्ट्रवाद, देशप्रेम यांची उच्च पातळी गाठल्याखेरीज आणि प्रामाणिकपणा असल्याखेरीज इतके मोठे काम होत नसते. देशातील साऱ्या वंचितांसाठी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानायक आहेतच. देशातील साऱ्या लोकांनी त्यांना महान नेता ठरविण आणि त्यांना भारतरत्न दिले जाणे. ही त्यांच्या कार्याची एक उचित दखल ठरते.

**सदंर्भ :—**
१) जाधव नरेंद्र — 'बोल महामानवाचे ' खंड १ पृष्ठ क्रं. १३.

२) फडके य.दि.,आंबेकरी चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९० पृष्ठ क्रं. १४३
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १७, महाराष्ट्र राज्य शासन प्रकाशित,पृष्ठ क्रं. २१२
४) दैनिक सकाळ — ४ ऑक्टोबर २०१५
५) जाधव नरेंद्र — 'उपरोक्त' पृष्ठ क्रं. ३७०—३७१.

६) भालेराव हरीश—'मानवी हक्काचे परिवर्तक' दै. महाराष्ट्र टाईम्स, दि. १४ एप्रिल २०१३.
७) गाठाळ साहेबराव— आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलास प्रकाशन औरंगाबाद, २०१० पृष्ठ क्रं. ३७२—३८०
८) Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches. vol. 10-page no. 302-380

# २६. राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जीवन व कार्य

**प्रा. डॉ. सुनिता तुकाराम राठोड (गोरे)**
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशीम

**प्रस्तावना :—**

सहयाद्रीचे कडेपठार गोदावरी, भीमा आणि कोयना,
जिजाऊ तुझेच गीत गाती
भाग्यवान आम्ही आहोत कारण,
तुझ्या पदस्पर्शाने पावन झाली महाराष्ट्राची माती

मॉ जिजाऊचे नाव घेतले की, त्यांचा जीवनपटच डोळयासमोर येतो. तो म्हणजे त्यांचे राजकारण, समाजकारण, निर्णयक्षमता, कार्यकुशलता, कुटुंबवत्सल, सर्वासाठी दया, माया, करुणा, प्रेम, साहचर्य असणाऱ्या स्वराज्याची ज्योत पेटविण्यासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजासारखे वाघाच्या जबडयात हात घालून फाडणारे पुत्र घडविणाऱ्या, शहाजी महाराजांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या राजमाता जिजाऊ. जिजाऊंचे पूर्ण नाव जिजाबाई लखूजी जाधव व लग्नानंतरचे जिजाबाई शहाजी भोसले. जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ मध्ये सिंदखेडराजा येथे झाला. आईचे नाव म्हाळसाबाई होते. १६०५ ला दौलताबाद येथे शहाजी महाराजासोबत जिजाऊंचा विवाह झाला आणि त्यानंतर त्यांच्या जीवनकार्याला सुरुवात झाली.

**उद्देश :—**

१. जिजाऊंचे कौटुंबिक, सामाजिक कार्य अभ्यासणे.
२. जिजाऊंचे राजकीय कार्य अभ्यासणे.
३. जिजाऊंचे समाजसेवेचे कार्य अभ्यासणे.
४. जिजाऊंची निर्णयक्षमता अभ्यासणे.
५. जिजाऊंची कार्यकुशलता अभ्यासणे.

जिजाऊंच्या विवाहानंतर त्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. जाधवांचे व भोसल्यांचे नाते घट्ट झाले आणि त्या लहान असताना घोडसवारी, तलवारबाजी इत्यादी गोष्टीत निपूण होत्या. आपल्या वडीलांच्या लाडक्या होत्या. अशातच विवाहानंतर अनेक जबाबदाऱ्या त्यांच्यावर पडल्या. निजामशाही, आदिलशाही, मुघल यांच्या जाचातून सुटका व्हावी, आपण स्वतंत्र राज्याची स्थापना करावी, महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबावेत यासाठी त्या सदैव तत्पर

होत्या. सोबतच त्या कुटुंबवत्सल होत्या. त्यांना एकुण ८ संतान होती. त्यामध्ये ६ मुली व २ मुले होती. त्यापैकी मुलींना देवाने हिरावून घेतले. आपल्या पुत्राची जडणघडण त्यांनी मोठया कष्टाने केली. दोन छत्रपती या मातेने घडविले. पारतंत्र्याची जाणीव, समाजाची होणारी हेळसांड, स्त्रियांच्या इज्जतीचे लक्तरे लोंबवणारा जाच या जोखडातून सुटका होण्यासाठी, जन्मापासूनच स्वराज्य पाहण्यासाठी, त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मुलांना शिकविले. शिवाजी महाराज १४ वर्षाचे असतांना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीरी सुपूर्त केली. अर्थातच जहागीरीची वहिवाट लावण्याची जबाबदारी जिजाबाईवर येऊन पडली. कुशल अधिकाऱ्यासोबत जिजाबाई आणि शिवाजी पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मुघलांच्या सततच्या स्वाऱ्यांमुळे पुण्याची अवस्था अतिशय भीषण होती. अशा प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी जिजाऊंच्या सोबत नेटाने पुणे शहराचा पूनर्विकास केला. सोन्याचा नांगर घडवून त्यांनी शेतजमीन नांगरली. स्थानिक लोकांना अभय दिले. शिवाजी राजांची शिक्षणाची जबाबदारी घेतली. जिजाऊंनी शिवाजीला पारतंत्र्यात सुरु झालेल्या आणि स्वातंत्र्यात संपलेल्या रामायण, महाभारतील गोष्टी सांगीतल्या. सीतेच्या हरण करणाऱ्या रावणाचा वध करणारा राम किती पराक्रमी होता, बकासुराचा वध करुन दूबळया लोकांची सुटका करणारा भीम किती पराक्रमी होता, अश्यासारख्या शुरवीरांच्या अनेक गोष्टींच्या माध्यमातून त्यांना बाळकडू पाजले, संस्कार केले. एवढेच नाही तर सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे धडे दिले.

शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वत: बारकाईने लक्ष ठेवले. शहाजी राजांची कैद व सुटका, अफजलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका, अशा अनेक प्रसंगात शिवरायांना जिजाईंनी मार्गदर्शन केले. शिवराय मोठया मोहिमांवर असताना खूद्द जिजाबाई राज्यकारभारावर बारीक लक्ष ठेवत असत. आपल्या जहागिरीत त्या जातीने लक्ष घालत. सदरेवर बसून स्वत: तंटे सोडवत. शहाजी राजे बंगळूरात वास्तव्यास असताना शिवाजी राजांनी आई व वडीलांची चोख जबाबदारी मोठया कौशल्याने पार पाडली. सईबाईच्या पश्चात संभाजी राजाचीही संपुर्ण जबाबदारी त्यांनी उचलली.

राजांच्या प्रथम पत्नी सईबाईचे भाऊ बजाजी निंबाळकर यांना जूलमाने बाटवण्यात आले होते. त्यांची हिंदू धर्मात परत येण्याची इच्छा होती. राजांचाही त्याला पाठींबा होता. या धर्मराजकाळात जिजाबाई राजांच्या पाठीशी ठाम उभ्या

राहिल्या. एवढेच नव्हे तर राजांच्या कन्या सखुबाईंना बजाजी निंबाळकरांच्या मुलाला देऊन राज सोयरीक साधली आणि बजाजींना पूर्णपणे धर्मात परत घेतले. या संपूर्ण प्रकरणात त्यांचा द्रष्टेपणा व सहिष्णूता दिसून येते.

राजांच्या सर्व स्वाऱ्यांचा, लढायांचा तपशील त्या ठेवत. त्यांच्या खलबतात, सल्लामसलतीत भाग घेत. राजांच्या गैरहजेरीत स्वत: राज्याची धूरा वाहात. शिवाजी राजे आग्र्याच्या कैदेत असताना स्वराज्याच्या सीमा वाढवत. रांगणा किल्ला जिंकून घेतला. जिजाबाईंनी उतारवयातही जबाबदारी कौशल्याने पूर्णत: निभावून नेली.

राजमाता जिजाऊ हया बालपणापासून तर मरेपर्यंत जे स्वप्न पाहिले ते साकार करुन सत्यात उतरवण्याचे कार्य थोर, कर्तृत्ववान, महापराक्रमी, शुरवीर, लढवय्या, क्रांतीकारक स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्वगुणांचे बाळकडू देत असत.

राजमाता जिजाऊ मॉसाहेबांच्याच प्रेरणेने कानंद, गुंजन, वेळगंड, भोसे खोऱ्यातील वीर बाजी पासलकर, झुंजारराव मारळ, तानाजी मालुसरे आदी अठरापगड जातीच्या ६०० तरुण सवंगडयांना सोबत धेऊन रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. मोठया युक्तीने जिजाऊंच्या मार्गदर्शनामध्ये अत्यंत मुत्सद्देगिरीने विना लढाई किल्लेदार पळून गेला असे. आदिलशाहाला पळवून पहिला किल्ला तोरणा ताब्यात घेतला. तोरण्याची डागडूजी सुरु असताना देव देवतांच्या सोन्याच्या मूर्ती सापडल्या. त्या मूर्तीचे काय करायचे. जिजाऊंनी सल्ला दिला, ''या मूर्ती देवाच्या असल्या तरी सोन्याच्या आहेत हे विसरु नका. या मूर्ती वितळवा आणि स्वराज्यातील मावळेरुपी जीवंत देव घडवा. हा महाराष्ट्र मुक्त करा. '' पुढे निजामशाहीचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा किल्ला मिळविला. चाकणचा किल्लेदार सुद्धा स्वराज्याच्याच विचाराने प्रेरित होऊन स्वराज्यात दाखल झाला. रक्ताचा थेबही न सांडता तीन किल्ले लोकांच्या उत्स्फुर्त पाठींब्यातून मिळाले. लोकांना स्वराज्य हवे आहे, हे स्पष्ट झाले. पुढे कोंढाण्याच्या मुसलमान किल्लेदाराला भरपूर पैसे देऊन गड ताब्यात घेतला. शहाजीराजांच्या परंपरागत जहागिरदारीच्या सुरक्षिततेसाठी पुरंदर किल्ला स्वराज्यात असणे किती आवश्यक आहे हे मॉ साहेबांनी पटवून दिले. ऐन दिवाळीच्या दिवशीच पुरंदर किल्ला स्वराज्यात आला. जिजाऊ मॉ साहेबांच्या उपस्थितीत शिवाजी महाराजांनी खरीखुरी दिवाळी साजरी केली. त्यामुळे शहाजीराजे शिवरायांना मदत करीत असल्याचा संशय आला.

जिजीच्या मोहीमेवर गेलेल्या शहाजीराजांना वेल्लोर येथे अचानक झडप घालून आदिलशहाने कैद केले. आदिलशहाने दोन्ही पुत्रांचा बंदोबस्त करएयासाठी मुर्शदखान व फतेहखान यांना पाठविले. फतेहखानने बाळाजी व हैबतराव यांच्या मदतीने सहज सुभानमंगळ किल्ला जिंकला. म्हणून मोठया आनंदाने विजयोत्सव साजरा करुन झोपले. अशा वेळी मल्हार कावाजीच्या नेतृत्वात मावळयांनी अर्ध्या तासात बाळाजी व हैबतरावाची फौज कापून काढली. स्वत: मल्हार कावजीच्या भाल्याने बाळाजी हैबतराव खाली पडला. उरलेले खानाचे सैन्य पळून लावले. जे जिवंत सापडले ते शरण आले व स्वराज्यात मावळे म्हणून दाखल झाले. खानांचा खजीना, नव्या दमाचे ५०० घोडे मिळाले व हिच रसद पुढे खानाच्या पराभवासाठी वापरली.

महाराजांनी खानाच्या बोलसद, शिरवळ खानाला डिवचले. खानाने पूरंदरवर चाल केली. खानाचे सैन्य पूरंदरवर अर्ध्यापर्यंत चढल्यावर अचानक दरवाजा उघडून खानाच्या सैन्यावर हल्ला चढविला आणि खानाचे सैन्य कापून काढले. खानाचा सासवडपर्यंत पाठलाग केला. तिकडे संभाजी राजांनी सुद्धा हिंदू राजांना एकत्रित करुन फर्राबखानची धुळधान उडविली. अशाप्रकारे आदिलशहाला जिजाऊ मॉ साहेबांच्या सल्ल्यानुसार शिवाजी महाराजांनी मोगलांचा दक्षिणेतील सुभेदार मुराद बक्ष यांच्याशी संधान साधने व आदिलशहाला मोगलांकडून फर्मान आले ''शहाजीराजे भोसले आमचा माणूस आहे, शिवाजीराजे हे त्याचे पुत्र आहेत. त्यांना तातडीने मुक्त करावे.'' त्यामुळे शहाजीराजेची सन्मानपूर्वक सुरक्षा झाली. आदिलशहाला मोठी चुक झाल्याचे कळून चुकले आणि त्याने शहाजीराजांना दरबारात बढती देऊन फर्जंद पदावर घेतले. या संपूर्ण प्रकारामागे मॉ साहेब जिजाऊंची मुत्सद्देगिरी कारणीभूत ठरली. २५ जुलै १६२९ ला निजामाने विश्वासघाताने भर दरबारात वडील, राजे लखुजीराव जाधव, भाऊ अचलोजी व राघोजी, भाचा यशवंतराव या चौघांचा एकाच वेळी खुन केला. तेव्हापासून जिजाऊ मॉ साहेबांनी स्वराज्य निर्मितीचा ध्यास घेतला. अखंड सावधानता बाळगली. निजामांच्या दरबाराची पुन्हा पूनरावृत्ती होऊ नये म्हणून एकाच वेळी चार ठिकाणी स्वराज्याचे चारधाम, चार शक्तीस्थळे निर्माण केली.

शहाजीराजेंना कर्नाटक प्रांतात छोटे छोटे हिंदू राजे एकत्र करुन कर्नाटकात त्या राजांना सहकार्य केले. मोठा मुलगा संभाजी राजांना बंगळूर या शहरात १५,००० फौजेनिशी कारभार सोपविला. सावत्र मुलगा व्यंकोजीराजे (तुकाईचा मुलगा) ला तंजावर येथे शहाजीराजे व संभाजीच्या आश्रयाखाली सुरक्षित वातावरणात ठेवले. इकडे अठरापगड जातीच्या मावळयासह जिजाऊ व शिवाजी

महाराजांनी अभेद्य रायगडाला राजधानी बनवून महाराजांना सुरक्षित केले. यामुळे जिजाऊ मॉ साहेब जिवंत असेपर्यंत कधीही शहाजीराजे, संभाजीराजे, व्यंकोजीराजे शिवाजी महाराजांवरील प्राणघातक हल्ला परतवून लावण्यामध्ये मावळयांच्या सहकार्याने यश मिळत गेले.

शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक व हिंदवी स्वराज्याची स्थापना पाहून राज्याभिषेकानंतर बारा दिवसांनी १७ जून १६७४ ला त्यांनी स्वतंत्र हिंदवी स्वराज्यात शेवटचा श्वास घेतला. वयाच्या ७६ व्या वर्षी राष्ट्रमाता जिजाऊंनी रायगडाच्या पायथ्याशी असलंल्या पाचाड गावी वृद्धापकाळाने निधन झाले. या गावी राजमाता जिजाबाईची समाधी आहे.

**निष्कर्ष :—**

जिजाऊ तुम्ही नसता तर, नसते घडले शिवराय व शंभू छावा.....!
जिजाऊ तुम्ही नसता तर, मिळाला स्वराज्य ठेवा.....!
जिजाऊ तुम्ही नसता तर, नसते लढले मावळे.....!
जिजाऊ तुम्ही नसता तर, नसते दिसले विजयाचे सोहळे.....!

हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी छत्रपती शिवरायांना ज्ञान, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्वगुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता. आपल्या मनात तयार असलेली हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचलं. कठोर परिश्रम घेतले. दोन छत्रपती घडविले. रयतेच्या सुखासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. अशा मॉ जिजाऊला मानाचा मुजरा.

मुजरा माझा त्या मॉ जिजाऊला
घडविले तिने त्या शूर शिवबाला
साक्षात होती आई भवानी
जन्म घेतला तिच्या पोटी शिवानी
जय जिजाऊ.....! जय शिवराय.....!

**संदर्भ :—**

१. राजमाता जिजाबाई — कर्वे स्वाती, २०१४ (१०१ कर्तृत्ववान महिला) पुणे : उत्कर्ष प्रकाशन
२. जिजाऊ चरित्रातून काय शिकावे
३. आदर्श राजमाता जिजाऊ

# २७. महात्मा गांधी: सत्याग्रह चळवळ आणि स्वातंत्र्य एक दृष्टिक्षेप

**डॉ. प्रा. कारभारी लक्ष्मण भानुसे**
इतिहास विभाग
शिवाजी महाविद्यालय कन्नड ता.कन्नड जि. औरंगाबाद
मो. न.9890588189

**प्रास्ताविक:-**

महात्मा गांधी हे श्रेष्ठ मानवतावादी होते. भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला त्यांनी नेतृत्व दिले आणि भारतीय राष्ट्रवादाचा आधार मानवतावाद कसा आहे हे आधुनिक जगाच्या निर्देषनास आणून दिले. इ.स. 1920 नंतर महात्मा गांधीच्या असहकारीता लढयास प्रारंभ झाला. केवळ भारतातीलच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एका अभिनव लढयाला सुरूवात झाली. अहिंसात्मक प्रतिकाराची कल्पना महात्मा गांधी पुर्वी होती. परंतु गांधीजींच्या नेतृत्वाखालील सत्याग्रहाला लढा त्याहून वेगळा आणि देषव्यापी होता. महात्मा गांधीनी राजकारणात जेव्हा प्रवेश केला तेव्हा एक प्रकारे देषातील स्वातंत्र्याची चळवळ कुंठीत बनली होती. काँग्रेसमधले जूने नेतृत्व असंगत होत चाललेले होते त्याचप्रमाणे आंदोलनाचे पुर्वीचे मार्ग परिणामकारक वाटत नव्हते. या परिस्थितीत गांधीजींनी सुरू केलेल्या आंदोलनाचे पूर्वीचे मार्ग परिणामकारक वाटत नव्हते. या परिस्थितीत गांधीजींनी सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या चळवळीमुळे भारतात नवचैतन्य संचारले होते. नवी आषा निर्माण झाली.

भारतीय राजकीय क्षितिजावर गांधीजीच्या रूपाने नवीन तारा उदयास आला एकुण इ.स. १९२० ते स्वातंत्र्याप्राप्तीच्या पर्यंतच्या कालखंडास ‘गांधी युग’[१] म्हणून संबोधले जाते.

**महात्मा गांधी आणि सत्याग्रह:-**

गांधीजीच्या मानवतावादी दृश्टीकोनाबद्दल बोलताना तर्कतिर्थ लक्ष्मणषास्त्री जोषी म्हणतात की, “आधुनिक जगात राश्ट्रवादाचा उदय होऊन अडीचषे वर्शे झाली त्यात माझे राश्ट्र आहे. राश्ट्राकरिता मी आहे. राश्ट्र माझ्याकरीता आहे. असा अभिमान भरलेला होता. उलट मी भारताचा आहे म्हणून सर्व मानव जातीच्या कल्याणाकरिता मी जगले पाहिजे असे भारतीय अध्यात्मवाद मला सांगतो. अषी धारणा महात्मा गांधीच्या हृदयात वसत होती.”[२] म्हणूनचे भारताचा स्वातंत्र्य लढा इतर

राष्ट्रांच्या लढयापेक्षा वेगळा लढला गेला हा वेगळा प्रकार म्हणजे सर्व मानवव्यापी प्रेमाच्या आधारावर लढलेला निषस्त्र लढा होय. हुकूम गाजविणाऱ्या राष्ट्राबद्दल म्हणजे ब्रिटन बद्दल द्वेश उत्पन्न न करता प्रेमाचे अधिश्ठान देवून जनतेला स्वातंत्र्याच्या लढयामध्ये सामील करून घेतले अषा सर्वव्यापी मानवी प्रेमाच्या अधिश्ठानावर राश्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा तो पण यषस्वी जगाच्या इतिहासात प्रथम लढला गेला. याचे कारण सत्ताधारी हा षत्रू नाही. त्याच्यातसुध्दा विवेकबुध्दी आहे. त्याच्या हृदयावरील मोहाचे बंधन नष्ट करणे आणि त्याच्यात सद्सदविवेक जागृत करणे म्हणजेच षत्रूच्या हृदयाचा पालट करणे हे आपले कर्तव्य आहे. हे महात्मा गांधीजीनी षिकविले तो मार्ग म्हणजे सत्याग्रहाचा आणि यामार्गाने गांधीनी भारताचा स्वातंत्र्य लढा यषस्वी केला.

महात्मा गांधीजीनी सत्याग्रहाचा विकास दक्षिण आफ्रिकेतील आंदोलनात केला आणि त्यांचे पालन भारतात इंग्रजी राज्य व देषीराजे आणि सामंतवादी षासनाच्या परिस्थितीतून झाले.[३] महात्मा गांधीजीची सत्याग्रहाची सुरूवात दक्षिण आफ्रिकेत इ.स १८९३ ला झाली. त्या विश्काराला सत्याग्रह हा षब्द देण्याकरीता दहा वर्शे लागले. महात्मा गांधीच्या सत्याग्रहाचा आत्मा हा ईसाई धर्म ग्रंथ बायबल आणि ईसाई पादरिच्या व्याख्यानी प्रभावित होती.[४]

महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह संकल्पनेवर रूसी षांततावादी विचारक लियो टालस्टायचा प्रभाव होता. टालस्टायने जे सांगितले की, ”द्वेश करायचा असेल तर पापाषी करा, परंतु पाप करणाऱ्याविषयी करू नका.“[५] महात्मा गांधीनी कर्ता आणि कार्य यात भेद केला आपला विरोध कर्ताषी न करता त्याच्या कर्माषी विरोध करा.[६] महात्मा गांधी टालस्टायच्या या विचारांषी ही प्रभावित झाले होते की, ”हिंसक युध्दात जसे योध्दाला पूर्ण लढाईचे प्रषिक्षण देणे गरजेचे आहे.“[७] म्हणजेच सत्याग्रहीला सत्याग्रहाने साध्य आणि साधनाचे पूर्ण ज्ञान आवष्यक आहे. त्याने सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने चालण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे. त्याच्या विरूध्द असामाजिक तत्ववाल्याकडून सत्याग्रहाच्या आंदोलना दरम्यान जाणून बुजून त्यांना भडकिवणाऱ्या हिंसेचा सहारा घेतला गेला तर त्याला अषा व्यक्तीपासून स्वतःला वाचविणे व प्रतिकार करता आला पाहिजे त्याचवेळी त्याला अषा रचनात्मक कार्यक्रमात सक्रीयपणे सहभागी होवून त्याच्या व विरोधी मधले संघर्शाचे संबंध कमी झाले पाहिजे व सहयोग वाढला पाहिजे याकरीता व्यक्तीला प्रषिक्षणाची आवष्यकता आहे यासाठी साबरमती आश्रमासारखे प्रषिक्षण केंद्राचे आयोजन केले गेले.[८]

लोकमान्य टिळकांप्रमाणे महात्मा गांधीने हे मान्य केले की, अधिकार हक्क हे दान भिक्षेतून मिळत नाही ते मागिल्याने मिळतात. त्याकरीता संघर्श करावा लागतो. परंतु तो संघर्श अहिंसेच्या

मार्गाने पाहिजे.[९] महात्मा गांधीजीना त्यावेळीच्या पष्चिम देषातील शांतीपूर्ण आंदोलनाची माहिती होती. विषेशता आर्यलंडच्या महिलांनी आपल्या अधिकारा करिता केलेल्या, श्सिनफिनश् नावाच्या आंदोलनाने प्रभावित झाले होते या आंदोलनामुळे संघटना आणि एकता या गोश्टींची महत्व लक्षात आले. त्याचबरोबर ओळखले की, आंदोलन हे वैयक्तिक नेत्याद्वारे केल्या पेक्षा सामुहिक किंवा सार्वजनिक रूपाने केले पाहिजे या सत्याग्रहाला ते रूप दिले पाहिजे या सत्याग्रहाला त्यामुळे यात जास्तीत जास्त लोक जमले पाहिजे त्यावरच सत्याग्रहाचे आदोलन यषस्वी होईल. महात्मा गांधीजी नेहमी म्हणयचे की, ”भारताला स्वराज्य त्या दिवषी मिळाले ज्या दिवषी स्वराज्य मिळविण्याचा संघर्शात सर्व भारत एकत्र येईल.“[१०] यावरून कळते की, भारताला स्वांतत्र्य देण्यात महात्मा गांधीजी असे व्यक्ती होते. ज्यांनी सत्याग्रहाच्या आंदोलनाला सुसंगठित लोक आंदोलनाचे रूप दिले ज्यामुळे त्याचे महत्व वाढले व यषस्वी झाले.

**सत्याग्रहाचे आधारभूत सिध्दांत:-**

महात्मा गांधीजींना जगाचा इतिहास माहित होता. त्यांचा विष्वास होता की, जगात हिंसेने अथवा युध्दाने प्रष्न सुटणार नाहीत युध्दाने प्रष्न काही काळा करता टळतात. षक्तीषाली राश्ट्रे गरीब राश्ट्रांना हरवून जबरदस्तीने आपल्या गोश्टी मानन्यास भाग पाडतात. परंतु यामुळे पूर्ण समाधान निघत नाही. कोणतीही गोश्ट स्वःइच्छेने स्वीकारली गेली पाहिजे. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्याने हिंसा वाढते ती समस्या सुटत नाही. हिंसेविरूध्द त्याच्या उलट षक्तीने म्हण्जेचे अहिंसेने उत्तर दिले पाहिजे. अहिंसा ही हिंसेला मारू षकते यावरून सिमो पेटर ब्रिक या निश्कर्शा पर्यंत पोहोचले की, ”गांधीजींनी संघर्शाचा स्वीकार केला परंतु हिंसेचा नव्हे.“[११] याच आधारावर के.एल.श्रीधरांनी म्हटले की, महात्मा गांधीच्या सत्याग्रहाला ‘हिंसा वहिन युध्द’ ची संज्ञा दिली.[१२]

**सत्याग्रहाची परिभाशा:-**

सत्याग्रह, संस्कृत भाशेचे दोन षब्द आहेत. सत् आणि आग्रह या संधीने बनला आहे. [१३] ”याचा षाब्दीक अर्थ आहे की सत्याकरिता आग्रह करणे सत्या करिता संघर्श करणे आणि दुसरी नकारात्मक रूपाने अर्थ आहे की असत्य अथवा अन्याय विरूध्द संघर्श.“[१४]

महात्मा गांधीच्या सत्याग्रहाची सुरूवात दक्षिण आफ्रिकेत झाली. सुरूवातील महात्मा गांधी याला कोणती सज्ञा देवू षकले नाही. त्यांनी आयरिष महिलांच्या सिनफिन आंदोलनाची प्रचलित शब्द ‘निशक्रिय प्रतिरोध’.[१५] चा उपयोग केला परंतु पुढे हा शब्द परस्पर विरोधी वाटला यात त्याचे तेरा वर्शे गेले इ.स.१९०६ ला त्यांनी इंडियन ओपीनियन नावाच्या विचारपत्राच्या वाचकाकडून मते

मागविली तेव्हा मगनलाल गांधी यांनी सदाग्रह हे नाव सुचविले.[१६] याचा अर्थ कोणत्याी चांगल्या अंती सत्याग्रह हे नाव दिले म्हणजे त्यांच्या अहिंसेच्या अविश्कारला सत्याग्रह हे नाव देण्याकरिता तेरा वर्श लागले. महात्मा गांधीजी म्हणतात, सत्याग्र्रह हे भिणाऱ्याचे काम नव्हे नैतिक षक्ती पेक्षा श्रेश्ठ असते यात हिंसक युध्दापेक्षाही अधिक शौर्य पाहिजे अषाप्रमाणे सत्याग्रह हे शुरविरांचा संघर्श आहे भिणाऱ्याचा नाही.[१७]

**सत्याग्रहाचा उद्देष:-**

सत्याग्रह नैतिक अधिकार, स्वातंत्र्य प्राप्त करण्याचे साधन आहे त्यामुळे राज्यांनी सर्व लोकांकरिता उपलब्ध करून दिले पाहिजे. सत्याग्रह म्हणजे कायद्याचा विरोध करणे नव्हे तर त्या कायद्यातील चुकीच्या गोष्टीचा विरोध करणे होय.[19] महात्मा गांधीजीच्या म्हणण्यानुसार, ''सत्याग्रहाचा प्रयोग कोणत्याही अषा उपदेषाच्या प्राप्ती करता केला जावू षकतो की ज्यात स्वार्थ नसला पाहिजे त्यात समाजाचे कल्याण असले पाहिजे. सामाजिक, राजनैतिक व आर्थिक परिवर्तना करिता हे एक सकारात्मक उत्तम साधन आहे.''[20] म्हणजेच महात्मा गांधीजीच्या सत्याग्रहात स्वार्थाकरिता कोणतेही स्थान नाही यात फक्त सामुहिक व सार्वजनिक हिताला प्राधान्य.

**निष्कर्ष:-**

महात्मा गांधीनी आपल्या मोठया राजनैतिक जीवनात उपयुक्त साधनाचा प्रयोग करून एकुण 31 सत्याग्रहाचे आंदोलन केले. त्यात प्रामुख्याने सविनय कायदेभंग, चले.जाव आंदोलन होते. या माध्यमांद्वारे असत्य, अन्याय, भेदभाव विरूध्द सतत संघर्श केला यामुळे त्यांनी प्रतिपक्षाचे हृदय जिंकले. महात्मा गांधींनी फक्त प्रष्न मांडले नाही तर ते प्रष्न सोडविण्याचे साधने (उत्तरे) षोधली.

महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह आंदोलनामुळे जनजागरण होवून गरीब निरक्षर लोक सत्याग्रही बनले यांच्यानंतर गांधीजी स्वःता 'बॅरिस्टर' ते महात्मा बनले. दिवाकर म्हणतात, ''सत्याग्रह एक असे साधन होते की, ज्याने महात्मा गांधीजींना महात्मा बनविले.'' सत्याग्रहामुळे कोणाचे नुकसान न होता चांगलेच होते. यामुळे विरोधी न्याय सत्य या वाटेवर परत येतो. सत्याग्रहाची आत्मा महात्मा बनती थोडक्यात सत्याग्रहामुळेच भारताला स्वातंत्र्य मिळाले ते एक प्रमुख साधन ठरले.

**संदर्भसूची**


1. शिंदे रामजी, गांधी विचार, मानक पब्लिकेषन दिल्ली, 1995 पृ. क्र.6
2. लोकराज्य, महात्मा गांधी माणुसकीची मषाल, आधुनिक जगात महात्मा गांधीजीचे स्थान, ऑक्टो 2010 पृ. क्र.14
3. रामरतन गांधीजी कन्सेप्ट ऑफ पालिटिकल आप्लिगेषन कलकत्ता, मिनर्वा एसोसिएट,1972 पृ. क्र.162
4. जोसेफ जे. डोक,एम.के.गांधी न्यु दिल्ली पब्लिकेषन डिव्हीजन भारत सरकार 1972 पृ.क्र.84
5. सिमोन पेंटर ब्रिक, गांधी अगेन्स्ट, मॅक्वालिजम, मुंबई 1966 पृ. क्र.326,28
6. रामरतन उपरोक्त पृ. क्र.228
7. रामरतन उपरोक्त पृ. क्र.63
8. गोपिनाथ धवन, राजकीय तत्वज्ञ महात्मा गांधी, न्यु दिल्ली 1990 पृ. क्र.25,26
9. रामरतन उपरोक्त पृ. क्र.95
10. षोभिका षारदा, गांधीजी कन्सेप्ट ऑफ स्वराज्य, दिल्ली 1983 पृ. क्र.409
11. षोभिका षारदा, उपरोक्त पृ. क्र.383
12. कित्ता पृ. क्र.383
13. श्रीधरी के.एल.वार विदआउट वायरलेस 1939 पृ. क्र.11
14. रामरतन उपरोक्त पृ. क्र.160
15. रामरतन उपरोक्त पृ. क्र.160
16. षोभिका षारदा, उपरोक्त पृ. क्र.411
17. रामरतन उपरोक्त पृ. क्र.221
18. रामरतन उपरोक्त पृ. क्र.173
19. रामरतन उपरोक्त पृ. क्र.52
20. हरिजन 09.09.1933 पृ. क्र.6

# २८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

**डॉ. मनोज उत्तमराव पाटील**
तत्त्वज्ञान विभागप्रमुख
पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता जि. अहमदनगर
ई. मेल. akshymanoj@gmail.com
मोबाईल नं. ९९७०५४४१०१

**प्रस्तावनाः**

ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राच्या जडणघडण करण्यात ज्या थोर पुरूषांनी मोठा वाटा उचलला त्यापैकी राजर्षी शाहू एक होते. राजर्षी शाहू महाराज हे प्रगतीशील विचारवंत होते. त्या काळात पुरूषप्रधान समाजात रूढी परंपरा आणि अंधश्रध्दांचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर सतत अन्याय होत होते. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराजांच्या एकंदरीत कार्याचा आढावा घेता, समाजातील उपेक्षित घटकाला प्राधान्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

" सामाजिक समतेच्या तत्वाचे पुरस्कर्ते आणि कृतीशील राजे म्हणून राजर्षी शाहू महाराजांकडे पाहिले जाते. त्यांची कारकीर्द म्हणजे न्याय, समतावाद आणि तत्वनिष्ठतेची कारकीर्द होय . " विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा कार्यप्रवण राजा समाजहितासाठीच कार्यरत होता. " शाहु राजांनी आपल्या सत्तेचा उपयोग समाजातील सर्व वंचित घटकाला शिक्षण देऊन त्यांच्यात जाणीव, जागृती निर्माण केली. १९ व्या शतकात बहुजन समाज हा अज्ञानी, दरिद्री व दुर्लक्षित होता . हे सर्व शिक्षणाच्या अभावामुळे घडले होते, हे महाराजांना जाणवत होते. बहुजन समाजात फक्त बोटावर मोजण्या इतके मॅट्रिकपास होते. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या. त्या काळात शिक्षणाचा हक्क फक्त उच्चवर्गातील धनिक, जमिनदार यांनाच हक्क होता. गरीब, दलित व स्त्री यांनी शिकणे हा गुन्हा आहे. असे त्यावेळी मानले जात होते. शिक्षण हे आपले काम नव्हे ते ब्राम्हण, श्रीमंत, सावकार यांचे कार्य आहे अशी सामान्य माणसाची समजूत झाली होती. शाहू महाराज प्राथमिक शिक्षणाबाबत म्हणतात की, “शिक्षण हेच दिन दलितांचा, व बहुजनांचा तरणोपाय आहे,

शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्मत व लढवये वीर कधीच निपजनार नाहीत . म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे." असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांचे शिक्षणासंबंधी कार्य त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शिक्षणासंबंधी केलेल्या वेगवेळया कायद्यांवरून व त्यांनी राबविलेल्या धोरणांवरून आपल्या लक्षात येते.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यामध्ये प्रकाशीत, अप्रकाशीत साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालीके, साप्ताहीके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इत्यादी स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्य:**

**1. स्त्री शिक्षण विषयक कार्य :**

कोल्हापुर संस्थानाचा स्त्रीशिक्षणाविषयीचा दृष्टिकोन मुळातच पुरोगामी होता. " संस्थानात मुलामुलींच्या शाळा होत्याच, त्याशिवाय खास मुलीच्यासाठीही स्वतंत्र अशा शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषतः भुदरगडसारख्या सह्याद्रीलगतच्या मागासलेल्या भागात मुलीच्या शाळा स्थापन झाल्या होत्या." " मुलींनी शाळेत यावे त्यांनी मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे, यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. " प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घालल्याचे दिसून येते. खास करून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये एक खास हुकुम गॅझेट केला होता. त्या अन्वये अशा स्त्रियांच्या राहाण्या जेवणाची सर्व सोय राजदरबाराकडून मोफत केली जाणार होती. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबारने खास शिष्यवृत्या ठेवल्या होत्या. मुलीच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी अत्यंत उदार दृष्टी ठेवली होती. " राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलीना त्यांनी शिक्षण मोफत केले होते. " स्त्री शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होऊ शकतो म्हणून शिक्षित स्त्रियांमधून शिक्षिका तयार करणे गरजेचे आहे, या भूमिकेतून शाहूंनी " १८९८ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली आणि स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या समान संधीची आवश्यकता असल्याचे आग्रही मत व्यक्त केलेले दिसून येते. एकूणच शाहूच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील " स्त्रियांच्या साक्षरतेचा दर ०.१० टक्क्यावरून ०.३५ टक्के इतका झाला होता. '

**2. प्राथमिक शिक्षणविषयक कार्य:**

सर्वांच्या विकासासाठी शिक्षण यावर शाहू महराजांचा भर दिसून येतो. " कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याविषयीचा विचार इ.स. १९१२-१३ च्या सुमारास सुरू होता. जोपर्यंत बहुजन समाज साक्षर होणार नाही तो पर्यंत लोकशाहीना डोळसपण येणार नाही असे त्यांचे मत होते, म्हणूनच निरक्षर लोक आपल्यापर्यंत पोहचू शकणार नाही तर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी खेडेगाव घटक मानून प्राथमिक शिक्षण प्रसारास सुरूवात केली. त्यांनी २४ जुलै १९१७ सालो एक हुकुम काट्न प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. या हुकूमाप्रमाणे १५ ऑगस्ट १९१७ साली ग्रामीण भागाची पाहणी करून अहवाल देण्याचा आदेश काढला होता.

**3. " माध्यमिक शिक्षण विषयक कार्य:**

कोल्हापूर संस्थानात १८६७ मध्ये पहिली इंग्रजी पूर्व माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आली होती ती 'कोल्हापूर हायस्कूल' या नावाने ओळखली जात असे. पुढे ती 'राजाराम हायस्कुल' या नावाने ओळखली जाऊ लागली. या शाळेत मट्रिकपर्यंतचे शिक्षण दिले जात असे. परंतु पैशाच्या अडचणीमुळे तेथे विद्यार्थी संख्या रोडावली हे जाणून शाहूंनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत केले होते.

**4. उच्च शिक्षणविषयक कार्य:**

उच्च शिक्षणाचा रीतसर प्रारंभ राजाराम महाविद्यालयाच्या स्थापनेपासून झाला. "तसेच संस्कृत विषय. शिकवण्यासाठी संस्कृत महाविद्यालय सुरू करण्यात आले होते. महाराजांनी बहुजन मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. शेतीला प्राधान्य म्हणन शेतीविषयक अभ्यासक्रमाची सुरूवात केली होती. त्यांच्या प्रयत्नवादी धोरणामुळेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते."

**5. तंत्रशिक्षण विषयक कार्य:**

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी औद्योगिक, तांत्रिक, व्यावसायीक शिक्षणावर त्यांनी भर दिला होता. त्यासाठी त्यांनी १९१२ साली जयसिंगरा घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तसेच अनेक व्यावसायिक शाळा सुरू केल्या होत्या

**6. वसतीगृह योजना:**

शाहू महाराजांनी १८१६ मध्ये कोल्हापूरात सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतीगृह सुरू केलेली राजर्षी शाहूंनी प्रत्येक जातीच्या विद्याथ्र्यासाठी स्वतंत्र वसतीगृह स्थापन केले

आणि ते चालवण्यासाठी एक ब्राह्मण अधिकाऱ्याची नियुक्ती केली परंतु या वसतीगृहात १० वर्षांत केवळ ब्राम्हणच शिकले अनुभव लक्षात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्य वसतिगृहे स्थापन केली. म्हणून राजर्षी शाहू महाराजांना भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचा आद्य जनक म्हणून ओळखले जाते.”

**7. शाळांची स्थापना :-**

" सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहूंनी शाळांची स्थापना केली. उदा . पुरोहित शाळा, पाटील शाळा, सैनिक शाळा, संस्कृत शाळा. पुरोहित शाळेत वैदिक परंपरेचा विचार. खेडेगावातील सार्वजनिक कामे पाटील शाळेत पाटलांनी योग्य प्रकारे करावी, सैनिक शाळेत मराठा सैनिक चांगला सुक्षिशित व्हावा, संस्कृत शाळेत बहुजन समाजातील मुलांनी संस्कृतचे शिक्षण घ्यावे, असा शाहू महाराजांचा दृष्टिकोण होता.

**8. शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना:**

"दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्याच बरोबर तलाठी, शेतकरी, तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली. महाराजांनी त्या काळामध्ये शिक्षणाची गरज म्हणून शिष्यवृत्ती ओळखली होती व त्याच दिशेने कार्य देखली केले आहे."

**9. व्यवयायाभिमुख शिक्षण:**

व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळा व्यतिरिक्त व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या. " त्यामध्ये टेक्निकल स्कूल, राधाकृष्ण मंदिरात छत्रपती राजाराम औद्योगीक मंदिर, पदमाळा ची सरूवात, कलागृह औद्योगिक स्कूलची स्थापना, दिल्ली दरबार पाटील शाळा, सत्यशोधक शाळा आणि तलाठी स्कूलची स्थापना अशा वेगवेगळया व्यवसायाभिमुख शाळांची स्थापना महाराजांनी केलेली दिसते.

**10. कला शिक्षण:**

शाहु महाराजांनी कलांना आणि कलावंतांना प्रोत्साहन दिले होते. " संगीत कलेच्या शिक्षणासाठी त्यांनी १९१३ मध्ये देवल क्लबचा आरंभ केला होता. त्यात त्यांनी शाहीर, मल्ल, कलावंत यांना आश्रय दिला होता. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहीरीला उत्तेजन दिले. अनेक शाहीरांना सहाय्य केले, यावरुन त्यांच्या रसिक मनाची साक्ष पटते. शाहीर तगासगीर, सत्यशोधक

जलसेवाले नी कवी या सर्वांना त्यांनी सहाय्य केले . त्यामुळेच त्यांच्या कलेचा विकास झाला आणि शैक्षणिकदृष्ट्या बहुजनसमाज प्रगतीपथावर आला.

**11. क्रिडा शिक्षण:**

" शाहू महाराजांनी गावोगावी तालमी, आखाडे स्थापन करण्यास मदत केली, जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा, फरीगदगा, बरची, माला, विटा, बाणा, जविया इत्यादींचे शिक्षण तालमित सुरू झाले. मल्लविद्येबरोबरच शस्त्रविद्येत गावोगावचे तरूण पारंगत होऊ लागले. स्पर्धेशिवाय प्रगती नाही हे त्यांनी जाणले होते. मल्लांच्या लढती वारंवार करावयाच्या ठरवून जत्रा-उत्सवाच्या व अन्य मंगल प्रसंगी कुस्त्यांचा शौक वाढीस लावला.

**निष्कर्ष:**

शाहू राजांनी आपल्या सत्तेचा उपयोग वंचित अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्यात जाणीव, जागृती निर्माण केली. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही. असे इतिहास सांगतो, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्मत व लढवये वीर कधीच निपजनार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे. असे त्यांचे मत होते. खास मुलीच्यासाठीही स्वतंत्र शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषतः मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे. यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घालल्याचे दिसून येते. खास करून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये एक खास हुकुम गॅझेट केला होता. एकूणच शाहूंच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर ०.१० टक्क्यावरून ०.३५ टक्के इतका झाला होता. त्यांनी २४ जुले १९१७ साली एक हुकुम काढून प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत केले होते. राजाराम व संस्कृत महाविद्यालये सुरू करून महाराजांनी बहुजन मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. त्यांनी १९१२ साली जयसिंगराव घाटगे टक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करून तांत्रिक शिक्षणाची सुरुवात केलेली दिसून येते. राजर्षी शाहूंनो प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र वसतीगृह स्थापन करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलेले आहे तसेच वेगवेगळ्या शाळांची स्थापना केलेली दिसते, तसेच दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा. त्याच बरोबर तलाठी, शेतकरी, तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली होती. तसेच व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या. तसेच महाराजांनी संगीत कलेच्या

शिक्षणासाठी त्यांनी १९१३ मध्ये देवल क्लबचा आरंभ केला होता. त्यांनी शाहीर, मल्ल. कलावंत यांना आश्रय दिला होता. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहीरीला उत्तेजन दिले. अनेक शाहीरांना सहाय्य केले आहे. तसेच शाहू महाराजांनी गावोगावी तालमी. आवाडे स्थापन करण्यास मदत केली. जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा, फरोगदगा, बरची, भाला, विटा, बाणा, जबिया इत्यादी चे शिक्षण तालमित सुरू केले होते .

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. घोरमोडे के . यू . , घोरमोडे कला ( २००६ ) , शैक्षणिक विचारवंत : भारतीय व पाश्चात्य विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. क्र . १७ .
२. बैनवाड रमेश रा., कदम एस. के. ( २०१२ ) , राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता, करपे आर, एन. ( संपा. ) राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद , पृ . क्र . ६८.
३ . कित्ता पृ.क्र.६९ .
४. डोईफोडे ज्योती ( २००५ ) , मूलभूत सामाजिक विचार , विद्या बुक्स पब्लिशर्स , औरंगाबाद . पृ.क्र . २६५ .
५. पवार जयसिंगराव ( संपा. ). ( २००७ ) , राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ , महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी. कोल्हापूर , पृ.क्र . १२२
६ . कित्ता, पृ . क्र . १२३ .
७. कित्ता , पृ . क्र . १२३ . .
८. ठोसर सांगता , कुलकर्णी दिपाली ( २०१२ ) , राजषा शाहू आणि स्त्री प्रश्न : अब्राम्हणी पर्यायाच्या दिशेने ,करपे आर . एन . ( संपा . ) राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ , चिन्मय प्रकाशन , औरंगाबाद , पृ . क्र . १५५ .
९ कित्ता , पृ . क्र . १५५
१०घोरमोडे के . यु . , घोरमोडे कला ( २००६ ) , शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य , विद्या प्रकाशन नागपूर, क्र.२५-२६११.
११. कित्ता पृ . क्र . २७ .

# २९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गोवंश हत्या संदर्भात धर्मचिकित्सा

**विजय ज्ञा□बा साळवे**
संशोधक छात्र (विद्यावाचस्पती)
पाली आणि बुध्दिझम विभाज,
डॉ.बाबासाहेब आंबेडज र,मराठवाडा विद्यापीठ, औरंजाबाद
E-mail: - vijaysalve950006@gmail.com
चलभाष्य : 9923950006

**मार्जदर्शज**

**डॉ.बाबासाहेब दगडू कोकाटे**
प्राध्यापज , पदवी व पदव्युत्तर हिंदी विभाज
प्रमुज तथा संशोध-न मार्जदर्शज
बलभीम महाविद्यालय,बीड ता.जि.बीड
चलभाष्य : 9545154555

**सहाय्यज मार्जदर्शज**

**डॉ.भदंत एम.सत्यपाल महाथेरो**
सहाय्यक प्राध्यापक, पाली आणि बुध्दिझम विभाज प्रमुज
तथा संशोधन मार्गदर्शक
मिलिंद महाविद्यालय,नागसेनवन,औरंगाबाद
चलभाष्य : 9403752408

---

**पार्श्वभूमी :**

विश्वभूषण बाबासाहेब डॉ.भिमराव रामजी आंबेडकरांचे धर्म चिंतनाधीन संशोधन अव्वल दर्जाचे होते, त्यांच्या इतका धर्माचा अभ्यास भारतीय इतिहासात तरी क्वचीत जणांनी केला आहे. त्यांचा इतर ज्ञा-न शाखांबरोबर धर्म हा प्रमुख चिंतन व संशोधनाचा विषय राहिला आहे. धर्मांतर हा काही पोरखेळ नव्हे,[01] या प्रजर जाणीवेतून त्यांनी 1935 साली केलेली धर्मांतराची घोषणा 1956 ला खरी करून दाखवली, म्हणजे तब्बल 21 वर्षांनी त्यांनी आपला मूळधर्म अर्थात बौध्द-धम्म स्विकारला. या 21 वर्षाच्या कालखंडात त्यांनी सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास करण्याबरोबरच हिंदू-ब्राम्हणी धर्माचा देखील कसून अभ्यास केला. स्वताला व समाज बांधवां-ना हिंदू-ब्राम्हणी धर्मात उपेक्षीत अस्पृश्य स्वरूपाची वागणुक मिळत असूनही ते स्वताला प्रोटेस्टंट हिंदू म्हणत,[02] व आपण हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणुच, असा ठाम आशावाद व्यक्त करीत. परंतू जेंव्हा हिंदू-ब्राम्हणी धर्मीयांनी त्यांच्या हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याच्या अथक प्रयत्नांना खीळ घालून त्यांची उपेक्षा

जे ली, तेंव्हा बाबासाहेबांनी हिंदू-ब्राम्हणी धर्म त्यागण्याचे सुतोवाच केले. त्यांना धर्मत्यागापासून थांबवण्यासाठी अनेक ब्रम्हवृदांनी प्रयत्न केले, त्यामध्ये तत्कालीन शंकराचार्य डॉ.कुर्तकोटी हेही होते.[03] बाबासाहेबांच्या धर्मांतर चळवळीस काही ब्रम्हवृंद,-मातंग समाजातील के.के.सकट नावाच्या व्यक्तीद्वारे अप्रत्यक्ष विरोध करत असत, तेंव्हा बाबासाहेबांनी समस्त ब्रम्हवृंदाना आवाहन केले की, मी माझा धर्मांतर निर्णय मागे घेण्यास तयार आहे, परंतू के.के.सकटांना एक वर्षासाठी शंकराचार्य करावे व त्यांची दररोज शंभर ब्रम्हवृंदांनी पाद्यपुजा करावी.[04] या आवाहनाला ब्रम्हवृंदांनी प्रतिसाद न देता काढता पाय घेतला. ब्रम्हवृंदांच्या सांगीने सकट विरोध करत असल्यामुळे बाबासाहेबांनी रणनितीचा भाग म्हणून सदर खोचक अट जाणीवपूर्वक घातली होती. या सर्व बाबींच्या अनुषंगाने हिंदू-ब्राम्हणी धर्म चिकित्सा व संशोधनाचा एक भाग म्हणून बाबासाहेबांनी 1948 साली लिहिलेल्या अस्पृश्य मूळचे कोण ? आणि ते अस्पृश्य कसे बनले ? या संशोधीत ग्रंथाकडे पाहता येईल.

**संशोधनातील गतिरोध :**

अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले ग्रंथाची भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणतात, [05] एखाद्याने ब्राम्हणी साहित्यातील कावा उघड करून सांगण्याचा प्रयत्न केला तर ब्राम्हण पंडीत मुळीच सहनशीलता दाखवीत नाहीत, ही बाब चीड आणणारी आहे. ब्राम्हण पंडीत जेथे आवश्यक आहे तेथे स्वताही मुर्तीभंजकाची भूमिका बजावीत नाही आणि ज्या अब्राम्हणांमध्ये अशी भूमिका पार पाडण्याची पात्रता असते, त्यालाही हा ब्राम्हण पंडीत तसा प्रयत्न करू देत नाही. एखाद्या अब्राम्हण विद्वानाने तसा प्रयत्न केला तर ब्राम्हण पंडीत त्याच्याविरूध्द गुप्तपणे कट उभारतात, त्याची उपेक्षा करतात, एखाद्या गौण स्वरूपाच्या कारणावरून त्याची निंदा करतात किंवा त्याचे कार्य निरर्थक असल्याचा शिक्का मारून टाकतात. ब्राम्हणी साहित्यातील दोष उघड करून सांगण्याचा प्रयत्न ज रणारा एक लेखक या नात्याने अशा प्रकारच्या नीच कटाला मी नेहमीच बळी पडत आलेलो आहे. बाबासाहेबांविरूध्द ब्रम्हवृंदांनी उभारलेला कट म्हणजे मनुस्मृती-ने अनुलक्षलेली आज्ञाच होय, कारण मनुस्मृतीने धर्मग्रंथांनी चिकित्सा करणे हा धर्मद्रोह मानला आहे, आणि असा धर्मद्रोह ब्राम्हणाने जरी केला तरी त्याला वाळीत टाकण्याची कठोर शिक्षा सुनावली,[06] आहे. या सर्व परिप्रेक्षात उपरोक्त निर्देशीत ग्रंथाद्वारे बाबासाहेबांनी ब्रम्हवृंदांचे अंतरंग उघडे पाडले आहेत.

**संदर्भाधी-न संशोध-न :**

विद्यमान सत्तांध ब्रम्हवृंद व ब्राम्हण्याचा परिपोष करणाऱ्या त्यांच्या सर्व संलग्नीत संघटना गोवंश हत्या बंदीसाठी प्रयत्नशील आहेत, तथापि प्राचीन कालखंडातील ब्रम्हवृंदाचे पूर्वज गोवंशाच्या मांसाचे प्रचंड चाहते होते व त्यांचेद्वारे गोमांस येथेच्छ भक्षण करण्यात येत असे. तत्काळात ब्राम्हण व अब्राम्हण हे जोमांस भजज होते, याची अतिशय चपखल उदाहरणे बाबासाहेबांनी दिली आहेत, यासाठी त्यांनी ऋग्वेद, वाजसनेयी संहिता, तैतरिय ब्राम्हण, आपस्तंभ धर्मसूत्र, गृह्यसुत्र, बहुते गृह्यसुत्र, वेद, हिरण्य गृह्यसूत्र, आपस्तंभ जृह्यसूत्र, ऐतरेय ब्राम्हण, मनुस्मृती मधील संस्कृत श्लोक, वेदण्यास स्मृती, ब्राम्हण्ये, शतपथ ब्राम्हण, अश्वलायन गृह्यसुत्र, अपरार्क गृह्यसुत्र, पराय गृह्यसुत्र, कुटदंत सुत्र, कोशिक सुत्र आदींचा आधार घेऊन गोवंश हत्यासंदर्भात अतिशय चिकित्सक मांडणी केली आहे.

बौध्द धर्म व ब्राम्हण धर्म यांच्या संघर्षाच्या धुमश्चक्रीतून एकेकाळी गोमांस भक्षक असणाऱ्या ब्रम्हवृंदांना आपमतलबापायी नाईलाजाने पुर्णता शाकाहारी बनावे लागले, ब्रम्हवृंदांनी केलेला बौध्द धर्मीयांचा द्वेष व तिरस्कार, वाताहात झालेल्या लोकांनी सुरू ठेवलेले गोमास भक्षण, यातून संधीसाधू ब्रम्हवृंदांनी जाणीवपूर्वक अस्पृश्यता निर्माण केली, यावरही बाबासाहेबांनी सदर ग्रंथात नाविन्यपूर्ण प्रकाशझोत टाकला आहे. गोवंश हत्या संदर्भातील बाबासाहेबांनी दिलेल्या काही पुढील प्रातिनिधीक उदाहरणांकडे पाहता येईल.[०७] वाजसनेयी संहितेची आज्ञा आहे की, गाय पवित्र असल्यामुळेच तिचे मांस भक्षण करावे, ऋग्वेद काळातील ब्राम्हण खाण्यासाठी गाईची हत्या करीत होते आणि तिचे मांस खात होते, हे दस्तुरखुद्द ऋग्वेदावरून चक्कपणे स्पष्ट होते. इंद्र म्हणतो,[०८] ते एकासाठी १५ अधिक २० बैल शिजवीतात, ऋग्वेदाचे कथन आहे की, अग्निदेवतेसाठी घोडे, बौल,सांड, वांझ गाई आणि बकऱ्यांचा बळी दिला.मनुस्मृती म्हणते,[०९] पितृ जर बारा वर्ष स्वर्गात राहावयाचे असतील तर 'वार्ध-नस्य' नावाचा विधी केला पाहिजे अर्थात पाणी पिताना ज्या बोकडाचे कान पाण्याला स्पर्श करतात, असा बोकड भोजनासाठी ब्रम्हवृंदांना कापला पाहिजे. असा बोकड काश्मीरमध्ये पाहावयास मिळतो.

ऋग्वेदाच्या १०-१२,१६ ऋचांवरून दिसून येते [१०] की गाई तलवारीने किंवा कुऱ्हाडीने मारण्यात येत असत. तैतरीय ब्राम्हणात कामेष्टी यज्ञाचे वर्णन आले आहे, कोणत्या प्रकारच्या गाईंचा व बैलांचा बळी कोणत्या देवाला दिला पाहिजे, हे सदर यज्ञात सांगण्यात आले आहे. तैतरीय ब्राम्हणातच पंचशारदीय सेवा यज्ञाचा निर्देश आलेला आहे. यातील अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे त्यात १७ (सतरा) वाशिंटरहित (नवाट न चमटिलेल्या/ठेसलेल्या) खुज्या गोऱ्ह्यांचा व तितक्याच तीन वर्षाच्या आतील वयाच्या कारवडींचा बळी द्यावा, असे सांगितले आहे.

**जोमांसाची भयंकर लालचच :**

आपस्तंभ धर्मसूत्र म्हणते,[११] गाय आणि बैल पवित्र असल्यामुळेच त्यांचे भक्षण करण्यात यावे. गृह्यसुत्रामध्ये सांगितलेल्या मधुपर्काचा विधीही लक्षात घेण्याजोगा आहे. मधुपर्क मांसाशिवाय होऊच शकत नाही, असे वेदांचे म्हणणे असून कोणी जर मांस अर्पण करण्यास असमर्थ असेल तर शेंगदाने शिजवून अर्पण करावेत.[१२] मधुपर्क हा विशिष्ट महत्वाच्या पाहुण्यांसाठी करण्यात येत असे व त्यात बहुधा गाईचे मांस असे. पाहुण्यांच्या सत्कारासाठी गाय कापण्याची प्रथा इतक्या स्तराला पोहचली होती की, पाहुण्याला 'जोध्न' म्हणजे गायमाऱ्या म्हणण्यात येत असे.[१३] अर्थात गोमांस खाल्ल्यावाचून ब्राम्हण हा ब्राम्हण राहू शकत नसे.[१४] याचा दुसरा अर्थ जो ब्राम्हण गोमांस खात नाही, तो ब्राम्हण नव्हेच, किंवा नाही.

मगधमधील खाणुमत नावाच्या ब्राम्हणगावात कूटदंत नावाचा ब्राम्हण महायज्ञ करू इच्छित होता, त्यासाठी त्याने सातशे बैल, सातशे वासरे, सातशे गाई, सातशे बकऱ्या आणि सातशे मेंढ्यांना खांबाला बांधून ठेवलेले होते. या समस्त प्राण्यांची महायज्ञात आहुती देण्यात येणार होती, परंतु तथागत बुध्दांनी कूटदंताला यज्ञातील फोलपणा निदर्शनास आणून दिला, व त्याला त्यापासून परावृत्त केले. याचे सविस्तर वर्णन बौध्द वाङ्मयातील कूटदंत सुत्रात [१५] आले आहे. पशूंना अतिशय निर्दयीपणे यज्ञात मारण्यात येत असे, याचे दाखले ऐतरेय ब्राम्हणात मिळतात. कोण्या एका राजाच्या अधिपत्य व नियंत्रणात चंबळा नदीच्या काठावर केलेल्या यज्ञ

ाात मारलेल्या गाईंच्या चर्मांचे ढीग तेथे पडल्यामुळे त्या नदीला चर्मण्वती नाव मिळाल्याचे आढळते.[१६] यज्ञामध्ये पशू मारला जात असताना त्याचे कोणते अवयव कोणी घ्यावेत, यावरून ब्रम्हवृंदांत भांडणे होत होती.[१७] भांडणे टाळण्यासाठी मारण्यात आलेल्या पशूचे कोणते भाग कोणी घ्यावेत, या विषयी नियम केलेले आढळतात. जे पशूंची नियमानुरूप वाटणी करतात ते स्वर्गाला जातात, आणि जे असे करत नाहीत, ते पापी होत, असे सांगण्यात आले आहे.[१८]

मनस्मृती म्हणते, यज्ञानिमित्त ब्राम्हणांनी मांस भक्षण करणे हा दैवी विधी आहे, परंतू ब्राम्हणांनी अन्य प्रसंजी मांस जाजे हा राजस विधी होय.[१९] "यथाविधी नियुक्ती झाल्यानंतर (यज्ञामध्ये पुरोहित म्हणून नियुक्ती झ ाल्यावर) जो मनुष्य मांस खाण्यास नकार देतो, तो मेल्यानंतर २१ (एकेविस) जन्मापर्यंत पशू होतो." येथे म-नु अर्थात सुमती भार्गव मांस भक्षण अनिवार्य ठरवितो.

उपरोक्त माहिती सारखीच अगदी समान अनेक उदाहरणे बाबासाहेबांनी दिली आहेत. विशेष म्हणजे संस्कृत उद्‌धरणासहीत बाबासाहेबांनी त्याचे विश्लेषण केले आहे, उपरोक्त उदाहरणे म्हणजे बाबासाहेबांनी सविस्तर मांडणी केलेल्या माहितीचा केवळ संक्षेप आहे. पुढे बाबासाहेबांनी सदर ग्रंथातच प्रश्न उपस्थित केला आहे की, ब्राम्हण शाज ाहारी कशामुळे बनले ? व या प्रश्नाचे अतिशय बुध्दिवादी समर्पक उत्तर यांनी दिले आहे. ते म्हणतात, [२०] एकेकाळी ब्राम्हण सर्वांपेक्षा जास्त गोमांस भक्षक होते, अब्राम्हण गोमांस खात असले तरी ते दररोज खात नव्हते, ब्राम्हणांसाठी प्रत्येक दिवसच गोमांसाहाराचा दिवस होता. धर्माच्या नावावर चालणारे ब्राम्हणांचे यज्ञ म्हणजे केवळ निरापराध प्राण्यांच्या हत्येशिवाय अन्य काहीही नव्हते. हे यज्ञ अत्यंत थाटामाटाचे उत्सव असत आणि आपली जोमांसाची लालचच लपविण्यासाठी त्यावर रहस्यमय आवरण चढवण्यात येत असे. या रहस्यमयतेची, ढोंगाची व थाटामाटाची कल्पना ऐतरेय ब्राम्हणामध्ये यज्ञीय पशूंच्या हत्येसंबंधी ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्यावरून येते.

**बौध्द व ब्राम्हण संघर्षातून अस्पृश्यतेचे निर्माण :**

ब्राम्हणांनी गोमांस खाणे सोडून दिले आणि त्यांनी गाईची पूजा सुरू केली, यात त्यांचा डावपेच होता. बौध्द व ब्राम्हण यांच्यामध्ये चालू असलेल्या संघर्षात व त्याचप्रमाणे बौध्दांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ब्राम्हणांनी जी साधने वापरली त्या साधनांमध्ये या गोपूजेच्या रहस्याचे मूळ दडले आहे. बौध्द व ब्राम्हणांतील संघर्ष ही भारतीय इतिहासातील कसोटीची निर्णायक घटना आहे. एकेकाळी बौध्द धर्म हा अधिकांश भारतीयांचा धर्म होता. शेकडो वर्षेपर्यंत तो भारतातील बहुसंख्य जनतेचा धर्म म्हणून ओळखला जात होता. पूर्वी कोणत्याही धर्माने केले नसतील असे आक्रमक बौध्दीक हल्ले बौध्द धर्माने ब्राम्हणी तत्वज्ञा-नावर ज्े ले, त्यामुळे त्याचा ऱ्हास होऊ लागला. ब्राम्हण आपली चमडी वाचवून आत्मरक्षणाच्या प्रयत्नात होता. बौध्द धर्माच्या प्रसारामुळे ब्राम्हणांची जनतेतील व राजदरबारातील प्रतिष्ठा नष्ट होऊन त्यांची सर्व सत्ता संपुष्टात आली होती. आपली गेलेली प्रतिष्ठा व सत्ता परत मिळविण्यासाठी वाटेल त्या प्रकारे ते प्रयत्न करीत होते. बौध्द धर्माने जनतेची इतकी जबरदस्त पकड घेतली होती की, बौध्द धर्माची तत्वे आत्मसात करून त्याचे अतिरेज्ी प्रमाणात पालन करण्यावाचून ब्राम्हणांना बौध्द धर्माशी टक्कर देण्याचा दुसरा कोणताही मार्ग अशक्य झाला होता. प्राणीहत्या व विशेषता गोहत्या करावयास सांगणाऱ्या यज्ञप्रधान ब्राम्हणी धर्माचा अव्हेर जनतेने केला

होता, समाज मुख्यता शेती प्रधान होता व गाय हे जनावर अतिशय उपयुक्त होते. बौध्द धर्माने गोहत्येचा निषेध केल्यामुळे त्याने जनतेच्या मनाची पकड घेतली. बौध्दांवर विजय मिळविण्यासाठी गोहत्या व यज्ञाद्वारे पुजा करण्याच्या पध्दतीचा त्याग करण्यावाचून ब्राम्हणांना गत्यंतर उरले नाही. गोमांस भक्षणाचा त्याग करण्यामाजे ब्राम्हणांचा हेतू बौध्द भिक्खूंचे वर्चस्व हिसकावून घेण्याचा होता, हे ब्राम्हणांच्या शाकाहारी होण्याच्या प्रक्रियेवरून सिध्द होते. ब्राम्हण शाकाहारी का बनले ? याचे उत्तर असे की, बौध्द धर्मामुळे नष्ट झालेली ब्राम्हणांची प्रतिष्ठा त्यांना शाकाहारी बनल्यावाचून परत मिळवता येणे शक्य नव्हते. बौध्द भिक्खूंच्याही पुढे एक पाऊल टाकून केवळ गायीचे मांसच नव्हे तर सर्व प्रकारचे मांस सोडून पुर्णता शाकाहारी होण्यावाचून त्यांना गत्यंतर उरले नाही व म्हणून त्यांनी बरोबर तेच केले. ब्राम्हणांनी केवळ यज्ञ पध्दतीचा त्याग केला असता व गायीला बळी देणे बंद केले असते तर त्याचा परिणाम मर्यादीत स्वरूपाचा झाला असता, त्यामुळे ब्राम्हणांना जास्तीत जास्त बौध्दांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झाले असते, मासांन्न खाण्याच्या बाबतीत बौध्द भिक्खूंसारखेच नियम त्यांनी पाळले असते तर त्याचाही परिणाम वरील प्रमाणेच शक्य होता, यामुळे ब्राम्हणांना त्यांच्या महत्वाकांजेप्रमाजे बौध्दांवर वर्चस्व प्रस्थापीत करता आले नसते. गायीला बळी देण्याच्या प्रथेला विरोध करून जनतेच्या मनात बौध्दांनी जे आदराचे व प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले होते तेथून त्यांना पदच्युत करणे हा ब्राम्हणांचा मूळ हेतू होता.

आपल्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी फुटलेल्या नावेतील नावाड्याप्रमाणे ब्राम्हणांना दुसाहसी योजनांचा अवलंब करणे भाग होते, अतिरेकाने अतिरेक ठार मारण्याची ही निती आहे. डाव्या पंथाच्या लोकांना नामोहरज ज रज्यासाठी उजव्या पंथाचे लोक नेहमीच या नीतीचा उपयोग करीत आले आहेत. बौध्दांना हरविण्याचा एकच मार्ग उरला होता, व तो म्हणजे एक पाऊल पुढे जाऊन शाकाहारी बनणे होय.

अस्पृश्यतेच्या जन्माची वेळ व जोहत्या व गोमांस भक्षण बंदीची वेळ यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे, अस्पृश्यता ही बौध्द व ब्राम्हण यांच्या संघर्षातून जन्माला आली असून या संघर्षानेच भारताचा इतिहास घडविला, असे शेवटी सदर ग्रंथात बाबासाहेब म्हणतात. त्यांनी केलेल्या गोवंश हत्या संदर्भातील धर्मचिकित्सेवरून ब्रम्हवृंदांची भूत, वर्तमान व भविष्यकालीन भूमिका व बाज स्पष्ट होतो.

**संदर्भ सूचि :**

01. मुक्ती ज ो-ा पथे, डॉ.बाबासाहेब आंबेडज र,ज ौशल्य प्रज ाश-ा, हडज ो,औरंजाबाद, तिसरी (सुधारीत ) आवृत्ती : 13 ऑक्टोंबर 2018 पृष्ठांक - 14.
02. ि-ंबधज ार डॉ.आंबेडज र, डॉ.यशवंत म-ोहर, प्रज ाशिज ा : सौ.प्रभाताई ज्जाभिये, संघमित्रा बुक हाऊस, गुड्डीगोदाम, गौतम नगर,बुध्द विहाराजवळ, नागपूर-01, प्रथमावृत्ती : विजयादशमी -1988 पृष्ठांक : 35
03. धर्मांतराची भीमगर्जना, अरूण कांबळे, सुगावा प्रकाश-ा, पुजे-30, द्वितीयावृत्ती : ऑगस्ट - 2006,पृष्ठांक-46
04. उपरोक्त, पृष्ठांक-47
05. अस्पृश्य मूळचे कोण ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर, युगसाक्षी प्रकाशन, रिंग रोड -ाजपूर- 22,पृथमावृत्ती : 14 एप्रिल 2012 पृष्ठांज :06
06. सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुध्द, डॉ.आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा, द्वितीय आवृत्ती : 22 ऑगस्ट 2007, (नववे पुनर्मुद्रण : सप्टेंबर -2014) पृष्ठांक : 102
07. अस्पृश्य मूळचे कोण ? (उपरोक्त) पृष्ठांक - 92
08. उपरोक्त (कित्ता)
09. आवाज इंडिया, युट्युब चॅनल, The People;s Post चे उद्घाटन प्रसंगी डॉ.रावसाहेब कसबे यांचे भाषणातून.
10. अस्पृश्य मूळचे कोण ? (उपरोक्त) पृष्ठांक - 92
11. उपरोक्त, पृष्ठांक : 93
12. उपरोक्त, पृष्ठांक : 94
13. उपरोक्त, पृष्ठांक : 94
14. शोध स्वामी विवेज ा-ंदांचा, डॉ.दत्तप्रसाद दाभोळज र, म-ोविज ास प्रज ाश-ा, -ारायज पेठ, पुणे-30 सुधारीत नववी आवृत्ती : 15 मे 2017, पृष्ठांज - 123
15. दीघनिकाय- प्रो.डॉ.विमलकीर्ति, समता प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर -17 प्रथमावृत्ती : 22 ऑक्टोंबर 2015, पृष्ठांक : 110
16. ऐतरेय ब्राम्हण : एक चिकित्सा, डॉ.आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा प्रथमावृत्ती : डिसेंबर 2001, (पुनर्मुद्रण : फेब्रुवारी 2013),पृष्ठांक :60
17. बळीवंश, डॉ.आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती :2005 (ऑगस्ट) पृष्ठांक : 291
18. उपरोक्त (कित्ता)
19. अस्पृश्य मूळचे कोण ? उपरोक्त (कित्ता) पृष्ठांक : 120
20. उपरोक्त, पृष्ठांक :105

# ३०. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य

**डॉ. आर. व्ही. मोरे**
समाजशास्त्र विभाग,
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड. जि. वाशिम

**सारांश**

गोरगरिबांना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी अमरावती जिल्हयात माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांची स्थापना केली. भाउसाहेबांनी केवळ वयाच्या २७ व्या वर्षी डी. फिल करून भारतीय तत्वज्ञान संपूर्ण जगाला पटवून दिले. वैदिक वाड;यात धर्माचा उद्गम व विकास हा त्यांच्या संशोधनाचा विषय असून त्यातून त्यांनी संस्कृत भाषेवर प्रभूत्व प्राप्त केले. ते त्यांच्या विव्दवतेचे प्रतिक आहे. मार्गदर्शक प्रो. ए.ए. मॅगडॉनल यांनीही मुक्तकंठाने पंजाबरावांच्या प्रबंधाची स्तुती केली आहे. ‘‘धर्माच्या चिकित्सक अभ्यासात जागतिक दृष्टिकोनातून केला. तसेच त्यांचे जिवनही विदर्भवासी यांनाच नव्हे तर कृषीप्रधान भारतदेशातील कृषीकांसाठी उघडे पुस्तक ठरले आहे. त्यांनी स्वतंत्र भारताचे विदर्भातील पहिले कृषीमंत्री म्हणून आपल्या कतृत्वाची छाप उमटविली. विदर्भभूमीवर जन्माला आलेल्या पंजाब नावाचा समृध्द विचार महान समाजक्रांतीचा पाईक ठरला.

**प्रस्तावना**

बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार आणि कृषिक्रांतीचे अग्रदूत भाउसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचे चरित्र आणि कार्य हिमालयापेक्षा उत्तुंग आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. देशातील शेतकरी आणि महाराष्ट्रातील शिक्षणाची अवस्था भाउसाहेबांनी अनुभवली होती.

चिखलात पाय आणि पायात काटा अशाच वाटा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या वाट्याला असतात. या वास्तवाचे भान असलेल्या भाउसाहेबांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्हयातील पापळ या गावी झाला. शेतकरी कुटूंबात जन्मास आलेल्या पंजाबरावांच्या आईचे नाव राधाबाई आणि वडील शामरावबापू असे होते. इयत्ता ३ री पर्यंतचे शिक्षण पापळ या गावीच झाले. ४ था वर्ग नसल्याने एक वर्ष पुन्हा ३ —या वर्गात शिक्षण घ्यावे लागले. पुढे भाउसाहेबांचे आजोळ सोनेगावच्या जवळच असलेल्या चांदूर रेल्वेच्या प्राथमिक शाळेत चौथा वर्ग पूर्ण केला. माध्यमिक शिक्षण कांरजा लाड येथे तर मॅट्रिक चे शिक्षण अमरावतीच्या श्री राम कृष्णा हिंदू हायस्कूल मधून पूर्ण केले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज मधून

इंटरमिडीएटचे शिक्षण घेवून उच्च शिक्षणासाठी भाउसाहेब इंग्लंड ला गेले. तेथे त्यांनी वेद वाड:मयीन धर्माचा उद्‌गम आणि विकास १९२० मध्ये ऑक्सफर्ड विद्यापिठाच्या डॉक्टरेट हि पदवी संपादन केली आणि विदर्भभूमीवर जन्माला आलेल्या पंजाब नावाचा समृध्द विचार महान समाजक्रांतीचा पाईक ठरला. भारतातील तळागाळातील ग्रामीण विभागातील लोकांना महाविद्यालयीन शिक्षणाचे दरवाजे बंद आहे हि वास्तुस्थिती भाउसाहेबांच्या मनाला अस्वस्थ करीत होती, म्हणून श्री शिवाजी लोकविद्यापिठाची अभिनव व सर्वांगपूर्ण योजना कार्यान्वित करण्याचा त्यांनी धाडसी प्रयत्न केला. स्वत:ला समाजकार्याच्या वाहत्या प्रवाहात कुठलाही अनुकुल—प्रतिकुल परिणामाची पर्वा न करता झोकुन दिले.

**पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्ये :—**

१. **रूढी, प्रथा, परंपरांचे उच्चाटन :—**

समाजाला जातीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी समोर स्वत:चा आदर्श उभा केला.डॉ. पंजाबराव देशमुख स्वत: वैश्विक पातळीवरचे उच्च विद्याविभूषित होते. शिक्षणाने माणसाचे मन संस्कारित होते. मनात दया, सहानुभुती, प्रेम अशा गुणांची रूजवणूक होते. आपल्या समाजात अस्पृश्यता , जातिव्यवस्था, विषमता, स्त्री—पुरूष भेद ही विषारी तत्वे आहेत. हया सर्व अमानुष गोष्टींना आपल्या मनातून समूळ काढून टाकण्याची प्रेरणा आपल्याला शिक्षणातूनच मिळत असते. माणसाच्या आत्मिक आणि भौतिक विकासाच्या आड येणा—या रूढी, परंपरा व कुप्रथा नष्ट करून सर्व समाजाचे एक विशाल सामाजिक मन तयार होण्याची समूहभावना केवळ शिक्षणातून, विद्येतून, ज्ञानातून निर्माण होवू शकते असा सुशिक्षित, समाजशिल व सुस्कांरित समाज निर्माण व्हावा यासाठीच पंजाबरांवांनी आपले सुपंर्ण जीवन झिजवले.

**आंतरजातीय विवाहाचे उच्चाटन :—**

समाजसुधारणांच्या बाबतीत हे केवळ शब्दशूर नव्हते तर कृतीवीर होते. पंजाबरावांनी स्वत: आंतरजातीय विवाह करून त्यांनी लोकांना आदर्श घालून दिला. धर्मभंजक प्रेरणेतून त्यांनी केलेले हे धाडस मौलिक होते. स्वत: भरपूर कर्जबाजारी असतांनाही त्यांनी लोकसेवेस्तव या सर्वांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. कुणीही प्रतिष्ठित देशमुखाची मुलगी लाखो रूपये हुंडा देवून केली असती परंतू भाउसाहेब त्या गावचे नव्हते. उलट त्यांनी समाजाला धडा शिकविण्याचा प्रयत्न सुरू केला. मुंबईच्या विमल वैद्य या सोनार समाजातिल शिक्षित मुलीसोबत मिश्र विवाह केला. विवाहाच्या निमित्ताने डॉ. भाउसाहेबांनी हे क्रांतीकारी पाउल टाकले आणि स्वत:ला

समाजकार्याच्या वाहत्या प्रवाहात कुठलाही अनुकुल–प्रतिकूल परिणामाची पर्वा न करता झोकून दिले.

**२. शेती विषयक कार्ये :–**

शेतकरी तसेच शेती विषयक कार्ये करतांना राष्ट्रीय कार्यावर डॉ. पंजाबराव यांचे पूर्ण लक्ष होते. स्वातंत्रपूर्व काळात राजकारणाच्या आखाडयात ते धडाधडीने उतरले होत, आणि आपल्या ध्येय– धोरणानुसार महात्मा गांधीप्रणित स्वातंत्रच्या कार्यक्रमाला हातभार लावित होते. ते भारतातील शेतक–यांचे खरे मित्र व मार्गदर्शक होते, शोषितांचे उध्दारकर्ते आणि कृषकांचे कैवारी असलेल्या भाउसाहेबांनी 'जगातील शेतक–यांनो संघटित व्हा' हा मंत्र दिला. देशाचे कृषीमंत्री असतांना १९५९ ला शेतक–यांसाठी 'जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले, तसेच त्यांनी कृषी महाविद्यालय पण स्थापन केले. त्यांच्या व्यापक कार्यामुळेच भारतीय जनता त्यांना कधीही विसरू शकणार नाही.

**३. शिक्षणविषयक कार्ये :–**

शिक्षणविषयक कार्य यापुर्वीही अनेकांनी केले आणि फार मोठा नावलौकीक त्यांनी मिळविला. पण त्यांचे कार्य केवळ वरच्या जातीतील लोकांसाठीच झाले, आणि त्यांनाच त्याचा लाभ मिळाला. जनतेपर्यंत शिक्षण नेवून पोहचविण्याचे कार्य या महाराष्ट्रात भाउसाहेबांनी केले. गोर–गरिबांना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी अमरावती जिल्हयात माध्यमिक शाळा, महाविद्यालये याची स्थापना केली. कालांतराने या उपक्रमाचा विस्तार होवून तो विदर्भात सर्वदूर पसरला. या शाळातून व महाविद्यालयातून भाउसाहेबांनी अनेकांचे जिवन घडविले. उच्च शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने डॉ. पंजाबरावांनी अमरावतीला १९४६ मध्ये श्री शिवाजी महाविद्यालयाची स्थापना केली. नागपूर विद्यापिठाने जेव्हा संलग्नीकरण नाकारले तर हे महाविद्यालय हैद्राबादच्या उस्मानाबाद विद्यापिठाशी संलग्न करण्याची तयारी त्यांनी दाखविली. त्यामुळे नागपूर विद्यापिठाला या महाविद्यालयास मान्यता देणे क्रमप्राप्त ठरले. महर्षी भाउसाहेंबांनी बहुजनसमाजाच्या उत्थाणाचे कार्य श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन करून केले. शिक्षण म्हणजे सर्वसामान्य समाजघटकांच्या सर्वांगीण विकासाचे अन् सर्वसमावेशक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. याची भाउसाहेबांना पुरेपुर जाणीव होती. जीवाचा आटापिटा करून स्वत: उच्चविद्याविभूषित झालेल्या भाउसाहेबांना अशिक्षित बहुजन समाजाची होणारी परवड बघवत नव्हती. अज्ञानामुळे आणि शिक्षणाच्या अभावामुळे शेतकरी वर्गाची झालेली दयनिय अवस्था बदलायची असेल तर त्याला शिक्षित करण्यासोबतच संघटित करण्याचे देखील सामाजिक कार्ये भाउसाहेबांनी केले.

### ४. दलितांसाठी मंदिराचे दारे खुली केली :—

पंजाबराव देशमुख यांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी अशा विविध क्षेत्रात समाजाच्या प्रगतीसाठी कार्य केले. इ.स. १९२८ साली त्यांनी सार्वजनिक विहिरी दलितांसाठी खुल्या केल्या. व अमरावती जिल्हयात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. शैक्षणिक प्रगतीचा मार्ग मोकळा करून दिला. शिक्षण घेतल्यामुळे दलितांच्या राहणीमानात सुधारणा घडवून येवू लागली. तसेच दलितांसाठी पंजाबराव देशमुख यांनी मंदिराचे दरवाजे खुले करून दिले.

भाउसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख हे अतिशय दुरदृष्टी ठेवणारे नेते होते. त्यांनी दलितांसाठी कृषी आणि शिक्षण अशा दोन्ही क्षेत्रात अव्दितीय कार्ये केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच बहुजन समाजातील दलित आणि तरूण पिढी शिक्षण घेवू शकली.

**निष्कर्ष :—**

भाउसाहेब समाजसुधारणाच्या बाबतीत केवळ शब्दशूर नव्हते तर कृतीवीर होते. आंतराजातीय विवाह करून त्यांनी लोकांना आदर्श घालून दिला. भाउसाहेबांचा देवावर विश्वास नव्हता. ते म्हणत 'मूर्तीत देव असेल तर मूर्तीत देव घडविणारा कारागीर हा देवाचा बापच ठरेल'. खरोखरच आजही डॉ. भाउसाहेबांचे कार्य शिक्षणक्षेत्रात काम करणा—या शिक्षक, संस्थापक, शिक्षणतज्ञांना तसेच बहुजन समाजाला प्रेरणादायी ठरेल. गोरगरिबांना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी अमरावती जिल्हयात माध्यमिक शाळा महाविद्यालये यांची स्थापना केली. कालांतराने या उपक्रमाचा विस्तार होवून तो विदर्भात सर्वदूर पसरला. ज्ञानगंगा खेडोपाडी पोहचविण्याच्या हेतूने भाउसाहेबांनी अनेक गावांत महाविद्यालये काढली. भारतीय अविकसित समाज संघटनेची त्यांनी स्थापना केली. स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून पदभार सांभाळल्यानंतर शेतक—यांना संघटीत करण्याच्या कार्याला त्यांनी अधिक वेग दिला. त्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी शेतक—यांच्या संघटना उभारल्या. अशाप्रकारे भाउसाहेबांनी समाजसेवेचे महत्वपूर्ण कार्ये केले.

**संदर्भ ग्रंथ :—**

1) देशमुख कल्पना आर :— पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान, सी.ए. प्रकाशन.
2) प्रा. शेजुळे भिमराव :— असा मी जगलो
3) प्रा. सौ. देशमुख कल्पना :— भाउ
4) प्रा. डॉ. पाटील आनंद :— धर्माचा वैदिक वाङ:मयातील उदय आणि विकास
5) प्रा. डॉ. ढाले रविंद्र :— डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार

# ३१. महात्मा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य

डॉ. बावलगावे सी. एम.
इतिहास विभाग प्रमुख,
संजीवनी महाविद्यालय, चापोली.,ता. चाकूर जि. लातूर.
bawalgavecm@gmail.com

**प्रस्तावना**

भारतीय समाजात स्त्रियांना अतिशय निम्न वर्गात गणले गेले होते. भारतात गीतेसारख्या ग्रंथात देखील स्त्रियांची शूद्रातिशूद्रांमध्ये गणना केली गेली आहे. म्हणून भारतातील महिलांवर होणारे अन्याय- अत्याचार, हुंडा प्रथा, सतीप्रथा, बालविवाह या कुप्रथा दूर करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले. प्राचीन भारतात वैदिक काळात स्त्री-पुरुष समानता होती असे इतिहास सांगतो. परंतु स्त्रियांना राजकीय व आर्थिक अधिकार नव्हते. उत्तर वैदिक कालखंडात हळूहळू शैक्षणिक व धार्मिक अधिकारही काढून घेतले. गौतम बुद्धानी त्यांना धार्मिक अधिकार दिले म्हणून संघमित्रा सारख्या स्त्रियांनी स्त्री गाथा हा ग्रंथ लिहिला, धर्मप्रसाराचे कार्य केले. त्यानंतर उत्तरोत्तर स्त्रियांच्या स्थानात घसरण होत राहिली. बाराव्या शतकात कर्नाटकात बसवेश्वरांनी स्त्रियांना सामाजिक धार्मिक आर्थिक व राजकीय असे सर्व प्रकारचे हक्क प्राप्त करून दिले. त्यांचे स्त्रीविषयक कार्य पाहिले असता स्त्री-मुक्ती चळवळीचे ते आद्य प्रणेते ठरतात. तसेच याच शतकात महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी स्त्रियांचे पुरुषाच्या बरोबरीचे स्थान मानले. भागवत संप्रदायात मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा यांना मानाचे स्थान होते व जन माणसावर त्यांचा प्रभाव होता. नंतर जिजाबाई अहिल्याबाई ताराबाई  यांचा प्रभाव जाणवतो या कर्तुत्ववान राज्यकर्त्या घराण्यातील स्त्रिया होत्या परंतु सर्वसामान्य स्त्रियांसाठी झालेले प्रयत्न किंवा सामूहिक प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी आढळत नाहीत.

एकोणिसाव्या शतकातील महात्माफुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य अतिशय महत्त्वाचे ठरते.  स्त्रियांसाठी असलेल्या जाचक रूढींना त्यांनी विरोध करून त्याचा उपाय म्हणून स्त्रीशिक्षणास सुरुवात करून तळागाळातील स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाजक्रांतीचे जनक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांना अग्रभागी स्थान प्राप्त झाले आहे. कारण आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण महात्मा फुले यांच्यापासून सुरू होते. धर्म परंपरांचे जोखड घेऊन चालणाऱ्या काळातच महात्मा फुले यांच्या रूपाने एक महान समाजसुधारक जन्माला आला.

महाराष्ट्राच्या समाज आणि धर्मसुधारणा चळवळीच्या इतिहासात महात्मा फुले यांच्यापासून एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक धार्मिक व आर्थिक स्थिती एखाद्या थंड गोळ्यासारखे निर्जीव बनली होती. त्यावेळी जगातील थोर महापुरुषांनी समाजाच्या या थंड गोळ्याला सचेतन करून जागृती आणली. त्यात महात्मा फुले यांचे नाव अग्रभागी येते. सामान्य जनतेच्या दुःखाला त्यांनी वाचा फोडली. सत्यमेव जयते या दिव्य तत्त्वाचा पुरस्कार करून स्वतः आचरण करून त्यांनी एक आदर्श निर्माण केला. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जाते. तत्कालीन समाजात सामाजिक विषमता अस्पृश्यता अंधश्रद्धा अनिष्ट चालीरीती बोकाळलेल्या होत्या. हिंदू समाजातील ब्राह्मण वर्गाच्या सामाजिक व धार्मिक अन्यायाखाली बहुजन समाज भरडला जात होता. हा समाज दीन अवस्थेत आपले जीवन जगत होता धर्माच्या गोंडस नावाखाली अनेक अनिष्ट प्रथा ठाण मांडून बसल्या होत्या. अशा परिस्थितीत समाजामध्ये जागृती करून त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न महात्मा फुले यांनी केले. यासाठी त्यांनी केलेले कार्य फारच महान होते.

**स्त्री उद्धाराचे कार्य**

ज्योतिबा फुले यांनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले होते. त्या वेळच्या समाजात विषमता, जातीभेद, अज्ञान, स्त्रीदास्य या सारख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे दृढमूल झाल्या आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी सर्व बाबींचा विचार करून प्रथम यांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. हिंदू स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. भारतीय समाजाने स्त्रियांना समाजापासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. मानवाचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतिबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो, सत्याचा उलगडा होतो म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे असे त्यांचे मत होते. समाजाने अनेक बंधनाने स्त्रियांना जखडून ठेवले होते. त्यांचे सर्व हक्क डावलले होते. समानता व मानवतेच्या भूमिकेतून त्यांच्याकडे पाहिले जात नव्हते. उपभोग्य वस्तू अशीच त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती. अशावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले त्यासाठी त्यांनी फार मोठे कष्ट सहन केले. स्त्री ही समाजाचे मूळ आहे हे समाजाला पटवून दिले ज्योतिबांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह प्रतिबंध, केशवपन या सारख्या महत्वाच्या सामाजिक समस्या बाबत भरीव कार्य केले

**स्त्री शिक्षण**

स्त्रियांना सुशिक्षित केले तर सर्व सुधारणांचा पाया घातला जाईल हे ज्योतीबांनी अचूकपणे जाणले. भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतिबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे असे त्यांचे मत होते शतकानुशतके हिंदू समाजातील स्त्री वर्ग हा शिक्षणापासून वंचित होता. मुलांच्या कर्तव्याचे मार्गदर्शन मातेकडून होत असते. कर्तव्याची जाणीव झाली तर देशाची प्रगती होते या विचारांचे ज्योतिबा होते. "जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी" हा ज्योतीबांच्या क्रांतीचा मूलमंत्र होता. यासाठी स्त्रीला शिक्षण देणे हाच उपाय ओळखून इ. स. 1848 च्या ऑगस्ट महिन्यात ज्योतीबाने आपले जिवलग मित्र सदाशिवराव गोवंडे यांच्या साह्याने पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना देखील तेथे शिक्षण दिले जात होते.

स्त्री शिक्षणासाठी शाळा काढणाऱ्या भारतातील, आधुनिक महाराष्ट्रातील ते पहिले समाजसुधारक होते. एका दृष्टीने हे एक बंड होते. सनातनी वृत्तीच्या लोकांना आव्हान होते. शाळा सुरू झाली तेव्हा त्यांना समाजातील अनेक लोकांनी धमक्या द्यायला सुरुवात केली. परंतु ज्योतिबा अशा धमक्यांना भीक घालणारे  नव्हते. त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवून तयार केले आणि त्यांना शाळेत शिकवण्याचे काम दिले. जुन्या वळणाचे लोक सावित्रीबाई शाळेत जावू लागल्या की त्यांच्या अंगावर चिखल फेकत खडे मारत. "मी आपले कर्तव्य करीत राहीन, देव तुम्हाला क्षमा करो" असे म्हणत त्या माऊलीने आपल्या पतीच्या ध्येय वादासाठी सर्व दुःख सहन केले. ज्योतीबांनी बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकर यांच्या वाड्यात जुलै 1851 साली दुसरी मुलींची शाळा उघडली. याच वर्षात रास्ता पेठेत तिसरी व इ. स. 1852 मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली. या कार्याला सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून जोतिबांनी आपल्या मित्रांच्या सहाय्याने एक कार्यकारी समिती स्थापन केली. त्यात अनेक मान्यवर व्यक्ती होत्या. ज्योतीबांच्या या अभिनय उपक्रमाबद्दल विश्रामबाग येथे त्यांचा सत्कार करण्यात आला ज्योतीबांनी स्त्री शिक्षणाला महाराष्ट्रात एक वेगळी दिशा दाखवून दिली.

**विधवा पुनर्विवाह**

हिंदू धर्मात नरबळी, सतीची चाल, केशवपण, अस्पृश्यता, मूर्तिपूजा अशा अनेक दुष्ट प्रथा रूढ होत्या हिंदू समाज या चालीरीतीने पोखरलेला होता. या अनिष्ट चालीरीती बंद व्हाव्यात म्हणून

इंग्रज सरकार कायदे करून प्रयत्न करत होते. इंग्रज सरकारने इ. स. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास केला. विधवा स्त्रियांचे अत्यंत हाल होत होते. ते हाल पाहून ज्योतिरावांचे अंतःकरण द्रवले. स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे, म्हणून ज्योतीबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. त्यानी इ. स. 1864 मध्ये पुण्यातील गोखले यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

**बाल हत्या प्रतिबंधक गृह**

तत्कालीन हिंदू समाजामध्ये बालविवाहाची प्रथा रूढ होती. मुला-मुलींचे विवाह त्यांच्या लहान वयातच करण्यात येत होते. अनेक वेळेला साथीचे रोग येत असत. पतीच्या मृत्यूनंतर मुलीला सबंध जीवन विधवा अवस्थेत जगावे लागे. या तरुण विधवा कोणाच्यातरी वासनेचा बळी ठरत गरोदर राहत. या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी आत्महत्या किंवा भ्रूणहत्या हाच पर्याय असल्यामुळे या संकटातून त्यांची सुटका करण्यासाठी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तेथे ठेवण्यासाठी ज्योतिबांनी इ. स. 1863 मध्ये आपल्या घराशेजारी स्वतःच्या खर्चाने एक वाडा बांधून घेतला. त्याची माहिती देणारे भित्तीपत्रके पुणे शहरात घराघरावर लावण्यात आली. विधवांनो इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशी वर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी अनाथाश्रम घेईल. ज्योतिबा फुले यांनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह हे भारतातील अशा पद्धतीची पहिलीच संस्था होती. त्यांच्या उपक्रमावरून ते किती काळाच्या पुढचा विचार करणारे समाजसुधारक होते हे लक्षात येते.

**बहुपत्नीत्वाला विरोध**

महात्मा फुलेंच्या काळात बहुपत्नीत्वाची पद्धत प्रचलित होती ब्राह्मण व श्रीमंत लोक एकापेक्षा अनेक बायका करीत असत. पहिली पत्नी जिवंत असताना दुसरी पत्नी करणे हा प्रकार त्यांच्या दृष्टीने निंदनीय होता. ते म्हणतात पुरुषांना चार चार बायका करण्यास परवानगी आहे तर मग स्त्रीने चार चार लग्नाचे नवरे केल्यास चूक कशी होईल ही गोष्ट जरा पुरुषांना सहन होत नसेल तर स्त्रियांनी तरी त्यांच्या पतीने चार चार लग्नाच्या बायका सहन का कराव्यात. स्त्री व पुरुष हे एक समान सर्व मानवी अधिकारांचा उपयोग घेण्यास पात्र आहेत. असे असताना त्यांना एका प्रकारचा नियम लागू करणे व पुरुषास दुसरा लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय. त्यामुळेच महात्मा फुले यांनी बहुपत्नीत्वास विरोध केला.

**बाला-जरठ विवाहाला विरोध**

जोतीरावांच्या काळात जरठ विवाह प्रथा प्रचलित होती. अशा विवाहात नवरी मुलीचे वय आठ नऊ वर्ष व नवऱ्या मुलाचे वय सत्तर ते 80 वर्षे असायचे. अशा प्रकारच्या विवाहामुळे विधवांचे प्रमाण वाढत असे. तसेच त्यांच्यावर अन्याय होत असे. त्यामुळे महात्मा फुले यांनी बालविवाहा प्रमाणेच जरठ विवाह या कुप्रथेला विरोध केला.

**केशवपन पद्धतीस विरोध**

महात्मा फुलेंच्या काळात समाजात अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथांचा शिरकाव झालेला होता. त्यापैकीच एक म्हणजे केशवपन पद्धती होय. समाजाच्या विकासासाठी अशा अनिष्ट प्रथा नष्ट करणे गरजेचे होते. त्यामुळेच महात्मा फुले यांनी या अशा अनिष्ट प्रथांचा विरोध केला. समाजामध्ये पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीचे केस कापण्याची पद्धत रुढ होती. केशवपन केले नाही तर त्याचा जीव तिच्या केसात घुटमळतो आणि तो स्वर्गात जाण्याऐवजी नरकात जातो अशी समाजाची धारणा होती. विधवेचे केशवपन केल्यामुळे तिचे सौंदर्य नष्ट होऊन ते विद्रूप दिसे. म्हणून ज्योतिरावांनी अशा वाईट प्रथेला विरोध केला. जोतीरावांनी आणि त्यांचे अनुयायांनी केशवपना विरुद्ध चळवळ सुरू केली.

**विधवेचा पुत्र दत्तक घेतला**

ज्योतिबांना मूलबाळ नाही याची खंत त्यांच्या वडिलांना म्हणजेच गोविंदरावांना वाटत असे. त्यांनी ज्योतिबाला दुसरे लग्न करण्यास सांगितले होते. त्यांनी प्रत्यक्ष ज्योतिबाचे मन वळविण्यासाठी आणि त्यांच्या सासऱ्याकडून गोविंदरावांनी प्रयत्न केला. ज्योतीबाने दुसरा विवाह करण्यास स्पष्टपणे नकार दिला. बालहत्या प्रतिबंधक गृहात सन 1873 मध्ये काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेस मुलगा झाला. ज्योतिबा आणि सावित्रीबाईनी या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंत म्हणजे यश मिळवणारा. सावित्रीबाईंनी वात्सल्याने त्या मुलाचे संगोपन केले. ज्योतिबा आणि सावित्रीबाईनी यशवंतला आपला मुलगा मानला. त्याला दत्तक घेऊन वैद्यकीय शिक्षण दिले. यशवंत डॉक्टर झाला. ज्योतीबाने यशवंत च्या नावाने मृत्यूपत्र तयार करुन ठेवले. त्यांनी असे करून आपण जातीभेद मानणारे नाही हे पटवून दिले. एकंदरीत स्त्री उद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य सर्वप्रथम महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात करण्याचे श्रेय महात्मा ज्योतिराव फुले यांनाच द्यावे लागते.

**निष्कर्ष**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाजसुधारकांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य उल्लेखनीय ठरते. त्यांनी अस्पृश्य समाज व स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य केले. महाराष्ट्रातील

अस्पृश्यता निवारण व स्त्रीमुक्ती चळवळीचे आग्रही म्हणून ज्योतिरावांना ओळखले जाते. महात्मा फुलेंच्या काळात महाराष्ट्रातील स्त्रियांची समाजातील स्थिती अत्यंत वाईट होती. समाज व्यवस्थेत त्यांना हीन दर्जा होता. स्त्री ही सुखाची व उपभोगाची वस्तू आहे अशी समजूत तत्कालिन समाजात रूढ होती. स्त्री पुरुषापेक्षा कनिष्ठ असून तिचे कार्य चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित मानले जात होते. बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. बाला-जरठ विवाह, केशवपन, सती प्रथा, विधवा विवाहाला विरोध, बहुपत्नीत्वाची प्रथा, समाजात प्रचलित होती. समाजाने अनेक बंधनाने स्त्रियांना जखडून ठेवले होते. त्यांचे सर्व हक्क डावलले होते अशावेळी महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. स्त्री शिकली तर सर्व कुटुंब शिकते. त्यातूनच समाजाची प्रगती घडून येते. असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. समाजामध्ये विधवांचा फार मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला होता. त्यामुळे विधवा पुनर्विवाहा साठी त्यांनी प्रयत्न केले. समाजाचा विरोध पत्करून बालहत्या प्रतिबंधक गृहाची निर्मिती केली. बालविवाहाला विरोध केला. बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध केला. विधवांच्या केशवपनाला विरोध करून विधवा विवाहास चालना देण्यासाठी चळवळ उभी केली. म्हणूनच महात्मा फुले यांना स्त्रियांचे पहिले उद्धारक व कैवारी मानले जाते.

**संदर्भ**


1. डॉ. गव्हाणे किशोरकुमार व इतर, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, 2 ऑक्टोबर 2014, पृष्ठ -91-96.
2. प्रा. सिद्धेश्वर कोळे, संग्राम जी अंदे, भारतातील सामाजिक चळवळी, अरुण प्रकाशन, लातूर, 10 ऑक्टोबर 2012, पृष्ठ -115 -116.
3. डॉ. जाधव एस. जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय प्रकाशन, नांदेड, डिसेंबर 2005, पृष्ठ -195 -198.
4. डॉ. गाठाळ साहेबराव, आधुनिक भारत, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, जुलै 1998, पृष्ठ- 86.
5. प्रा. भावरे अशोक, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, 2006, पृष्ठ- 62.
6. प्रा. पाटील व्ही. बी., महाराष्ट्राचा इतिहास, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, 2014, पृष्ठ -182.
7. डॉ कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, जानेवारी 2013, पृष्ठ- 180 -181.

# ३२. महात्मा ज्योतिबा फूले: विचार आणि कार्य

**प्रा. डॉ. डी. के. खोकले**
(सहाय्यक प्राध्यापक)
(लोकप्रशासन विभाग)
कै.डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी.
Email : dkkhokle123@gmail.com
मो. 9960947184

## ABSTRACT

म. ज्योतिबा फुले यांचा सामाजिक परिवर्तनाचा लढा महत्वपूर्ण असून त्यांनी हजारो वर्षापासून दडपल्या गेलेल्या आणि स्वत:चे माणुसपण सुध्दा विसरलेल्या मानवी समुहाची मानसिकता ओळखता त्यांनी माणसाला गुलामगिरीची जाणीव करुन दिली. त्यांचे मुलगामी विचार आणि कार्य आजच्या काळातील विविध सामाजिक संघर्ष आणि समस्या टाळण्यासाठी मागदर्शक ठरु शकतात. त्यांच्या विचारांना जननिष्ठ तत्वज्ञानाचे भक्कम अधिष्ठान आहे. चार्वाक, सांख्य बौध्दादी परंपराचे इहनिष्ठ आणि लोकहितवादी तत्वज्ञान पचवून त्यांनी अस्सल देशी तत्वज्ञानाची मांडणी केली आणि तत्वज्ञानाला तेवढ्याच समर्थपणे कार्याची जोड दिली. या पलिकडे मानवी मनोव्यापाराच्या संदर्भात फुल्यांच्या विचाराचा आणि कार्याचा संक्षेप आणि परामर्श घेऊ.

**प्रस्तावना :**

म. ज्योतिबा फुले यांचे द्रष्टे आणि मुलगामी विचार व कार्य आजच्या काळातील विविध सामाजिक संघर्ष आणि समस्या टाळण्यासाठी मार्गदर्शक ठरु शकतात. प्रस्थापित मुल्यांना आणि पुरोहितशाहीने निर्माण केलेल्या पोथीनिष्ठ समाज रचनेला सर्व प्रथम सुरुंग लावुन उध्वस्त करणारा बुलंद माणुस म्हणजे महात्मा फुले या स्फोटांच्या हादऱ्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातीलच समाज—व्यवस्था ढवळून निघाली असे नव्हे तर विसाव्या शतकातील अनेक क्षेत्रात सुधारणा घडून यावयास हे हादरे कारणीभूत ठरलेत आणि या हादऱ्याचे मुळ शक्तिकेंद्र म्हणजे महात्मा फुल्यांचे युग प्रवर्तक विचार व कार्य होय.[१]

सामाजिक आणि राजकीय चळवळ यामधील महत्वाचा फरक कोणता असेल तर तो हा की, सामाजिक चळवळ समाजाविषयी वाटणाऱ्या कळकळीतून निर्माण झालेली असते. कळ आणि कळ अंतर्बाह्य सलणाऱ्या ठसठसणाऱ्या

वेदनेपोटी तळात साचलेला मळ उपसून टाकण्याच्या तळमळीतून सामाजिक चळवळ आकार घेते आणि म्हणूनच सामाजिक चळवळीपूढे राजकीय चळवळ ही बरेचदा वळवळ ठरते. वरपांगी वाटते. त्यांच्या विचारांना जननिष्ठ तत्वज्ञानाचे भक्कम अधिष्ठान आहे. चार्वाक, सांख्य, बौध्दी परंपराचे इहनिष्ठ आणि लोकहितवादी तत्वज्ञान पचवून त्यांनी अस्सल देशी तत्वज्ञानाची मांडणी केली आणि तत्वज्ञानाला तेवढ्याच समर्थ कार्याची जोड दिली. त्यांच्या विचारांना या वर्ण—जाती—स्त्रीदास्य प्रथा समाजातून सर्व जातीचे अनुयायी मिळाले हे त्यांच्या विचाराचे व कार्याचे यश आहे.[२]

परंतु जसजसा काळ पुढे सरकतो आहे. तसतसे ज्योतीरावांचे महात्म्य उजळुन निघाले आहे. शेकडो वर्ष दाबून दडपून ठेवलेल्या बहुजन समाजाच्या आक्रोशांचा स्फोट महात्मा फुलेंच्या मुखातुन आक्रमकरित्या झाला. महात्मा फुले हे समाज सुधारकांचे मेरुमणी मुलींच्यासाठी शाळा उघडण्याचे कार्य त्यांनी केले. स्त्री शिक्षणाचा प्रणेता, दलितांच्या उत्थानाचा उद्‌गाता आणि शेतकऱ्यांसाठी शेतकीचे तत्वज्ञान मांडणारा पहिला हाडाचा कृषि पंडित म्हणजे महात्मा फुले या ज्योतीच्या प्रत्थर तेजात आधुनिक महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रे उजळुन निघाली.[३]

प्रस्तुत शोध निबंधात म. ज्योतिबा फुले यांचे विचार आणि कार्य स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे**

१. म. ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा अभ्यास करणे.

२. म. ज्योतिबा फुले यांच्या विचार व कार्यांचा समाज जीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

३. म. फुले यांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

४. म. ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्ये :**

१. म. ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार वर्तमान काळात साधर्म्य साधणारे आहे.

२. म. ज्योतिबा फुले यांचे विचार व कार्य हे उत्कृष्ट स्वरुपाचे होते.

३. म. ज्योतिबा फुले यांचे सामाजिक विचार सामाजिक सुधारणेला अनुरुप होते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध हा म. ज्योतिबा फुले यांच्या विचार व कार्याशी निगडीत असल्याने शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा

वापर करण्यात आला. तसेच प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा व साधनांचा वापर करण्यात आला. असून मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांचा ही आधार घेण्यात आला आहे.

**१. लेखन पध्दती :**

म.फुले यांच्या जननिष्ठ भूमिकेतून प्रतिपक्षाच्या मुलायम व अलंकारिक भाषेचा डोलारा आणि त्यातील तत्वशून्यता व बहुजनद्रोह वाचकांपुढे स्पष्टपणे मांडतात. निरूसंदिध्द, परखड, निर्भीड पध्दतीने म. फुले यांनी लेखन केले आहे.[४]

**२. सामाजिक विचार :**

म. फुले यांनी त्यांच्या लेखनात नेहमीच योजिलेल्या शुद्रातिशुद्र या संज्ञेचा अर्थ व व्याप्ती प्रथमत: इ.स. च्या सातव्या–आठव्या शतकापासून ब्राम्हणांनी त्यांच्या ग्रंथातून द्विवर्णाचा सिध्दांत मांडावयास प्रारंभ केला.[५] वर्ण, जाती, अस्पृश्यता या सामाजिक विषमता पोसणाऱ्या आणि जोपासणाऱ्या संकल्पना मानवनिर्मित व भावनिक आहेत. या व्यवस्थित समाजात आपण कोणाच्या तरी वर आहोत, श्रेष्ठ आहोत ती टिकून आहे. व्यवसायात कौशल्याचा भाग आल्यामुळे जातीप्रमाणे व्यवसाय हे तत्व न राहता कौशल्य हस्तगत करुन कोणीही कोणताही व्यवसाय करु शकत असे. उदा. शिंपीकाम, बांधकाम, यंत्र–मार्गावर व गिरणीत सूत कातणे व कापड विणणे, वैद्यकीय व्यवसाय, चांभार, कुंभार, सुतार व लोहार काम इत्यादी या व्यवस्थेला धक्का देण्यासाठी म. फुले यांनी स्वत: काही कृती केल्या.[६]

**३. शिक्षण विषयक विचार :**

शिक्षणाच्या सामाजिकरणाची मागणी करणारा पहिला हिंदुस्थानी दृष्ट्य तत्वज्ञ विचारवंत म. फुले होत एकोणिसावे शतक हे मानवाच्या बुध्दीला, शक्तीला आणि सर्व प्रकारच्या क्षमतांना आवाहन करणारे शतक होते. या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती झाली. विविध वैज्ञानिक शोध लागले. नव्या मुल्याधिष्टित आणि उद्दिष्टांनुगामी शिक्षणामुळे पाश्चात्य देशात सुधारणांना आणि विकासाला गती मिळाली होती. त्याचीच गोड फळे ब्रिटिशांना चाखावयास मिळाली होती. शिक्षण हे जीवन विकासासाठी असते. शिक्षणामुळे माणसांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्वाचा विकास होतो, सुप्त गुण फुलतात. बहरतात हा शिक्षणविषयक आधुनिक दृष्टिकोन आहे. शिक्षणाच्या सुसंस्कारामुळे माणसातील माणुसकी अधिकच उन्नत होते, म्हणून ते म्हणाले होते की,

**''विद्येविना मती गेली**
**मतीविना नीती गेली**
**नीतीविना गती गेली**

**गतीविना वित्त गेले**
**वित्ताविना शुद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले''**

याचा अर्थ असा की, शिक्षणाशिवाय माणूस डोळे असून आंधळा कान असुन बहिरा आणि तोंड असून मूका असतो 'मुका बिचारी कुणी हाका' अशी त्याची अवस्था असते.[७]

म.फुले यांना अनुभवाने खुप शिकविले. शिक्षणात अनेक प्रयोग करण्याच्या कल्पना अनुभव, अडचणी गरजा यातूनच सुचल्या. तत्कालीन शिक्षणाची दशा, आणि पध्दती याविषयी त्यांनी खुप चिंतन केले.

आजच्या शिक्षणपध्दतीतून पाश्चात्य इंडिया आणि जनद्रोही साहेब घडविण्याचे आणि अनेक भावी पिढ्यंचे नुकसान करण्याचे कार्य पध्दतीशीरपणे सुरु आहे.

नियोजनाची आणि पंचवार्षिक योजनांची पध्दती राज्यकर्त्यांनी स्वीकारली, पण शिक्षणाचे कसलेच नियोजन नाही. अनुदान संस्कृती आणि विनाअनुदान संस्कृतीने अनेक यक्ष प्रश्न शिक्षण क्षेत्रात निर्माण करुन ठेवले आहेत.[८]

**४. शासनसंस्थेचा उदय :**

सृष्टीच्या उत्पत्तीपासून मानव समाजाच्या विकासाच्या टप्प्याचा आणि त्यांनी निर्माण केलेल्या काही संस्थांचा ते त्रोटक आढावा घेतात, निसर्गातील नाना प्रकारचे रस, गंध संगीत व सौंदर्य यांचा मुक्तपणे आस्वाद घेत होते. काही कालावधीनंतर वस्त्रप्रावरणे शेत व्यवसाय, गोधन—पालन यांचा शोध लागला. कुटूंबसंस्था उदयास आली. लोकांची संख्याही वाढत गेली. कालखंडात दास प्रथाही उदयास आली. या दासांच्या मदतीने धाडसी पुंडांनी शेजारच्या प्रदेशात लुटालूट केली. आपल्या हाताखालच्या सर्व लोकांवर आणि जथ्यावर वर्चस्व प्रथापित होताच स्वतरूला राजे म्हणून जाहिर केले. या प्रमाणे राज्य संस्थेचा उदय झाला.[९]

**५. इंग्रजी राजवटीचे स्वागत:**

म. फुले यांनी इंग्रजी राजवटीचे स्वागत केले. एवढेच नव्हे, तर निर्भिकाने इंग्रजांना शौर्यादी गुण देऊन, हिंदूस्थानातील पंगू, शुद्रादी अतिशुद्रांना आर्यभट्टांच्या दाश्यत्वातून मूक्त करण्यासाठी या देशात पाठविले आहे. आणि तेही या कामी मनपुर्वक प्रयत्न करीत आहेत. असे उद्‌गार काढले. त्या काळातील न्या. म. गो. रानडे, लोकहितवादी गो. ह. देशमुख, न्या के.टी तेलंग, नाना शंकर शेट, बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भाऊ दाजी लाड, वगैरे सुशिक्षितांचा कल इंग्रजी राजवटीचे उघडेपण करण्याकडेच होता. बा. ग. टिळक आणि आगरकरांनीही या राजवटीच्या प्रशासनाची

गुणात्मकता मान्य करुन स्वागत केले होते. म. फुले यांच्या मते, इंग्रजी राजवटीत माणसाला मनुष्यपणा प्राप्त झाला होता. इंग्रजांनी अनेक लोकोपयोगी खाती आणि कायदे निर्माण करुन प्रजेला सौख्य मिळेल असा कारभार सुरु केला.[१०]

**६. राष्ट्र :**

राष्ट्र ही राज्यशास्त्रात १९ व्या शतकात उदयास आलेली संकल्पना आहे आणि ती भांडवलशाहीचे अपत्य आहे. राष्ट्रीय काँग्रेसने या संकल्पनेचा अर्थविस्तार करुन उच्चवर्णिय आणि पुढारलेल्या वर्गाचाच फायदा करुन घेण्याचे धोरण स्वीकारले होते. म. फुले यांच्या मते, हिंदूस्थान हा देश खऱ्या अर्थाने राष्ट्र नव्हता. संबंध देशात समता किंवा समोनाकांक्षेचा कोणताही धागा नव्हता. त्यांचे हितसंबंध समान नव्हते. उच्चनीच भेदभाव, रोटीबेटी, व्यवहार, आचार—विचार, खाणे—पिणे, रीती—भाती यात कुठेच मेळ बसत नव्हता.[११] अशा अठराधान्यांची भेसळ होऊन त्यापासून तयार होणारे मुडबोळे म्हणजे एकमेव लोक राष्ट्र कसे होईल. म. फुले यांच्या मते शुद्रोतिशुद्र भिल्ल, कोळी, हे सर्व विद्वान होऊन स्वतरूविचार करण्याची पात्रता त्यांच्यात येईल तेव्हा खऱ्या अर्थाने राष्ट्र उदयास येईन.[१२]

**७. राजकीय विचार :**

शुद्रातिशुद्रांच्या ऐहिक कल्याणाचे साधन म्हणजे. म. फुले राजकारणाकडे पाहत होते. पेशवाईच्या तुलनेत इंग्रजी राजवटीत शुद्रातिशुद्रांना स्वतरूची उन्नती करुन घेण्याची संधी मिळाली होती. म.फुले यांनी राजकीय समतेचा आग्रहाने पुरस्कार केला. त्यांच्या नंतरच्या कालखंडात जे वेदान्तवादी वर्ण जातिव्यवस्थेचे समर्थक होते, ते महात्मा राष्ट्रवादी ठरले. उलट न्या. रानडे लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारखे वर्णव्यवस्था—समर्थक सामाजिक सुधारणांचा आग्रह धरित होते. म्हणून त्यांना मवाळ ठरविले म.फुले यांनी समाजकारणा प्रमाणेच राजकारणाचाही मुलगामी पध्दतीने विचार केलेला आहे.[१३] राज्यकर्ते कोण आहेत. यापेक्षा ते राज्यसत्तेचा वापर कोणसाठी व कसा करीत आहेत, याचे महत्व त्यांना वाटत होते. त्यांच्या राजकीय तत्वज्ञानाचे वेगळेपण हे आहे की, शुद्रातिशुद्र आणि स्त्रिया यांना केंद्रबिंदू मानुन ते राजकारणाचा विचार करतात. प्रजासत्ताक आणि लोकसत्ताक राजवटी दीर्घकाल टिकतात आणि या पध्दतीची कास सोडली की, ते राजे आणि त्यांचे राज्य लयाला जाते, हा सिध्दांत ते मांडतात. ब्रिटिशांची राजवट प्रजासत्ताक नव्हती. पण प्रजेच्या इच्छा—आकांक्षाचे प्रतिबिंब त्यांच्या कारभारात दिसत होते.[१४]

**८. सत्यशोधक समाजाची स्थापना :**

माणसाला आपल्या आयुष्यात काही उदात्त, त्यागाशील, कर्तव्य परायण अशी नीतिमान आचार संहितेची आवश्यकता समृध्द सुखी व सत्वशील मार्गाने जीवन जगत असतांना असते. यामुळे माणुस इतर प्राण्यापेक्षा आपले अस्तित्व वेगळे निर्माण करु शकतो. सनदशिर मार्गाचा अवलंब करत असणाऱ्या माणसाच्या आचरणाकडे दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिने नुसते पाहिले तरी त्यातील माणुस जागा व्हायला वेळ लागत नाही. एवढी ताकत या सत्य वर्तनात असते. आपल्या आयुष्याचा भव्योदात्त हिमालय उभा करावयाचा असेल तर निर्मिकाने निर्मिलेल्या, वस्तूंचा उपभोग सार्वजनिक सत्यमार्गाने घेतला पाहिजे तरच आपल्या जगण्याला वेगळी झळाळी प्राप्त होते.[१५] आपल्या सुखासोबत इतरांच्याही सुखाची अपेक्षा जेव्हा माणुस करेल त्यावेळी तो खऱ्या अर्थाने निर्मिकाच्या जवळ गेलेला असेल. निर्मिकाची भक्ती म्हणजे सत्य वर्तन करणे होय. हे सर्व सांगण्यासाठी धर्मचिकित्सा व बहुजनांच्या इतिहासाची चिकित्सा व ब्राम्हणीचे षडयंत्र शोधण्यासाठी, सर्वांना सुखी व सत्यवर्तनाची संहिता देण्यासाठी म. फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ साली करुन सार्वजनिक पातळीवर सत्याचे समर्थन व नैतिकतेचे आचरण करण्यासाठी या समाजाची स्थापना केली.[१६]

**निष्कर्ष :**

म.फुले यांनी आत्मभान व अस्मिता प्राप्त झालेला समाज कोणाच्याही आणि कोणत्याच प्रकारच्या गुलामगिरीत राहू शहत नाही. ते भान देण्यासाठी त्यांनी व्यापक सांस्कृतिक चळवळ उभी केली होती. इंग्रजी राज्य आज ना उद्या जाणार आहे. हे त्यांना माहित होते. म. फुले शुद्र राजकी तत्वज्ञानी व विचारवंत होते. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वामागे त्यांच्या ग्रंथाचा जप तपाचा अवलंब न करता सामान्यासारखे जीवन जगू नये पण केलेल्या असामान्य कार्याबद्दल लोक त्यांना मोठ्य आदराने म्हणूनच महात्मा म्हणतात. गौतम बुध्दानंतर महात्मा ही पदवी जन सामान्यात फक्त जोतीबा बद्दलच रुजली म्हणून भाडेतत्वावर आलेल्या मारेकऱ्यांना ही त्यांचा खून करण्यासाठी पैशाची अभिलाषा वाटली नाही. सत्य वर्तन करताना त्यांना मृत्यूसमयी यातना होत नाहीत. असे आयुष्यभर सांगणाऱ्या फुल्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीत मौलिक कार्य केले आहे. जेव्हा जेव्हा सार्वजनिक सत्याचा विजय झाला असेल तेव्हा तेव्हा फुल्यांचे नाव निघालेले असेल इतके अढळ कार्य फुल्यांनी केले आहे. फुल्यांच्या विचार आणि कार्याला तोड नाही.

**संदर्भ ग्रंथ**


१. Ghury, G.S. Caste and Race In India] Bombay 1969 (5th Editions)

2- Lederle, M.R. Philosophical Trends in Modern Maharashtra Bombay 1976

3- Mangudkar, M.P (ed.) Mahatma Phule Ani satya Shodhak Chalavval Pune (N.D)

४. कीर धनंजय आणि मालशे स.ग. (संपादक) महात्मा फुले समग्र वाड्.मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तिसरी आवृत्ती १९८८.

५. महात्मा फुले गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मुंबई १९८२

६. सरदार गं. बा.महात्मा फुले व्यक्तीत्व आणि विचार, ग्रंथाली, मुंबई, तिसरी आवृत्ती १९८८

७. Phadke Y-D- Social Reformers of Maharashtra] New Delhi 1975

८. राजभोज पा.ना. आद्यसमाज सुधारक : म.फुले, व्यक्ती आणि विचार १९५८

९. वाळिंबे डॉ. श. शं. १९ व्या शतकातील महाराष्ट्राची पुनर्घटना भाग १ ला, प्रकाशक डॉ, वाळिंबे, पुणे प. आ. १९६२

१०. वैद्य प्रभाकर, म. फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाड्.मय प्रकाशन, मुंबई, प. आ. १९७४.

११. कीर. धनंजयराव म. ज्योतिराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, पुर्नमुद्रण १९७५

१२. अधिकारी गो.गो. (संपा) ज्योतिराव फुले समग्र ग्रंथ अधिकारी प्रकाशन, पुणे १९६३

१३. शहाकार पांडुरंग लक्ष्मण (संकलक), म. ज्योतिराव फुले : चरित्र व कामगिरी, १९४६

१४. डॉ. गुंदेकर श्रीराम, महात्मा ज्योतिबा फुले विचार आणि वाङमय भाग १ आणि २ प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९२

१५. कुलकर्णी अ.रा. महात्मा ज्योतीराव फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्रथम आवृत्ती. जुलै २००८.

१६. सौ. मगर निर्मला ज्योतिराव फुल्यांची समाज परिवर्तन नीती, प्रथमावृत्ती २८ एप्रिल १९९१.

# ३३. अण्णा भाऊ साठे: समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे पाईक

**प्रा. डॉ. भालेराव सुधाकर नारायण**
(संशोधक विद्यार्थी)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली.
मो. ९८२५५३००२९
email : sbhalerao410@gmail.com

**प्रस्तावना :**

माणुस हा समाजशील प्राणी आहे. तो ज्या समाजात जगतो, वाढतो त्या समाजाचे त्याला काही देणे लागते ही भावना प्रत्येक व्यक्तीमध्ये जागृत झाली पाहिजे. समाजाची प्रगती करायची असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने नीतीमत्ता ही पाळणे गरेजेचे असते. तेव्हाच समाजाचा विकास होत असतो. समाजात सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि समाजिक न्याय पाळणाऱ्यांची संख्या जितकी जास्त असेल तितकी त्या समाजाची प्रगती अधिक होत असते. समाजनिष्ठा, समाजशिस्त, सामाजिक न्याय, इतर व्यक्तींबद्दल आदरभाव, सामाजिक बांधिलकी हे महत्वपूर्ण घटक आहेत. समाजातील प्रत्येक मनुष्याने गरीब—श्रीमंत, स्पृश्य—अस्पृश्य, लिंग, धर्म, जात, पंथ यांच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीमध्ये भेदभाव, पक्षपात करू नये. अशा प्रकारची भावना प्रत्येक मनुष्याने जीवन जगत असताना आचरणात आणने गरजेचे आहे. तरच समाजाचा सर्वांगीण विकास होत असतो. समाजाचा विकास होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने या समाजिक भावनेचा अंगिकार करणे गरजेचे असल्याचे मत अण्णा भाऊ साठे यांनी व्यक्त केले आहे.

समाजातील विषमता नष्ट करणे हे त्यांच्या साहित्य लेखनाचे ध्येय आहे. समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विद्रोही जाणीवा त्यांच्या साहित्यातून स्पष्ट करण्यात आल्या. अर्थात सामाजिक परिवर्तन ही त्यांच्या साहित्य लेखना मागची मुख्य प्रेरणा आहे. बालपणापासूनच अण्णा भाऊ साठे यांना दारिद्र्याचे आणि सामाजिक विषमतेचे चटके सहन करावे लागले. बालपणातील दाहक अनुभवामुळे त्यांचे मन बंडखोर बनत गेले. याची अनेक ऊदाहरणे त्यांच्या चरित्र ग्रंथात आढळतात. जीवनावर, माणूसपणावर प्रचंड निष्ठा असल्याने अण्णा

भाऊ साठे संघर्ष करण्यासाठी सदैव तयार असत. बालपणापासून माणूस आणि त्या माणसाचे जगणे हा त्यांच्या चिंतनाचा विषय होत आला आहे. यामुळेच माणूस हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू बनत गेला. माणसाकडून माणसाचे होणारे शोषण थांबविल्याशिवाय आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही याची जाणीव अण्णा भाऊ साठे यांना होती. म्हणूनच त्यांनी विषमतेवर घाव घातला. मार्क्सवाद हा त्यांच्या अत्यंत जवळचा विषय त्यांनी बनविला. भारतातील आर्थिक विषमता सामाजिक विषमतेवर आधारित असल्याने त्यांनी आंबेडकरवादही प्रेरक प्रकारचा मानला होता.

**अण्णा भाऊ साठे यांचा जीवनपट :—**

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म कोल्हापूर आणि साताऱ्याच्या मध्येभागी डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या वाटेगावमध्ये १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते तर आईचे नाव वालुबाई होते. अण्णा भाऊ साठे यांचा जन्म धर्मव्यवस्थेने, समाजव्यवस्थेने अस्पृश्य ठरवलेल्या मांग जातीमध्ये झाला. त्यांच्यामुळेच त्यांचे बालपण विषमतेच्या दारिद्र्याच्या चटक्याने होरपळून जात होते. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. विषमता आणि दारिद्र् यांच्याशी दोन हात करत अण्णा भाऊ साठे आपल्या जीवनाशी संघर्ष करत राहिले. औपचारिक शिक्षणापेक्षा अनौपचारिक शिक्षणातूनच अण्णा भाऊंचे व्यक्तिमत्व अधिकाधीक समृध्द होत गेले. चार भिंतीतील शिक्षणापेक्षा समाजजीवनातून मिळणारे शिक्षण अण्णा भाऊंच्या दृष्टीकोनातून महत्वाचे मानण्यात येते.

**तुकाराम ते अण्णा :—**

अण्णा भाऊ साठे यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे तुकारामचा अण्णा कसा झाला हे सांगतांना शंकर साठे म्हणतात. अण्णांचे मूळचे नाव तुकाराम असे होते. ते त्यांना तुका केव्हा तुक्या असे म्हणत असत. त्या वेळेस त्यांच्या आईने सांगितले होते की, तुका, तुमच्यापेक्षा वडील आहे. तेव्हा तुम्ही तुकाला दादा किंवा अण्णा म्हणत जावा. तेव्हापासून तुकाचा अण्णा झाला. नंतर अण्णा हेच नाव रूढ झाले व तुकाराम हे नाव मागे पडले. कुटूंबात आणि समाजात सर्वच लोक तुकारामाला अण्णा म्हणू लागले.

**अण्णा भाऊंची जीवनदृष्टी :—**

अण्णा भाऊ हे लोककलावंत आहेत असे सांगितले जाते. त्यांच्याकडे मानवी जीवन समजून घेण्याची दृष्टी होती. माणूस आणि माणसाचे प्रश्न हे त्यांना अधिक जवळचे वाटतात. या माणसांच्या जीवनाबद्दल बरबाद्या कंजारी या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊ असे सांगतात की माझी जीवनावर फार मोठी निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती फार महान आहे. ते जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालत असते. त्यांची झुंज नि त्यांच यश त्यावरच माझा प्रभावी विश्वास आहे. त्यांना विद्रुप करणं आवऊत नाही. मानवाला त्याच्या बाह्य जीवनाच्या परिस्थितितून वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणे त्याला कमीपणा आणणाऱ्या वास्तव जगाच्या बंधनातून मुक्त करणे आणि तू गुलाम नाहीस, तू वास्तव जगाचा धनी आहेस. तू जीवनाचा स्वतंत्र निर्माता आहेस असा साक्षात्कार करून देण्याचे कार्य त्यांनी केले.

**समता, स्वातंत्र्य आणि बंधुता :—**

आपण जे जीवन जगतो तेच जीवन जगणाऱ्या बहुजन जनतेच्या मनातील ऊदात्त स्वप्ने, विचार शब्दबध्द करावेत या मोहाने ग्रंथाना पुढे आणावे यासाठी प्रयत्न करावेत. अण्णांना दलित जीवनात पिचणाऱ्या माणसांचाच विचार बैचेन करू लागला होता. पोवाड्याला चिंतनाची ठाम अशा स्वरूपाची विशेष बैठक होती. त्यांच्या ज्वलंत आणि जातीवंत प्रतिभेत सहज डोळ्यात भरावा असा मर्दानीपणा होता. आणि त्या मर्दानीपणाला अण्णा भाऊंनी कारूण्याची सुंदरशी रम्य किनार जोडली होती. गुलामगिरीबद्दल वाटणारा द्वेष त्यांनी पोवाड्यातून खंबीरपणे प्रकट केला. आपल्या अंतरंगात सामाजिक अन्यायाविरूध्द विषमतेविरूध्द, विसंगतीबद्दल निर्माण झालेली आग ते ज्वालाग्राही शब्दाने व्यक्त करत गेले.

धगधगणारे जीवन जगणाऱ्या माणसांचे विश्वच रेखाटण्यात अणा भाऊंनी धन्यता का मानावी? तर याचे ऊत्तर एकच देता येईल की अण्णा भाऊंच्या मनाचा व त्या जीवनाची जातकुळीच मुळी एक होती. ऊपेक्षितांचे अंतरंग ऊलगडून दाखविण्याचा प्रयत्न वेगळ्या वळणाचा होता. सगाजी, रामभरोसे, राही, सत्या रामवंशी, शेवंती, देवकाई इत्यादी पददलित म्हणून किंवा ऊपेक्षित म्हणून मानल्या गेलेल्या माणसांची कैफियत अत्यंत पोडतिडकीने मांडली. ती माट्यांनी यापुढे

जाऊन त्यांनी वास्तव चित्र रेखाटले. माणूसच माणसाचा घास घ्यायला या विषमतेतून ग्रासलेला समाजात कसा सिध्द झाला आहे हेच दाखवून दिले आहे.

दलितांच्या जीवनांच वास्तव चित्रण प्रामाणिक हेतूने आणि अनेक कथा कादंबऱ्यातून अण्णा भाऊनी केलं आहे. दलित म्हणत असताना एका विशिष्ट जाती जमाती विषयीची अस्मिता त्यांनी प्रकट केली नाही. जे जे अन्यायाखाली भरडले जातात, दारिद्र्याने, दैन्याने, दूरवस्थेने हैराण होतात. परिस्थितीने पिचले जातात. ऊपेक्षेचे, अपमानाचे अगतिक जीवन जगत असतात. ते सर्व अण्णा भाऊंना आपले वाटतात.

अस्पृश्यांच्या जीवनात मरणप्राय यातना होत्या. जन्माने आम्ही अस्पृश्य नाही तर हे अस्पृश्यांचे भयानक भूत येथेच हेतू परस्पर निर्माण केले गेले, त्यावर आघात करून ते ऊध्दवस्त करण्याचा निर्धार अण्णांनी केला म्हणून अण्णांना महात्मा फुले, शाहू, गाडगेबाबा, ऊॉ. बाबासाहेब आंबेडकर वारसदार म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण अण्णांचे मूळ ध्येय मानवमुक्ती हे होते.

समाजात ऊघड्या डोळ्यांनी वारले व समाजाची योग्य नाडी तपासून अशक्त रोगीट समाजाला योग्य दिशा ऊपचार करण्यासाठी संपूर्ण हयात घालविली. समाजातील विषमता, सावकारशाही, काळाबाजार, दारिद्र्य व अज्ञान या सर्व विषारी विळख्यात अडकलेला हरीजन बहुजन समाज की ज्यांच्या नशिबी आलेले दु:ख, यातना, अपमान, गुलामगिरी या साऱ्यांवर इलाज केला.

शाहिरी या कलेतून सारा महाराष्ट्र जागविला. ज्यांना अस्पृश्य म्हणून गुराढोरांचे जीवन जगावे लागले, त्याच घरी जन्माला आलेल्या शाहिराने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी करून दिली. प्राचीन काळी देवालयातून वेदांचे पठण केले जात होते ते पठण जर चुकुन एखाद्या अस्पृश्याने ऐकले तर त्याच्या कानात गरम तेल टाकले जात असे. कुणी म्हटले तर त्याची जीभ कालपी जात होती. अशी विषमता त्या काळात होती. ही विषमता कित्येक शतकांपासून चालू होती. या असंख्य विषमतावादी परंपरावर पिळवणूकीवर अण्णांनी प्रहार केला. अस्पृश्यांनी शाहीरीचा अनमोल जपून ठेवला. हीच शाहिरी अण्णा भाऊंनी जन प्रबोधनाचे शस्त्र म्हणून वापरली व यशस्वीपणे त्या शस्त्राची ताकद, प्रभाव समाजात निर्माण केला.

कोणतीच कला, मानव हा हीन जातीचा, कमी नाही. सर्व माणसे सारखी आहेत. समता प्रस्थापित करण्यासाठी अण्णांनी अतोनात प्रयत्न केले.

दारिद्र्यासोबत रडत बसणे अण्णांना आवडत नव्हते तर बाबासाहेबांनी सांगितलेली त्रिसूत्री शिका—संघटित व्हा आणि संघर्ष करा, त्या शिवाय दारिद्र्यातून बाहेर निघणे अवघड आहे. जोपर्यंत आपण अज्ञानापासून अंधश्रध्देपासून, गुलामगिरीतून बाहेर पऊत नाही तो पर्यंत आपली प्रगती नाही. जीवनामध्ये नवी पहाट, प्रकाशदीप लावण्यासाठी शिक्षणच घेतले पाहिजे. अण्णा स्वतः खूप वर्ग शिकले नव्हते, त्यांची त्यांना नेहमी खंत वाटत होती. पण इतर आपल्या बांधवांनी व भगिनींनी खूप शिकावे ही तळमळ त्यांच्या मनात होती.

**निष्कर्ष :—**

थोडक्यात अण्णा भाऊ साठेंची जीवनदृष्टी विशाल, चिंतनशील होती. मानवी मूल्यांची होणारी हेळसांड, अपमान दूर करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता ही मानवी मूल्ये समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला. नवचैतन्याची, समतेची, सुखाची, प्रगतीची व मानव मुक्तीची पहाट निर्माण केली. मनुष्याच्या ऊन्नतीसाठी, दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी, समाजात चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी आपल्या संस्कृतीचा गौरव करण्यासाठी, स्वातंत्र्य, समता व बंधुता चा जास्तीत जास्त लोकांनी स्वीकार केला. तितक्या प्रमाणात त्या व्यक्तीचा समाजाचा, देशाचा विकास होऊ शकतो. संयम, प्रामाणिकपणा, सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, श्रमप्रतिष्ठा, नम्रता, ऊदारता, सत्य, स्नेह, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी जीवनमूल्ये रूजवून समाजात परिवर्तन करण्याचे कार्य अण्णा भाऊंनी केले.

**संदर्भ :—**


१. पिंगळे वि.दा. — लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, भक्तीसुगंध प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २०१२.

२. संपा. डांगळे अर्जून, ऊपाध्ये नीला, नाईक वसुंधरा, सावरकर सुभाष — लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्‌मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८

३. गुरव बाबुराव — अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्‌मय गृह, मुंबई

४. गुरब बाबुराव — अण्णा भाऊ साठेः समाजविचार आणि साहित्य विवेचन, लोकवाङःमय गृह, मुंबई १९९९

५. साठे दिनकर सहदेव अण्णा भाऊंच्या आठवणी, संकेत प्रकाशन नागपूर, २००७

६. डॉ. माधव रा. पोतदार — शाहीर अमर—अण्णा, अनुबंध प्रकाशन पुणे, २००४

७. विटेकर वि. ब. — असे होते अण्णा भाऊ साठे, छाया प्रकाशन पुणे, १९८६

८. सकाटे मच्छिंद्र — अण्णा भाऊ साठे : एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, २००५

# ३४. शिवकालीन प्रशासन

**बिडवे टी .एस**
सहाय्यक प्राध्यापक, बाबुरावजी **आडसकर** महाविद्यालय, केज
ता. केज जि. बीड

---

**1.1 प्रास्ताविक :**

शिवाजी महाराज हे कार्यक्षम आणि प्रबुद्ध सम्राट म्हणून ओळखले जातात. **त्यांनी** स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्याच्या प्रशासकीय कामात त्यांना मदत करण्यासाठी अष्टप्रधान नावाची आठ मंत्र्यांची परिषद होती. यामध्ये, मंत्र्यांच्या प्रमुखांना पेशवे म्हटले गेले, जे राजा नंतर सर्वात महत्वाचे होते. अमात्य वित्त आणि महसूलचे कामकाज पाहत होते, तर मंत्री राजाच्या वैयक्तिक दैनंदिनीची काळजी घेत होते. सचिव कार्यालयीन काम करत असत ज्यात शाही शिक्का लावणे आणि करार पत्रांचे लेख तयार करणे समाविष्ट होते. सुमंत परराष्ट्रमंत्री होते. सेनाप्रमुखांना सेनापती असे संबोधले जात असे. धर्मादाय आणि धार्मिक व्यवहार प्रमुख यांना पंडितराव म्हटले जात असे. न्यायाधीश न्यायालयीन कामकाजाचे प्रमुख होते.

मराठा साम्राज्य तीन किंवा चार विभागांमध्ये विभागले गेले. प्रत्येक प्रांतात एक सुभेदार होता ज्याला प्रणपती म्हटले जात असे. प्रत्येक सुभेदाराची अष्टप्रधान समितीही होती. काही प्रांत केवळ करदाते आणि प्रशासनाच्या बाबतीत स्वतंत्र होते. न्यायव्यवस्था प्राचीन पद्धतीवर आधारित होती. गावातील पाटील गुन्हेगारी प्रकरणाचा तपास करायचे. राज्याच्या उत्पन्नाचा स्त्रोत हा जमिनीवरून कर होता, परंतु सरदेशमुखीमधूनही महसूल गोळा केला गेला. 'चौथ' हा शेजारच्या राज्यांच्या सुरक्षेची हमी देण्यासाठी लावलेला कर होता.

प्रारंभिक जीवन

शिवाजी महाराजांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यात झाला. त्यांचे वडील शहाजी भोंसले एक शक्तिशाली सामंत होते. त्यांची आई जिजाबाई जाधव कुळात जन्मलेली एक प्रतिभावान महिला होती. शिवाजी महाराजांच्या मोठ्या भावाचे नाव संभाजी होते जे बहुतेक वेळा वडील शाहजी भोसले यांच्यासोबत राहत होते. शहाजी राजेंची दुसरी पत्नी तुकाबाई मोहिते होती. त्यांना एकोजी राजे नावाचा मुलगा होता. शिवाजी महाराजांच्या चारित्र्यावर पालकांचा मोठा

प्रभाव होता. त्यांचे बालपण आईच्या मार्गदर्शनाखाली गेले. त्याने राजकारण आणि युद्ध शिकले होते. त्यांना त्या काळातील वातावरण आणि घटना चांगल्या प्रकारे समजू लागल्या.

1.2 कौटुंबिक माहिती

शहाजीराजे भोसले (वडील) हे प्रथम अहमदनगरच्या निजामशहाच्या पदरी एक सरदार म्हणून होते.मलिक अंबर ह्या निजामशहाच्या प्रभावी वजिराच्या मृत्यूनंतर मोगल सम्राट शहाजहानच्या सैन्याने इ.स. १६३६ मध्ये अहमदनगरवर चाल करून ते शहर आपल्या ताब्यात घेतल्यानंतर शहाजीराजे विजापूरच्या आदिलशहाच्या पदरी सरदार म्हणून रूजू झाले.[ संदर्भ हवा ] आदिलशहाने त्यांना पुण्याची जहागिरी दिली. शहाजीराजांनी तुकाबाईंशी आपला दुसरा विवाह केला. लहान शिवाजीराजांना घेऊन जिजाबाई पुण्याला रहायला आल्या. तुकाबाई आणि शहाजीराजे ह्यांच्या एकोजी भोसले (व्यंकोजी भोसले) ह्या पुत्रांनी पुढे सध्याच्या तमिळनाडूमधील तंजावरला आपले राज्य स्थापन केले.

1.जिजाबाई (आई)

जिजाबाई पुण्यात रहायला गेल्या त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवाजीराजे आणि कारभारी ह्यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून, जिजाबाईंनी पुण्याची पुन:स्थापना करायला सुरुवात केली.शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि मोठे झाल्यावरही (मोठेपणीच्या सिंहगडावरच्या स्वारीसारख्या) प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजाबाईंनी खंबीर मार्गदर्शन दिले.शिवाजीमहाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्यस्थापनेचे स्वप्न साकार करायला शिवाजीमहाराजांना जिजाबाईंनी स्फूर्ती दिली असे काही इतिहासकार मानतात.

2 मार्गदर्शक

युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार ह्यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजीराजांकडून, दप्तरव्यवस्था व न्यायव्यवस्थेचे शिक्षण दादोजी कोंडदेव मलठणकर यांचेकडून,तर परकीय सत्तेविरूद्ध लढा करण्याकरता आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण जिजाबाईंकडून मिळाले असे मात्र उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाबाई यांनी बाल शिवाजीच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले.शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड इत्यादींच्या माध्यमातून बाल शिवबाच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

3 पत्नी

1. काशीबाई जाधव
2. गुणवंतीबाई इंगळे
3. पुतळाबाई पालकर
4. लक्ष्मीबाई विचारे
5. सईबाई निंबाळकर
6. सकवारबाई गायकवाड
7. सगुणाबाई शिंदे
8. सोयराबाई मोहिते

4 वंशज

1. मुलगे :

- छत्रपती संभाजी भोसले
- छत्रपती राजारामराज भोसल

2. मुली:

- अंबिकाबाई महाडीक
- कमळाबाई (सकवारबाईची कन्या
- दीपाबाई
- राजकुंवरबाई शिर्के (सगुणाबाईची मुलगी, गणोजी शिर्के यांची पत्नी)
- राणूबाई पाटकर
- सखुबाई निंबाळकर (सईबाईची मुलगी)

3. सुना/नातसुना

- अंबिकाबाई(सती गेली)
- जानकीबाई
- राजारामांच्या पत्नी ताराबाई (माहेरच्या मोहिते)
- संभाजीच्या पत्नी येसूबाई
- राजसबाई (पुत्र संभाजीची पत्नी)
- सगुणाबाई{ (संभाजीपुत्र शाहूची पत्नी) {संदर्भ हवा}}

4. <u>नातवंडे</u>

- संभाजीचा मुलगा - शाहू
- ताराबाई-राजारामाची मुले - दुसरा शिवाजी
- राजसबाईची मुले - दुसरा संभाजी[

5. <u>पतवंडे</u>

- ताराबाईचा नातू रामराजा, याला शाहूने दत्तक घेतले, म्हणजे तो स्वतःचाच काका झाला.
- दुसऱ्या संभाजीचा मुलगा - द्वितीय शिवाजी (खरेतर ३ रा शिवाजी) (कोल्हापूर)

<u>1.3 शिवकालीन प्रशासन</u>

मराठा शासक छत्रपती शिवाजी महाराजांच्या सल्लागार परिषदेला अष्टप्रधान म्हणत असत. सरकारचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी आठ मंत्र्यांची परिषद स्थापन केली होती, ज्याला शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ म्हटले जाते. या परिषदेचा प्रत्येक मंत्री त्याच्या विभागाचा प्रमुख होता. अष्टप्रधान परिषदेच्या सर्व मंत्र्यांनी शिवाजी महाराजांचे सचिव म्हणून काम केले. या परिषदेला कोणत्याही प्रकारे "मंत्री" म्हटले जाऊ शकत नाही कारण ती कोणताही निर्णय घेऊ शकत नाही किंवा थेट धोरण ठरवू शकत नाही. त्यांची भूमिका केवळ सल्लागाराची होती. छत्रपती शिवाजी महाराज या मंत्र्यांच्या सल्ल्याचे पालन करण्यास बांधील नव्हते.

अष्टप्रधानांतर्गत पेशवे, अमात्य, वाकियानवीस, सुमंत, शुभानवीस, सार-ए-नौबत, पंडितराव आणि न्यायाधीश अशी आठ पदे समाविष्ट करण्यात आली. शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्याभिषेक जून 1674 मध्ये करून घेतला व मराठ्यांच्या स्वतंत्र आणि सार्वभौम राज्याची घोषणा केली. शिवाजी महाराजांची राज्याभिषेकाची कल्पना व्यापक व प्रभावी होती. त्यामुळे निर्वीकार पडलेल्या मराठी माणसाला चेतना मिळाली. याप्रसंगी शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापन केली. राज्यकारभाराची निरनिराळी कामे त्यांनी या मंत्र्यांकडे सोपवली. ही मंत्रीपदे वंशपरंपरागत न ठेवता, कर्तबगारीवर व व्यक्तीचे गुणदोष पाहूनच ठरवण्यात येत. या अष्टप्रधान मंडळात पुढील मंत्री कार्यरत होते.

**1.प्रधानमंत्री (पेशवा) :**

मोरोपंत त्रिंबक पिंगळे हे शिवाजी महाराजांच्या मंत्रिमंडळातील प्रथम क्रमांकाचे मंत्री. स्वराज्याच्या सर्व राज्यकारभारावर देखरेख ठेवणे व महाराजांच्या गैरहजेरीत राज्यकारभार सांभाळणे हे त्यांचे काम होते. प्रधानमंत्रीला वार्षिक १५ हजार होन, पगार मिळत असे.

**2. पंत अमात्य (मजुमदार) :**

रामचंद्र निलकंठ हे महत्त्वाचे मंत्री असून त्यांना स्वराज्यातील सर्व महाल, परगण्यांचा एकूण जमाखर्च पाहून तसेच लिहून व तपासून महाराजांसमोर सादर करणे ही कामे करावी लागत. पंत अमात्यांना वार्षिक १२ हजार होन पगार होता.

**पंत सचिव (सुरनिस) :**

अण्णाजीपंत दत्तो. हे महत्त्वाचे मंत्री असून त्यांना सर्व जाणाऱ्या येणाऱ्या पत्रव्यवहारावर लक्ष ठेवणे, शिवाजी महाराजांकडून निरनिराळ्या सुभेदारांना व इतर अधिकाऱ्यांना वेळोवेळी पाठवल्या जाणार्या आज्ञापत्रावर लक्ष ठेवणे, स्वराज्याचे सर्व दफ्तर सांभाळणे तसेच जमीन महसुलाच्या व्यवहारावरही लक्ष ठेवणे ही कामे करावी लागत. पंत सचिवांना वार्षिक १० हजार होन पगार होता.

**3.मंत्री (वाकनीस) :**

दत्ताजीपंत त्रिंबक यांच्याकडे महाराजांच्या खाजगी कारभाराकडे लक्ष ठेवणे, महाराजांची रोजनिशी ठेवणे, त्यांच्या भोजन व्यवस्थेकडे लक्ष ठेवणे, वैयक्तिक संरक्षणाकडे लक्ष पुरविणे, खाजगी, कौटुंबिक आमंत्रणे करण्याची कामे होती. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

**4.सेनापती (सरनौबत) :**

हंबीरराव मोहिते हे शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या घोडदळ व पायदळ विभागाचे सेनापती होते. स्वराज्याच्या सर्व सैन्यावर सेनापतींची हुकूमत चालत असे. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

**5.पंडीतराव दानाध्यक्ष (सद्र-मुहतसिब) :**

रघुनाथराव पंडीत यांना दानधर्म करणे, पंडीत, विद्वान ब्राह्मणांचा सन्मान करणे, यज्ञ करणे, नियमीत चालणाऱ्या धार्मिक कार्याबाबत सल्ला देणे, शास्त्रार्थ पाहणे ही कामे होती. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

**6.पंत सुमंत (डाबीर) :**

रामचंद्र त्रिंबक यांना परराष्ट्रांना खलिते पाठविणे व आलेली घेणे, परराष्ट्रासंबंधी माहिती आणि सल्ला महाराजांना देणे आणि परराष्ट्रातील बातम्या हेरांमार्फत काढण्याचे काम होते. पंत सुमंतांना वार्षिक १० हजार होन पगार होता.

**7.न्यायाधीश (काझी-उल-ऊझत) :**

निराजीपंत रावजी यांना दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत खटले चालवून न्यायनिवाडा करून रयतेला न्याय देण्याचे काम होते. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

या सगळ्यात आपण जर नीट पाहिले तर असे दिसून येईल की, आठपैकी सहा प्रधानांना सेना घेऊन युद्धप्रसंगी स्वारी करावी अशी राजाज्ञा आहे. म्हणजे न्यायाधीश आणि पंडितराव सोडल्यास तुम्ही कितीही मोठ्या पदावर असा, खुद्द महाराज जातीने युद्धाच्या आघाडीवर जात असल्याने सगळ्यांना हे काम करावेच लागे. अशा वेळी मग दरबारातील कामे करण्यासाठी या अष्टप्रधानांचे मुतालिक नेमले जात असत, ते दरबारातील कामकाज पाहत. महाराजांच्या काळात प्रत्येक अष्टप्रधानाचे मुतालिक कोण होते हे आज सांगणे अवघड आहे, पण पुढे शाहू महाराजांच्या काळात बाजीराव वगैरे सर्व पेशवे स्वाऱ्यांनिमित्त बाहेर असताना सातारा दरबारात कामकाजासाठी पुरंदरे मुतालिक असल्याचे ज्ञात आहेच. एकंदरीतच अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची उभारणी केली आणि ज्याला त्याला आपल्या पदानुसार कामे वाटून दिली. आज शिवजयंतीनिमित्त केवळ जयघोष न करता आपल्याला महाराजांच्या या साऱ्या सुसूत्रतेचं, या सगळ्यांच्या एकंदर कार्याचे स्मरण असणे आवश्यक आहे. बहुत काय लिहिणे? अगत्य असू द्यावे. लेखनावधी!

**संदर्भसूची:**


1. Maharashtra (India) (1967). Maharashtra State Gazetteers: Maratha period. Directorate of Government Printing, Stationery and Publications, Maharashtra State. पृ० 147.
2. The Quarterly Journal of the Mythic Society (Bangalore). 1975. P. 18.
3. Singh K S (1998). India's communities. Oxford University Press. P. 2211. ISBN No. 978-0-19-563354-2.
4. Marathi book Shivkaal (Times of Shivaji) by Dr V G Khobrekar, Publisher: Maharashtra State Board for Literature and Culture, First edition 2006. Chapter 1
5. Salma Ahmed Farooqui (2011). A Comprehensive History of Medieval India: From Twelfth to the Mid-Eighteenth Century. Dorling Kindersley India. P. 314–. ISBN No. 978-81-317-3202-1.
6. Har Bilas Sarda (Diwan Bahadur), Speeches and writings
7. Chintaman Vinayak Vaidya History of medieval Hindu India: (being a history of India from 600 to 1200)
8. The Marathas 1600-1818, Part 2, Volume 4 By Stewart Gordon. Page 88.
9. Shiri Ram Bakshi (1998). Sharad Pawar, the Maratha legacy. APH Publishing. P. 25–. ISBN No. 978-81-7648-007-9. अभिगमन तिथि 15 May 2011.
10. Bhatia, H. S. (2001). Mahrattas, Sikhs and Southern Sultans of India: Their Fight Against Foreign Power (2nd संस्करण). Deep & Deep. ISBN No. 9788171003693. अभिगमन तिथि 2012-08-31.
11. "Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti: मराठा गौरव शिवाजी महाराज जयंती के लिए स्पीच". Dainik Jagran. अभिगमन तिथि 2021-05-10.
12. https://www.mahamtb.com/Encyc/2021/2/18/Article-on-Chhatrapati-Shivaji-Maharaj-Ashta-Pradhan-and-their-duties.html

# ३५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार हितांचे रक्षण

**प्रा. उद्धव शिवाजी जमधाडे**
सहयोगी प्राध्यापक (समाजकार्य विभाग)
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम
Email ID – udhavjamdhade916@gmail.com

कामगारांच्या कल्याणविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय कळकळ होती. मध्यवर्ती सरकारच्या श्रम विभागाचे मंत्री या नात्याने कामगार कल्याणविषयक धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना होते. या पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट १९४२ रोजी नवी दिल्ली येथे शासन, मालक आणि कामगारांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत कामगार संघटना अन्न,वस्त्र,निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा अधिकार असे सर्वसमावेशक धोरण असावे. कामगारांची दुखणी मांडण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असावा, मात्र संपाचा अतिरेक नको इत्यादी विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. उद्योगाच्या आणि श्रमिकांच्या कल्याणविषयक समस्यांचे कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून विश्लेषण आणि समाधान करण्यासाठी, स्थायी आणि प्रतिनिधिक यंत्रणा निर्माण करण्याच्या हेतूने, श्रमसंमेलन आमसभा आणि स्थायी श्रम समिती स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

कामगारांना सामाजिक सुरक्षा कामगारांच्या विविध प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्यासाठी ६ सप्टेंबर १९४३ रोजी दिल्ली येथे श्रम संमेलनाच्या आमसभेची बैठक आयोजित करण्यात आली. आमसभेच्या पहिल्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर मंत्री म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले, ‘श्रमिकांकरिता उचित श्रममूल्य आणि योग्य सेवाशर्ती निर्धारित करण्याचे कर्तव्य आणि उत्तरदायित्व २७जुलै १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर लगेचच ७व ८ऑगस्ट १९४२ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली मालक, कामगार व सरकार यांचे प्रतिनिधी असलेली त्रिपक्षीय मजूर परिषद दिल्ली येथे भरली. व्ही.व्ही.गिरी.ना.म.जोशी,जमनादास मेहता यांसारख्या कामगार नेत्यांनी या परिषदेत भाग घेतला. डॉ. आंबेडकर या परिषदेत ‘नीड ऑफ युनिफॉर्मिटी इन लेबर लेजिस्लेशन’ या विषयावर भाषण करताना. सरकारने स्वत: स्वीकारले आहे. ‘कामगार संघटनांना मान्यता बंधनकारक कामगार संघटनांना बळकटी देऊन.

कामगारांना आपली दुखणी प्रभावीपणे मांडता यावी या हेतूने १९२६ च्या भारतीय कामगार संघटना कायद्यात (ट्रेड युनियन अॅक्ट १९२६) सुधारण सुचवणारे

विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ नोव्हेबंर १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात मांडले. १) मालकाने कामगार संघटनेला मान्यता देणे बंधनकारक करणे २) कामगार संघटनेला मान्यतेबाबतच्या अटी व शर्तीची पूर्तता केली आहे. त्या संघटनेला मालकाने मान्यता न दिल्यास तो दंडनीय अपराध ठरविणे हया महत्वाच्या तरतुदींचा या सुधारणा विधेयकात समावेश होता.

### स्त्री पुरूषांना समान मजुरी

पूर्वी कोळसा खाणीत काम करायला स्त्री कामगारांना बंदी होती. परंतु दुसऱ्या महायुध्दामुळे उत्पन्न परिस्थिती आणि कोळसा उत्पादनात होत चाललेली घट विचारात घेता कोळसा उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यावरील प्रतिबंध काढून टाकण्यासाठी दिंनाक ८ फेब्रुवारी १९४४ रोजी केंद्रीय विधिमंडळात उपस्थित झालेल्या तहकुबी सूचनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उत्तर दिले. ते म्हणाले ‘ स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यास केलेली मनाई उठवणे म्हणजे काही दृष्कृत्य नव्हे, उलट हे कृत्य अत्यंत समर्थनीय आहे. पुरूष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री कामगारांना दिला जाईल. स्त्री पुरूषांना समान मजुरी हे महान तत्व पहिल्यांदाच स्वीकारण्यात आले आहे.‘ महिलांना प्रसूती काळात रजा उपभोगतांना पूर्ण पगार मिळावा यासंबधीचे विधेयक डॉ. आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात सादर केले.

### कामगारांना पगारी सुटी

कामगारांची प्रकृती चांगली राहावी व त्यांची कार्यक्षमता वाढावी कायद्याने दिलेल्या सुटया कामगारांना मंजूर करण्यात येतात. तथापि सुटीची भरपाई करण्याची तरतूद त्यावेळी कायद्यात नव्हती.एखाद्या कामगाराने सुटीच्या दिवशी काम केल्यास त्याची भरपाई करण्याची तरतूद करण्यासाठी १ नोव्हेंबर १९४४ रोजी फॅक्टरीज ॲक्ट (दुसरी सुधारणा) विधेयकावर केंद्रीय विधिमंडळात झालेल्या चर्चेला मजूर मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेबांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले. या विधेयकातील दुसरी तरतुद पगारी रजेबददल होती. याशिवाय बारमाही चालणाऱ्या कारखान्यासाठी आठवडयात कामांच्या तासांची कमाल मर्यादा ४८ आणि हंगामी कारखान्यासाठी ५४ तासांची मर्यादा निश्‍चित करणे आवश्यक होते. त्या वेळच्या फॅक्टरीज कायद्यात ‘ओव्हर टाइमच्या’ वेतनाबद्दल सर्वत्र सारखा नियम नव्हता म्हणून कोणत्याही प्रकारचा कारखाना असो ‘ ओव्हर टाइमच्या’ वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम असावा यासाठी वेतनाचा दर दीडपट असावा या दोन प्रमुख सुधारणा सुचवणारा फॅक्टरीज ॲक्ट १९३४ (सुधारणा) विधेयक २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय विविधमंडळात सादर केला. ट्रेड युनियन ॲक्टमुळे कामगरांना संप करण्याचा अधिकार मिळाला.

कामगारांना आपल्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकारी असला तरी या अधिकाराचा अनाठायी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास कामगारांचे नुकसान होईल ही बाब त्यांनी आवर्जून सांगितली. दुसऱ्या महायुध्दाच्या धामधुमीत इंग्लडंच्या बादशहाने ९ जुलै १९४२ च्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेवरील नेमणुकीस मंजुरी दिल्याची गव्हर्नर जनरल यांनी घोषणा केली. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ जुलै १९४२ रोजी पदभार स्वीकारला त्यांच्याकडे श्रम,सिंचन,वीज, सार्वजनीक बांधकाम आणि खाणकाम ही खाती सोपविण्यात आली. कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. संविधान सभेमध्ये काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला.

### स्वतंत्र मजूर पक्ष

भारत सरकार कायदा १९३५ नुसार भारतात १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार हे स्पष्ट होते. या कायद्यामुळे जे राजकीय हक्क प्राप्त झाले आहेत. त्याचा फायदा घेऊन असपृश्यांमध्ये राजकीय जागृती निर्माण करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरवले.त्यासाठी राजकीय पक्षाची स्थापना करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. तथापि प्रस्तावित राजकीय पक्ष जातीय आधारावर न उभारता या पक्षाला राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या हेतूने शेतकरी व कामगारांच्या लढयाशी जोडण्याचा त्यांनी निश्चय केला. गोलमेज परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनेकदा लंडनला जावे लागते. त्यावेळी मजूर पक्षाचे महत्वाचे नेते, पदाधिकारी यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली. मजूर पक्षाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपल्या पक्षाची घटना, कार्यक्रम,ध्येय व उद्दिष्टे ठरवली. अशाप्रकारे १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ या नावाने नवीन पक्ष स्थापन केला. शेतकरी व मजूर यांची संघटना बांधून त्यांचे राहणीमान सुधारण्याचा प्रयत्न करणे, विद्यमान जमीनधारा पध्दत अनिष्ट असल्यामुळे ती बदलणे, सामाजिक सुधारणा घडवणे, ग्राम संघटना, कृषी सुधारणा, शिक्षण आदी मुद्दयांवर या पक्षाच्या जाहीरनाम्यात भर देण्यात आला, या पक्षाची दारे सर्व समाजासाठी मोकळी ठेवण्यात आली.

### संदर्भग्रथं

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर—धजंजय कीर—१९८९ पोपुलर प्रकाशन
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषने—१९३७—१९४५ म.शा.२००२
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखाण खंड २१ स्पेक्टर्स म.शा.२००६
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत यांचे मुकनायक म.शा.२००८

# ३६. राजर्षी शाह छत्रपती यांचे शैक्षणिक विचार

**सहा. प्रा. डॉ. बाळासाहेब मुळिक**
तत्त्वज्ञान विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
Email: balasaheb.mulik1969@gmail.com

**प्रस्तावना –**

भारतामध्ये इंग्रज व्यापाऱ्यांच्या वेषात आले तेव्हा ते केवळ व्यापारासाठीच आले असे वाटले. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने साम्राज्यवादी संघर्ष करून आपले प्रभूत्व निर्माण केले. त्यावेळी इंग्रज आणि मराठा यांच्यात तीन युद्धे झाली. परंतु इंग्रजांविरूद्ध आघाडी निर्माण करण्यास आपणास अपयश आले. अर्थातच मराठेशाहीची विनाशाकडे वाटचाल सुरू झाली. तद्वतच दूर असणाऱ्या भागांवर मध्यवर्ती सत्ता नियंत्रण ठेवू शकत नसल्याने संस्थाने उदयास आली. सर्व संस्थानांना अंतर्गत कारभारात स्वातंत्र्य देताना आपल्या सरकारच्या हितसंबंधांना बाधा येणार नाही याची खबरदारी ब्रिटीश सरकारने घेतली. सातारा, हैद्राबाद आदी संस्थानात राजकीय, प्रशासकीय सुधारणा घडून आल्या. या संदर्भात समाजानेही मोठे कार्य आणि सहकार्य केले. महाराष्ट्रातील आद्य सुधारक चळवळी, महिला चळवळ, शैक्षणिक चळवळ आदी चळवळींनी प्रबोधनाच्या कार्याला मोठा हातभार लावला आहे. सांस्कृतिक पुनर्रउत्थानात संगीत, नाटक, चित्रकला, काव्य, साहित्य आणि संशोधन विकास या क्षेत्राचा भारताच्या प्रगतीमध्ये मोठा वाटा आहे. त्याच अनुषंगाने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने व्यापक असे कार्य केलेले आहे.

राजघराण्याचा वारसा असणाऱ्या जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब व राधाबाई या दांपत्यास २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर मुक्कामी पुत्रप्राप्ती झाली. या पुत्राचे नाव 'यशवंतराव' असे ठेवले गेले. छत्रपत्रींच्या गादीवर सर्वात जवळचे वारसदार म्हणून ब्रिटीशांच्या संमतीने आबासाहेबांचे ज्येष्ठ पुत्र यशवंतराव यांची निवड केली. चौथ्या शिवाजी महाराजांच्या राणी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना विधिवत दत्तक घेतले. त्याच वेळी कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव कोल्हापूरच्या गादीवर शाहू छत्रपती म्हणून आरूढ झाले. राजर्षी शाहू महाराज एक क्रियाशील पंडीत होते. ते 'प्रगतीप्रिय राजे' असल्यामुळे त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सर्व जातीधर्मियांची प्रगती पाहायची होती. त्याअनुषंगाने लोकविकासासाठी गावोगावी शिक्षण पोहोचले पाहिजे. लोकांना शिक्षण आणि उद्योग देणे एवढेच नव्हे तर त्यांची सर्व क्षेत्रात उन्नती व्हावी आणि त्यासाठी राजाने

प्रगतीशील रहावे नव्हे तर ते त्याचे कर्तव्यच असते असे शाहू महाराजांना वाटे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अंत्यजापासून ते वंजाऱ्यापर्यंत सर्वांच्या शिक्षणाची सोय केली. त्याचप्रमाणे शिक्षणातून लोकांच्या हक्कांची जाणीव करून दिली. यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी जी ज्ञानज्योत लावली त्या ज्योतीने ज्योत लावण्याचे पवित्र काम राजर्षी शाहू महाराजांनी केले.

शैक्षणिक कार्य करणारा दूरदृष्टीचा महापुरूष म्हणून राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. ज्या समाजात शिक्षणाला फारसा वारसा नव्हता आणि भारतामध्ये परंपरांनी ज्या लोकांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता अशा लोकांच्या शिक्षणासाठी शाहू छत्रपती महाराज काम करीत राहिले. खऱ्या अर्थाने कोल्हापूर हे त्याकाळी विद्येचे माहेरघरच होते. ब्राह्मणेतरांच्या शिक्षित झालेल्या अनेक नेत्यांनी कोल्हापूरात शिक्षण घेतल्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये कोल्हापूरचे मोठे योगदान आहे. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर प्रजासत्ताकाची घटना १९५० साली अंमलात आली. घटनेच्या ४५ व्या कलमान्वये असा आदेश दिला आहे की, सर्व मुला-मुलींना चौदा वर्षे वयापर्यंत मोफत शिक्षण द्यावे परंतु शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यात १९१७ साली सक्तीच्या शिक्षणाचा तर १९०२ साली राखीव जागासंबंधी कायदा केला होता. हा एक क्रांतीकारी निर्णय मानला जातो की, ज्या निर्णयामुळे आजची समाजव्यवस्था त्याच विचारावर आपले अस्तित्व निर्माण करू पाहत आहे.

परंपरेने विशिष्ट जाती व धर्मातील लोक ज्ञान फक्त आम्हीच घ्यावे, त्या ज्ञानाच्या सर्व चाव्या आमच्याकडे कशा राहतील याची व्यवस्था केलेली होती. पण राजर्षी शाहू महाराजांनी या व्यवस्थेला छेद देत प्रत्येक जाती धर्माच्या हाती ज्ञानाच्या चाव्या सोपविल्या. त्यामुळे झोपडीपर्यंत आणि गरिबांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचून त्यांच्यात असामान्य सामर्थ्य जागृत झाले. त्याच ज्ञानाची सूर्यकिरणे चंद्रमौळी घरापर्यंत येऊन पोहोचली. त्यामुळे समानता, एकता आणि मानवता या तत्त्वत्रयींच्या आधाराने समाज मंदीर उभे केले. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे‘बहूजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय व त्या समाजाची काळजी घेतल्याशिवाय राजकारण फलद्रूप होणार नाही’याच हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी स्वामी विवेकानंदांचे तत्त्व तंतोतंत आचरणात आणून दाखविले.

**राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण कार्य –**

१) बहूजन समाजामध्ये ज्ञानप्राप्तीची जाणीव निर्माण करणे,

२) सामाजिक उच्चनीचतेची भावना बोथट करणे,

३) समाजोद्धारासाठी शाळा आणि वसतीगृहे काढणे या पायावर आधारलेले आहे.

१) प्राथमिक शिक्षण, २) दुय्यम आणि उच्च शिक्षण, ३) पुरोहित शाळा, ४) युवराज शाळा, ५) पाटील शाळा, ६) उद्योग शाळा, ७) संस्कृत शाळा८) सत्यशोधक शाळा, ९) सैनिक शाळा, १०) बालवीर शाळा, ११) डोंबारी मुलांची शाळा, १२) कला शाळा

**वसतीगृहांची स्थापना –**

१) कोल्हापूर – विद्यार्थी वसतिगृहांची माता,

२) शिक्षणासाठी जातवार वसतिगृहे

**वसतिगृहे –**

१) व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग हाऊस, २) दिगंबर जैन बोर्डींग, ३) वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह, ४) मुस्लीम बोर्डींग, ५) मिस क्लार्क होस्टेल, ६) दैवेज्ञ शिक्षण समाज बोर्डींग, ७) श्री नामदेव बोर्डींग, ८) पांचाळ ब्राह्मण वसतिगृह, ९) श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, १०) इंडियन ख्रिश्चन होस्टेल, ११) रावबहाद्दूर रघुनाथ व्यंकाजी सबनीस चंद्रसेनीय कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह, १२) आर्य समाज गुरुकूल, १३) वैश्य बोर्डींग, १४) ढोर-चांभार बोर्डींग, १५) शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह, १६) श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊस, १७) इंडियन ख्रिश्चन होस्टेल, १८) नाभिक विद्यार्थी वसतिगृह, १९) सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डींग, २०) श्री देवांग बोर्डींग, २१) उदाजी मराठा वसतिगृह, २२) श्री छत्रपती करवीर चौथे शिवाजी मराठा बोर्डींग, २३) वंजारी समाज वसतिगृह, २४) श्री शाहू छत्रपती बोर्डींग, २५) चोखामेळा वसतिगृह, २६) छत्रपती ताराबाई मराठा बोर्डींग ची स्थापना करून राजर्षी शाहू महाराजांनी माणसाला माणुसकीचे आणि स्वातंत्र्याचे समान हक्क देण्यासाठी आर्थिक आणि त्याचबरोबर मानसिक स्तरावर जीवनभर कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांची दृष्टी काळाच्या पुढे पाहणारी होती. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय दुसरा अन्य पर्याय नाही हे त्यांनी अचूकपणे जाणले. त्यामधूनच शिक्षण हे सर्वसामान्यांपर्यंत पोहचण्याचे धोरण आखण्यात आले. यामध्ये शाहू महाराजांना सर्वप्रथम मानसिक गुलामी दूर करावयाची होती. लोकांना ज्ञानी बनण्यासाठी तसेच त्यांच्या अंधश्रद्धा नाहीशा

होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले. माणसाचे जीवन सुरू झाले की शिक्षणही सुरू होते. शिक्षण ही प्रक्रिया नदीच्या वाहत्या पाण्यासारखी असते. माणसाच्या जीवनाचा शिक्षणाशी अतूट असा संबंध असतो. शिक्षणातून स्वातंत्र्य, समता, न्याय, प्रतिष्ठा आणि बंधूभाव ही सामाजिक मूल्ये समजू शकतो व नंतरच्या पिढीकडे आपण सोपवू आणि रुजवू शकतो. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी सर्व समाजाला शिक्षणच द्यावे लागते हे राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले होते. म्हणूनच प्राथमिक शाळेपासून वसतिगृहाच्या उभारणीसाठी त्यांनी प्रयत्न केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या आधी महाराष्ट्रामध्ये शिक्षण प्रसाराचे काम जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळकृष्ण जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी, डॉ. भाऊ दाजी लाड व महात्मा जोतीराव फुले या समाजसुधारकांनी काही प्रमाणात केले. पैकी महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार त्यामध्ये मौलिक आहेत. त्याच आधारे राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणविषयक चळवळ खऱ्या अर्थाने अंमलात आणली व लोकांना शिक्षण देण्याचे महनीय काम केले. महात्मा जोतीराव फुले म्हणत ‘पोटात भुकेचा डोंब उसळला की भाकरीची किंमत कळते, तसे गरिबीचे चटके बसले की शिक्षणाची किंमत कळते.’ज्यांना ज्यांना इच्छा असेल त्यांना त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. कारण शिक्षणातून समाजजागृती होते. तसेच समाजशिक्षणातून समाजपरिवर्तनही हे चोहो बाजूंनी होते. या जगामध्ये विद्येचा अधिकार माणसांना आहे तो त्यांना मिळाला पाहिजे यावर शाहू महाराजांचा प्रचंड विश्वास होता.

नवा समाज निर्माण व्हायचा असेल तर प्रत्येकास शिक्षण मिळाले पाहिजे ही समतावादी भूमिका शाहू महाराजांनी स्वीकारली होती. ते सतत असे म्हणत की, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अमेरिकेतील टस्केनी संस्थेचे संचालक बुकर टी. वॉशिंग्टन यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधण्याचे जे एक ऐतिहासिक कार्य केले तसेच कार्य शाहू महाराजांनी आपल्या राज्यात केले. खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू आपल्या महाराष्ट्राचे ‘बुकर टी. वॉशिंग्टन’होते. राजर्षी शाहू महाराज शिक्षण हे मानवी गुंतवणूक आहे असे मानत असत. शिक्षणामुळे लिहिता-वाचता येणे, लिहिलेले समजणे, समजलेले आचरणात आणणे आणि आचरणात आणताना ते का आचरणात आणावे अशा ठाम विचार प्रक्रियेला खरे शिक्षण म्हणता येईल यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळेच ते असे म्हणत की, शिक्षणामुळे माणसांची मने बदलत असतात. भारतीय समाजरचना बदलायची असेल तर त्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे. शिक्षण या साधनाने माणसाच्या मनामध्ये आत्मविश्वास

जागा होतो तसेच त्याची पात्रता वाढते. मानवी ध्येयप्राप्तीसाठी प्रथम पात्रता असावी मगच त्या गोष्टीची इच्छा व्यक्त करावी असे ते म्हणत असत. शिक्षणाने समतेवर आधारलेली नवीन समाजरचना निर्माण करता येईल. त्यातूनच राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून ध्येय-धोरणे ठरविता येतील आणि जातिबांधवांच्या हाती राज्याची सूत्रे सुरक्षित राहतील असे शाहू महाराजांना वाटे.

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक आणि सक्तीच्या मोफत शिक्षणावर भर देऊन सर्व जातीधर्मासाठी शिक्षण सुरू केले. त्यामुळे शाहू महाराजांच्या काळातच विद्येच्या मक्तेदारीला मूठमाती मिळाली. समाज उन्नतीप्रित्यर्थ शिक्षण मिळू लागले. शेकडो वर्षांपासून गोरगरिबांची अविद्येमुळे चाललेली गळचेपी थांबली. आपल्या राज्याचा 'शूद्र' हा आधारस्तंभ ठरला. या शुद्रांसाठी राजर्षी शाहूंनी 'गाव तेथे शाळा' काढून लोकांची अस्मिता जागृत केली. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा याविषयी लोकांच्या मनात प्रेम निर्माण केले.

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या मानसिक विकासासाठीही शिक्षण आवश्यक आहे असे म्हटले. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांच्या शिक्षणापासून स्त्रीशिक्षणापर्यंत शिक्षणाविषयी निश्चित धोरण आखले. शाहू महाराजांविषयी त्यांचे गुरू एस. एम. फ्रेझर म्हणतात, शाहू महाराजांचा जीवित कार्याचा गाभा म्हणजे त्यांच्या हृदयात असलेली मानवतावादी विशाल दृष्टी तसेच कोणाचीही भीड मुर्वत न ठेवणारी, दडपणाने दबली न जाणारी विलक्षण साहसी वृत्ती या दोन्हीचा संगम आहे. त्याकाळी स्त्रियांनी शिक्षण घेणे पाप समजले जाई परंतु धाडसाने स्त्री शिक्षणाचे कार्य करणारे शाहू महाराज स्त्री शिक्षणासाठी उत्तेजन देत राहिले.

राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांमध्ये खालील प्रमुख बाबी दिसतात.

१) शिक्षणसंस्थांची निर्मिती करणे,

२) विविध जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसति गृहाची सोय करणे,

३) सामान्य माणसामध्ये ज्ञानाची लालसा निर्माण करणे,

४) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, पारितोषिके व नादाऱ्या देणे, प्राथमिक शिक्षणाच्या आधाराने शिक्षणप्रसार होईल व शिक्षणासाठी गरीब, दलित, सर्व ब्राम्हणेतर वर्ग शिक्षण घेण्यास तयार होईल. या चार शिक्षणविषयक घटकांमुळे शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचेल असे त्यांना वाटे. म्हणून त्यांच्या शिक्षणविषयक आंदोलनाचे हे चार आधार होते.

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजसुधारकांचे योगदान महत्त्वाचे आहे. समाजसुधारकांच्या मांदियाळीमध्ये सर्वांनी शिक्षणावर अधिक भर दिला. ज्ञानी माणसेच देशाचे

भविष्य उज्ज्वल करतील म्हणून प्रथम ज्ञानाचा अंधकार नाहीसा करावा लागेल हे सर्वांनाच उमगले. महाराष्ट्रामध्ये म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजोद्धारासाठी असलेली तळमळ ही आजही आपणास ऊर्जा आणि प्रेरणा देत असते. त्या प्रेरणेतून महाराष्ट्र व संपूर्ण भारतात शिक्षणविषयक चळवळ उभी राहिली आहे. आपल्या महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, डॉ. बापूजी साळुंखे, श्री. भाऊसाहेब हिरे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, कर्मवीर डॉ. घोगरे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, बाळासाहेब विखे-पाटील, तात्यासाहेब कोरे, बाबूराव जगताप यासारख्या शिक्षणप्रेमी माणसांनी शिक्षणप्रसाराच्या कामात निस्वार्थीपणे रस घेतला म्हणूनच आज शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचल्याचे दिसत आहे. या शिक्षण प्रसारकांनी संपूर्ण महाराष्ट्रात बहूजन समाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ चालविली. त्यातून समाजाची एक प्रागतिक सामाजिक मानसिकता तयार झाली. या सर्व प्रगतीची मुळे म. फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारात व कृतीत आहेच हे विसरून चालणार नाही. आजच्या महाराष्ट्राच्या प्रगतीचे प्रत्येक पाऊल म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने पडत आहे म्हणूनच देशपातळीवर महाराष्ट्राची ओळख या समाजसुधारकामुळे वेगळी आहे. त्यांच्या विचारांना प्रमाण मानून महाराष्ट्र प्रगती करीत आहे.

**संदर्भ ग्रंथ –**


१) डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, ताराराणी बुक सर्व्हीस, कोल्हापूर-४१६०११.

२) प्राचार्य रा. तु. भगत, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर-४१६००१.

३) कॉ. गोविंद पानसरे, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, कॉ. प्रशांत आंबी, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.

# ३७. आधुनिक भारताच्या जडणघडणीत, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री-शिक्षणाकरिता महात्मा फूले यांचे योगदान

**सहा. प्रा. यु. एस. बनकर**
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय , वाशीम

**सारांश:**

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाज सुधारकांचे योगदान हे निर्विवाद राहिलेले आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या अनिष्ट रूढी व परंपरा यांना विरोध करून त्या मोडीत काढणे हे समकालीन कालखंडामध्ये सोपे काम नव्हते. या कालखंडामध्ये उच्चवर्णीयांनी मनुस्मृती सारख्या ग्रंथांचा आधार घेऊन महिला, निम्न जातीतील लोक यांना आपले गुलाम बनविले होते. या गुलामगिरी विरोधात लढण्याकरिता अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. त्यामध्ये महात्मा फुले यांचे नाव अग्रस्थानी आहे. गुलामगिरी विरोधात जर आवाज उठवायचा असेल तर, सर्वांना शिक्षित केले पाहिजे, म्हणून त्यांनी शिक्षणाकडे लक्ष वेधले. शिक्षणामुळे आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव लोकांमध्ये होईल व ते त्या विरोधात लढतील असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणतात, " विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले".

महात्मा फुले यांनी फक्त शिक्षणच नाही तर अस्पृश्यता निवारण, विधवा पुनर्विवाह, केशवपन, व्यसन मुक्ती, बालविवाह प्रतिबंध , अंधश्रद्धा निर्मूलन, बालहत्या प्रतिबंध, कामगारांचे प्रश्न अशा अनेक क्षेत्रांमध्ये कार्य केलेले आहे. याकरिता त्यांनी आपल्या घरातून सुरुवात करत असताना आपल्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईंना शिक्षण दिले, जेणेकरून त्या मुली आणि महिलांना शिक्षण देतील. त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांनाही सामाजिक हिताचे कायदे करण्यास भाग पाडले. उदा.पहिला कारखाना कायदा १८८१, तसेच अनेक कार्यकर्तेही तयार केले. हे कार्य करत असताना त्यांना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागले, कधी कधी तर त्यांना जीवे मारण्याचाही प्रयत्न केला गेला, परंतु त्यांनी हाती घेतलेले समाजसुधारणेचे कार्य अपूर्ण सोडले नाही. जीवनाच्या अंतापर्यंत ते समाजसुधारणेचे कार्य अविरत करत राहिले.

प्रस्तावना :-

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये अनेक समाजसुधारकांचे योगदान राहिलेले आहे. राजा राम मोहन राय यांना आधुनिक भारताचे जनक असे संबोधले जाते . त्यांनी सती प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले आणि त्यातूनच लॉर्ड बेटिंग यांनी सती प्रथा बंदी कायदा पारित केला. त्याच प्रमाणे त्यांनी अनेक प्रकारचे लोकोपयोगी कार्य केले. पुढे चालून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, तारामती शिंदे , विठ्ठल रामजी शिंदे , महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रां. धो. कर्वे आदी समाजसुधारकांनी वर्षानुवर्ष चालत आलेल्या अनिष्ट रूढी व परंपरा यांच्या विरोधात आवाज उठवून त्या परंपरा नष्ट करण्यासाठी समाजाचा ( उच्च वर्णीय लोकांचा) विरोध पत्करून महान असे कार्य केले. त्या पैकीच एक समाज सुधारक म्हणजे महात्मा फुले हे होय. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये महात्मा फुले यांचे योगदान हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रांमध्ये कार्य करून आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. ते फक्त बोलके सुधारक नव्हे तर कर्ते सुधारक असल्याचे त्यांनी आपल्या कृतीमधून दाखवून दिलेले आहे.

उद्देश:- १) महात्मा फुले यांनी दलितांसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे

२) महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे

## दलितांसाठी केलेले कार्य:-

महार, मांग चांभार ढोर या जातींचा समावेश दलित जातीत होत होता या जातीतील लोकांना अस्पृश्य, अंत्यज व अतिशूद्र या नावाने ओळखले जात होते अस्पृश्यतेच्या नावाखाली त्यांना अत्यंत वाईट व अपमानास्पद अशी वागणूक देण्यात येत होती भारतात ४२९ अस्पृश्य जाती होत्या सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या त्यांचा दर्जा समाजव्यवस्थेमध्ये अत्यंत खालच्या स्तराचा होता त्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याची देखील मुभा नव्हती अशावेळी त्यांनी आपल्या वाड्यातील पाण्याने भरलेला हौद इ.स. १८६८ साली अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी खुला केला. तसेच इ.स. १८७३ साली अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा काढला. त्यामुळेच पुढे भारत सरकारला अस्पृश्यता ही कायद्याने नष्ट करता आली. आपल्या राज्यघटनेमध्ये कलम १७ मध्ये याची तरतूद करण्यात आलेली आहे.

## स्त्रियांकरिता केलेले कार्य:-

**स्त्री शिक्षण:-** मध्ययुगीन कालखंडामध्ये म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात, महाराष्ट्रातील स्त्रियांची समाजामधील स्थिती अत्यंत दयनीय अशी होती. समाजव्यवस्थेत त्यांना निम्न दर्जा होता. स्त्री ही

सुखाची व उपभोगाची वस्तू आहे, अशी समजूत तत्कालीन समाजामध्ये रूढ होती. स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा कनिष्ठ असून त्यांचे कार्य चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित आहे, असे मानले जात होते. त्या काळामध्ये स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. जर त्यांनी शिक्षण घेतले तर शिक्षण सुद्धा भ्रष्ट होते, अशी कल्पना समाजामध्ये रूढ होती . त्याकाळमध्ये ब्राह्मण महिलांनादेखील शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. विकासाच्या व समाज परिवर्तनाच्या दृष्टीने शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे असे महात्मा फुले यांचे ठाम मत होते. शिक्षणाचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, " विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले". स्त्रियांना आणि शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नसल्याने त्यांची अधोगती झाली. त्यामुळे त्यांना शिक्षण देणे महात्मा फुले यांना महत्त्वाचे वाटत होते. स्त्रियांच्या वाईट स्थितीबद्दल सर्वप्रथम महात्मा फुले यांना कळकळ वाटली. स्त्रीयामुळेच समाजाचा आणि राष्ट्राचा विकास होऊ शकतो, असे महात्मा फुले यांचे मत होते. म्हणूनच ते म्हणतात, 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात आपल्या घरातूनच केली. त्यांनी आपली पत्नी म्हणजेच सावित्रीबाई यांना शिक्षण दिले व १८४८ मध्ये पुणे येथील बुधवार पेठेतील भिडे वाड्यामध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली. या शाळेमध्ये शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण देण्यात येऊ लागले. अशाप्रकारचे स्त्रियांना शिक्षण देणारी भारतामधील ही पहिलीच शाळा ठरली. म्हणूनच ते स्त्री शिक्षणाचे जनक व शिक्षण महर्षी म्हणून ओळखले जातात. स्त्रियांसाठी केलेल्या या शैक्षणिक कार्यामुळेच आज आपल्याला अनेक क्षेत्रांमध्ये महिला कार्य करत असताना तसेच उच्च पद भूषवत असताना दिसून येतात. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ६५.४५% टक्के आहे तर महाराष्ट्रातील स्त्री साक्षरता ७५.८७% आहे. यावरून महात्मा फुले यांनी महिलांना शिक्षणाची संधी देऊन महिलांना न्याय देण्याचे किती महान कार्य केलेले आहे हे सिद्ध होते. त्यामुळेच १६ नोव्हेंबर १८८२ मध्ये स्त्री शिक्षणाचे आद्य जनक म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांचा गौरव केला.

### जरठ विवाह:-

महात्मा फुले यांच्या काळामध्ये जरठ विवाह ही प्रथा प्रचलित होती. अशा विवाहात मुलीचं वय १०-१२ वर्ष असायचे तर मुलांचे वय ५०-६० वर्ष असायचे. म्हणजेच पती-पत्नीमध्ये किमान ३०-४० वर्षांचे अंतर असायचे. या विवाहामुळे विधवांची संख्या वाढत असे व त्यामुळे त्यांच्यावर

अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात होत असत. तसेच अनैतिक संबंधातून मुले देखील जन्माला येत होती, त्यामुळे त्यांना केशवपन करावे लागत होते.

केशवपन पद्धतीस विरोध:-

पतीचे निधन झाल्यानंतर पत्नीने केस कापावेत अशी पद्धत रूढ होती. केशवपण करून तिचे केस पतीच्या तिरडीला लावले नाहीत तर, त्याचा जीव तिच्या केसात घुटमळतो आणि तो स्वर्गात जाण्याऐवजी नरकात जातो, अशी समाजाची धारणा होती. तसेच विधवेचे केशवपन केल्यामुळे तिचे सौंदर्य नष्ट होऊन ती विद्रुप दिसत, त्यामुळे तिच्याकडून काही समाज विघातक गोष्टी घडणार नाहीत (जसे की अनैतिक संबंधातून होणारे अपत्य) असे लोकांचे मत होते. परंतु स्त्रियांचे असे विद्रूप दिसणे महात्मा फुले यांना पटत नव्हते. म्हणून महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये नव्ह्यांचा संप घडवून आनुन केशवपण या पद्धतीस विरोध दर्शविला.

बाल हत्या प्रतिबंधक गृह:-

जरठ विवाह या पद्धतीमुळे अल्पवयातच विधवा झालेल्या स्त्रियांना अनैतिक संबंधातून मुले होत असत. अशी मुले जन्माला आल्यानंतर आपले नाव खराब होईल, आपली विटंबना केली जाईल या भीतीपोटी या स्त्रिया आपल्या मुलांची हत्या करत असत. अशा स्त्रियांची समाजाच्या जाचापासून सुटका करण्यासाठी महात्मा फुले यांनी इ. स. १८६३ मध्ये बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. अनैतिक मार्गाकडे जाऊन गरोदर राहिलेल्या स्त्रिया गुप्तपणे या बाल हत्या प्रतिबंधक गृहात येऊन सुरक्षितपणे प्रसूती होऊ लागल्या. काशीबाई नावाची ब्राह्मण विधवा स्त्री ही अनैतिक मार्गामुळे गरोदर राहिली होती. पुढे या स्त्रीने बालहत्या प्रतिबंधक गृहात प्रसूत होऊन इ. स. १८६५ मध्ये एका बालकाला जन्म दिला. याच बालकाला महात्मा फुले यांनी इ. स.१८७३ मध्ये दत्तक घेतले. हाच पुत्र डॉ. यशवंत फुले या नावाने ओळखला जाऊ लागला.

अशाप्रकारे महात्मा फुले यांनी आपल्या कृतीतून अनिष्ट रूढी व परंपरा यांना विरोध दर्शविला.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) महात्मा ज्योतिराव फुले; धनंजय कीर; पॉप्युलर प्रकाशन; २०१२

२) महाराष्ट्रातील समाजसुधारक व भारतीय विचारवंत; के सागर प्रकाशन;२०१५

३) महामानव ज्योतिबा फुले; प्रभाकर बागुल; ज्ञानदत्त प्रकाशन; २००२

४) महात्मा फुले : विचार आणि वांगमय; श्रीराम गुंदेकर; प्रतिमा प्रकाशन

# ३८. राजश्री शाहू महाराजांचे स्त्रियांविषयीचे कार्य

**डॉ.देवानंद सखाराम अंभोरे**
सहायक प्राध्यापक
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम.
Email :- ambhoredevanand@gmail.com

**गोषवारा:-**

हजारो वर्षापासून पुरुष प्रधान संस्कृती ही हजारो वर्षापासून स्त्रियांना कायम दुय्यम दर्जाची व असमानतेची वागणूक देत आलेली आहे. वर्णश्रमानुसार स्त्री ही कोणत्याही वर्णातील(ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र)असो तीला शूद्र मानल्या गेले होते. त्यावेळी अनेक रूढी, परंपरा, नियम स्त्रियावर लादण्यात आले होते. यामध्ये शिक्षण बंदी, विधवा पुनर्विवाह, सतीजाने, केशवपन इ. इथल्या व्यवस्थेने जणू काही स्त्रियांच्या जगण्याचा हक्कच हिरावून घेतला होता. राजश्री शाहू महाराजांच्या अगोदर स्त्रियांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम अनेक सुधारकांनी केले. त्यामध्ये अग्रक्रमाने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. राजश्री शाहू महाराजांना जसा स्वराज्याचा वारसा लाभला, तसाच त्यांना परिवर्तनवादी विचारांचा वारसा महात्मा फुलें कडून लाभला. शाहू महाराजांनी स्वराज्य आणि सत्यशोधक विचारांचा मिलाफ करून, कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्रियांच्या शिक्षणाबरोबरच, स्त्रीच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे कायदे तयार करून ते अमलात आणले आणि स्त्रियांवर होणारे अन्याय आणि अत्याचार थांबविण्याचे काम राजश्री शाहू महाराज यांनी केले.

**Key Words :- स्त्री शिक्षण, कायदा, आंतरजातीय विवाह, देवदासी, घटस्फोट, प्रतिबंध.**

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराज हे धोरणी व विवेकशील राजे होते. त्या काळी संपूर्ण भारतात स्वराज्याची चळवळ धगधगत होती. ब्रिटीशांची करडी नजर ही भारतातील वेगवेगळ्या संस्थानिकावर होती. राजश्री शाहू महाराजांना देशाचे स्वातंत्र्य मान्य व अपेक्षित होते.

ब्रिटिश कालखंडात महाराष्ट्राची जडणघडण करण्यात अनेक थोर पुरुषांनी मोठा वाटा उचलला आहे, त्या थोर पुरुषांपैकी राजश्री शाहू महाराज एक होते. शाहू महाराज हे एक दूरदृष्टी व

प्रगतीशील विचारवंत होते. त्यावेळी समाजामध्ये स्त्रिया आणि दलितांची स्थिती उपेक्षित आणि दुय्यम दर्जाची होती. या पार्श्वभूमीवरच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि स्त्रियांवरील अत्याचार थांबविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रीमुक्ती चळवळीत शाहू महाराजांनी भरीव योगदान आहे. तत्कालीन समाजातील स्त्री वर्ग एका दृष्टीने सर्व प्रकारात मागासलेला होता. पुरुष प्रधान संस्कृतीचे स्त्री जातीवर अनेक प्रकारचे अन्याय व अत्याचार होत होते. तत्कालिन भारतामध्ये स्त्रियांना शिक्षण बंदी, पडदा पद्धत, बालविवाह सतीजाने, विधवाविवाह इ. प्रखर रूढी व परंपरानि स्त्रियांचे जीवन पूर्णपणे परावलंबी झाले होते. मुख्य म्हणजे भारतीय समाजव्यवस्था हीच विषमता निर्माण करणारी आहे. स्वाभाविकच त्या समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यासाठी अनेक वाट पहावी लागली, परंतु महाराष्ट्रात करवीर संस्थानातील राजश्री शाहू महाराजांनी प्रतिगामी संस्थेविरुद्ध चौफेर बंड केले.

परंपरागत रुढी, प्रथा, परंपरा या संस्कृतीच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या स्त्री समाजाला (वर्गाला) स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय (प्रतिष्ठा) देण्यासाठी बंड केले. समाजामध्ये वैचारिक बदल घडवण्यासाठी बंड करणारा व सामाजिक नवरचना करणारे म्हणून राजश्री शाहू महाराजांचे नाव अग्रेसर व अजरामर आहे. एकूणच शाहू महाराजांच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता समाजातील उपेक्षित घटकांना सामाजिक प्रवाहात आणण्याच्या व प्राधान्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकास घडवून आणण्याचे कार्य राजश्री शाहू महाराजांनी केले आहे. राजश्री शाहू महाराज हे राजदंड ही शोभेची वस्तू नसून ती लोकसेवेची ही एक साधना आहे. याची पूर्णपणे जाण असलेला एक अलौकिक राजे शाहू महाराज होता.

**स्त्री शिक्षण :-** कोल्हापूर संस्थानाचा स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन मुळातच पुरोगामी होता. महाराजांनी स्त्री शिक्षणाची मुळात सुरुवातच घरातून केली आहे. त्यांनी स्वतःच्या सुनेला उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले.

संस्थानातील मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी रखमाबाई केळवकर यांची स्त्री शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली होती. मुला मुलींच्या शाळा होत्याच, त्याशिवाय विशेष मुलीच्या साठीही स्वतंत्र शाळा स्थापन केल्या होत्या. खासकरून मुलींच्या शिक्षणाकरिता भुदरगडसारख्या सह्याद्रीलगतच्या व इतर मागासलेल्या भागात स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. या भागातील मुलींनी शाळेत यावे व मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी विशेष प्रोत्साहन दिले

जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहूमहाराजांनी विशेष लक्ष दिले होते. खास करून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रीयांसाठी त्यांनी १९१९ मध्ये एक खास "हुकुम गॅझेट" केला होता. त्यामध्ये या स्त्रियांच्या राहण्याची व जेवनाची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत केली जाणार होती. हुशार मुलींना शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबारने खास शिष्यवृत्या ठेवल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने रुपये ४० अशा पाच शिष्यवृत्या चौथ्या वर्गात सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थिनींना देण्यात येत होत्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत शाहूमहाराजांनी अत्यंत उदार दृष्टी ठेवली होती. "राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते". स्त्री शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होऊ शकतो. म्हणून प्रिंम स्त्रियांमधून शिक्षिका तयार करणे गरजेचे आहे. या भूमिकेतून राजश्री शाहू महाराजांनी १८९८ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली आणि स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या समान संधीची आवश्यकता असल्याचे आग्रही मत व्यक्त केलेले दिसून येते. एकूणच शाहू महाराजांच्या प्रयत्नांमुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर ०.१० टक्क्यांवरून वाढून तो ०.३५ टक्के इतका झाला होता.

**राजश्री शाहू महाराज आणि स्त्री संरक्षण कायदे:**

**बाल विवाह प्रतिबंध :-**

बालविवाह या प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मध्ये १२ जुलै १९१९ रोजी एक कायदा करून वधू आणि वरांचे वय अनुक्रमे १४ आणि १८ वर्षे इतकी असणे बंधनकारक केले होते. यावरून आपणास शाहू महाराजांची बालविवाह संबंधीची भूमिका दिसून येते.

**आंतरजातीय विवाह कायदा :-**

१९१७ ला सरदार वल्लभाई पटेल यांचे बंधू विठ्ठल भाई पटेल यांनी मंत्रिमंडळात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा मांडला. या कायद्याला पुरीच्य शंकराचार्यासह अनेक धार्मिक नेत्यांबरोबरच राष्ट्रीय पातळीवरील मोठे नाव असलेले बाळ गंगाधर टिळक यांनी या कायद्याला विरोध केला होता. शाहू महाराजांनी पटेलांची पाठराखण करून जाहीर पाठिंबा तर दिलाच परंतु कोल्हापूर संस्थानात आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहास १२ जुलै २०१९ रोजी "कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा" या नावाने गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. या कायद्यान्वये संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जातिनिर्बंध न पाहता सदरहू दोघांपैकी आपल्याला

कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली गेली. त्यांचे याप्रकारे होणारे आप-आपसातील विवाह कायदेशीर ठरविले गेले.

जाती-जातीतील उच्चनीचता भेदभाव काढून व मानवता हीच जात समजून कोणत्याही जातीजातीतील विवाह कायद्याने संमत करण्यात आले. यासाठी महाराजांनी स्वत: धाडस करून इंदौरचे होळकर, धनगर व कागलचे घाटगे क्षत्रिय मराठा यांच्यामध्ये विवाह जमवून आणले. यामध्ये कोल्हापूर व इंदौर या दोन संस्थानाच्या दरम्यान जवळपास १०० मराठा धनगर आंतरजातीय विवाह करण्याची योजना आखली. सदरील विवाहासाठी ६०००० हजार खर्च येणार होता. विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यास संस्थानात जमीन जुलामाही इनाम दिला जाणार होता. या योजने प्रमाणे एकूण २५ विवाह पार पडले. व सामाजिक ऐक्य जोपासले.

या कायद्यामध्ये आणखी एका महत्त्वाच्या कलमान्वये 18 वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला आपल्या भल्यासाठी पित्याची किंवा पालकांची संमती आवश्यक असणार नाही. स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे हे मोठे वैशिष्ट्यपूर्ण कलम होते. या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहू महाराजांनी एक खास विवाह नोंदणी अधिकारी नियुक्त केला होता. हा कायदा महाराजांनी दोन भागात केला.

या कायद्याअन्वये पुरुषाच्या लग्नाचे वय १८ वर्षे तर स्त्रीचे वय १४ वर्ष असा नियम घालून दिला. इंग्रजांनी संमतीवयाचा जो कायदा बनवला होता त्यात मुलीची संतती, (शारीरिक संबंध) १० वर्षे ऐवजी १२ वर्ष करण्यात आले आहे. या कायद्यालासुद्धा बाळ गंगाधर टिळक यांनी विरोध केला होता. इंग्रजांच्या कायद्याचा विचार करता शाहूमहाराजांचा कायदा किती पुरोगामी होता. दुसऱ्या भागात कोणत्याही जाती धर्मीय मनुष्याशी स्त्रीला विवाह करणे याची मुभा देणारा कायदा, यात वारसा हक्काचा सुद्धा अधिकार देण्यात आला आहे.

**विधवा पुनर्विवाह कायदा :-**

त्याकाळी बालविवाहाची प्रथा होती, तेंव्हा तुलनेने पुरुष वयाने अधिक मोठा असायचा, त्या कारणाने स्त्रीला बऱ्याच वेळेला कमी वयातच विधवेचे जीवन जगावे लागत असे. पुरुषांना कितीही लग्न करता येत असत परंतु स्त्रीला मात्र पुनर्विवाह नाकारण्यात आला होता. राजश्री शाहू महाराजांनी या सर्व धार्मिक रूढी परंपरा नाकारत, स्त्रीला सन्मानाने जगता यावे, तिच्या भाव भावनांचा सन्मान व्हावा म्हणून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता जुलै १९१७ मध्ये मान्यता देणारा कायदा संमत केला. एखाद्या स्त्रीने जन्मभर खितपत पडण्यापेक्षा तिच्या

आयुष्यात ओलावा येण्यासाठी तिचा उद्धार होण्यासाठी तिला वाटल्यास पुनर्विवाह करता येईल, अशाप्रकारचा विधवा पुनर्विवाह कायदा करण्यात आला होता. विधवा पुनर्विवाह समाजाच्या स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत महाराजांनी १९१९ साली कानपूर मध्ये झालेल्या कूर्मी क्षत्रिय परिषदेत व्यक्त केले होते. हिंदू च्या अनेक जाती विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत इतर विवाह प्रमाणे योग्य विधी न करण्याची पद्धत असल्यामुळे ज्या अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या त्या या कायद्यान्वये दूर करण्यात आलेल्या या कायद्यानुसार विवाहांची कायदेशीर नोंद करण्याची पद्धत सुरू केली गेली. त्यामुळे विवाह विधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात राहिल्यामुळे स्त्री वर्गावर होणाऱ्या संभाव्य अन्यायाचा प्रतिकार करण्याचे एक साधन शाहू महाराजांनी स्त्रियांना उपलब्ध करून दिले.

### घटस्फोटाचा व वारसाचा कायदा:-

त्याकाळात घटस्पोटा संबंधी जात पंचायतीचे कायदे होते, परंतु ते पुरुषांना अनुकूल होते. घटस्फोट संबंधी निर्णय देताना स्त्रीवर अन्याय होत असे. घटस्पोटा संदर्भात स्त्रियांना न्याय मिळावा व स्त्रीच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, अन्न वस्त्र व खर्चाची योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल याकडे लक्ष देऊन कायद्यामध्ये तसे कलम तयार केले होते. तसेच वैवाहिक संतती असेल तर त्यांच्या त्याबद्दलची पोटगी व शिक्षणाबद्दलची व्यवस्था या कायद्याने केली होती. जात पंचायतीच्या लहरीवर आधारलेला प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्पोट अमान्य करण्यात आला. स्त्रियांना योग्य न्याय मिळावा म्हणून २ ऑगस्ट १९१९ रोजी 'कोल्हापूरचे  काडी मोडण्याचे नियम' असा कायदा केला. या कायद्यात स्त्रीयांना हक्काचे संरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली होती.

"करवीर सरकारच्या" गॅझेटमध्ये १७ जानेवारी १९२० रोजी “हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा” या नावाने एक महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणेचा कायदा प्रसिद्ध करण्यात आला. या या कायद्याची संहिता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांत लिहिली. या कायद्यानुसार शुद्राची अनैरस संतती व ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वरिष्ठ वर्णांची अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसाहक्कातील फरक काढून टाकला. सर्व वर्णाच्या अनैरस संततीना जन्मदात्या बापाच्या मिळकतीत वारसा हक्क दिला गेला. याच कायद्याचे कलम पडीत स्त्रियांच्या उध्दाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

### देवदासी प्रथा (जोगत्या-मुरळी) प्रतिबंद कायदा :-

देवाच्या नावावर मुली सोडण्याच्या अनिष्ठ प्रथा मोठ्या प्रमाणात त्याकाळी अस्तित्वात होती. या प्रथे मधूनच समाजात जोगत्या-मुरळी इत्यादी प्रकारच्या पतीत स्त्रियांचा वर्ग अस्तित्वात आला होता. ही प्रथा बंद करण्यासाठी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी " देवदासी प्रतिबंध" कायदा अस्तित्वात आणला. या कायद्यानुसार देवाला सोडल्यामुळे या स्त्रियांना मिळणारा समाजातील कायदेशीर दर्जा अमान्य केला; पण त्याचबरोबर या स्त्रियांना आपल्या जन्मदात्या आईबापाच्या मिळकतीत वारशाचे हक्क प्राप्त करून दिले. स्त्रियांना मिळनारा समाजातील कायदेशीर दर्जाच अमान्य करण्यात येऊन देवदासी प्रथेचा पायाच उखडून टाकण्याचा प्रयत्न महाराजांनी केला.

### विधवांचे केशवपन कायद्याने बंद:-

हिंदू धर्मातील काही कालबाह्य जुलमी व कठोर अशा रूढी यांचा कोणताही मुलाहिजा न ठेवता शाहू महाराजांनी कायद्याने ही प्रथा बंद केली. त्या काळच्या रूढी म्हणजे स्त्रियांना शिक्षण बंद, स्त्रीयांना वेद एकने अगर वाचणे बंद आणि अत्यंत नीच पणाची एक रूढी म्हणजे विधवा स्त्रीचे केशवपन करणे होय. या प्रथेनुसर अगदी कुमारी बालिका दुर्दैवाने विधवा झाली, तर प्रथमता तिच्या सौंदर्यावर घाला घालत. तिचे सक्तीने मुंडन करून, विद्रूप करणे व तिला बोडकी म्हणेने, प्रतिकार केला तर तिचा सासरा, दिर, एवढेच नव्हे तर तिचा प्रत्यक्ष बाप देखील तिचा अंबाडा धरून तिला मारझोड करून नाव्ह्यापुढे ढकलत. जन्मभर अंगावरून सुतळीचा तोडाही न ठेविता विद्रूपणात भर म्हणून की काय नेसण्यासाठी लालभडक रंगाचे वस्त्र टाकीत, हात मुंढे तिला तिच्या हक्काच्या घरात वाळीत टाकने, विटाळ मानत व सोवळी म्हणत असत. कोणत्याही कार्यक्रमात तिला बंदी होती. अशावेळी ती पुढे आली अपशकून मानत. तिला घरातील अनारोग्य अंधारी जागा देत. जिवंत असूनही मेल्या प्रमाणे तिचे जगणे करत. शाहूमहाराजांनी हे सर्व लक्षात घेऊन विधवा केशवपन रुढी १९१७ च्या कायद्याने बंद केली.

### स्त्रियां विरुद्ध क्रूर वर्तन प्रतिबंध करणारा कायदा :-

सर्व धर्मीयांच्या कुटुंबात स्त्रीचा वेगवेगळया प्रकारे छळ केल्या जायचा. अनेक कुटुंबात नवरा व त्याचे नातलग यांच्याकडून स्त्रीचा अनेक प्रकारचा छळ होत असे. स्त्रियांच्या छळाचे काही प्रकार असे असतात की, छळ करणाऱ्या अपराध्यास 'इंडियन पिनल कोड' मधील तरतूदीच्या मर्यादेत आणता येत नाही. या त्रुटींचा विचार करु छळाचा कोणताही प्रकार न्यायदेवतेच्या नजरेतून सुटणार नाही व छळाला प्रतिबंध घालण्याकरीता २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानच्या गॅझेटमध्ये

हा कायदा प्रसिद्ध केला. या कायद्याचे महत्व असे कि, 'हिंदू शास्त्रकारांनी कुटुंबातील पुढाऱ्यास प्रसंगी हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली होती. परंतु या परवानगीचा दुरुपयोग करून स्त्रियांना वाटेल तशा वाईट पद्धतीने वागविण्यास स्त्रियांना परवानाच मिळाला आहे , अशी पुरुषांची समजूत झालेली आहे. एकूण ११ कलामांच्या या कायद्याने, स्त्रीला क्रूरपणे वागणूक देणाऱ्या अपराध्यास ६ महिन्यांचा कारावास व २०० रुपयांपर्यंत दंड, अशी शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात शाहू महाराजांनी केली होती.

**पडदा पद्धतीचा निषेध :-**

महाराष्ट्रातील उच्च जाती मध्ये पडदा पद्धती सर्वत्र रूढ होती. ही पद्धत स्त्रीयांमधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपडणारी रूढी आहे, असे शाहूमहाराजांचे स्पष्ट मत होते. शाहू महाराजांनी १९१९ साली कानपूर मध्ये झालेल्या कूर्मी क्षत्रिय परिषदेत त्यांनी या रुढीचा निषेध व्यक्त केला होता.

**निष्कर्ष :-**

स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि ते चिपळूण थांबवण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले आणि त्यांनी स्त्री मुक्ती चळवळ त्यांच्या परीने हातभार लावला. शाहू महाराजांनी मुलींच्या साठी खास स्वतंत्र शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. रोड स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे. खासकरून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये एक खास हुकूम गॅझेट केला होता. तसेच एकूणच शाहूंच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर ०.३५ टक्के इतका झाला होता. महाराजांनी आपल्या संस्थानात मध्ये १२ जुलै १९१९ रोजी एक कायदा करून वधू आणि वराची व अनुक्रमे १४ आणि १८ वर्षे इतके असने बंधनकारक केले होते. शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत करू विधवांना न्याय दिला होता. महाराजांनी १९१९ साली कानपूर मध्ये झालेल्या कुर्मी क्षत्रिय परिषदेत पडदा पद्धती निश्चित केल्या असून अंतर जाति विवाह कायदा १२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील यासंबंधी कायदा या नावाने कॅसेटमध्ये प्रसिद्ध करून १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची किंवा पालकांची संमती आवश्यक असणार नाही अशी स्पष्ट केली यावरून शाहू महाराज आणि ०२ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थांच्या गॅझेटमध्ये स्त्रीला पुरणाची वागणुकीची प्रतिबंध करणारा कायदा प्रसिद्ध केला असून या कायद्यातील एकूण अकरा कलमांच्या

आधाराने स्त्रीला खुरपण्या ची वागणूक देणाऱ्या अपराध्यास सहा महिन्यांचा कारावास व दोनशे रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली होती घटस्फोट वर्षाच्या कायद्यांनुसार जातपंचायतीच्या लहरीवर आधारलेला प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य करण्यात आला तसेच तिच्या नैसर्गिक हक्क कायद्याचा दृढ पाया देण्यात आला.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेले कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे कायदे होत. शंभर वर्षापूर्वी शाहू महाराज त्यांच्या उद्धाराचा विचार करूनच थांबले नाही तर कायदे करून ते अमलात आणले होते आपण निवडून दिलेले सरकार सुद्धा स्त्रियांच्या संरक्षणाबाबत जेवढे दक्ष दिसत नाही तेवढे दक्ष शाहू महाराज होती आजच्या सुशिक्षित स्त्रिया वैभव लक्ष्मी च्या पारायणात आणि कर्मकांडात गुंतलेले आहेत परंतु महाराजांच्या विचारांचा स्वीकार करताना दिसत नाही त्यांच्या चरित्राचे वाचन करताना दिसत नाही आहे. हेच आमच्या शिक्षणाचे फलित का?.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१. दराडे संभाजी सोपान, (२०१२), शाहू महाराजांचे स्त्रियांच्या सुधारणे विषयीचे विचार व कार्य, करपे आर एन. (संपा) राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्रमांक.20.

२. बागुल वैशाली, करपे राजेश (२०१२), राजश्री शाहू महाराज आपण त्यांची ब्राह्मणेतर चळवळीतील भूमिका, करपे आर एन. (संपा) राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्रमांक. ३६.

३. शेख फारुख, बी व्ही तोर, एस के तोर , (२०१२) राजश्री शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार व वर्तमान स्थिती, करपे आर एन. (संपा) राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्रमांक. २०४

४. डोईफोडे ज्योती, (२००५) मूलभूत सामाजिक विचार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद , पृष्ठ क्र. 265.

५. पवार जयसिंगराव, (संपा) "राजश्री शाहू स्मारक ग्रंथ" (२००७) महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर.

६. साळुंखे हिंदुराव कृष्णराव स्काउट महर्षी. ११९८."छत्रपती राजश्री शाहू महाराज स्मृती दर्शन" महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर.

७. कांबळे उत्तम, (२००३), "राजश्री शाहू महाराज आणि महिला मुक्ती" सुगावा प्रकाशन, ५६२,सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत, पुणे.

८. राणा अशोक. (२००७)" लोकांचा राजा शाहू छत्रपती". जिजाई प्रकाशन, पुणे.

९. चव्हाण रा. ना. (२००२) लोकनेते राजश्री शाहू महाराज काळ आणि कार्य, संपादिका सौ वैशाली चव्हाण.

१०. बगाटे रा. फ. आणि वी.फ, (२०१४) 'शाहू महाराजांचे स्त्रीयांविषयीचे कार्य' (सं.पा.) Achievement of Philosopher & Social Reformer in Transformation Indian Society in 19th & 20th Century पृ.क्र.२९-३०.

११. सलामपुरे मनीषा , दोरगे गी.बी (२०१२) 'राजश्री शाहू महाराजांचे स्त्री प्रश्नाविशायींचे कार्य आणि वार्तामनातील प्रस्तुतता (सं.पा. करपे आर. एन.'राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ पृ..क्र. १९२ -१९६.

# ३९. महात्मा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार

**प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे**
**श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी—अकोला**

सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ।
पतितांचा पालनवाला । हा महात्मा झाला ।।
शिक्षण महर्षी वि.रा.शिंदे

**प्रस्तावना:**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात जातीभेद, स्पृश्य—अस्पृश्य वाद, अंधश्रद्धा, ब्राम्हणांचे सर्व क्षेत्रातील वर्चस्व, समता, बंधुता, स्वातंत्र्य,मानवी हक्क या मुलभूत तत्वांचा आणि प्रामुख्याने खुल्या शिक्षणाचा अभाव या सा—या अवगुणांमुळे मराठी समाज मरगळल्यासारखा झाला होता. ही दयनिय परिस्थिती बदलण्यासाठी आमूलाग्र सामाजिक क्रांती झाली पाहीजे, अशी जोतीराव फुल्यांची खात्री झाली होती आणि हे साध्य करण्यासाठी सार्वत्रिक शिक्षण हेच एकमेव शस्त्र आहे, या तत्वाचा स्विकार करुन शिक्षणाच्या प्रसाराच्या कार्याला त्यांनी सर्वस्वी वाहून घेतले.

जोतीरावांनी आपली पत्नी सावित्रीबाई आणि मित्रमंडळ यांच्या सहाय्याने मोठया प्रमाणात मागासलेल्या वर्गासाठी शाळा काढल्या आणि जनजागृतीच्या कार्याचा पाया रचला. मुलींची शाळा सर्वप्रथम जोतीरावांनीच सुरु केली. ब्रम्हवृंदांचा विरोध सहन करुन स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. जे आजवर कोणी केले नव्हते, ते प्रत्यक्ष समाजसुधारणेचे काम जोतीरावांनी सुरु केले. ब्राम्हणांचे कसब, गुलामगिरी, शेतक—यांचा आसुड, अखंडादि काव्यरचना, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक इत्यादी साहित्य निर्मिती करुन समाजातील शोषणांच्या प्रवृत्तीवर घणाघाती टीका केली. त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील 'सामाजिक क्रांतीचे अग्रणी' म्हणून जनमाणसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली आणि जनतेने सन्मानाने त्यांना 'महात्मा' बनविले.

इ.स. १२—१३ व्या शतकात ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील संत मंडळीने अध्यात्मिक क्षेत्रात समता निर्माण करण्याचे महान कार्य केले. या कार्याला आध्यात्मिक क्षेत्रात समता निर्माण करण्याचा एक महत्वपूर्ण प्रयत्न असे आपण म्हणू शकतो. ''उस डोंगा परी, रस नव्हे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।।'' अशी चोखोबाने अंत:करणातील तीव्र तळमळ व खळबळ व्यक्त केली आहे. म्हणजे जेथे अध्यात्माच्या

क्षेत्रात मनाला पीळ पाडणारी स्थिती होती, तेथे समाजजीवनाच्या इतर क्षेत्रांची अवस्था काय असेल याचा विचार आपणास सहज करता येईल.

पेशवाईच्या अस्तानंतर लवकरच या देशात इंग्रजांचे शासन भक्कम झाले. या सत्तेला पुढे १८५७ मध्ये सुरुंग लावण्याचा प्रयत्न झाला; परंतु तो यशस्वी होऊ शकला नाही. उलट तेव्हापासून या देशाचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीऐवजी इंग्लंडचे पार्लमेंट पाहू लागले. दळणवळणाची साधने, नवे उदयोगधंदे, कारखानदारीचा उदय, राज्यकारभाराची नवी शिस्त व घडी, समाजातील वरच्या वर्गातील लोकांना इंग्रजी शिक्षणाचा मिळत असलेला लाभ, परिणामत: देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला येऊ लागलेला आकार यामुळे विचारांची जागृती झाली. अशा अनेक खळबळजनक घटना एकीकडे या काळात घडत होत्या, तर दुसरीकडे अज्ञान, गरिबी, अस्पृश्यता, सावकारशाही, स्त्रियांची गुलामगिरी, शेतक—यांची दैन्यावस्था अशा अनेक जुनाट रोगांनी समाज पोखरुन निघाला होता.

या पार्श्वभूमीवर महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हणून उदयाला आले. कारण नसताना शेकडो वर्षे समाजातील तळाच्या आपल्या बांधवांना छळ सहन करावा लागला. हे सर्व पाहून केवळ शब्दांच्या द्वारे तळमळ व्यक्त करण्यात समाधान मानणा—या तथाकथित बोलभांड समाजसुधारकांपैकी महात्मा फुले नव्हते. तर त्यांनी आपल्या वाणी, लेखणी व चळवळीने या समाजाची कठोर चिरफाड केली. म्हणून त्यांचे समाजसुधारण्याबाबतीतले सामाजिक व शैक्षणिक विचार पाहणे अगत्याचे ठरते.

### सामाजिक विचार:

भारतात प्रचलित असलेली धर्मसंस्था, त्यावर आधारित समाजरचना, एका विशिष्ट जातीचे, ब्राम्हण जातीचे क्षेत्रातील वर्चस्व, यामुळे शेतक—यांचे, दलितांचे होणारे शोषण, त्यांची दयनिय स्थिती, ही सारी परिस्थिती बदलण्यासाठी अमुलाग्र सामाजिक क्रांती झाली पाहीजे, अशी जोतीरावांच्या मनाची खात्री झाली. एका ब्राम्हण मित्राच्या लग्नात हजर राहिल्या मुळे व लग्नाच्या मिरवणूकीत सामील झाल्यामुळे त्यांची ब्राम्हणांनी अवहेलना केली. त्यांना संताप आला. पेशव्यांची राजवट असती तर आपले काय झाले असते, अशा प्रकारचे विचार त्यांच्या डोक्यात थैमान घालू लागले आणि त्यातूनच सामाजिक क्रांतीची प्रेरणा मिळाली. दलित आणि अन्य शोषित वर्गांना ज्ञानाच्या मार्गावर आणणे आणि स्त्रियांना त्यांच्या सामाजिक दास्यातून मुक्त करणे या गोष्टींवर त्यांनी भर दिला. राजकिय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरी फार हानिकारक असते याची त्यांना पूर्णपणे जाणिव झाली होती.

जोतीराव फुल्यांनी विशेषत: अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या उद्धारासाठी जे कार्य केले ते लोकोत्तर स्वरुपाचे होते. स्त्रिला शूद्रासमान मानले जात होते. स्त्रिला स्वातंत्र्याची काय गरज आहे. कारण, 'कुमारी असताना पिता, यौवनकाळात पती आणि वृद्धापकाळात पुत्र' त्यांचे संरक्षण करतात. त्यावेळच्या रुढीनुसार मुलींचे लग्न लहान वयातच केले जात होते. त्यामुळे अनेक स्त्रियांना पतीनिधनानंतर वैधव्याला तोंड दयावे लागे. पुनर्विवाह निषिद्ध मानला जात होता. विधवेवर अत्याचार होत असत, केशवपण केले जाई. पतीच्या चितेवर स्वत:ला झोकून देऊन सती जावे लागे. पतीच्या मालमत्तेवर अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण नव्हते.

स्त्रियांना न्याय मिळावा, त्यांना समानतेची वागणूक मिळावी यासाठी जोतीरावांनी स्त्री शिक्षणाला अग्रक्रम दिला आणि त्यांनी १८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाडयात शाळा सुरु केली. 'शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे'. हे तत्व डोळयापुढे ठेऊन जोतीरावांनी आपल्या पत्नीच्या सावित्रीबाईच्या सहकार्याने एकुण १८ शाळा सुरु केल्या. प्रसिद्ध सुधारक राजाराम मोहन रॉय (१७७२—१८३३) यांच्या पुढाकाराने सती जाण्याच्या चालीला कायदयाने बंदी घातली. पण समाजाने तिला वैधव्य भोगण्याची सजा दिली.

विधवांना पुनर्विवाह हक्क नाकारल्यामुळे असंख्य यातना भोगाव्या लागत असत. महाराष्ट्रात विधवा पुनर्विवाहाची चळवळ १८४० साली पुण्यातील विष्णूशास्त्री बापट यांनी प्रथम सुरु केली. या चळवळीला जोतीराव फुल्यांचा सक्रिय पाठिंबा होता. विधवांच्या पुनर्विवाहाला जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणून ऑक्टोबर १८५३ मध्ये एक जंगी सभा भरविण्यात आली होती. सनातन्यांनी ती सभा उधळून लावली. परंतू पुढे जोतीराव फुले आणि अन्य सुधारक मंडळींनी या प्रश्नाचा पाठपुरावा केल्याने १८५६ साली सरकारने 'विधवा पुनर्विवाह कायदा' संमत झाला. पुरुषांच्या वासनेला बळी पडलेल्या स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय जोतीरावांनी केली होती. विधवांना आपलं बाळंतपण सुखरुप पार पाडता यावं आणि भ्रुण हत्या न करता ते बालक सुरक्षित रहावे म्हणून जोतीरावांनी पुण्यात एक बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. स्त्रियांना संरक्षण देणारी अशा त—हेची बालहत्या प्रतिबंधक संस्था भारतात सर्वप्रथम जोतीरावांनी काढली, हे त्यांच्या दूरदर्शीपणाचे दयोतक आहे.

ब्राम्हण विधवा स्त्रियांच्यावर अन्याय करणारी रुढी म्हणजे केशवपणाची. ही रुढी बंद करण्यासाठी जोतीरावांनी प्रयत्न केले. अनेक वृत्रपत्रातून लेखन झाले. जोतीरावांचे एक सहकारी आणि 'दिनबंधू' चे संपादक कृष्णराव भालेकर यांनी केशवपन रुढी विरुद्ध एक लेखमाला सुरु केली. ''आपमतलबी ब्राम्हणाच्या भूलथापांना बळी पडू नका'' अशी विनंती केली. सामाजिक चळवळीत विष्णूशास्त्री बापट, बाळशास्त्री

जांभेकर, गोपाल हरी देशमुख, न्यायमुर्ती रानडे, बाबा पद्मनजी या सुधारकांच्या कार्याला जोतीरावांचा नेहमी पाठिंबा असे. स्त्रीचे शिक्षण, अन्रिष्ट चालिरीती,रुढी, सामाजिक दास्यत्व, यांच्यापासून त्यांची मुक्तता, मानवी हक्क यासाठी समाजातील सर्व जातीतील स्त्रियांच्यासाठी जोतीरावांनी केलेल्या कार्यामुळे 'स्त्रियांचा पहिला उद्धारकर्ता' म्हणून त्यांचे नाव सतत घेतले जाते.

जोतीरावांवर टीकाकारांनी ब्राम्हणव्देष्टे, ख्रिस्ताळलेले म्हणून, इंग्रजधार्जिणे असल्याबद्दलचा बिनबुडाचा आरोप केला होता. इतर सुधारकांप्रमाणे महात्मा जोतीराव फुले इंग्रजी राज्याचे स्वागत करणारे होते. इंग्रजी राजवटीमुळेच सामाजिक अभिसरण सुरु झाले असून, समाजाची सुधारणा करावयाची असेल, तर इंग्रजांचे राज्य काही काळ तरी टिकले पाहिजे असे त्यांना वाटत होते. बहूजनांना केवळ जगण्याचे नव्हे, तर माणूसपणाचे हक्क प्राप्त झाले पाहीजेत असा आग्रह त्यांनी धरला होता. त्यासाठी जोतीराव बहूजन समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना त्यांच्या हक्काविषयीचे आत्मभान देण्याचा प्रयत्न करतात.

**मानवाचे हक्क सर्वास कळता।**
**मग कोण त्राता। आर्य भटा।।**
**किंवा**
**मानवाचे हक्क ते का विसरले?।**
**अतिशूद्र झाले पशुव्रत।।**

जोतीरावांनी मानवी हक्काचा आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रश्न जसा वेळोवेळी मांडला, तसा सामाजिक नीतिमत्तेसंबंधीही त्यांनी आग्रह धरलेला दिसतो. व्यसनी, असत्य, दूराचारी, आत्मपरिक्षण इत्यादीसंबंधीचे जागर त्यांनी घातलेले होते. गृहकार्य दक्षता आणि स्वच्छता इत्यादीनांही जीवनात किती महत्वाचे स्थान आहे, हे ते सामान्यांना पटवून देतात. स्नान करावे, कपडे धुवावीत, चार—चौघात अंग खाजवू नये इत्यादी गोष्टी सांगण्याचीही गरज त्यांना वाटते.

शेतकरी आणि शेतकरी—स्त्रियांसंबंधीही जोतीरावांनी वेळोवेळी कृती आणि विचार मांडलेले आहेत. शेतक—यांच्या आसूड, इशारा या ग्रंथाबरोबरच जोतीबांनी ब्राम्हणांचे कसब, तृतीय रत्न नाटक, निवडक अखंड, पोवोडे आदी गदय—पदय लेखनातून शेतक—यांविषयी आणि स्त्रियांविषयी विस्ताराने, तळमळीने आणि व्यापकपणाने लेखन केलेले आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो, शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाचा प्रश्न असो, बालविवाह, सती प्रथा, विधवा, विधवांचे केशवपन, विधवाविवाह इत्यादी तत्कालिक सर्व सामाजिक

प्रश्नांवर त्यांनी लेखन केले, आंदोलने केली, जनजागृती मोहिमा चालवल्या, हे सारे प्रश्न ब्राम्हणांनी धर्मग्रंथ तयार करताना जे 'कसब' दाखवले होते, त्यातून निर्माण झालेले होते, अशी त्यांची धारणा होती. या धारणेचा प्रत्यय त्यांनी वेळोवेळी केलेल्या लेखनातून होतो. 'ब्राम्हणी कसब' निकाली नेमकेपणाने दाखवण्याचे काम त्यांनी आपल्या लेखनातून केले. हे 'ब्राम्हणी कसब' निकाली काढण्यासाठी त्यावर त्यांनी लेखनीचा 'आसूड' चालवला. परिणामी शूद्रातिशूद्रांना आपल्या अधिकाराची, आपल्या हक्कांची जाण येऊ लागली. ही जाणीव अधिक संघर्षशील करण्यासाठीच त्यांनी 'सत्यशोधक समाज' जन्माला घातला होता.

**शैक्षणिक विचार:**

महात्मा फुले यांनी शैक्षणिक कार्यावर विशेष भर दिला होता हे समजून घ्यायचे असेल तर त्यांचा विचार सखोल व समग्रपणे अभ्यासला तरच कळून येते. त्यांनी समाजजीवनाचा सुक्ष्म अभ्यास केला होता. या अभ्यासातूनच त्यांना,

**''विद्येविना मति गेली। मतीविना नीती गेली।**
**नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।**
**वित्ताविना शूद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले।।''**

हे कळून आल्याने शूद्रातिशूद्रांना व स्त्रियांना शिक्षण देण्याचा वसा घेतला. म. फुले यांनी १८५१ साली पहिली शाळा सुरु केली. इथून त्यांचा शिक्षणक्षेत्राचा अनुभव सुरु होतो. त्यांनी लिहिलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा अखेरचा ग्रंथ मानला तर त्यांचे लेखन त्यांनी १८८६ साली केलेले आहे. त्यांचे समग्र लेखन व त्यांची चळवळ यातून त्यांचा शैक्षणिक विचार स्पष्ट होत जातो.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' हे सुभाषित स्त्रिची महती सांगण्यासाठी नेहमीच वापरले जाते. आपल्या कुटुंबाच्या उद्धाराची जबाबदारी स्त्री वर येऊन पडते. म. फुले यांची धारणाही अशीच होती. 'आईच्या मुलांची जी धारणा होते ती फारच चांगली आहे'. म्हणून जोतीरावांनी सखाराम यशवंत परांजपे. सदाशिव गोविंद हाटे, सदाशिव बल्लाळ गोवडे व मोरोपंत विठ्ठल वाळवेकर या तरुणांनी ३ जुलै १८५१ रोजी पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडेवाडयात शाळा सुरु केली होती. ही शाळा सुरु केल्यानंतर हया मंडळीस असंख्य दु:खे, श्रम व शिव्या सोसाव्या लागल्या. जोतीरावांनी स्थापलेली मुलींची शाळा ही पहिली एतद्देशीय शाळा ठरली. अस्पृश्य वर्गासाठी प्रथम शाळा सुरु करण्याचा मानही त्यांच्याकडेच जातो. मुलांना शाळेत कधी घालावे इथपासून प्रचलित शिक्षणपद्धती, सुधारित शिक्षणपद्धती, शिक्षणशास्त्र इथपर्यंत त्यांनी आपले विचार मांडले आहेत.

म. फुले यांना स्वानुभवावरुन बहूजनसमाज आणि दलितवर्ग यांच्या साध्या प्राथमिक शिक्षणाची हेळसांड जुन्या आणि नव्या राजवटीत कशी चालली होती याची कल्पना आली होती. त्यावेळी पुण्यातील शाळा जुन्या गावगाडयाच्या धर्तीवर चालविल्या जात होत्या. शाळांचे चालक ब्राम्हण असून, उदारनिर्वाहाचा अखेरचा व्यवसाय म्हणून शाळा काढल्या होत्या. परिस्थितीमुळे मागासलेल्या, अतिमागासलेल्या आणि स्त्रिया यांच्या शिक्षणाची समाजात फार आबाळ होत होती. पण याला सर्वस्वी ब्रिटीश राजवट कारणीभूत आहे, असे मानावयास जोतीराव फुले तयार नव्हते. शिक्षणाचे महत्व सांगताना ते म्हणतात, ‘‘गुलामगिरीला इंग्रज जबाबदार नाहीत, त्याला आपले अज्ञान जबाबदार आहे’’. त्यासाठी लोकांमध्ये शिक्षण प्रसार करुन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे हे ‘गुलामगिरी’ नष्ट करण्याचे एक प्रभावी साधन आहे असे ते मानीत.

शैक्षणिक क्षेत्रात भेदभाव करणे इंग्रजांना तत्वत: मान्य नव्हते. त्यांनी सर्व जातीच्या मुलांसाठी शाळा सुरु केल्या होत्या. परंतु जोतीरावांची खंत वेगळीच होती. त्यांना वाटे की, अशा शाळावर जर ब्राम्हण शिक्षकांचीच नेमणूक झाली, तर महार—मांगांना योग्य ते शिक्षण मिळणार नाही. शूद्र जातीतील शिक्षक तयार करण्याची काही तजवीज सरकारने न केल्यामुळे त्यांना अशी भीती वाटत होती की,‘‘आर्य लोकांच्या एकतर्फी ग्रंथात शूद्रादी अतिशूद्रास विद्या न देण्याविषयी कडेकोट बंदोबस्त केला आहे आणि धूर्त आर्यभट ब्राम्हण आपली पोटे जाळण्यासाठी पोटार्थी भटपंतोजीकडून खेडेगावातील अतिशूद्रांची मुले शाळेत शिकून विव्दान होणार नाहीत असे मी खात्रीने सांगतो.’’

आपल्या गुलामगिरी या ग्रंथात ते म्हणतात,‘‘अरे एका भट प्रोफेसरात सहा शूद्र अथवा नऊ अतिशूद्र प्रोफेसर मिळण्याची खात्री असता सरकार या कामी भटांच्या नादी लागून आमच्या अज्ञानी बांधवांच्या कमाईचे पैसे असे बेलगामी खर्चते म्हणून त्याविषयी आपल्या सरकारास आपण जागे केले नाही, तर त्याचा दोष आपल्या माथ्यावर येणार आहे.’’

ख—या शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या जोतीरावांनी केवळ शाळा काढून समाधान मानले नाही. शिक्षणाचे प्रतिबिंब शिक्षण घेतलेल्यांच्या दैनंदिन जीवनात पडले पाहिजे, शिक्षणाने जीवन अधिक समृद्ध केले पाहिजे, दृष्टी व्यापक झाली पाहिजे, ज्ञानाची कदर केली पाहिजे, अशी अपेक्षा आपण शिक्षणापासून केली पाहिजे. शिक्षण हे सामान्यांच्या भाषेतून, मातृभाषेतूनच दिले जावे या शिक्षणाच्या मूलभूत सिद्धांतास जोतीराव उचलून धरित होते.

स्त्री—दलित शिक्षणाच्या या शाळांचा व्याप सांभाळताना सतत दक्ष व कार्यमग्न राहिल्यामुळे काही सुधारक मंडळींना जोतीरावांच्या कार्याचे महत्व पटू लागले. ज्ञानप्रकाशसारख्या वृत्तपत्रांनी जोतीराव करित असलेल्या महान शैक्षणिक कार्याला

पाठिंबा दिला. दानशूर नानाशंकर सेठ, डॉ. भाऊ लाड यांनी आपला सहकार्याचा हात पुढे केला, तर मेजर कॅण्डीसारख्या शिक्षणप्रेमी इंग्रज अधिका—यांनी 'दक्षिणा पारितोषिक समिती' कडून जोतीरावांच्या शाळांना दरमहा रुपये ७५ चे अनुदान मंजूर केले. जोतीराव हे मानवतावादी होते. कोणती तरी जात इतर जातीपेक्षा श्रेष्ठ आहे, या भूमिकेला त्यांचा ठाम विरोध होता. म्हणूनच तळाच्या जातींवर केवळ दया दाखविणे त्यांना मंजूर नव्हते. गरिब शेतकरी आणि भूमिहीन कनिष्ठ जाती यांना त्यांचे जन्मसिद्ध मानवी हक्क मिळाले पाहिजेत व त्यासाठी निर्भयपणे संघर्ष केला पाहिजे ही त्यांची भूमिका होती. जोतीराव जसे समाजशिक्षक होते, तसा त्यांचा पिंड क्रांतीकारकाचाही होता. त्यांना समाजाच्या सर्व क्षेत्रातील जुनाट कल्पना, त्यातून निर्माण भेदभाव, काहीजणांना मिळणारे विशेष अधिकार लाखोंच्या व्यक्तिमत्वावर होणारे प्रहार या सर्वांचा पराभव करावयाचा होता. त्यातूनच सामाजिक समतेची व व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांच्या मुल्यांची स्थापना होणार होती. म्हणून ते आपल्या शिक्षण संस्थेतील सहका—यांपुढे आग्रह धरु लागले की, कनिष्ठ वर्गातील लोकांना अशा त—हेचे शिक्षण द्यावे की, ज्यामुळे ते आपल्या सामाजिक समतेच्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांसाठी संघर्ष उभा करतील. परंतू हे त्यांच्या सहका—यांना मान्य नव्हते. लिहीण्या—वाचण्याचे व सामान्य व्यवहाराचे शिक्षण शूद्रांना देण्यात समाधान मानणारे सहकारी व वैचारिक संघर्षाचा परिणाम म्हणजे जोतीराव, असे मतभेद सुरु झाले. यातूनच आकाराला आणलेल्या शिक्षणसंस्थेतून त्यांना निवृत्ती स्विकारावी लागली. ही निवृत्ती एका शिक्षण संस्थेतून होती. तळागाळाच्या समाजाला चेतना व स्वत्व देणा—या व्यापक शिक्षण प्रक्रियेतून नव्हती. म्हणून पुढील आयुष्य त्यांनी समाजजागरणासाठी ग्रंथ लिहीण्यात घालविले. पण तेथेही 'शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे धारदार व प्रभावी हत्यार आहे, त्याला दुसरा कोणताही पर्याय नाही.' या आपल्या विचारसूत्रापासून ते तसूभरही ढळले नाहीत. जोतीरावांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल १८५२ साली सरकारने जो जाहीररित्या गौरव केला होता, त्याचा परिणाम अस्पृश्यांच्या शिक्षणविषयीच्या सरकारी धोरणावरही झाला. ईस्ट इंडीया कंपनीने १८५४ साली एक शिक्षणविषयक धोरणासंबंधीचा आपला एक आदेश कंपनी सरकारच्या विचारार्थ पाठविला. 'शिक्षणाची महान सनद' असे या खलीत्याचे वर्णन केले जाते. १८८२ साली सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली इंग्रज सरकारने भारतीयांच्या शिक्षणासंबंधी एका आयोगाची नेमणूक केली. म. फुले यांनी याला विरोध केला. हंटर आयोगाला त्यांनी सांगितले की, ''तुम्ही शिक्षणाची उभारणी खालून वर अशी करा, वरुन खाली अशी करु नका. आधी पाया मग कळस, तुमच्या इंग्लंडमध्ये आधी कळस मग पाया हे कदाचित शक्य झाले असेल, आमच्याकडे ते होणार नाही.

आमच्याकडे जातीभेद आहे, वर्णभेद आहे, आमचा समाज एकसंघ नाही, एकजीव नाही. हे वरचे डोंगरमाथ्यावरचे लोक, खालच्या लोकांपर्यंत ज्ञान येऊ देणार नाहीत. स्वत: पाट काढणार नाहीत. बांध घालतील, पाणी वरच अडवतील, आजवर त्यांनी ज्ञानगंगेचे पाणी अडविले. या वरच्या लोकांवर बहुजन समाजाच्या शिक्षणाची जबाबदारी टाकू नका. सरकारच्या वतीने शिक्षणाची खालून सुरुवात करा. निदान बारा वर्षाच्या वयापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करा.''

शिक्षणाचा लाभ प्रामुख्याने वंशपरंपरा लेखनावर उपजिविका करणारे ब्राम्हण, प्रभू या समाजातील लोकांनाच घेता येतो. जोतीराव म्हणतात की, शाळांची संख्या वाढवावी, गरीब आणि शेतकरी यांची मुले शाळेत जातील आणि टिकून राहतील, यासाठी उत्तेजनार्थ त्यांना शिष्यवृत्त्या, बक्षिसे दयावीत आणि प्राथमिक शिक्षण हे वयाच्या बारा वर्षे वयोमर्यादिपर्यंत सक्तीचे करावे. मुसलमान वर्गातील मुलांना मराठी व इंग्रजी भाषेची आवड नसल्याने त्यांची भाषा शिकविली जाईल, अशा अधिक शाळा काढाव्यात, महार—मांग लोकांची वस्ती अधिक असेल तेथे त्यांच्यासाठी वेगळया शाळा काढाव्यात. परिक्षांच्या निकालावर शिक्षकांचे वेतनमान अवलंबून ठेवण्याची प्रथा बंद करावी. सरकारने स्वत:च अधिक शाळा काढून त्याकडे विद्यार्थ्यांना आकर्षून घ्यावे, असे जोतीरावांनी सूचित केले.

अभ्यासक्रमात धंदे शिक्षणावर भर द्यावा, कारण सर्वांनाच काही सरकारी नोक—या मिळणार नाहीत. सध्याच्या शिक्षणपद्धतीत व्यवहारोपयोगी शिक्षणाचा अभाव असल्याने सुशिक्षितांना रोजगार—धंदे करणे अशक्य झाले आहे. जोतीराव प्रामुख्याने मानवतावादी असल्याने त्यांच्या हातून जे विधायक समाजकार्य अथवा शिक्षणविषयक कार्य घडले ते कौतुकास्पद आहे. कदाचित अशा कार्यासाठी लागणारी विशिष्ट मनोवृत्ती, आंतरिक ओढ या भूतदयावादी समाजसुधारकांच्या ठायी दिसून येते. जोतीराव मोठे निर्धाराचे आणि क्रांतीकारकवृत्तीचे गृहस्थ होते. त्यामुळे अनेक संकटांना तोंड देऊन प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी अगदी शेवटपर्यंत जे कार्य केले, त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांना मानाचे स्थान मिळाले. १८८८ साली जनतेकडून त्यांचा उत्स्फुर्तपणे सत्कार झाला. 'महात्मा' ही पदवी अर्पण केली व भारताचे ते पहिले महात्मा बनले.

सत्याच्या संदेशाने जोतीरावांचे व्यक्तिमत्व अगदी भारलेले होते. जोतीरावांनी सत्य हीच आपली पूजनीय देवता मानून तिचीच भक्ती केली. तिच्या प्रचारार्थ ते आयुष्यभर कायावाचामनाने झटले. महात्मा फुले यांना मानाचा दुसरा मुजरा करताना शिक्षणतज्ञ विठ्ठलराव घाटे म्हणतात,''महात्मा फुले महाराष्ट्राला आपला शेवटचा संदेश सांगून गेले. तो वैराचा नव्हता. सत्याचा होता.'' ते म्हणतात—

"सार्वभौम सत्य स्वतः आचारावे। सुखे वागवावे पंगु लोका।
अशा वर्तनाने सर्वांना सुख द्याल। स्वतः सुखी व्हाल,ज्योती म्हणे."

अशाप्रकारे या महान व्यक्तिमत्वाचे दर्शन आपल्याला त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून घडते आणि अशा समाजपुरुषाची आजही समाजाला गरज आहे असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ :—**


1. महात्मा जोतीराव फुले (सामाजिक आणि शैक्षणिक कार्य) — अ.रा. कुळकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे.
2. शेतक—यांचा आसुड : एक आकलन — अशोक कौतिक कोळी, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद
3. क्रांतिबा फुले : चळवळ आणि तत्वज्ञान — मोतीराम कटारे, सुगावा प्रकाशन, पुणे—३०.
4. म. फुले यांचे शैक्षणिक कार्य — प्रा. तानाजी ठोंबरे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
5. जोती म्हणे — भास्कर चंदनशिव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
6. महात्मा फुले : व्यक्तितत्व आणि विचार — गं. बा. सरदार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

# ४०. राजा राममोहन राय यांचे स्वातंत्र्य विषयक विचार

**प्रा. दत्तात्रय मुकुंदराव ढवारे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,वाशिम.
मो.क्र.९८२३१८८१५५
Email ID - dhawaredm2012@gmail.com

**प्रस्तावना :—**

आधुनिक भारताच्या इतिहासातील तो खरोखरच काळाकुट्ट कालाखंड होता. जुनी समाजरचना आणि राज्यव्यवस्था मोडकळीस आली होती. आणि तिचे अवशेष इतस्तत: विखुरलेले होते. या अवशेषांचा ढिगारा बाजुला सारून प्रचीन व्यवस्थेच्या पायावर नव निर्माण करण्याचा प्रयत्नही होत नव्हता. कालबाहय रीतीरिवाज आणि अविवेकी धर्मांधता यांनी राष्ट्राचा जीवनप्रवाह अवरूध्द करून टाकला होता. ज्ञान संपुष्टात आले होते. तो एक जणू काही न संपणा�या काळोखाचा कालखंड होता. राजा राममोहन रॉय यांचा उदय अशा प्रकारच्या दुष्काळग्रस्त आणि रूक्ष कालखंडात झाला.

मानवी संस्कृतीच्या इतिहासात अदृश्यरूपाने कार्यरत असलेली सर्जनशील सघन ऊर्जा आणि काल — शक्तीचे लोकोत्तर पुरूष हे केंन्द्रबिंदु असतात. लोकोत्तर व्यक्तिमत्वाची सार्थकता किंवा त्यांच्या व्यक्तिमत्वाची थोरवी ही त्यांच्या वाटयाला आलेले ऐतिहासिक कार्य ओळखण्याच्या त्याच्या समतेत असते. ऐतिहासिक प्रवाहाचा मुळ गाभा शोधण्यात असते आणि शेवटी त्या कार्याच्या पूर्ततेसाठी दृढ आणि कृत निश्चयी होऊन अत्युत्तम सर्जनशील अशी कृती करण्यामध्ये ही थोरवी सामावलेली असते.

आठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जेव्हा राजा राममोहन रॉय यांचे भारतीय इतिहासाच्या रंगमंचावर पदार्पण झाले. तेव्हा इस्लामी राज्यव्यवस्था जीर्णशीर्ण होऊ लागली होती. भारतात व्यापाराच्या निमित्ताने आलेले इंग्रज हळुहळु या देशाचे शासक म्हणून वावरू लागले होते. इ.स. १७५७ मध्ये झालेल्या प्लासीच्या लढाईने बंगालच्या विनाशाचे भवितव्य आधीच पंधरा वर्षानी अलीकडे आणून ठेवले. पाश्चात्य जगाचे अग्रदूत म्हणून भारतात आलेले इंग्रज फक्त वाणिज्यविषयक घडामोडीचेच दलाल म्हणून नव्हे तर ऐतिहासिक घटनाक्रमाचे माध्यम म्हणून

भारताला त्यांच्या औदासीण्यातून ढवळून काढून नव्या विचारांची आणि कृतीची लाट जुन्यापुराण्या इतिहास प्रवाहातून निर्माण करण्यासाठी आले होते. त्यांच्या समीक्षक बुध्दीवादामुळे, सामाजिक विवेक दृष्टीमुळे व मानवमात्राबद्दलच्या कळवळयामुळे राजा राममोहन रॉय बंगालच्या धार्मिक — राजकीय व सामाजिक प्रबोधनाचे अध्वर्यू ठरले. पाश्चात्य राज्यशास्त्राच्या इतिहासात ॲरिस्टॉलचे जे स्थान आहे ते भारतातील राज्यशास्त्रीय विचारक्षेत्रात राजा राममोहन रॉय यांना द्यावे लागेल. अनेकदा त्यांच्या सामाजिक व धार्मिक विचारांकडेच आकर्षित झाल्या मुळे अभ्याकांच्या नजरेतून त्यांचे राजकीय विचार निसटुन जातात. राजा राममोहन रॉय यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ धर्माला चिकटलेली बांडगुळे छाटण्यापासून केला. हिंदुच्या भ्रष्ट चालीरीती, भ्रमाधिष्ठित पाशवी रूढी व भारतीय मनाची झालेली कुपमंडूक वृत्ती यांच्यावर हल्ले चढविण्यातून केला. राजा राममोहन रॉय यांच्या मनाची बैठक तत्वज्ञानाची असल्यामुळे क्रांतीकारक मार्गानी स्वातंत्र्य संपादन करण्याची कल्पना त्यांच्या मनाला स्पर्श करू शकली नाही.

**राजा राममोहन रॉय यांचे स्वातंत्र्यविषयक विचार** :—

स्वातंत्र्य हा मानवाचा अति मौल्यवान ठेवा आहे याची जाणीव राजा राममोहन रॉय यांना होती. जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात राजा राममोहन रॉय यांनी जे कार्य केले त्या सर्वामागील अंत:प्रेरणा स्वतंता—प्रेम ही होती, स्वतंत्रप्रेम ही कदाचीत त्यांच्या मनाची सर्वात प्रखर भावना असावी,स्वातंत्र्य केवळ शरीराचे नव्हे तर मनाचेही ! केवळ कृतीचेच नव्हे तर विचारांचेही समाजातील व्यक्तीगत स्थान वंश,घराणे, पायंडे,धर्म इत्यादी गोष्टींनी स्वातंत्र्यावर घातलेल्या जाचक बंधनांना तोडून त्यांनी पायदळी तुडवले, त्यांच्या वाटेत जे अडथळे आले त्यांच्यावर त्यांनी मात केली त्यांच्या मानसिक स्वातंत्र्यावर अप्रत्यक्षपणे जरी कोणी अतिक्रमण केले तरी त्यांनी त्याचा दुर्दम्य खंबीरपणे प्रतिकार केला. त्यांच्या असीम स्वातंत्र्यप्रेमाचाच अविष्कार त्यांच्या विविध कार्यातून प्रत्ययास येतो. धार्मिक क्षेत्रात त्यांनी प्रेमाने मुर्तिपूजाविरोध, अंधश्रध्दानिर्मुलन असे स्वरूप धारण केले. सामाजिक क्षेत्रात सती, बहुपत्नीत्व इत्यादी सामाजिक अनिष्टांशी झुंज करण्यातून ते प्रेम व्यक्त झाले. तर राजकीय क्षेत्रात भारतीयांच्या नागरी व धार्मिक हक्कांना त्यांनी मागीतलेल्या संरक्षणाच्या स्वरूपात,स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी व समान दर्जासाठी त्यांनी केलेल्या आवाहनांच्या स्वरूपात किंवा या सर्व हक्कांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने न्यायालयीन व प्रशासकीय अधिकारांची विभागणी व्हावी या त्यांनी धरलेल्या आग्रहाच्या स्वरूपात त्यांचे हे स्वातंत्र्यप्रमेच अविष्कृत झालेले दिसून येते.

त्यांची आदर्श धर्मकल्पना ही जशी विश्वात्मक, धर्माची आहे त्याचप्रमाणे त्यांची स्वातंत्र्य लालसासुध्दा विश्वात्मक स्वरूपाची आहे. कोणत्याही विशिष्ट देशापुरती वा समाजापुरती ती मर्यादित नाही. स्वत:च्या हक्काबद्दल सावध राहणाऱ्या या विचारवंताच्या मनात भोवतालच्या व्यक्तीच्याच नव्हे तर राष्ट्रांच्याही स्वतंत्रे बदृल निंतात आदर व सन्मान होता.

राजा राममोहन रॉय यांच्या व्यक्तीमत्वाचाच एक अविभाज्य घटक होऊन बसलेले हे स्वातंत्र्यप्रेम म्हणजे त्यांना गवसलेला एक बुध्दीगम्य व अढळ असा विश्वास होता. त्याचे मूळ सर्व भारतीयांना व सर्व समजांना सुनियंत्रित व आत्मसंयमी स्वातंत्र्याद्वारेच सापडु शकरणाऱ्या उमद्या हेतुवरील विश्वासात होते. त्या स्वातंत्र्याचा उपभोग विशिष्ट वर्गासाठी, वर्णासाठी,वंशासाठी, राष्ट्रासाठी वा धर्मासाठी मर्यादित करणे रॉय यांना मान्य नव्हते त्यांच्या सहानुभूतीच्या कक्षा अखिल मानवमात्रांना सामावून घेणाऱ्या होत्या.

१८२३ मध्ये दक्षिण अफ्रिकेतील स्पॅनिश वसाहती स्पेनच्या जूलमातून मुक्त झाल्याची व त्या वसाहतीमध्ये घटनात्मक शासन प्रस्थापित झाल्याची वार्ता कळताच राजा राममोहन रॉयनी टाऊन हॉलमध्ये मित्रांना भोजन दिले होते. पोर्तुगालमध्ये घटनात्मक शासन आल्यावर ते हर्षित झाले होते. तूर्कांच्या जूलमातून सुटण्याठी ग्रीक लोकांनी केलेल्या लढयाला त्यांनी पाठींबा दिला होता आयर्लंडवर ब्रिटनचे साम्राज्य चालु ठेवले जाऊ नये असा लेख आपल्या ''मीरत–उल–अख्बार'' या नियतकालिकातून लिहिला होता. १८३० मध्ये इंग्लडला समुद्रामार्गे जात असतांना त्यांना एक फ्रेंच आगबोट येतांना दिसली तिच्यावर स्वतंत्र फ्रान्सचा झेंडा डौलाने फडफडतांना पाहुन त्यांचे अंत:करण भरून आले होते. स्वातंत्र्य–समता– बंधुत्वाचे निशाण हवेत फडफडतांना पाहुन त्यांच्या ऊर्मी उफाळुन आल्या होत्या.त्या आगबोटीवर जावुन त्या ध्वजाला मुजरा करण्याच्या धावपळीत त्यांनी आपल्या पायाला जबर दुखापत करून घेतली होती.

इंग्लडमधील १८३२ च्या सुधारणा कायद्याला त्यांनी मन:पूर्वक पाठिंबा दिला होता. त्यांच्या मते तेव्हाचा संघर्ष हा सुधारक व सुधारणाविरोधक यांच्यातला, म्हणजेच पर्यायाने स्वातंत्र्य व जुलुम,न्याय व अन्याय, बरोबर व चूक यांच्यातील जागतिक संघर्षाचा एक भाग होता.

अप्रत्यक्षपणे का होईना या देशाला राजकीय स्वातंत्र्याचा पहिला संदेश राजा राममोहन रॉय यांनीच दिला. भारत परतंत्र झाला तेव्हा गुलामगिरीची ती भावना आसहय होऊन राजा राममोहन रॉय तिबेटमध्ये निघुन गेले होते. अशी बिपिनचंद्र पाल यांनी त्यांच्या संबंधी सांगितलेली आठवण या संदर्भात लक्षणीय ठरते.

**राजा राममोहन रॉय यांचा प्रभाव** :—

राजा राममोहन रॉय यांचे इंग्रजीत चरित्र लिहीणाऱ्या सोफिया डॉक्सेन कोलेट यांनी राममोहन रॉय यांचा त्यांच्या विदेशी चाहत्यांवर पडलेल्या एकुण प्रभावाचे वर्णन करताना म्हटले आहे की, ‘‘इतिहासाच्या एका टोकाला भारताचा अगम्य भुतकाळ व दुसऱ्या टोकाला अमर्याद भविष्यकाळ हा दोहोमध्ये जिवंत सेतू म्हणून राममोहन रॉय उभे आहेत आणि त्यावरून भारतवर्षाची वाटचाल सुरू आहे. एका बाजूला जुनी झालेली जातिव्यवस्था, अंधश्रध्दा, हुकुमशाही, रूढीरिवाजांचे डोंगर, विकासाची पारंपारिक कल्पना, अनेकश्वरवाद, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक मानवतावाद, विज्ञान, लोकशाही व एकेश्वरवाद हया दोन्ही बाजूंना जोडणाऱ्या महिरपीचे काम राजा राममोहन रॉय यांनी केले. हे खडतर कार्य करण्यासाठी प्रसंगी त्यांनी एकाकी झुंज देवुन यातना सहन केल्या, दीर्घजीवी परंपरा व अटळ असा ज्ञानोदय यांच्यात असलेल्या परस्परविरोधी प्रवाहांना व्यक्तिगत पातळीवर सहन केले पण समाजामध्ये सुसंवाद निर्माण करण्यासाठी मध्यस्थाची भुमिका शेवटपर्यंत वठवली राजा राममोहन रॉय यांचे जीवन म्हणजे नव भारतासाठी चेतना व स्फुर्ती देणाऱ्या स्थिर आणि प्रेरक अशा व्यक्तिमत्वाचा अभ्यास आहे. राजसत्तेचा प्रभाव असलेल्या ब्रिटिश जनतेला आणि नवी वाटचाल करणाऱ्या पाश्चिमात्य लोकशाहीला राजा राममोहन रॉय यांनी पौर्वात्य विचारांच्या आधारे देऊ केलेला संदेश निश्चितच कमी महत्वाचा नाही. भारतासाठी काळाच्या उदरात काय दडलेले आहे हे आज जरी सांगता येत नसले तरीही त्या येऊ घातलेल्या भविष्यकाळावर मोठया प्रमाणात राममोहन रॉय यांच्या जीवन व कार्याची छाप नक्कीच राहील.’’

**संदर्भ** :—

१. टागोर सौम्यन्द्रनाथ, भारतीय साहित्याचे निर्माते राजा राममोहन रॉय, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९२४
२. दत्त कार्तिक चंद्र, राजा राममोहन रॉय जीवन और दर्शन, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
३. भोळे, भा.ल. आधुनिक भारतीय राजकीय विचार
४. वराडकर र.घ. भारतीय राजकीय विचार, विद्या प्रकाशन,नागपुर
५. पाटील वा.भा. प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव.
६. झा ममता, समाज सुधारक राजा राममोहन राय,प्रभात प्रकाशन,२०१९
७. तिवारी, विनोद, राजा राममोहन राय, मनोज पब्लिकेशन,२००५

# ४१. महात्मा ज्योतीराव फुले यांचे राजकीय विचार

**प्रा. एस.एस. तायडे**
राज्यशास्त्र विभाग
मधुकरराव पवार कला महाविद्यालय,
मुर्तिजापूर,जि. अकोला, मो. ९७३०८२७८३१

**प्रस्तावना :-**

ज्योतीराव गोविंदराव फुले (मुळ आडनाव गोऱ्हे) यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कटगूण गावचा (१८२७) पेशव्यांना फुले पुरविण्याच्या व्यवसायावरुन त्यांचे आडनाव फुले पडले. शाळेतील वेगवेगळ्या जातीचे मीत्र, मिशनरी लोकाची कामाची पध्दत, थॉमस पेन यांच्या (Rights of Man) या पुस्तकाचा प्रभाव आणि लघूजी मांग साळवे यांच्या आखाड्यात केलेली बलसाधना या सर्वामुळे त्यांच्या विचारांची जडण घडण आधुनिकतेला शोभेल, पुरोगामी आशीच झाली. ज्योतीराव दलित उध्दारक, स्त्रीमुक्ती ई. चे आद्य प्रवर्तकच होते. विधवांचा पुन:रोध्दार, केशवपण बालहत्या, ई. सडेतोड विरोध, आरोग्य व शिक्षण याविषयी च्या सुविधांना समाज प्राण मानणारे हे व्यक्तीमत्व असले तरी त्यांचे राजकीय विचारही तेवढेच प्रखर व पुरोगामी होते. या शोध निबंधाच्या उद्देशाने संशोधकाने त्यांच्या राजकीय विचारांवर प्रकाश टाकण्याचा केलेला हा प्रयत्न!

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) म. ज्योतीराव फुले यांच्या राजकीय विचारांचा शोध घेणे.
२) म. ज्योतीराव फुले यांच्या राजकीय विचारांना प्रसिध्दी देणे.
३) आधुनिक व्यवस्थेत त्यांच्या राजकीय विचारांची उपयोगीता सिध्द करणे.

**म. ज्योतीराव फुले यांचे राजकीय विचार :**

१८५७ च्या उठावापर्यंत इंग्रज सरकारचे धोरण सामान्य जनतेला न्याय देण्याच्या बाजूने होते म्हणून ज्योतीरावांना त्याबद्दल सहानुभूती होती. जेव्हा सरकारने धोरण बदलले भारतीय लोकांच्या धार्मिक व सामाजिक बाबतीत हस्तक्षेप करायचा नाही असे निश्चित केले होते. आणि याच निर्णयामुळे सामाजिक सुधारणेच्या कार्यात अडथळा निर्माण झाला आणि हेच धोरण शेषीतांचे घात करणारे ठरले आणि म्हणून त्यांनी आपले राजकीय विचार प्रकट करण्याला सुरुवात केली.

मनुष्य जेव्हापासून समूह करुन राहू लागला तेव्हापासून समुहाच्या नेतृत्वासाठी सत्तासंघर्ष सुरु झाला निसर्गातच प्रत्येकाला दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याचा मोह निर्माण होत असतो. लहान मुलातही अशीच नेतृत्व भावना दिसत असते. म. फुलेच्या मते राजकीय सत्तेची हक्कविषयक नियमावली हजारो वर्षापासून चालू असल्याने राजकीय सत्ता हा नेहमीच राजकीय चिंतनाचा केंद्रबिंदू राहत आलेला आहे. सत्ताधाऱ्यांनी त्यांना हवे तसे नियम तयार करावयाचे निते प्रजेवरलादायचे असा सिलसिला चालू असल्याने प्रजेच्या बाजुने कोणीही फारसे पुढे नेत नसत निदान भारतात जरी प्रजेला न्याय मिळावा अशी त्याची तळमळ होती. इंग्रजी शासनाला त्यांनी स्पष्ट इशारा दिला होता की सत्तेचा मुलस्त्रोत हा कष्टकरी व जनसामान्याना सुस्थितीत ठेवणारा असतो. चुकीच्या धोरणांनी तसेच भ्रष्ट व अकार्यक्षम प्रशासनापायी शेतकरी व कष्टकरी लोकांची कशी दैना होत आहे यावर त्यांनी त्यावेळी आक्षेप नोंदविले व शासनावर कठोर टिका सुध्दा केली.

कोणतेही शासन हे समाजातील विशिष्ट वर्गा-वर्गासाठी नसुन बहुजनांसाठी असते जर शासन बहूजनांच्या विकासाचा विचार करीत नसेल तर ते लवकरच अधोगतीला जात असते असे त्यांचे मत होते.

या देशात इंग्रज राजवटीच्या आधी केवळ छत्रपती शिवाजी महाराजांची, छत्रपती संभाजी राजांची राजवट, फार वर्षापुर्वी केव्हातरी बळीराजांचे राज्य लोककल्याणकारी होते. इंग्रजी राजवटीवर राणीची सत्ता होती म्हणून म. फुले त्यांना राणीबाईची सत्ता म्हणत. तसेच बळीराज, छ. शिवाजी महाराज व राणीबाई (इंग्रज) यांच्या सत्तेला त्यांनी आदर्श राज्यसत्ता म्हणून संबोधले. राणीबाईची सत्ता (इंग्लडमधील लोकशाही शासन) ही सामान्यांच्या बाजुची असली तरी ती हिंदुस्थानात जागृत नाही. ती येथील भ्रष्ट्र आणि पक्षपाती शासनाकडे दुर्लक्ष करते, ती बहुजनांच्या न्यायाकडे लक्ष न देता विशिष्ट लोकांची पाठराखन करते असा त्यांचा आक्षेप होता. सत्तेन धनाचा लोभ न ठेवता सामाजिक दायित्व पार पाडायला पाहिजे असा त्यांचा सवाल होता. शासनाने शुद्राती शुद्रांना कायिक व मानसिक दास्यातुन मुक्त करुन रयतेकडुन मिळालेला पैसा रयतेच्या कल्याणासाठी खर्च केला पाहीजे. असे त्यांचे मत होते.

**ज्योतीरावांचा आदर्श राज्यकर्ता :-**

ज्योतीरावांना द्रव्यलोभर न करणारा, सारासार विचार करुन प्रत्येक पाऊले उचलणारा, सतत उद्योगी, निर्भय, सावध, जनतेला जीव लावणारार व प्रजेच्या सुखासाठी झटणारा राज्यकर्ता सर्वोत्तम आणि आदर्श वाटतो. म्हणूनच निर्मिक हा अशा शुध्द सत्तेचा

विश्वपातळीवरचा आविष्कार आहे. असे निर्मिक या शब्दाचे स्पष्टीकरण केले, चराचर सृष्टी हे निर्मिकाचे राज्य आहे असे त्यांचे मत होते. निर्मिकाचे राज्य आहे असे त्यांचे मत होते. निर्मिकाने जी सृष्टी निर्माण केली ती सर्व स्त्री-पुरुषांना समान स्वातंत्र्य व अधिकार मिळावेत म्हणून केली आहे.

पुढे चालून ते असे म्हणतात की राज्यकर्त्यांला भ्रष्ट करणे हा सत्तेचा स्वभाव असतो, सत्ता चालविणारे जर छंदीपंदी झाले, त्यांच्या मनातील निर्मिकाची भिती कमी झाली, व्यक्ती-व्यक्ती मधला भवंडपणा संपला, जेत्यांनी जिताशी अमानुष वर्तन केले. तव्दतच मुडभरांनी विद्येच्या तोऱ्यात येऊन समाजास नागविले तर निर्मिकाचे राज्य भ्रष्ट होण्यास फारसा कालावधी लागत नसतो. दृष्टी क्रुर मी छंदीपंदी च्या हाती जेव्हा राज्यसत्तेची सुत्रे जातात तेवहा त्यातून विकृत किंवा अशुध्द राजसत्ता उभी राहते. शिवाजी महाराजांचे राज्य आदर्श सत्तेचे प्रतिक म्हणून त्यांनी मान्य केले.

राज्यसत्ते विषयी त्यांचे विचार हे अगदी स्पष्ट नि परखड स्वरुपाचे होते. कोणाचाही मुलाहिजा ठेवणारे ते विचार नव्हते ते दैववादी नव्हते तर कर्मवादी होते म्हणून त्यांनी त्यांचा निर्मिक हा अलौकीक, अद्भूत आणि चमत्कारी अवतार नाही तर तो बुध्दीगम्य आहे. तो प्रत्यक्ष परिणामातून दिसणारा आहे. राज्यकर्ते हे जेव्हा जुलूम करु लागतात. ऐशोरामी आणि व्यसनाधिन होतात. तेवहा तयांना सत्तेबाहेर फेकुन दिले जाते नी त्यांचे जागेवर नवे राज्यकर्ते सत्ताधिष बनतात जे राज्यकर्ते आपले ऐतिहासिक कार्य पार पाडू शकत नाहीत त्यांना निर्मिक शिक्षा करतो. शिक्षा करणारा काळ असतो. तेव्हा काळ हा निर्मिकाचे स्वरुप आहे असे जोतीराव म्हणतात. प्रत्येक येणाऱ्या राज्यकर्त्यांने स्त्री, शुद्राती-शुद्रांना दास्यमुक्त करावे असे ते आवाहन करतात. राज्यकर्त्यांच्या दृष्टीने बहुसंख्य जनता सत्तेपासून वंचित राहणे घातक असते. सत्तेत जनतेचा सहभाग असायलाच पाहिजे आणि म्हणून सत्ता आणिजनता या बाबतीत ते नेहमीच भाष्य करीत असत. राज्यसत्तेव्दारे श्रमीक व शेती सुधारणेसाठी नेहमी प्रयत्न केले गेले पाहिजे. भ्रष्ट्र प्रशासनाकडून अज्ञानी लोकांच्या द्रव्यांची हाणी होता कामा नये. तत्कालीन परिस्थिती इंग्रजांची लूट काही त्यांच्या मनाला पटत नसे म्हणून ते वेळोवेळी इंग्रज सरकारच्या धोरणावर टीका करत व त्यांच्या ह्या बाबी लक्षात आणून देत असत.

जोतिरावांच्या एकंदरीत विचारांचे अवलोकन केले तर असे लक्षात येते की, राज्यसत्ता आणि श्रमिक यांचा जवळचा तो निकोप संबंध असावा. राज्यसत्ता दिर्घकाळ टिकून राहण्यासाठी जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे. **श्रमिक जनतेला राज्याच्या**

**सत्तासंपत्तीत रास्त वाटा मिळणे हे त्या राज्यसत्तेचे उत्तम लक्षण समजले जाते.** श्रमिकांना जर त्यांचा न्याय वाटा मिळाला तर सामाजिक उर्जेची पातळी आपोआपच उंचावते. समजा तसा न्याय मिळाला नाही तर मग ही पातळी खाली गेल्या शिवाय राहत नाही.

सामाजिक उर्जेची पातळी जर उंच असेल तर समाजातील सगळी माणसे एकमेकांच्या हित आनंदासाठी झटत असतात. सत्यवचन व सत्यचरण करत असतात आणि अशा वेळी दंडशक्तीची सुध्दा गरज भासत नाही. याचा अर्थ राजसत्तेने दमनशक्तीचा वापर जर कमी केला तर जनतेच्या स्वातंत्र्याला काही अर्थ राहतो. बळीचे राज्य अशाच प्रकारचे होते असे ते आग्रहाने सांगतात.

राजसत्ता ही लोकभिमुख असायला पाहिजे यावर जोतीरावांचा कटाक्ष होता. राजसत्ता ही प्रजाहीतदक्ष आणि लोकनुवर्ती असेल तर लोकांत असंतोष निर्माण होत नसतो. उठाव करणारी एखादी व्यक्ती असेल तर जनता तीला दडपून टाकण्यास मागेपुढे पाहत नसते. अशा राजसत्तेकडे कोणी डोळे वर करुन पाहत नाही. परंतु राज्यकर्ते जेव्हा लोकसत्तात्मक कार्याची कास सोडून चैनीकडे झुकतात तेव्हा त्या राजयाचा अंत जवळ आला म्हणून समजा. समाजात निरनिराळ्या स्तरावर जे लोक सत्ता धारण करीत असतात त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देतांना ज्योतीराम म्हणतात, कुटूंबातील मुख्य माता किंवा पिता, गावातील मुख्य पाटील अथवा पाटलीन , देशातील मुख्या देशमुखीन किंवा देशमुख, पुथ्विवरील मुख्य महाराणी अथवा महाराज या सर्व मुख्य अधिकाऱ्यांना सत्यापालनाची मुळीच कळकळ न उरली की त्यांच्या पाल्य व प्रजाजनांच्या ठिकाणी आणि आजचा दृष्टवर्तनाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

ज्योतीरावांचे असे स्पष्ट मत होते की, राज्यकर्ते बदलल्यामुळे राजकीय मत्तांतर घउन येत नाही. राजकीय मात्तांतर घडून येण्यासाठी सत्ताग्राहक असलेले वर्ग सत्ताधारी बनले पाहिजे. इंग्रज राज्यकर्त्यांच्या काळात असे घडत नव्हते ही त्यांची खंत होती.

समाजाच्या कोणत्याही कालखंडात सत्ताधारक व सत्तावंचीत लोक एकत्र आले नाहीत. त्यांची एकजुट होणे शक्य नसते. केवळ सत्ताधारी लोक सत्तावंचितांना सत्ता मिळवून देणे किंवा सत्तेत सहभागी करुन घेणे कधीच नसते. केवळ ढोंगीपणा, दिखाऊपणा व कृत्रिमपणा इ. प्रयत्नांनी राष्ट्रउभारणी होणे शक्य नसते. राष्ट्र उभारणीसाठी समाजात एकजिनसीपणा असावा लागतो. समाज जर आर्थिक आणि सामाजिक विषमतांनी दुभंगलेला

असेल तर कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले तरी ते प्रयत्न कृत्रिम पायावर आधारीत असल्याने राष्ट्रउभारणी करणे शक्य होत नाही.

स्वातंत्र्याबाबत भाष्य करताना ते म्हणतात की, वरिष्ठांचे स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य असू शकत नाहीत. या स्वातंत्र्यात मुठभर मतलबी सत्तापिपासू लोकांचा समावेश झालेला असतो. दीन-दुबळयासाठी ती अंतर्गत गुलामगिरी असते.

**साधन संपन्न, उच्चवर्णीय आणि सुशिक्षित वर्गांनी मागीतलेले स्वातंत्र्य हे साधनहीन, निम्मवर्गीय व अशिक्षित वर्गीय लोकांच्या दास्याचा जाहीरनामा ठरत असते.** अशी ज्योतीरावाचीं ठाम भुमिका होती श्रमिकांनासत्ता मिळणे हा ज्योतीरावांचा स्वातंत्र्यविषयक विचारांचा मुलभूत गाभा होता.

ज्योतीराव हे लोकसंत्तेचे खंडे पुरस्कर्ते आणि कट्टर समर्थक होते. राजेशाहीपेक्षा लोकसत्ताक राज्यव्यवस्थेचे अंगभूत श्रेष्ठत्व त्यांना अगदी उघडपणे मान्य केले होते. जोतीरावांना अशी लोकसत्ताक सत्ता हवी होती की ज्यात रयतेला सर्व प्रकारच्या दास्यातुन मुक्त करण्याची व्यवस्था असायला पाहिजे. ज्यांना सत्ता पेलायची आहे त्यांच्या अंगी ती सत्ता पेलण्यासाठी लागणारी बौध्दीक आणि आर्थिक समता येणे आवश्यक असते ती जर येणे शक्य नसेल तर लोकशाहीसत्ताक राज्याची कल्पना साकार होणे शक्य नाही असे ज्योतीरावांचे मत होते.

जोतीराव हे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रयीचा वारंवार पुरस्कार करीत असत. लोकांना खऱ्या अर्थाने पूर्ण स्वातंत्र्य असावे. ज्या स्वातंत्र्यांत सगळीकडेच समता दिसून येईल. लोकांच्या ठिकाणी बंधुत्वाची भावना निर्माण झाली तर कोणत्याही प्रकारच्या सत्तसंघर्ष असणार नाही. कोणीच श्रेष्ठ व कोणीच कनिष्ठ असणार नाही असे असले तरी याबाबतीत त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचा कुठेच उल्लेख केला नाही. त्यांना अभिप्रेत असलेली राजसत्ता थेट **विश्वमानवतावादाला** गवसणी घालणारी होती.

अशाप्रकारे जोतीरावांचे विचार कमालीचे व्यापक व विवेकावर आधारलेले होते. त्यांना भारताबरोबरच जगात सगळीकडे समता हवी होती. त्यासाठी त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सत्यज्ञानाचा आग्रह धरला. कारण सत्यज्ञानामुळे लोक सद्गुणी होतात, त्यांच्यातील वर्चस्व गाजविण्याची भावना लोप पावते. जोतीरावांचे हे राजकीय विचार केवढ्या उच्च प्रतीचे होते याची कल्पनाही करता येणे शक्य नाही.

**आधुनिक राजकीय व्यवस्थेत म. फुले यांच्या विचारांची उपयोगिता :**

१९ व्या शतकात जोतीरावांनी जे विचार त्यावेळी मांडले त्या विचारांची त्यावेळी तर गरज होती परंतु आजही २१ व्या शतकात त्यांचे विचार किती आवश्यक आहेत याचा विचार संशोधकाने केला आहे. आजही पंचायतराज्य व्यवस्था व त्यातुन प्रजेला सत्तेत सहभागी करुन घेण्याची पध्दती म्हणजे म. जोतीरावांच्या राजकीय विचारांचेच अपत्य होय सत्ता व जनता यांचा जो संबंध ज्योतीरावांनी कथीत केला त्यांची जणू काही प्रचिती या युगात आलेली आहे. सत्ता मात्र माणसाला भ्रष्ट्र करतो हे निर्वीवाद सत्य त्यांनी त्यावेळी कथन केले.

सत्ता परिवर्तनातुन प्रजेचे हीत साधले जाईलच असे नाही हे ज्यावेळी त्यावेळी त्यांनी सांगितले व या त्यांच्या विचारांची आज जणूकाही प्रचितीच येऊन राहली आहे. आज सत्ता परिवर्तन होऊनही समान्य जनता नुसती भरडली जात आहे. केवळ मुठभर लोकच (उच्चवर्णीय) आलटून पालटून लोकसत्ताक पध्दतीचा भरपुर स्वाद चाखतांना दिसत आहे. सामान्य माणसाच्या नावाने टाहो फोडणारे सत्तेत गेल्यावर मुकाट्याने मुग गिळून बसताहेत. श्रमिक शेतकरी, कष्टकरी यांच्या आत्महत्येने समाजात थैमान घातले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता यांच्या व्याख्या बदलून गेल्या व बंधुताशुन्य राजवटी आल्या व त्यातून नक्षलवाद व दहशवादी जन्माला येऊन एकूण विश्वशांती भंग पावली.

थोडक्यात सांगायचे झाल्यास भारताने व जगातील प्रत्येक राष्ट्राने जर जोतीरावांच्या राजकीय विचाराला मुख्य स्थान दिले तर आज लोकशाहीच्या वाट्याला आलेली ही विचित्र परिस्थिती बदलण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी सर्वात प्रथम प्रजेला सत्ताधिश होण्याचे मार्ग मोकळे झाले पाहिजे. **प्रजा ही मालक बनली पाहिजे अशी विशोधणे घटनेत करायला काहीच हरकत नसते.** श्रमिक कष्टकरी, उपेक्षीत शेतकरी व शेतमजुर हा केंद्रबिंदू मानून त्याच्या उत्थानासाठी झटत राहण्याचा ध्यास येणाऱ्या प्रत्येक सरकारने घ्यायला हवा. उपेक्षीतांची मुस्कटदाबी लोकसत्ताक पध्दतीच्या विकासासाठी योग्य नाही. भारतासारख्या कृषीप्रधान देशातील शेतकरी व कष्टकरी प्रजेला आत्महत्या करण्याची वेळ येते हे आदर्श राजसत्तेच्या आरोग्यासाठी भयावह आहे. केवळ बोटावर मोजण्याइतक्याच लोकांनी स्वातंत्र्याचा उपभोग घेणे बंद केले नाही तर समतेची प्रचिती सुध्दा येणार नाही. समता नसेल तर न्याय नाही आणि जेथे न्याय मिळत नाही तेथे बंधुत्वाचा प्रश्नच उद्भवत नाही असे असेल तर विश्वबंधुत्वाचा विचार तरी कसा करता येईल? ही विचारपूस लूप्त झाली तर नक्षलवाद आणि दहशदवादाला लगाम तरी घालता येईल काय?

जोतीरावांनी सांगितलेल्या धर्म, अर्थ, शिक्षण, राज्य या सर्व विचारांशी प्रमाणिक अशा व्यवस्था उभ्या राहल्या तर प्रत्यक्ष उउपेक्षीतांना न्याय मिळेल. त्यांनी वृत्तपत्राकरीता, सांगितलेली आचारसंहीता जर आज मिडीयाने अवलंबीली तर लोकशाहीचा दम घुटमुळणार नाही. आपण स्वत:ला पुरोगामी म्हणविणारे परंतू खरा पुरोगामी विचारच आपल्यापासुन दुर ठवेल्या गेला. फार पुर्वीपासुन चालत आलेली एका विशिष्ट वर्गाची छुपी राजकीय सामाजिक इच्छाशक्ती जीवंत राहावी त्यामुळे म. फुले यांचे विचार आपल्याला निरर्थक वाटले परंतू अजूनही या विचारांचा मुलमंत्र जगाच्या पाठीवरील सर्व मानव समूहात स्विकारला तर या जगातील दु:ख निश्चितच कमी होईल.

**या जगज्जेत्याला महामानवाला पुन्हा एकदा त्रिवार वंदन!**

**संदर्भ ग्रंथ :**

१) पाटील डॉ. वा. भा. : आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत (भाग-२) : प्रशांत पब्लीकेशन्स :(२०१३)

२) काथोळे डॉ. दा.धो : भारतीय सामाजिक विचारवंत : कैलास पब्लीकेशन्स , औरंगपुरा : (जुलै १९९९)

३) पाटील बी.बी. : राजकीय संकल्पना : फडके प्रकाशन कोल्हापूर : (जून २०००)

४) नांदेडकर प्रा. डॉ. व गो : राजकीय विचार आणि विचारवंत : डायमंड पब्लीकेशन्स, पुणे :(जाने. २०११)

५) काणे प.सि. : राजकीय सिध्दांत आणि राजकीय विचार : पिंपळापूरे पब्लीशर्स, नागपूर : (सप्टें. २०००)

## ४२. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक - एक विज्ञानवादी जीवनमार्ग....

प्रा. डॉ. भगवान वाघमारे, निलंगा, जी. लातूर

क्रांतीबा ज्योतिबा फुले यांचा जन्म १८०७ साली झाला. त्यांचे शिक्षण आणि वैचारिक विचाराची मूस त्यांनी घडवलेल्या अनेक कृती चळवळीच्या, अनेकांच्या सहवासातील वैचारिक विचाराच्या देवाण-घेवाणीतून आणि त्या घुसळणीतून, प्रत्यक्ष धर्माने दिलेल्या अनेक धक्क्यातून नि डागातून, ब्राह्मणी धर्माच्या वर्चस्व वादाच्या अपमानतुन, अनेक ग्रंथाच्या वाचनातून आणि प्रत्यक्षपणे,1847 च्या क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या मानवी स्वातंत्र्यासाठी निर्माण झालेल्या क्रांती शाळेतील वैचारिक विचाराच्या सहवासातून निर्माण झालेली असावी असे वाटते. क्रांती पिता ज्योतिबा फुलेंनी, 1853 साली "सत्याचा शोध" या पुस्तिकेच्या लिखाणातून सत्यशोधक साहित्यकृतीची विचारधारा मांडली. सत्याचा शोध हा सर्वच कालखंडातील अनेक तत्त्वचिंतकानी लावण्याचा प्रयत्न केलेला आहेच. सत्याचा शोध घेत असताना, पारंपारिक लबाड विषमतावादी विचार परंपरेला पूर्णता: नाकारून सत्याचा शोध घ्यावा लागतो तरच सत्य शोधता येते. क्रांती पिता ज्योतिबा फुलेंनी मानवी समूह हा महत्त्वाचा मानला. त्या मानवी समूहासाठी पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या पारंपारिकतेला नाकारून, विवेकी आणि मानवी मूल्याचा आधारभूत विचार जो की, सत्यशोधनाचा मुळाशी असतो. म्हणून मानवी जाणिवेतून निर्माण होणारी संवेदना, मानवी समाजाच्याप्रति जपणे ही सत्यशोधकांच्या नि सत्य वर्तनाच्या प्रक्रियेत येते म्हणून महात्मा फुले यांनी २८ सप्टेंबर १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. बहुजनांच्या चींतेवर प्रत्यक्षपणे चिंता वाहणारे, क्रांतीबा ज्योतिबा फुले यांनी दलित- बहुजन समाजावर कायमची गुलामी लादणाऱ्या सनातन हिंदु धर्म आणि त्याच्या कर्मकांडाला पूर्णता: नाकारून विवेकी जीवन जगण्याची जीवन प्रक्रिया "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक" या ग्रंथाच्या माध्यमातून बहुजनांना दिली.

सत्यमेव जयतेचा जय घोष करून , सत्यशोधन आणि सत्यवर्तन या पायाभूत तत्वज्ञानाचा मूलाधार स्वीकारून क्रांतीबा ज्योतिबा फुले यांनी "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक " या ग्रंथाची निर्मिती ०१ एप्रिल १८८९ ला केली. त्या दरम्यान महात्मा फुले यांना अर्धांगवायू हा भयंकर आजार झाला असताना सुद्धा, बहुजन समाजाला सत्याच्या आणि नीतीच्या मार्गावर घेऊन जाणे, त्यांच्यातील सनातन देव धर्माची आणि त्यांच्या कर्मकांडाची भीती आणि अज्ञान कायमचे दूर करणे, खऱ्या

आणि नैसर्गिक वास्तव नि जिवंत जगाची बहुजनांना ओळख करून देणे महत्त्वाचे होते. देव-धर्माचे बटीक आसणाऱ्या भठ - ब्राह्मण आणि पुरोहित दलालाची देव- धर्माच्या नावाने भारतीय समाजात निर्माण केलेली पाप-पुण्याची भीती कायमची दूर करण्यासाठी आणि मानवी समाजात सत्यशोधकी वर्तनाची जीवन मूल्य प्रदान करण्यासाठी क्रांतिबा महात्मा फुलेंनी "सार्वजनिक सत्य धर्म" हा ग्रंथ लिहिला. निखळ जगण्याचा जीवनमार्ग मानवाप्रति प्रदान केला. हे क्रांतीबा ज्योतीबांनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या काळात अर्धांगवायूच्या आजारात असतानाही प्रचंड हाल-अपेष्टा सहन करत, डाव्या हाताने हा ग्रंथ लिहून काढला आणि बहुजन समाजाला लुबाडणाऱ्या पारंपारिक देव-देवतांची, त्यांच्या धर्माची आणि पुरोहित शाहीच्या खऱ्या- खोट्याची जाणीव बहुजनांना करून दिली.

सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथाचे प्रकाशन दुर्दैवाने महात्मा फुले यांच्या हयातीत होऊ शकले नाही, म्हणून डॉ. यशवंत ज्योतिराव फुले यांनी, मुंबई येथे १८८९ या वर्षात या मौलिक जीवनावश्यक ग्रंथाची किंमत बारा आणे ठेवून, "सार्वजनिक सत्यधर्मा पुस्तक" या ग्रंथाचे लोकार्पण केले. या ग्रंथात मानव जातीच्या सुखापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व जीवन व्यवहारातील प्रत्येक सत्य आणि असत्यची निपक्षपातीपणे सूर्यासारखी स्पष्ट ओळख,क्रांतीपिता ज्योतिबानी बहुजनांना करून दिली. या ग्रंथाच्या माध्यमातून विवेक आणि विज्ञानाची प्रेरणा घेऊन आणि देऊन मानवी समाजाच्या शुद्ध आचरणासाठी सत्यवर्तनाची अचारसहिता घालून दिलेली आहे.ती जीवनात अंगीकृत करून, निसर्गाला सर्वस्व मानून, निसर्गाची करणी आणि विचारसरणी आत्मसात करणे. कारण जेवण मागितल्या शिवाय आई जेवण देत नाही. पण झाडे मात्र न मागताच सावली देतात. आसरा देतात, जीवन देतात तुमचे आयुष्य पसरविण्यासाठी निसर्गाचा अवाढव्य प्रसाराही देतात. आम्ही मात्र सतत घेतच असतो. निसर्गाची प्रत्येक करणे आम्ही स्वीकारतो पण निसर्गाची विचारसरणी मात्र स्वीकारत नाही प्रत्येक मानवाने निसर्गाची विचार सरणी स्वीकारून कर समाज जीवनात उपयोगात आणली तर एकही सजीव अज्ञानी, लाचार, दरिद्री, वंचित आणि उपाशी राहणार नाही. समाज सुजलाम् - सुफलाम् होईल. म्हणून निसर्गवाद स्वीकारणे ही नित्याची गरज आहे. त्यासाठीच विवेकी आणि विज्ञानवादी माणूस म्हणून जगण्यासाठी खालील ३३ ( तेहतीस) अंचारसहिता जीवनात प्रत्येकांनी आत्मसात करावी तरच, समाजाची सत्यशोधक आणि सत्यवर्तनी विचार - व्यवहाराची जडण-घडण होऊ शकते.

क्रांती पिता ज्योतिबानी संवाद शैलीतून अर्थात प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अर्थात जे, प्रश्न - उत्तर, यशवंत गोविंदराव फुले, बळवंत हरी साकवळकर, गोविंदराव काळे नि इतरांच्या सोबत क्रांतीपिता ज्योतीबांनी संवाद साधला त्यातूनच सुखमय आणि अधिकार संपन्न जीवन जगण्याच्या ३३ अचार संहिता नव-जीवन नि नवीन मानवी संस्कृती निर्माण करतात.

सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे? या प्रश्नाचे उत्तर

क्रांतीपिता ज्योतिबा फुले यांनी जो सत्यवर्तनाचे नियम पाळतो तो सत्यवर्तनी असे सांगितले आहे.

**1. स्त्री व पुरुष हे दोघेही जन्मताच स्वतंत्र आणि अधिकाराचा उपभोग घेण्यासाठी पात्र.**

नैसर्गिक स्वातंत्र्य अर्थात निसर्गाने निर्माण केलेल्या प्रत्येक नि प्रत्येक घटकाचा उपयोग मानवी समूह प्रत्येक क्षणा-क्षणाला घेतो. खरेतर, सजीवात निर्माण होणारा जिवंतपणा हा फक्त न फक्त निसर्गाच्या दानत्वामुळेच आहे, हेच आम्ही मानवप्राणी विसरतो. मानवी समूहाच्या सुयोग्यतेसाठी निसर्गाने निर्माण केलेल्या प्रत्येक घटकावर सजीव सृष्टी अवलंबून असतानासुद्धा आम्ही सहज आणि फुकटात मिळणारी, निसर्गाच्या करणीचा फक्त आम्ही उपयोग येतो. पण निसर्गाला काहीच देत नाही. इतकेच नव्हे तर निसर्गाप्रती आमची कृतज्ञताही कृतीतून व्यक्त करत नाही. निसर्गाच्या प्रत्येक वाटेवरील प्रत्येक टप्प्यावर मानवी समूहाला निसर्गाने मार्गदर्शन केलेले आहे. जसे की, हवा सर्वत्र वाहते, श्रीमंत - गरीब असा भेदभाव मात्र करीत नाही. पाऊस सर्वत्र पडतो. श्रीमंत-गरीब, खेडे - शहर, सुपीक - पडीक जमीन असा भेद न करता सर्वत्र बरसून, समाज जीवन आनंदी आणि सुखमय करून जाते. हवा- पाण्याचे नैसर्गिक वितरण, समाजाला समता आणि न्याय शिकविते. निसर्गाने निर्माण केलेले अक्सिजन म्हणजेच जीवन वायू सर्व प्राणिमात्रांना विनापरवाना आवश्यक तेवढा घेता येतो म्हणजे निसर्ग आम्हाला स्वातंत्र्य, समता, लोकशाही आणि बंधुभाव अर्थात लोकशाही - समाजवाद शिकवितो.

**2, स्त्री असो किंवा पुरुष असो ,एखादा धातू, दगडाच्या मूर्तींना मान न देणाऱ्याना सत्यवर्तन करणारे म्हणावेत.**

अर्थात मूर्ती पुजेस नकार. म्हणजे देव अस्तित्व नाकारणे आणि माणसांच्या महानतेला अभिवादन करणे म्हणून मूर्तिपूजेला नकार.

**3, निर्मिकाचे पोकळ नामस्मरण जे करत नाहीत. त्यांना सत्यवर्तनी म्हणावे.**

या अन्वयार्थाने, पोकळ नामस्मरणाला विरोध. ओठात एक पोटात एक ही फसवेगिरी म्हणजे पोकळ नामस्मरण. नामस्मरणाला पूजा-पाठाला येथे वाव नाही आणि सक्त विरोध.

**4, सर्व निसर्गनिर्मित वस्तूंचा सर्वांना उपयोग/ उपभोग घेता यावा.**

अर्थात नैसर्गिक स्वातंत्र्य समता न्याय आणि लोकशाही समाजवाद समाजात प्रस्थापित करणे यासाठी निसर्गनिर्मित वस्तूंचा सर्वांनी उपयोग आणि उपभोग घ्यावा.

**5, माणसाने दुसऱ्याला निरर्थक त्रास देऊ नये.**

बहुजन सुखाय- बहुजन हिताय या तत्त्वज्ञानाला स्थापित करणे होय.

**6, माणसाने दुसऱ्यावर जबरदस्ती अगर जुलूम करू नये.**

भयमुक्त आणि भीती मुक्त समाजरचना निर्माणीची प्रक्रिया समाजात रुजवणे नि अधिष्ठीत करणे म्हणजेच माणसाने माणसाबरोबर माणसा सारखे वागणे आणि माणसाच्या माणूसपणाची उंची वाढवणे आणि माणसाला महानतेकडे घेऊन जाणे हे होय.

**7, माणसांचे धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्य अबाधित.**

स्वतंत्र लोकशाही मूल्याचा पाया मजबूत करणे होय.

**8, पती-पत्नी एकमेकाशी एकनिष्ठ राहावे/ राहणे.**

सुखी आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली म्हणून निष्ठा ही महत्त्वाची असते. समाज जीवनामध्ये आणि जीवन- व्यवहारात पती-पत्नीची एकनिष्ठता समाजाला नैतिक मूल्य प्रधान करते.

**9, मत मांडण्याचे स्वातंत्र्य**

अर्थात विचार स्वातंत्र्य बहाल करणे, व्यक्तिस्वातंत्र्य आणि विचार स्वातंत्र्याचा अधिकार निश्चित करणे होय.

**10, धार्मिक सहिष्णुता**

सर्वधर्म समभावाचे तत्वज्ञान. धर्म ही वैयक्तिक बाब असल्याने, स्वतः पुरती मर्यादित नि दाराच्या आतच, ती सार्वजनिक न करता इतर धर्माबद्दलचा आदर-भाव स्वतःप्रति निर्माण करणे.

**11, योग्यतेनुसार अधिकाराच्या पदावर नियुक्त्या देणे, निंदा हे नको.**

Right place and Right man हा जीवनवादी युक्तिवाद स्वीकारणे होय.

**12, मानवी स्वातंत्र्य आणि त्यांच्या मालकी हक्कला संरक्षण देणे.**

मूलभूत हक्काचे संरक्षण करणे आणि मूलभूत हक्क प्रदान करणे होय.

**13, वृद्ध मातापित्यांची सेवा करणे.**

जगात सर्वच मिळेल पण आई- वडील मिळणे ही अशक्य गोष्ट म्हणून आई - वडिलांना प्रेम द्या. प्रेम घ्या. या जगात निशुल्क सेवा करणारे फक्त आई - बाप असतात म्हणून आपले अस्तित्व अबाधित राहते. यासाठी आई-वडिलांची सेवा करणे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य ठरते.

**14, भांग,अफू आणि मद्य वगैरे अमली पदार्थांचे सेवन न करणे.**

मेंदूला अकार्यक्षम किंवा निर्जीव बनवीणाऱ्या शक्तीला नाकारुन निसर्गदत्त असणाऱ्या क्षमतेला चालना देणे आणि कार्यप्रवण करणे यासाठी अमली पदार्थांचे सेवन न करणे.

**15, प्राण्यांची हत्या न करणे. नैसर्गिक सृष्टीतील जीव-**

जंतूंचा सामाजिक परिसंस्थेत महत्त्वाचा वाटा निसर्गाने निर्माण केलेला आहे. ते जपणे म्हणजेच नैसर्गिक परिसंस्थेचा विकास करणे होय. यासाठी प्राणी- जीवजंतू महत्वाचे त्यांना जगविणेही महत्वाचे.

**16, स्वार्थासाठी खोटे न बोलणे.**

सत्य वर्तनी आणि विवेकी जगण्याचा आनंद उपभोगणे यासाठी निस्वार्थी भावना वाढवणे म्हणजे जीवनाचे अर्थात आयुष्याचे वय वाढवणे होय. यासाठी सत्यवर्तन नि खोटे न बोलणे

**17, व्याभिचार न करणे.**

नैतिक मूल्यांची स्वता: प्रती आणि समाजाप्रती पेरणी करणे, ज्यातून नीतिमत्ता संपन्न होते आणि समाजही नीतिमान होतो.

**18, चोरी न करणे.**

इतरांच्या मनाची, भाव- भावनांची चोरी करू नये. हा प्रांजळ वाद नव्हे तर विवेकवाद त्यातूनच मानवतावाद निर्माण होतो.

**19, दुसऱ्याची वित्तहानी किंवा आर्थिक हानी न करणे.**

स्वार्थ न बाळगता नीतीने व्यवहार करणे, त्यातून कुणाचीच आर्थिक हानी होणार नाही. यासाठीची आचारसहिता.

**20, न्यायप्रिय शासन प्रणाली विरोधात बंड न करणे.**

न्याय प्रियतिचे स्वागत, अन्यायी वृत्तीचा विरोध आणि निषेध.

**21, ज्ञानार्जनाचे स्वातंत्र्य.**

ज्ञानाची तृष्णा भागवणारा ज्ञानपिपासू म्हणजे बोधी होणे. यासाठी ज्ञानार्जनाचे स्वातंत्र्य बहाल करणे म्हणजे ज्ञान वर्चस्व निर्माण करणे होय.

**22, उच्चनीचता व भेदभावास विरोध.**

जन्मता माणूस निसर्गत स्वतंत्र व्यक्तिमत्व लाभलेला माणूस म्हणून माणसा- माणसात भेद भाव हा नेसर्गिक वाद नाही म्हणून भेद - भावास विरोध.

**23, गुलामगिरीस विरोध.**

मानवी स्वातंत्र्याची पायमल्ली म्हणजे मानवी समूहावर लादलेली अमानुष गुलामगिरी म्हणून दमनास विरोध.

**24, शैक्षणिक सहिष्णुता, कुणाचाही दुजाभाव नको.**

स्वतंत्र इच्छाशक्तीला वाव. शिक्षणाचा मार्ग स्वतःहून चोखळण्याची आश्वासक कृती साठी प्रेरणा देतात. ही शैक्षणिक सहिष्णुता होय.

**25, न्यायदानात पक्षपात न करणे,**

या अन्वयार्थाने न्यायप्रिय जगणे. ज्यांचे देणे लागते त्यांना विनातक्रार देणे म्हणजे न्याय या अन्वयार्थने, न्यायप्रिय जगणे, सामाजिक न्यायाची संकल्पना कृतीत निर्माण करणे होय.

**26, कृषी संस्कृतीचा सन्मान करणे.**

जमीन ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे म्हणून पेरणी ,रुजवणी ,उगवणी या प्रक्रियेचा एकमेव मार्ग, ज्यातून नैसर्गिक साधन संपत्तीची निर्मिती होते. आणि कृषी ही जगाची पोषनकृती ठरते म्हणून सन्मान.

**27, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य.**

अर्थात व्यवसाय स्वातंत्र्य म्हणजे इच्छाशक्तीला स्वातंत्र्य बहाल करणे होय.

**28, धार्मिक शोषणाला विरोध.**

धार्मिक दमनाच्या विरोधात पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कर्मकांडाचा विरोध म्हणून धार्मिक शोषणाला विरोध. धर्म ही जगण्याची आचारसंहिता किंवा प्रक्रिया असते . धर्माच्या नावाखाली मानवी समूहाची शोषण होत असेल तर त्याला धर्म कसे म्हणावे? म्हणून धार्मिक शोषणाला विरोध.

**29, अंधश्रद्धेतून केल्या जाणाऱ्या शोषणास विरोध.**

अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारी विद्याशाखा म्हणजे विज्ञान ज्यातून मानवी समूह अंधश्रद्धा मुक्त होतो अर्थात शोषण व्यवस्थेचे बळी जात नाहीत म्हणून मानवी समूहांनी विज्ञानाची कास धरावी. त्यातूनच अंधश्रद्धेच्या गुलामीतून माणूस मुक्त होतो .

**30, पिळवणूक करणाऱ्या विचारधारेचा कडकडून विरोध.**

पिळवणुकीचा चौकटीत पिळल्या गेलेल्या मानवी समूहाचे गुलामीकडे मार्गक्रमण होते म्हणून विवेकी मानवी जाणिवेने माणसाकडे पाहणे. माणसांच्या माणूसपणाचा सत्कार करणे. ज्यातून पिळवणूक होत नाही म्हणून पिळवणूकीस कडाडून विरोध.

**31, स्वार्थ हेतूने कलह करणाऱ्यास विरोध.**

कलह हा नाशाचा मूलाधार असतो म्हणून स्वार्थ - कलहास विरोध होय. स्वार्थी आणि कलहातून समाज एकसंघ राहत नाही उलटपक्षी समाजाची आणि माणसांची विभागणी होते त्यातून माणूस भेदाची प्रवृत्ती बोकाळते. स्वार्थ मानवी मनाला लागलेला रोग आहे. त्यातुनच कलह निर्माण होतो म्हणून स्वार्थ आणि कलहास विरोध.

**32, सामाजिक सहिष्णुता.**

अर्थात एकजिन्सी समाजरचना निर्माण करण्याचे स्वप्न घेऊन जगणारा समाज म्हणजे सामाजिक सौख्य आणि ऐक्य निर्माण करणारी विचारधारा म्हणजे सामाजिक सहिष्णूता (homogenous society ) अर्थात एकजिनसी समाज होय.

**33, रोगी ,अपंग, निराश्रिताना कुवती नुसार मदत करणे.**

म्हणजे ज्यांच्या घरी अंधार आहे त्यांना दिवा द्या. जे अपंग आहेत त्यांना आधार द्या, काठी द्या, ज्यांना घर नाही त्यांना आसरा द्या, हे गाडगेबाबाच्या विचार संहितेतील तत्वज्ञान आहे. हे मानवी जाणिवेचे आणि कळवल्याचे तत्वज्ञान यातून अभिप्रेत आहे म्हणून गरजूंना मदत करणे हे मानवी कर्तव्य होय.

हे माणसांच्या जीवनातील 33 अचारसंहिता महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचा मुख्य गाभा आहे...... सार्वजनिक सत्यधर्मातील आचार संहिता विज्ञानवादाला सोबत घेऊन मानवतावादाची मांडणी करतात. महात्मा फुले यांचा निर्मिक हा बुद्धिवादी, विवेकी, विज्ञानवादी तत्वनिष्ठ या विचार प्रणालीच्या अधिष्ठानावर उभा आहे. इतकेच नव्हे तर महात्मा फुले म्हणतात, हजारो वर्षाच्या पलीकडे गेल्यावर, तिथे एका महालामध्ये सर्वांचा निर्माणकर्ता अनेक विश्वातील प्राणीमात्राच्या सुख - दुःखाची व्यवस्था करीत बसला आहे. असे आपल्या दृष्टीस पडेल, असे

जर आपण कल्पना केली तर ती चुकीची आहे. म्हणून निर्मिकाची भेट घेण्याचे प्रयत्न निरर्थक असतात. या सूत्राचा अर्थ विज्ञान आणि निसर्ग धर्मातील सत्य हा आहे. निर्मिक या संकल्पनेचे स्वरूप पाहता, सार्वजनिक सत्य म्हणजे युनिव्हर्सल टूर्थ (Universal Truth) म्हणजे H2 आणि O एकत्र येताच ज्या नियमांनी "पाणी" या विश्वात निर्माण होते. तेच तत्त्व म्हणजे निर्मिक होय.... प्रत्येक झाड मानवी समूहासाठी जीवन वायुची निर्मिती झाडांची पाने प्रकाश संश्लेषण या प्रक्रियेच्या (photosynthesis) माध्यमातून अन्नाची निर्मिती करतात . झाडांना पाने -फुलेच लागतात. मानवी रंगसूत्राच्या संयोगातून स्त्रीला मातृत्व निर्माण होते आणि मुले नि मुलीच जन्माला येतात . हे वास्तव सत्य म्हणजे निसर्ग. निसर्गवादात धर्मवाद नाही. देववाद नाही.जातियवाद नाही. भांडवल - सरंजामशाही वाद नाही. वंशवाद नाही. भाषा वादही नाही.सीमावाद नाही. दाष्यवाद नाही. निसर्गवाद म्हणजे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि बहुजन- सुखाय बहुजन - हिताय हे मानवी मूल्य निसर्ग न मागता प्रामाणिकपणे प्रत्येक जैविक घटकाला प्रधान करतो. म्हणून महात्मा फुले यांचा निर्मिक हा व्यक्तीरूप नसून तत्वरूप आणि निसर्गरूप आहे. निर्मिक म्हणजे निसर्गवाद होय. या अर्थाने आत्मसात करणे आवश्यक आहे.

**क्रांतिबा फुले यांच्या समग्र क्रांतीला अभिवादन!!!**

# छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवचरित्र व राष्ट्रीय एकात्मता

**प्रा. माणिक डोखळे**
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली, ता.जि. हिंगोली
Email – mbdpatil@gmail.com
मो.न. 7391910121

भारताचा सामाकि, सांस्कृतिक, धार्मिक वा राजकीय इतिहास बळीराजा, तथागत गौतम बुध्द व छत्रपती शिवाजी महाराज यांना वगळून पूर्णच होऊ शकत नाही. सतराव्या शतकात जगभर सम्राटाविरोधात अथवा परंपरागत राजेशाही विरोधात जनता पेटून उठत होती. भारतातही मोगलशाही, आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, पोर्तुगिज, फ्रेंच, इंग्रज या परकीय सत्ताधीशांसह भारतीय वंशाच्या राजेशाही विरोधात जनता बंड करत होती. इंग्लंडसारख्या शहरात कॉमवेलच्या नेतृत्वात राजेरजवाडे उद्ध्वस्त करुन शोषणाविरोधातील जनतेचा विद्रोह शांत झाला. त्याचवेळी भारतातील रयतेने शिवरायांचे नेतृत्व स्वीकारुन भारतातील शासनव्यवस्थेत मानवतावादी तत्वांचे बीजारोपण केले. छत्रपती शिवाजी महाराज रुढ अर्थाने संरजामशाहीचेच प्रतीक वा प्रतिनिधी समजल्या जाऊ शकतात... परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचे ‘शिवराज्य’ हे जगातील लोकशाहीचे पहिले बीज असल्याचे जागतिक पातळीवर मान्य करण्यात आले आहे. साध्या शब्दात सांगायचे म्हणजे आपल्या लोकशाही राज्यपध्दतीचे जनक छत्रपती शिवाजी महाराज आहेत. भारतात लोकशाही राज्यपध्दत आहे. तरी भारतातील ऐंशी टक्के रयत मुलभूत मानवी गरजा अन्न, शुध्द पाणी, रोजगार, संरक्षण यापासून वंचित आहे. यात शिवरायांचा दोष नसून राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा त्यास कारणीभूत आहे. लोकप्रतिनिधी युरोपमधील तेराव्या चौदाव्या शतकातील सरंजामशाहीचे प्रतिनिधीत्व करत आहेत. सर्व पातळीवरील सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी राज्यकर्त्यांना अत्यंत कठोर निर्णय घ्यावेच लागतात. पण भारतातील राज्यकर्ते मध्ययुगीन काळात राजेशाही व धर्मशाही म्हणजे राजे व पुरोहीत जसे एकत्रित जनतेचे शोषण करत त्याच व्यवस्थेचे अनुपालन करताना दिसत आहेत. एवढेच नाही तर लोकशाहीचा अर्थ शाही लोकांचे राज्य असा समजावा, असे राज्यकर्ते मानतात. सर्वच शाही लोक एकत्र येऊन सामान्य रयतेला म्हणजेच

लोकांना सामूहिकपणे लुटतात. त्यालाच लोकशाही म्हणतात. असे श्रीमंत राज्यकर्ते अधिकारी मानतात.

जगाच्या पाठीवर गेल्या हजारो वर्षात राजे-महाराजे होऊन गेले. त्यांचा इतिहास रक्तानेच माखलेला आहे. यापैकी एकाही राजाचे वा सम्राटाचे नाव रयतेच्या ध्यानी-मनीही नाही. याच पार्श्वभूमीवर जगात जेथे मानववस्ती आहे, तेथपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते. याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजांचे लोककल्याणकारी कार्य! शहाजी राजे व जिजामात यांच्या देखरेखीखाली शिवबांचे सर्वच क्षेत्रिय प्रशिक्षण पूर्ण झाले. वयाच्या बाराव्या वर्षी वडील शहाजी राजे यांनी बेंगळुरला भव्य समारंभात बाल शिवबास 'राजमुद्रा' व 'भगवा' झेंडा दिला. ही राजमुद्रा 'विश्वबंधुत्वाच्या भावनेतून विश्वकल्याण म्हणजेच लोककल्याण याची जाहिर हमी देत होती'. जग विघटनाच्या वाटेवर असताना व भारतातील धर्मव्यवस्थेचा विषमता-अमानवता-क्रुरता-शोषण या क्षेत्रात टोकाचा प्रभाव वाढलेला असतानाही, शहाजीराजे व जिजामाता यांनी शिवबास विश्वबंधुता व विश्वकल्याणाची शपथ दिली. शिवरायांनी शेवटपर्यंत राजा व राज्य धर्ममार्तंडाच्या शोषणापासून व त्यांच्या सावलीपासून दूर ठेवले. यामुळेच महात्मा जोतिबा फुले सारखे सत्यशोधक केवळ शिवरायांपुढेच नतमस्तक होताना दिसतात. शिवरायांच्या काळामध्येही त्यांना अनेक भागातील सरंजामशाही शोषणवादी राज्यव्यवस्था नष्ट करण्यासाठी हातात शस्त्र धरावेच लागले. त्याचवेळी धर्माच्या नावाने रयतेचे शोषण करणाऱ्यांनाही शिवरायांनी हातात शस्त्रासोबतच शास्त्र धरुन जबर शासन केले. हे राज्य 'श्रींचे' आहे. म्हणताना हे 'श्री' म्हणजे कुठलेही काल्पनिक देवी-दैवत वा धर्ममार्तंड नसून शिवसंस्कतीतील शिरीमाता म्हणजेच शिवकाळातील 'जिजामाता' यांचे राज्य आहे. हा अर्थ हा जसा भारतीय शिवपरंपरेचा अभिमान होता, तसाच मातृसत्ताक शासनपध्दतीचा जिजामातेचा मातृसन्मान होता. याच भावनेतून शिवरायांनी राज्यकारभार चालविला. रयतेला पोटच्या लेकरासारखं सांभाळलं. रयतेच्या सुख, समृध्दी, शांतता व सुरक्षितता यासाठी शिवरायांनी अनेकदा स्वत:चा जीव पणाला लावलेला होता. महाराज स्वत:चा आत्मविश्वास, रयतेची साथ, सहकाऱ्यांची संघटित ताकद व या सर्वांना साजेसे बिनचूक व्यवस्थापन, यामुळे जीवावरच्या अनेक प्रसंगातून सहीसलामत विजयी होऊनच बाहेर पडले. त्यामुळेच रयत सर्वार्थाने आनंदी होती. संरक्षित

होती. राजा व राज्य आपलेच आहे, असे मानणारी होती. म्हणूनच शिवराज्य वाढले व टिकलेच पाहिजे, यासाठी रयत सर्वस्व पणाला लावत होती. 'छत्रपती' हे राज्याचे विश्वस्त आहेत. उपभोगशून्य स्वामी आहेत. रयतेचे सेवक आहेत. हे शिवरायांच्या प्रत्यक्ष आचरणातून स्पष्ट होत होते. रंजल्या-गांजलेल्या प्रत्येकाला शिवराय आपलेच वाटत. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज बळीराजा व बुध्दाएवढेच जगातील जनतेच्या मनावर आजही बिंबलेले आहेत.

मध्ययुगीन भारतात राजपद टिकविण्यासाठी राजांना लढायांना सामोरे जावे लागत असे. त्यामुळे राजा व लढाया यांचा जवळचा संबंध होता. शिवरायांनीही अनेक राजकीय शत्रुंना नामोहरम केले. या लढायांमधून संपादन केलेल्या विजयाचा वापर महाराजांनी स्वत:चे महत्त्व वाढविण्यासाठी केलेला नव्हता. त्यातून रयतेला शोषणमुक्त करणे हाच प्रमुख हेतू होता. असे करतांना शिवरायांनी अफझलखान, शाहिस्तेखान, चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे, जसवंत सिंह, औरंगजेब अशा अनेकांना शिक्षाही दिल्या. परंतू त्यांच्या विरोधात कारवाई केल्यानंतर त्यांच्याशी असलेले मतभेदही विसरले. याचाच परिणाम म्हणून समाजातील सामाजिक बंधुत्वाचे संबंध वृध्दिंगत झाले. हिंदु धर्मातील जातीविषमता कमी झालीच, पण सैनिकांमध्येही सर्व जाती धर्मातील सैनिक एकत्र राहू, खाऊ व लढू लागले. जात, पात, धर्म, वंश, भाषा, प्रांत असे आपसातील मतभेद शिवराज्यात रयतेनेच गाडले. समाजात समता, न्याय, स्त्री-पुरष-समानता, स्वातंत्र्य, बंधुता स्थापित झाली. युरोपमधील बेंझामीन फ्रँकलिन, व्हाल्टेर, डॉ. ट्रॉटस्की, डॉ. चेगव्हेरा इत्यादी शोषणाविरोधी लढवय्या नेत्यांना याच शिवप्रेरणेतून लोकशाही राज्यासाठी लढा उभारण्याचे प्रोत्साहन मिळाले. म्हणून लोककल्याणकारी राज्याचा संस्थापक व निर्माता हीच छत्रपती शिवाजी महाराजांची खरी ओळख आहे.

जगातील गुलामगिरी प्रथा कायद्याने नष्ट करणारा पहिला राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. याच कृतज्ञ भावनेतून आफ्रिकेसारख्या अनेक देशात शिवरायांना मुक्तिदाता मानतात. त्यांचे पुतळे उभारले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी धार्मिक व्देषभावना भडकवण्याची धर्ममार्तंडाची हरामखोरी गाडून टाकली. अफझलखानाच्या मृत्यूनंतर त्याची समाधी शिवरायांच्या खर्चाने बांधलीच, पण जोपर्यंत माझे नाव राहील, तोपर्यंत तेथे दिवा बत्ती व्यवस्था व्हावी. त्यासाठी जमीन दिली. अफझलखानाची मुले, कुटूंबकाबिला, वाचलेले सैन्य व इतरांना सन्मानपूर्वक विजापूरला जाण्याची परवानगी दिली. युध्दामध्ये शरण

आलेल्या व पराजित परधर्मीय सैन्यास एवढया इज्जतीने वागविल्याचे उदाहरण जागतिक इतिहासात नाही.

शिवाजी महाराज उत्तम प्रशासक होते. त्यांनी राज्यकारभाराची घडी व्यवस्थीत बसविली होती. राज्यकारभारात जनहितास प्राधान्य होते. त्यांनी आठ मंत्र्यांचे मंत्रिमंडळ बनविले होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याचे तीन भाग केले होते. प्रत्येक विभागावर सक्षम अधिकारी नेमून त्याचे प्रभाग, खंड, महसूल, खेडे असे केले होते. खेडेगाव हा सर्वात लहान विभाग होता. न्यायव्यवस्थापनाचे काम न्यायाधीश पाहत.

शेतकऱ्यांना जमीन मोजून देऊन सोयीनूसार करआकारणी केली जात असे. लष्करी खर्चासाठी देशमुखी व चौथाई घेतली जात असे. शिवाजी महाराजांनी एक कार्यक्षम व खडे लष्कर उभे केले. त्यात शिस्त बाणवली. त्यांच्या सैन्यात सर्वच प्रकारचे सैन्य होते.

भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवाजी महाराजंनी जहागीर देण्याची पध्दत बंद करुन सैनिकांना रोख रक्कम वेतन स्वरुपात देण्यास सुरुवात केली. पायदळ व घोडदळाच्या जोडीला मोठे आरमार उभे करुन आपली लष्करी ताकद वाढविली. थोडक्यात शिवाजी महाराजांचे प्रशासन कार्यक्षम तर धोरण प्रगतशील होते.

“शिवाजी महाराजांना भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. लहानशा जहागिरीपासून सुरवात करुन स्वत:च्या हिमतीवर त्यांनी स्वराज्य उभे केले. त्यांनी तत्कालीन बहुजनांच्या मनात राष्ट्रभावना जागवून नवचैतन्य निर्माण केले. स्वत: रुढीप्रिय सनातनी हिंदूधर्माचे असूनही ते सहिष्णू होते. इतर धर्माबद्दल त्यांना आदर होता. स्त्रियांना त्यांनी नेहमीच सन्मान दिला. हिंदूधर्मातील उणिवा जमेस धरुनही त्यांनी हिंदूधर्माची प्रतिष्ठा वाढवली. ते अत्यंत धाडसी, बुध्दिमान, विधायक कार्य करणारे होते. भारतात आजवर होऊन गेलेल्या अलौकीक व्यक्तीमध्ये एकमेव सर्वश्रेष्ठ असे शिवाजी महाराजांचे वर्णन करता येईल.” अशा पध्दतीचा राजकीय, समाजिक, धार्मिक इतिहास अथवा शिवचरित्र भारतात शिकविण्याची गरज आहे. तरच सामाजिक एकोपा निर्माण होईल. शिवराय सार्वत्रिक होतील.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात परराष्ट्र धोरण सामाजिक विकासाचे होते. विश्वबंधुत्व व लोककल्याणाच्या बाजूचे होते. **दया तिचे नाव भूताचे पालन ।। आणिक निर्दालन कंटकाचे ।।** या संत तुकाराम महाराजांच्या विचारांचेच होते.

वाचकांनी व भारतीयांनी यावर विचार करावा. भारताला आज ॲटमबॉम्ब, सुखोई विमाने, न्युक्लिअर, शस्त्रास्त्रे, युरेनियम इत्यादींची गरज नसून शेजारी राष्ट्र पाकिस्तान, चीन, बांगलादेश, म्यानमार (ब्रम्हदेश), श्रीलांका, नेपाळ, यांच्याशी बंधुभावाच्या संबंधांची गरज आहे. आमच्या ऐंशी टक्के जनतेला मूलभूत सुविधा नाहीत. आणि आम्ही शेजारच्या राष्ट्रांशी भांडण्यासाठी दरवर्षी दोन लाख कोटी रुपये खर्च करत आहोता. छत्रपती शिवाजी महाराजांचे परराष्ट्र धोरण अंमलात आणल्यास वाद संपणे सहज शक्य आहे. दूरवरच्या अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया यांच्याशी मैत्री करायची व घरातील बायको-पोरांशी व शेजाऱ्यांशी रोज भांडायचे हे अतार्कीक आहे. तसेच भारतातील इतिहासही पुनर्लेखनाची गरज आहे. नव्या पिढीला आम्हीच दहशतवादी, आंतकवादी, नक्षलवादी, माओवादी बनवत आहोत. सर्वच जगाला नव्या युगाचा-नव्या विचारांचा सदासर्वकाळ निश्चित दिशा देणारा शिवविचारच आम्हाला उपयुक्त आहे. तो वैयक्तिक तसेच राष्ट्रीय पातीवर प्रामाणिकपणे स्वीकारावा. शेजारील राष्ट्रांना मित्र बनविण्यासाठी भारतानेच पुढाकार घ्यावा.

**जय जिजाऊ! जय शिवराय !!**

**संदर्भग्रंथ**

1) छत्रपती शिवाजी आणि शिवकाळ – डॉ. रामभाऊ मुटकुळे / डॉ. राजेंद्र धाये.
2) छत्रपती शिवाजी महाराज – वा.सि. बेंद्रे
3) शिवचरित्रापासून काय शिकावे – डॉ. जयसिंगराव पवार
4) शिवचरित्र – डॉ. पुरुषोत्तम खेडेकर, जिजाई प्रकाशन पुणे,
5) कुळवाडी भूषण राजा शिवछत्रपती – संपादक प्रा. सिताराम काकडे
6) विश्ववंद्य राजा शिवछत्रपती – प्रा. श्रीमंत कोकाटे, जिजाई प्रकाशन, पुणे.

## गो. ग. आगरकरांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत योगदान

**डॉ. विष्णू नामदेव लांडे,**
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशीम जि. वाशीम
मोबाईल - 9822319415
Email- vishnulande1@gmail.com

गोपाळ गणेश आगरकर हे महाराष्ट्रातील सुप्रसिध्द समाजसुधारक म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचा जन्म १४ जुलै १८५६ मध्ये सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडजवळील टेंभू या गावी झाला. त्यांचे व्यक्तिमत्व निष्कलंक, निस्वार्थी, कृतिशील, चारित्र्यसंपन्न असल्याचे दिसून येते. त्यांनी विवेकवाद, बुध्दिनिष्ठ तत्वज्ञानाची महाराष्ट्राला देणगी दिली. समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, दुराग्रह, अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य खर्च केले. समाजातील वाईट, बुरसटलेले विचार दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या कृतीतून आणि लेखणीतून प्रयत्न केले. त्यांच्या एकूणच कार्यातून त्यांनी बुध्दिवादाचे समर्थन, अंधश्रध्देस विरोध, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार, विवेकनिष्ठा, स्वातंत्र्यप्राप्ती आणि लोकशिक्षण यावर लक्ष केंद्रित केले असल्याचे आढळून येते.

गो. ग. आगरकरांनी विविध विषयांवर, विविध वृतमानपत्रांतून विस्तृत असे लेखन केले आहे. त्यांनी विविध लेखांबरोबरच शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचा मराठी अनुवाद 'विकारविलसित' या ग्रंथाच्या रूपाने केला. 'डोंगरीच्या तुरूंगातील 101 दिवस' मधून कारागृहातील स्वत:बरोबरच, कैद्याचेही अनुभवकथन केले. याशिवाय 'वाक्यमींमासा' हा व्याकरणावरील ग्रंथही लिहिला असल्याचे दिसून येते.

गो. ग. आगरकरांनी शैक्षणिक कार्यही केले असल्याचे आढळून येते. एम.ए. झाल्यानंतर सरकारी नोकरी न पत्करता केवळ निर्वाहापुरते वेतन घेऊन शिक्षण कार्यात आयुष्य घालविण्याचा संकल्प केला. त्यातूनच 1 जाने 1880 रोजी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कुल'ची स्थापना केली.[i] पुढेचालून 1884 च्या अखेरीस 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. नंतर याच सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी पुण्यामध्ये फर्ग्युसन कॉलेज सुरू केले. याच फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये त्यांनी काही काळ प्राचार्य म्हणूनसुध्दा काम केले. खरे तर त्यांना बी.ए.ला असतानाच दमा या आजाराने

ग्रासले होते. या आजाराचा आयुष्यभर सामना करीत त्यांनी अध्यापन, प्रशासन व उल्लेखनीय अशा सामाजिक कार्यात महत्वपूर्ण असे योगदान दिले.

